
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास.
सं. क्र. ४४५

REFBK-0017695

REFBK-0017695

# मुंबई ते मॉस्को
# व्हाया लंडन





REFBK-0017695

# मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन

माधव गडकरी

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

मूल्य आठ रुपये

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई

प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव नाका, मुंबई ४

प्रथमावृत्ती : २३ जानेवारी १९६९
कै. राम गणेश गडकरी यांचा ५० वा पुण्यतिथी दिन.
© सौ. कुंदा गडकरी, राणू निवास, औरे रस्ता, पणजी ( गोवा )

मुद्रक : चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती,
४६१।१, सदाशिव पेठ, पुणे २

# अनुक्रमणिका


१ आकाशात झेप १
२ रोमचे पहिले दर्शन ८
३ ब्रुटस इज ॲन ऑनरेबल मॅन १४
४ राणीच्या राजधानीत १९
५ कोळशातून जन्मलेले कार्डिफ २५
६ रॉबर्ट क्लाइव्हच्या पेनार्थमध्ये ३३
७ वेल्श कुटुंबातील एक संध्याकाळ ४१
८ जेव्हा वसंत फुलतो ४५
९ बर्ट्रांड रसेल – एक ओझरती भेट ५१
१० कीर्तिवंताची घरे आणि स्नोडोनियाची शिखरे ५५
११ वेल्श मजुराच्या जीवनाची रुपेरी कडा ६२
१२ वेल्सचे मामा वरेरकर ६७
१३ स्वप्नात रंगलेले ब्रिस्टल ७०
१४ बदलणारे बर्मिंगहॅम ७५
१५ एव्हनच्या तीरावर ८२
१६ पूर्व इंग्लंडची सफर ८९
१७ चार्लस डिकन्सचे इप्सविच ९९
१८ ब्रिटिश वृत्तपत्रांचे जग १०४
१९ ब्रिटिश संसदेत ११६
२० साऱ्यांचे जीवन व्यापणारे टेलिव्हिजन १२३
२१ बिटल्स व बीटनिक्स यांचे धुंद जग १३३

२२ ब्रिटनमधील लोक आहेत तरी कसे १४५
२३ झिमझिम पावसातील पारी
व सरोवराकाठचे झुरिक १५३
२४ पब्ज् व नाईट क्लब्ज् १६०
२५ दुभंगलेले बर्लिन १७१
२६ हॅम्बुर्ग बंदरात १८२
२७ बव्हेरियातील म्युनिक १८९
२८ पाश्चात्य रंगभूमी व चित्रपट १९७
२९ साम्यवाद्यांची मक्का – मॉस्को २०६
३० क्रूश्चेवची निंदा आणि
ते न संपलेले ‘ पेन्शन ’ २१२
३१ क्रेमलिनच्या परिसरात २१९
३२ अखेर ते चालणे व चरणेही संपले २२४

प्रकरण पहिले

# आकाशात झेप

१९ एप्रिल १९६५. रोज येणारी ती सुखद संध्याकाळ. उत्साहाचे तांबूस वस्त्र लेवून माझ्याही जीवनात ती आज आली होती. दुसऱ्यांना निरोप देताना विमानतळावर पाहिलेले अनेक प्रसंग माझ्या स्वतःच्या जीवनात आज घडत होते. ती नातलगांची, मित्रांची गर्दी. ते हारतुरे. विजेसारखा चमकून जाणारा तो प्रकाश व त्यावर टिपलेली ती छायाचित्रे. फोटोत येण्याचा प्रत्येकाला आग्रह. अभिनंदनाची ती हस्तांदोलने. मधून ध्वनिवर्धकावरून येणाऱ्या कोकीळकंठी घोषणा. मोराच्या पिसांनी गालाला स्पर्श करावा तसे त्या कोकिळेने उच्चारलेले ' थँक्यू ' हे मोहक शब्द. त्या शब्दांच्या दिशेने सर्वांच्या माना वळत. कंठ कोकिळेचा परंतु रंग हंसाचा असावा. आवाजाच्या दिशेने मान वळविली म्हणून बोलणाऱ्याचा मुखवटा थोडाच दिसणार होता. तरी सारे माना वळवीत होते.

विमानतळ हा रोज फुलणाऱ्या फुलासारखा नेहमी कसा टवटवीत वाटतो. दिव्यांचा झगझगाट, साड्यांची सळसळ, यांनी कसा तो भारलेला असतो. परदेशीय मुखवट्यांतून आंतरराष्ट्रीय सलोखा येथे चमेलीच्या सुवासासारखा दरवळत असतो. सारे हसत असतात, सारे भेटत असतात.

मीही हसत होतो, मीही भेटत होतो. मोठ्या कष्टाने मिळविलेला पासपोर्ट खिशात चाचपडत होतो. परकीय चलनाचे ते सरकारमान्य तीन पौंडांचे ' अवाढव्य ' भांडवल ताब्यात घेत होतो. ती पोलीसतपासणी व मग ते कस्टम्स. परतताना हे आपली अधिक

'चहा' करतील याची आठवण येऊन मी तिकडे एक कटाक्ष टाकीत पुढे जातो.

प्रवासी विमानाकडे जायला निघतात. मीही बॅग उचलतो. इतक्यात एक हवाई 'स्वागतिका' धावत येते. कुठची तरी तपासणी राहिलेली असते. ओळखीचा पोलीस अधिकारी घेऊन लावलेला पहिला नंबर आमचा फुकट गेलेला असतो. पासपोर्टवर कसला तरी शिक्का मारावयाचा अखेर राहतोच. सारे प्रवासी विमानाकडे जात असतात व आम्ही पुन्हा मागे येतो.

आपण अती चलाख आहोत असे ज्याला वाटत असेल, त्याने परदेशी निघावे. मग विमानात पाऊल ठेवीपर्यंत त्याला ठायीठायी आपले गर्वहरण झाल्याचा अनुभव मोठ्या समृद्धतेने घेता येतो. पासपोर्ट ऑफिसमध्ये त्याची अर्धी टोपी उडते. उरलेली उडते ती रिझर्व्ह बँकेचा 'पी' फॉर्म मिळविताना. अखेरच्या दिवसापर्यंत काहींना या दोन्हींचे दर्शन होत नाही. विमानात न बसता त्याला आपण हवेतच तरंगत आहोत असे अनेकदा वाटते. 'लंडन, पॅरिस, रोम, बर्लिन, मॉस्को' असे स्वप्नात पुटपुटण्याऐवजी तो 'पासपोर्ट', 'पी फॉर्म' असे सारखे बोलत राहतो.

आणि हे सारे मिळवावे व ते दाखवून विमानाकडे निघत असताना कुणीतरी परत न्यावे! पुन्हा तो भीतीचा निश्वास. सारे भांबावून गेलेले.

परंतु कुंडलीतील सारे शुभ ग्रह एकत्र आले असल्याने आम्ही पुन्हा विमानाकडे जातो, हात उंचावीत निरोप घेत. आता कितीतरी लोक रोज परदेशी जातात. त्यात पूर्वीची नवलाई राहिलेली नाही. महाराष्ट्रीयही यात मागे नाहीत. पत्रकारांना तर परदेश-प्रयाणाची सर्वांत अधिक संधी. तरीही प्रत्येकाच्या जीवनात त्याचे महत्त्व असतेच. लहानपणापासून परदेशी जायचे, विशेषत: लंडनला, ही प्रत्येकाची आकांक्षा. १५० वर्षे ब्रिटिश राज्य करून गेल्याने लंडनची ही ओढ सर्वांत अधिक असावी. आज मीही निघालो होतो. समोर चमचमणाऱ्या त्या हवाई जहाजाच्या दिशेने चाललो होतो.

ही पावले टाकताना माझे गणगोत मला पाहात होते. आमच्या गडकरी घराण्यातील पहिला असामी परदेशी चालला होता. याचा सर्वांत अभिमान ज्यांना वाटला असता ती व्यक्ती मात्र तेथे नव्हती — माझे वडील. या सांताक्रूझ विमानतळाबाहेर १०० पावलांवर अखेरचे दिवस त्यांनी काढले व तेथेच ते निवर्तले. रोज ते या विमानतळावर संध्याकाळी फिरावयास येत. रोज विमाने उतरताना पाहात आणि म्हणत, "तू परदेशी केव्हा जाणार?"

आज मी निघाली होतो, विमानाच्या पायऱ्या मी चढत होतो, परंतु ते पाहावयास वडील मात्र नव्हते.

'अलिटालिया' या इटालियन कंपनीच्या विमानाने आम्ही निघालो होतो. 'अलिटालिया' म्हटले की नाणेघाटातील अपघाताची आठवण येते. अनेकांनी या भलत्याच विमानाने तुम्ही का चालला आहात म्हणूनही विचारले; परंतु विमान कंपनीच्या पाहुणचारात शहरे कशी पाहता येतात याचा गुरुमंत्र आमच्या प्रवासी कंपनीतील स्नेह्याने दिला असल्याने जाताना रोम व येताना मॉस्को पाहण्याचे मी ठरविले होते. 'अलिटालिया'चे विमान हे रोमलाच संपत असल्याने पुढचे विमान मिळेपर्यंत मी रोममध्ये अलिटालियाचा पाहुणा म्हणून राहू शकणार होतो.

इटालियन हवाई सुंदरीचे सस्मित स्वागत स्वीकारून मी विमानात चढलो. 'अलि-टालिया'चे हे विमान टोकियोहून आले होते. तरी त्यामध्ये फार गर्दी नव्हती. बऱ्याच जागा व विशेषतः कोपरे रिकामे होते. रात्रौ बरोबर ८–२५ ला विमान सुटले. सांताक्रूझ विमानतळाचे दिवे दिसेनासे झाले व चमचमती शहरे पाहात आमचा प्रवास सुरू झाला. थोड्याच वेळात आम्ही गुडूप अंधारात शिरलो. काही क्षणांपूर्वीच सोडलेली पृथ्वी मुळीच दिसेना. ढगांवरून विमान चालत असल्याने आमच्यात दुरावा निर्माण झाला होता. २८ हजार फूट उंचीवरून आम्ही उडत होतो. एव्हरेस्ट शिखर फक्त एक हजार फूट उंच असल्याची आठवण झाली व मग एव्हरेस्ट विजेत्यांची इतकी जाहिरात का होते ते कळेना. एव्हरेस्ट शिखरावर एक छोटासा विमानतळ बांधावा व सबंध जगातील हौशी प्रवाशांना तेथे आणून भारताने भरपूर परकीय चलन कमवावे अशासारख्या काही कल्पना हवेत असल्याने सुचू लागल्या.

विमान बरेच वर-खाली होत होते. मेघांशी त्याचा चाललेला हा सुसंवाद आम्हांला थोडा जड जात होता. बोट सागराच्या लाटा कापीत जात असताना जसा आवाज होतो तसाच आवाज विमान ढगांतून अगर ढगांवरून जात असतानाही होत होता. विमानाला हवाई जहाज हे दिलेले हिंदी नाव खरोखरच अतिशय सयुक्तिक आहे.

विमान सुरू झाले तेव्हा प्रथम आली ती चॉकोलेट्स. चॉकोलेट्स ही मोठ्या माणसांनी खायची 'चीज' आहे, हे मी बरेच दिवस विसरलो होतो. आकाशातील हवा अपरिचित असल्याने जिभेवर चॉकोलेट तरंगत असले की पोटात दुसरे काही घोटाळत नाही अशी

काही कल्पना. चॉकोलेट खाऊन आम्ही जरा बाहेर अंधारात डोकावतो तो पुन्हा ती विशेष सुंदर नसलेली हवाई सुंदरी हजर. मान वळवून पाहतो तो वाफ निघत असलेला पांढरा पदार्थ. इटालियन स्पगेटी आली असावी असे मनात यायला व ते छोटे टॉवेल असल्याचे लक्षात यायला एकच गाठ. पासपोर्ट व 'पी' फॉर्म मिळविताना व विमानतळावरील सर्व समारंभांतून पार पडताना आम्हांला आलेला शीण जावा यासाठी ते गरम टॉवेल आले होते. त्यांनी तोंड पुसण्याची कल्पना मोठी रम्य वाटली. मुंबईच्या गर्दीतून व गाड्यांत उभे राहून घरी परतल्यावर एका ट्रेमध्ये असाच गरम टॉवेल घेऊन पत्नीने स्वागत करण्याची कल्पना मनात घोळू लागली. जरा तोंड पुसून हाशहुश करतो तोच पुन्हा कुणी तरी हजर. या वेळी हसणाऱ्या दंतपंक्ती नव्हत्या. इटालियन आचारी फार चांगला असतो याची आठवण करून देणारी मोठ्या नाकाची एक व्यक्ती सरबताचे पेले घेऊन उभी होती. या वेगाने खाद्यपदार्थ येत राहिले तर रोमपर्यंत मोठी चंगळ होणार या कल्पनेने थोडा सुखावलो; परंतु विमानात बसून साधे सरबत पिण्याची कल्पना काही पटेना. जे आले आहे ते घ्यावे व सध्या लागलेली भूक भागवावी म्हणून सरबत संपविले.

विमान सुटल्यानंतर थोड्याच वेळात तुम्हाला झकास 'डिनर' येईल असे अनुभवी मित्रांनी सांगितले होते. त्यामुळे ही पहिली सलामी आहे असे समजून पुढच्या खुर्चीतून परमेश्वरासारखे प्रकट होणारे ते छोटे टेबल मी सरबताचा ग्लास उचलून नेल्यावरही उघडेच ठेवले. परंतु एका हवाई सुंदरीने ते जाताना पाहिले आणि चटकन तिने ते बंदही केले. मी तितकेच मनोहर हास्य तोंडावर खेळविण्याचा प्रयत्न करीत वर तिला 'थँक्यू' म्हटले.

ते सरबत गेले. टेबल बंद झाले. बाहेर गुडूप अंधार. मग आतील सोबत्यांशी गप्पा सुरू झाल्या. 'सोलापूर समाचार'चे सहसंपादक श्री. प्रभाकर तुलकर हे माझे एक सोबती. त्याशिवाय श्री. मंगेश देशपांडे हे डेअरी व्यवसायाचे शिक्षण घेण्यासाठी प. जर्मनीला निघाले होते. गप्पा थोड्या रंगल्या. इतक्यात घोषणा झाली. आमचे विमान कराचीच्या जवळ आले होते. आपला देश सोडून परदेशात आपण आलो आहोत हे प्रथम जाणवून दिले, ते या घोषणेने. दिव्यांच्या लखलखाटात उजळून निघालेले कराची आमच्या दृष्टिपथात आले होते. एका बाजूला समुद्राची किनारपट्टी व दुसरीकडे दिवे असे मुंबईसारखेच दृश्य मला दिसत होते. मुंबईच्या लोकल गाडीत आवाज चढवून 'घणो भाव' करणाऱ्या सिंधी नागरिकांच्या कराचीला आमचे विमान क्षणात उतरणार होते. पट्टे लावण्याच्या सूचना आल्या, विमानाने मूक गिरकी घेतली व पक्ष्याच्या सहजतेने त्याने

भूमीवर पाय टेकले. विमानाची चाके जेव्हा धरणीला स्पर्श करतात तेव्हा ते मीलन क्षणभर जाणवते. बाकी सारे कसे सहजतेने चालते.

कराची विमानतळावर आम्ही उतरलो तेव्हा ९-३० वाजले होते. एका कॉफीगृहाकडे आम्हांला नेण्यात आले. परदेशप्रवासात सरबत, कॉफी घेण्याची कल्पना मोठी विचित्र वाटली. भारतीय प्रवाश्यांबद्दलचा हा अपसमज मोठा खेदकारक वाटला. विमान ढगाच्या पिसांतून उडत असावे. खाली लखलखणारे दिवे, आपण अधांतरी उडत आहोत ही सुखद जाणीव देत असावेत, स्वस्तात मिळालेल्या सिगारेटच्या धुराने सोनेरी रंग घेतलेला असावा. अशा वेळी त्या हवाई सुंदरीने समोरच्या छोट्याशा टेबलावर नर्तकीच्या लालित्याची आठवण करून देणारे एक सुरेख ग्लास समोर आणून ठेवावे. झाडावर पिकलेल्या संत्र्याची रसरसता व लकाकी असलेले पिवळसर नारिंगी पेय त्यात असावे. त्यात हिऱ्याची चमक असलेला एक बर्फाचा खडा तरंगत असावा. असे काही मनात येत असताना कॉफीगृहाकडे पावले वळेनात. ती कल्पना मनात तरंगवीत आम्ही सरळ बारकडे वळलो. दोन बियरच्या बाटल्या उचलल्या व आता इटालियन स्वयंपाक्याच्या हातचे जेवण मिळणार या रम्य कल्पनेने विमानाकडे पुन्हा चालू लागलो. बियर, स्पगेटी व रोम हे त्या रात्रीचे आमचे परवलीचे शब्द. घड्याळात सहज पाहिले. रात्रीचे ११ वाजले होते.

विमान पुन्हा उडाले. बियरचे घुटके व सिगारेटचे झुरके यांच्या संगतीने गप्पांतील विषयांची विविधता वाढली. परंतु एकीकडे घड्याळाचे काटे फिरत होते तरी ती स्पगेटी व इटालियन स्वयंपाक्याने केलेले ' डिनर ' काही येईना. चॉकोलेट, गरम टॉवेल व सरबत इतकीच सरबराई इटालियन यजमानाकडून आतापर्यंत झालेली होती. ती हवाई सुंदरी इकडून तिकडे फेऱ्या मारीत होती. परंतु समोरची छोट्या टेबलाची कळ काही दाबत नव्हती. घड्याळात पावणेबारा झालेले पाहिले. संध्याकाळी ६ लाच चहा घेऊन घर सोडले होते. तेव्हा न राहवून आम्ही अखेर विचारलेच,

" What about the dinner ? "

" It's coming. "

त्या उत्तराने आमचे विमान सुखरूप जमिनीवर उतरल्यासारखे वाटले.

तो सरबत घेऊन आलेला रोमन राजा पुन्हा येऊन आमच्याजवळ गंभीरपणे उभा राहिला. आमची नजर जाताच त्याने अदबीने मान नमविली. परंतु चेहऱ्यावरचा भाव असा, की ज्यांच्यासमोर मी मान तुकवीत आहे ते भारतीय भुक्कड आहेत याचा विसर

पडला नाही हे व्यक्त करणारा.

अखेर मध्यरात्र झाली. काटा बारावर सरकला. इटालियन वेळेप्रमाणे डिनरची वेळ आता जवळ आली होती. अखेर एका सुंदर ट्रेमध्ये ठेवलेले ' डिनर ' नाजुक हातांनी पुढे ठेवले गेले. पुढील खुर्चीच्या पोटातील छोटे टेबल बाहेर आले. जेवण अगदी मोजके होते. आपल्या भोजनगाडीला असलेले भाताचे इंजिन व इतर डबे त्याला नव्हते. विविध श्वापदांचा समाचार घेण्याचा माझा कार्यक्रम विमानातूनच सुरू झाला. फ्रीजमध्ये ठेवलेला ' पोर्क ' या भारदस्त नावाने ओळखला जाणारा डुकराच्या मांसाचा तुकडा बटाट्याच्या तळलेल्या तुकड्याबरोबर मी स्वाहा केला. जगातील सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या इटालियन स्वयंपाक्याने त्यापैकी एकाही पदार्थात आपले कसब ओतलेले नव्हते.

विमानात झोप घेण्याचा माझा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही. विमान आता कुठेही थांबणार नव्हते. सरळ रोमन साम्राज्यात आम्ही पोहोचणार होतो. कानांत कापसाचे बोळे घालूनही ढग कापत जाणाऱ्या विमानाचा आवाज काही झोप लागू देत नव्हता. मधूनच कुणी तरी प्रवासी आपल्या डोक्यावरचा दिवा लावी. आपला देश आपण सोडला आहे ही कल्पनाही थोडी मन अस्वस्थ करीत होती. विमान हजारो मैलांचे अंतर वेगाने तोडीत होते. माझ्या घड्याळात सकाळचे पाच वाजले होते आणि इतक्यात एका तासाचे आत आपण रोमला उतरू अशी घोषणा झाली. डोळे चोळीत बाहेर डोकावू लागलो. निराशेचा गुडूप अंधार व मधूनच चमकणाऱ्या तारकांसारखे दिसणारे आशेचे दिवे ओलांडीत विमान धावत होते. खाली तारका वर तारका. मेघांवर स्वार होऊन आमचे आकाशयान उडत होते.

माझ्या घड्याळात सहाला पाच मिनिटे होती आणि १ वाजून २० मिनिटे फक्त झाल्याची घोषणा मंजुळ आवाजात झाली. याचा अर्थ युरोपातील घड्याळाप्रमाणे त्यांनी आम्हांला आठ वाजता ' डिनर ' दिले होते. दोन खंडांतील ही काळाची तफावत आमच्या पोटावर मारून गेली होती. मुकाट्याने घड्याळ फिरविले. काळाचे काटे मागे फिरविण्याची ती आमची पहिली वेळ. पाश्चिमात्य निदान वेळेच्या बाबतीत तरी आपल्यापेक्षा मागे आहेत या कल्पनेने बरे वाटले. इकडे विमानाने रोम विमानतळावर एक घिरटी घालून पाय टेकले होते. मुंबई ते रोम हा ६,२६२ किलो मीटर्सचा प्रवास आम्ही १० तासांत संपविला होता. ५६° उष्णतामान असल्याची घोषणा विमानात ऐकली होती. त्यामुळे विमानातून बाहेर येताच पहिले स्वागत केले ते बोचऱ्या वाऱ्याने. वसंत ऋतूत तुम्ही जात आहात,

तुम्हाला थंडी लागणार नाही असा उबदार सल्ला घेऊन आम्ही आलो होतो व येथे तर दिल्लीतील डिसेंबरची थंडी पडली होती. मर्क्युरीच्या प्रकाशात रोम विमानतळ उजळून निघाला होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या खुणा प्रथम जाणवल्या त्या रोम विमानतळावरच. रोमच्या वेळेप्रमाणे रात्री २–३० वाजता चाळिशी उलटलेल्या स्त्रिया तो विमानतळ उंच झाडूंनी पुसून काढीत होत्या. युरोपातील जी राष्ट्रे महायुद्धात लढली त्या सर्वांचेच पुरुषबळ कमी झाले. स्त्रिया या आधीपासून समान भूमिकेवर काम करीत असल्याने त्यांनी पटापट पुरुषांच्या जागा घेतल्या. पाश्चिमात्य जगात कोणतेही काम हलके गणले जात नाही. रात्री दोन वाजता पन्नाशी ओलांडलेल्याही काही स्त्रिया ते काम करीत असताना पाहून मला आश्चर्य वाटले. त्या निळ्या गणवेषात होत्या. व्यवसायाप्रमाणे येथे समाजातील स्थान ठरत नसले तरी व्यवसायाप्रमाणे भाषा व तिचा ‘ व्हॉल्युम ’ ठरत असावा. इटालियन शब्दांची फेकाफेक चालू होती. आम्हांला एक शब्दही कळत नव्हता. पासपोर्ट दाखवून सामान तेथेच ठेवण्याच्या सूचना देऊन आम्ही बाहेर आलो, तर ‘ अलिटालिया ’ कंपनीचा माणूस समोर उभा होता. रोममधील हॉटेलचा पत्ता व कुपन त्याने आमच्या हाती दिले व बाहेर येऊन आम्हांला एका कोच-ड्रायव्हरच्या स्वाधीन केले.

आमचे पहिले स्वागत त्याने आपली टोपी जोराने आपटून केले. त्याच्या मनात ती सफर करावयाची नव्हती. गाडीत आम्ही फक्त सहा प्रवासी होतो. कोचमध्ये बसलो तेव्हा माझ्या फिरवलेल्या घड्याळात आता २–४५ झाले होते. आधीचे सात वाजलेले मी विसरलो होतो आणि अजून रात्रच आहे हे मान्य करून पुन्हा झोपण्यासाठी हॉटेलकडे चाललो होतो. एका रात्रीत दोनदा झोपण्याचा अनुपम आनंद मला आज मिळणार होता.

## प्रकरण दुसरे

# रोमचे पहिले दर्शन

एका रात्रीतील दुसरी झोप संपली व जाग आली तेव्हा जाणवले की, ज्युलिअस सीझरच्या रोममध्ये मी प्रवेश केला होता. क्लिओपात्राच्या कथेने रंगलेल्या रोमचे दर्शन मी घेत होतो. ही क्लिओपात्रा या रोमन साम्राज्याच्या गहिऱ्या राजधानीत कधीच आली नाही; परंतु तिने प्रत्यक्ष न येता रोमरोमी संचार केला. मी आलो तेव्हा हे रोम झोपलेले होते. मी जागा होतो. नीरोच्या फिडलचे सूर कुठून तरी येत असावेत. त्या सुरांचा मागोवा घेत मी रोममध्ये शिरलो, तेव्हा त्या साम्राज्याचे जुने अवशेष ठिकठिकाणी दिसत होते. उरलेली ती तटबंदी सामोरी येत होती. साम्राज्य कोसळले तरी त्या भिंती तशाच उभ्या होत्या. एकामागोमाग एक आम्ही त्या ओलांडीत होतो. मधून मधून दुसऱ्य मोटारीही जात. रोममध्ये प्रवेश करताच जाणवले ते मोटारींचे आकार. साऱ्या मोटारी लहान जणू एखाद्या खेळणीवाल्याने आपल्या दुकानातील लहान मोटारी साऱ्या रस्त्यावरच सोडून दिल्या आहेत. छोटे कुटुंब, छोटी मोटार, छोटे विश्व हे एके काळच्या अवाढव्य रोमन साम्राज्याचे व मुसोलिनीच्या साम्राज्यलालसेचे आज उरलेले स्वरूप असावे. रस्त्यावरची गर्द झाडी व रस्त्याच्या कडेकडेने उभ्या केलेल्या असंख्य मोटारी या ओलांडून आम्ही पुढे चालतो होतो. रोमच्या टर्मिनसवर या टोपी आपटणाऱ्या ड्रायव्हरने आम्हांला उतरविले. तो आमच्याबरोबर चालत जरा पुढे आला. त्याने एका टॅक्सीवाल्यास साद घातली. हिरव्या रंगाची परंतु अगदी छोटी अशी ही टॅक्सी. आम्हांला हॉटेलात सोडण्याची त्याने सूचना

दिली. त्याचाही लालबुंद चेहरा त्या सूचनेने फारसा राजी झालेला दिसला नाही. हे सारे 'अलिटालिया'च्या खर्चाने चाललेले असल्याने आम्ही बेफिकीर होतो. टॅक्सी सुरू झाली व क्षणभर वाटले, की आपण कुठच्या तरी जागतिक शर्यतीत भाग घेत आहोत. ती टॅक्सी तुफान वेगाने, वळणे घेत गल्ल्या ओलांडीत आणि बाजूच्या इमारतींना जणू आमच्याबरोबर दौडत नेत धावत होती. त्यात तिने रस्त्याची उजवी बाजू घेतली होती. त्यामुळे हा ड्रायव्हर काहीतरी चूक करतो आहे असे सारखे वाटत होते. रस्ते सारे शांत होते. रविवारची रात्र जागवून परतणारे काही शुल्हौशी मधूनमधून दिसत होते.

ती शर्यत अखेर संपली आणि एका रात्रीतील दुसरी झोप काढण्यासाठी आम्ही हॉटेलात शिरलो होतो. सात वाजेपर्यंत झोपलो आणि तो इटालियन ब्रेकफास्ट घेऊन या नव्या जगाचे दर्शन घेण्यास बाहेर पडलो. रात्री आलो तेव्हा झोपलेले रोम आता फुलले होते.

चर्चच्या प्रासादतुल्य इमारती, ते अतिभव्य चौक, प्रत्येक चौकात उभारलेले ते सुंदर शिल्प असलेले कारंजे, रोमन साम्राज्याचा कणखरपणा प्रतीत करणारी फत्तरांची घरे, फरशीचे रस्ते आणि त्या रस्त्यांतून धावणाऱ्या हिरव्या रंगाच्या बसेस, हिरव्या रंगाच्या ट्रॅमगाड्या व त्याच गवती रंगाच्या टॅक्सीज्. या धावत्या गाड्यांना बगल देऊन चटपट चालणाऱ्या इटालियन स्त्रिया, डोक्यांवर रंगीबेरंगी रुमाल बांधलेल्या. उंच सुदृढ बांध्याच्या. केसांचे कल्ले कानांखाली काढलेले इटालियन पुरुष. चेहेरे बरेचसे गंभीर, आजूबाजूच्या जगाची विशेष नोंद न घेणारे. हातातील निमुळती छत्री हालवीत एखाद्या कलावंताच्या बेफिकिरीत चाललेले. ती बेफिकिरी वाढविणाऱ्या पेयांच्या दुकानाबाहेर टाकलेल्या त्या निळ्या, तांबड्या रंगांच्या खुर्च्या. जवळजवळ फुटपाथवरच पडलेल्या. त्यात कोपरा गाठून कुणी तरी दोघे बसले आहेत. कुजबूज करीत. मनातील हितगुज सांगत. रोम शहराचे माझ्या मनात चित्र उमटले ते हे असे.

एका वेगळ्या जगात मी आलो आहे याची सारखी जाणीव रोममध्ये भटकताना मला होत होती. दुसऱ्या महायुद्धाच्या जखमा कुठेही दिसत नव्हत्या किंवा त्याचा कुणीही उल्लेख करीत नव्हता. रोमचे नवे रस्ते अतिशय भव्य आहेत व एकमेकांच्या डोक्यावरून मोटारी नेण्याची आधुनिक पद्धती येथे पुरातन झालेली आहे. परंतु शहरातील जुने फरसबंदी रस्ते अगदी अरुंद आहेत. जुन्या जमान्यातील या गल्ल्यांनी शहरी पोषाख चढविलेला जाणवतो. एकमार्गी प्रवासाचे बंधन घालून या लहान रस्त्यांचाही येथे वाहतुकीसाठी

चांगला उपयोग करून घेतलेला आहे. ‘ ऑल्ट ’ म्हणजे थांबा व ‘ अवन्ति ’ म्हणजे चला या इशाऱ्याप्रमाणे माणसे भराभर रस्ते ओलांडीत होती. ‘ अवन्ति ’ हे शब्द अगदी भारतीय वाटले. विक्रमादित्याच्या अवन्तिनगरीतच आपण आलो आहोत असे क्षणभर मनात आले. संस्कृत भाषेचा हा आविष्कार युरोपात नंतर अनेकदा जाणवला.

दि. २० एप्रिल रोजी मी रोममध्ये भटकत होतो. २१ एप्रिल रोजीच हे रोम शहर रोमुलस नावाच्या व्यक्तीने वसविले असे मानले जाते. परंतु केव्हा ? ख्रिस्तपूर्व ७५३ सालात. याचा अर्थ ही नगरी आज २,७०० वर्षांची आहे. ग्रीकांच्या मागोमाग पराक्रमाचे पर्वत रचणाऱ्या रोमन लोकांना त्यांच्या गतेतिहासाचा अभिमान असल्यास नवल नाही. या वाढत्या साम्राज्याबरोबरच रोमचे माहात्म्य वाढले ते पोपच्या वास्तव्याने. ‘ व्हॅटिकन ’ हे रोमचे दुसरे मोठे सामर्थ्य. तलवारीचे तेज व धर्माचे अधिष्ठान दोन्ही रोमला लाभले. ३१३ मध्ये पोपचे अधिकार रोमन साम्राज्याने मान्य केले व तेव्हापासून टिबर नदीच्या तीरावरचे रोम हे सबंध जगातील ख्रिश्चन लोकांचे आशास्थान, स्फूर्तिस्थान झाले.

म्हणून सेंट पीटर्स चर्चच्या समोर येऊन मी उभा राहिलो, तेव्हा कॅथॉलिकांच्या काशीचे हे दर्शन मला विलोभनीय वाटले. दोनच दिवस आधी ईस्टरच्या निमित्ताने पोप पॉल या चर्चमध्ये आले होते व या समोरच्या भव्य चौकात जमलेल्या लाखो इटालियन स्त्रीपुरुषांना त्यांनी दर्शन दिले होते. या समारंभाचे काही अवशेष अजूनही या चर्चच्या पायऱ्यांवर पडून होते. ते ओलांडून सेंट पीटर्स चर्चच्या एकेक दालनातून भटकताना जाणवले, ते आतले निःस्तब्ध शांत वातावरण. मंद दिव्यांतील ती प्रार्थनामंदिरे माणसाला क्षणभर अंतर्मुख करतात.

रोम जळत असतानाही फिडल वाजवीत बसल्याने अमर झालेल्या नीरोची बाग याच चर्चच्या जागेवर होती. सीझरची रक्षा याच भूमीवर टाकण्यात आली अशी या लोकांची भावना. या चर्चच्या समोरचा चौक खरोखरच इतका भव्य आहे, की सबंध जगातील लोकांना मी सामावू शकेन असे बाहू उंचावून तो सांगत असावा असे वाटते. ही अर्ध-वर्तुळाकार इमारत येथे जमलेल्यांना जणू प्रेमाने आलिंगन देते. सीझरपेक्षाही येथे नाव घेतले जाते ते मायकेल ॲन्जेलोचे. उत्कृष्ट शिल्पकार, चित्रकार, स्थापत्यशास्त्रज्ञ अशी ही चतुरस्र व्यक्ती. नव्या रोमच्या सांस्कृतिक विकासाचा पाया मायकेल ॲन्जेलोने घातला असे म्हटले तरी गैर ठरू नये. मेरीच्या मांडीवर पहुडलेल्या, वायाळ स्थितीतील येशू ख्रिस्ताचे

एकच शिल्प या चर्चमध्ये शिरलेल्या माणसाला खिळवून टाकते. मायकेल ॲन्जेलोच्या या शिल्पावर रोखलेली नजर, मातेचे दुःख व येशूचा तो अपरिमित त्याग यात थिजून जाते. १५०६ मध्ये पुन्हा बांधलेल्या या प्रचंड प्रार्थनामंदिराचा घुमट मायकेल ॲन्जेलोच्या कल्पनेप्रमाणे बांधलेला आहे. त्याच्या जोडीला बर्निनी हा दुसरा श्रेष्ठ शिल्पकार होता. सेंट पीटरचा पुतळा हे या चर्चचे दुसरे वैभव. आत आत असा माणूस फिरत राहतो. जणू अंत नसलेल्या एखाद्या इमारतीत आपण शिरलो आहोत, असे वाटते. ईश्वराचा शोध कितीही फिरलो तरी लागत नाही.

ईश्वराचा नाद सोडून आम्हांला रोममध्ये हिंडविणारी बस तरी जागेवर आहे किंवा नाही, याचा शोध घेत आम्ही अखेर बाहेर आलो. बाहेर प्रवाश्यांच्या असंख्य बसेस उभ्या होत्या. त्यांमधून आमची बस शोधून काढणे हेच मोठे दिव्य होते. ईश्वराला शोधण्यापेक्षा आम्हांला ते कठीण वाटले. त्यात प्रत्येक बसचा मार्ग वेगळा होता, इतकेच नव्हे तर भाषा वेगळी होती. आमची बस ही इंग्रजी भाषेत समालोचन देणारी. मार्गदर्शक इंग्रजी बोलणारा. काठी उंचावून तो मागे राहिलेल्यांना बोलावी.

तीन तासांची आमची ही सफर रिपब्लिक स्क्वेअरमधून निघाली होती. मूल्य दोन हजार लिरा. सुरुवातीला हे आकडे ऐकून रोममध्ये आलेला माणूस दबून जातो. परंतु एक लिरा म्हणजे तेथे एक पैशाच्या मोलाची आहे हे लवकरच लक्षात येते व मग हजारांची ऐट तोही मिरवू लागतो. एक पौंडाच्या लिरा आम्ही घेतल्या होत्या आणि हजारो रुपये खर्च करण्याचा आनंद घेत व मधून मधून सरकारचे उरलेले दोन पौंड चाचपत आम्ही फिरत होतो.

सेंट पीटर्स चर्चचे दर्शन घेण्यापूर्वी कॅथॉलिक्स जातात ते ' पॅन्थेऑन 'कडे. खिस्तपूर्व २७ व्या वर्षी बांधलेला हा एक भव्य प्रासाद. त्याचेही नंतर प्रार्थनामंदिर झाले; परंतु याचे वैशिष्टय असे, की हा प्रासाद वर साफ उघडा आहे. एखाद्या वर्तुळाकार सभामंडपासारखा याचा आकार आहे. परंतु वरचा ३५ फूट आकाराचा घुमटासारखा भाग आकाशाला खुला आहे. त्यामधून सूर्यप्रकाशच नव्हे तर पाऊसही सरळ आत पडतो. गेली दोन हजार वर्षे ही निसर्गाची बरसात या प्रार्थनामंदिराने भोगली असावी हे पाया-खालच्या फरशीकडे नजर टाकली की सहज जाणवते.

परंतु ही वर्षा येते व आपले तुषार एका कोपऱ्यातील एका समाधीवर उडवून जाते. रोममधीलच नव्हे तर जगातील कलावंतांच्या भावना जेथे गुंतल्या आहेत, अशी एक मूक

समाधी येथे एका बाजूला आहे. वयाच्या २७ व्या वर्षी मृत्यू पावलेल्या चित्रकार राफेलची ती समाधी आहे. १५२० मध्ये त्याने ही चिरनिद्रा घेतली, परंतु त्याची चिरंजीव ठरलेली चित्रे पाहण्यासाठी जवळच्या एका चित्रकक्षेत रोज हजारो लोक येत आहेत. या चित्रकाराचा एक ओजस्वी मुखवटा त्या समाधीच्याच वर दगडी भिंतीत कोरलेला आहे. अठरा-वीस वर्षांचा मिसरूड न फुटलेल्या युवकासारखा तो दिसतो आणि त्याच्या बाजूला, पलीकडच्या खांबावर नुसतीच एक चौकट आहे. तेथे पुतळा नाही, मूर्ती नाही, चेहरा नाही. राफेलची प्रिया मरीया नंतर गेली. माझा मुखवटा नको, फक्त राफेलच्या शेजारी माझी रिकामी चौकट ठेवा इतकेच सांगून ती गेली. राफेल व मरीया यांच्या अपुऱ्या जीवनाचा अर्थ शोधीत त्या दोन हजार वर्षांपूर्वीच्या प्रचंड दारातून मी बाहेर आलो, तेव्हा मार्गदर्शक सांगत होता, " १६ प्रचंड खांबांवर उभे असलेले हे मंदिर एकदा जळले होते. " राफेल व मरीयाने मृत्यूनंतरही अग्नी भोगला तर !

राफेलची समाधी पाहिली तेव्हा त्याची सुंदर चित्रेच माझ्या डोळ्यांसमोर उभी होती. कारण नुकतीच ती पाहून मी आलो होतो. ' बोर्गीसी गॅलरी ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेत इटालियन व इतर चित्रकारांच्या कलाविलासाचा उत्कृष्ट संग्रह ठेवलेला आहे. बोर्गीसी घराण्याकडे हा चित्रांचा संग्रह होता. तो परस्पर विकण्याचा प्रयत्न या घराण्याच्या सूत्रधाराने केला. मॉर्गन नावाच्या अमेरिकन व्यक्तीने ३ कोटी ' गोल्ड फ्रँक्स् ' देण्याचे जाहीर केले. तेव्हा इटालियन जनता संतापून उठली. इटालियन सेनेटने खास सभा भरविली व ही चित्रकक्षा राष्ट्रीय मालकीची असल्याचे जाहीर केले.

या चित्रसंग्रहात राफेलची मोनालिसा आहे. त्याच्या शैलीचे वर्णन ' Soft, pure and delicate ' या शब्दांत मार्गदर्शक करीत होता. एका स्त्रीचे राफेलने काढलेले व येथे ठेवण्यात आलेले चित्र विकत घेण्यासाठी काही रसिकांनी जंगजंग पछाडले; परंतु रोम ते चित्र देणार नाही. बोटीसेली, कॅरव्हॅचो, टिशन अशा अनेक चित्रकारांनी काढलेली अतिशय सुंदर चित्रे येथे आहेत. कॅरव्हॅचो हा दिसावयास अतिशय कुरूप होता व त्याच्या आयुष्यातील बराचसा काळ तुरुंगात गेला; परंतु जागतिक चित्रकलेत घडलेल्या एका स्थित्यंतराचे जनकत्व त्याच्याकडे जाते. चित्रांच्या बरोबरीने अतिशय सुंदर पुतळे हे या चित्रकक्षेचे आणखी एक वैशिष्ट्य. ओठावर दात दाबून धरले आहेत, डोळे सर्व आवेश ओतत आहेत, अशा त्वेषाने धावून येणाऱ्या एका तरुणाचे सुंदर शिल्प येथे आहे. बर्निनी नावाच्या शिल्पकाराने ते घडविले. त्याच्या स्वप्नातील एका तरुणाचे प्रतीक म्हणून. परंतु

ते दर्शन आहे खुद्द बर्निनीचेच. २२ वर्षांचे वय असतानाचे. स्वतःच्या मनातील सर्व खळबळ त्याने या मूर्तीत ओतली आहे.

बोर्गीसी गॅलरीत प्रेक्षक अखेर घुटमळतो, तो व्हीनसच्या सुंदर पुतळ्याजवळ. कॅनोव्हे नावाच्या मूर्तिकाराने ही रेलून बसलेली व्हीनसची मूर्ती घडविली ती डोळ्यांसमोर एक वेगळीच स्त्री ठेवून: नेपोलियनच्या बहिणीची ही शिल्पाकृती आहे. जिथे ही मूर्ती आज ठेवलेली आहे, तिथेच ती राहिली. या बोर्गीसी घराण्यात नेपोलियनची बहीण आली व रोममध्येच ती रमली.

या चित्रकक्षेतून मी बाहेर आलो तरी कितीतरी वेळ ती सारी चित्रे माझ्या डोळ्यांसमोर फिरत होती. कडक थंडी व बोचरे वारे थोडे अस्वस्थ करीत होते. ते टाळण्यासाठी टुरिंग बसमध्ये शिरलो. बस सुरू झाली. रोमचे रस्ते ओलांडले जाऊ लागले आणि मार्गदर्शकाचा विनम्र आवाज पुन्हा कानावर आला. "या भिंतीपलीकडच्या अंतर्भूमीत शेलेचे थडगे आहे." याच रोममध्ये शेले, कीटस् रंगले, राहिले आणि अखेर त्या लोकप्रिय कवीने रोममध्येच आपला देह ठेवला. राफेल आणि शेले. या पहिल्या भेटीत ही दोन माणसे मनाला चटका लावून गेली.

प्रकरण तिसरे

# ब्रूटस इज अॅन ऑनरेबल मॅन

दुपारी एकच्या विमानाने आम्ही लंडनला जाणार होतो. रोममध्ये तसा अर्धा दिवस आमच्या वाट्याला होता. परंतु रोम सोडण्याचे मनात नव्हते. सकाळचे जेवणही अलिटालियाच्या खर्चाने झाले होते. अखेर हे एकचे विमान चुकवावयाचे आम्ही ठरविले. विमान कंपन्यांच्या सौजन्याचा आम्ही फायदा घेणार होतो. रोममधील एअर टर्मिनसवर गेलो तेव्हा विमानतळाकडे घेऊन जाणारी बस निघून गेली होती. विमानतळ ५ मैल दूर. तुम्हांला आता उद्या सकाळी सहाशिवाय विमान नाही असे त्याने सांगताच आम्ही मनात हुरळलो, परंतु चेहऱ्यावर काळजीचा भाव व्यक्त करीत खोटे चुकचुकलो. विमान सुटण्याआधी १० मिनिटे आपण तेथे पोहोचलो नाही, की त्या विमानाचे आपले तिकीट आपोआप रद्द होते आणि नंतरच्या विमानाने पहिल्याच तिकिटात जाता येते, हे आम्हाला माहीत होते. सकाळच्या विमानातील आमच्या जागा निमूट राखून ठेवल्या व टर्मिनस सोडले ते प्राचीन रोम पाहण्यासाठी.

विमान कंपनीचे सहकार्य मिळाले तरी निसर्गाचे सहकार्य दुर्मिळ झाले होते. "If winter comes, can spring be far behind," हे शेलेचे शब्द आठवून बोचऱ्या वाऱ्यांना मी विसरू पाहात होतो. रोमच्या रस्त्यालगतची ती कण्हेरीची झाडेही वसंताची वाट पाहात होती. शेलेच्या शब्दांवर माझ्यापेक्षा त्यांचा अधिक विश्वास असावा.

परंतु आम्ही ज्या जागी येऊन ठेपलो होतो, ती जागा शब्द मोडणाऱ्या, विश्वासघात

करणाऱ्या माणसांचे कौतुक करणारी होती. ' ब्रूटस इज ॲन ऑनरेबल मॅन, ' असे ॲन्टनीने जेथे सांगितले, ती ही जागा. ' ब्रूटस ! तूही ? ' म्हणून निश्वास टाकलेल्या सीझरचा खून झाल्यावर रोमचे नागरिक जेथे जमले, ती ही जागा. रोमन फोरम या नावाने ती ओळखली जाते. सीझरचे शव घेऊन ॲन्टनी येतो तो शेक्सपियरच्या ' ज्युलियस सीझर ' नाटकातील प्रवेश माझ्या डोळ्यांसमोर ते अवशेष पाहताना उभा राहिला. देश-बांधवांना हाक मारणारे ब्रूटसचे भाषण संपले आहे. " सीझर मला अतिशय प्रिय होता; परंतु रोम त्यापेक्षाही मला अधिक प्रिय होते. " असे ब्रूटस याच जागेवरून जनतेला सांगत आहे, आणि मग ॲन्टनी बोलावयास उभा राहतो. ब्रूटसची तो खरोखर स्तुती करतो असे त्याच्या भाषणावरून वाटत नाही. सीझरला ठार मारले गेले, याचे दुःख त्याच्या अंतर्यामी त्याला टोचत असावे.

सीझर, ॲन्टनी, ब्रूटस आणि ते रोमचे रंगेल लोक यांनी एकेकाळी गाजविलेली ती जागा, पूर वाहून गेल्यावर गाव दिसावे तशी समोर दिसत होती. काळाचा पूर या रोमन फोरमवरून वाहून गेलाच होता; परंतु रोमन साम्राज्याची ऐट मिरवीत ही भव्य कमान अजूनही उभी आहे आणि या कमानीच्या परिसरात पडल्या आहेत असंख्य शिला. राजवाड्यांचे – राजमहालांचे तुकडे. रोमन साम्राज्याचे खरेखुरे अवशेष. एका उंच टेकडीच्या उतारावर व या कमानीपर्यंत असे ते विखुरले आहेत. पॅलेस्टाईन या नावाने ही जागा येथे परिचित आहे. याच जागी अनेक रोमन राजे राहिले. सीझरच्या नंतर ऑगस्टस या त्याच्या दत्तक-पुत्राने रोमन साम्राज्य वाढविले व गाजविले. त्याने आपला राजवाडा येथेच बांधला. ज्याने प्रथम रोम वसविले, त्या रोमुलसचे थडगे या रोमन फोरमच्या परिसरातच आहे. ज्युलियस सीझरची स्मृती उजळविणारे एक मंदिर तेथे आहे. लोकांसाठी इमारती बांधल्या गेल्या, त्या याच भागात. सात टेकड्यांवर रोम वसविले आहे, असे सांगितले जाते. प्रत्यक्षात वीस एक टेकड्यांवर हे वसले आहे व प्राचीन रोम उभारले गेले ते यावरच.

हे प्राचीन रोम कोसळले तरी विशेष न कोसळलेली, प्राचीन रोमची एक प्रचंड वास्तू रोममध्ये उभी आहे. ग्लॅडिएटर्स व त्यांच्या क्रूर श्वापदांबरोबर होणाऱ्या लढाया या आज सर्वश्रुत आहेत. माणसे मारताना व मरताना बघण्याची या रोमन लोकांची, विशेषतः स्त्रियांची हौस, हा अनेक इंग्रजी चित्रपटांचा विषय. ही झुंज जेथे होत असे, ते ' कोलोझियम ' मी पाहिले. पॉलव्हिन ॲम्फिथिएटर हे त्याचे अधिक परिचित नाव. ५०

हजार लोकांची बसण्याची सोय असलेले हे एक स्टेडियम. समोरच्या मैदानात चोर, गुलाम अगर शत्रूचे पकडलेले लोक यांना एकमेकांशी अगर क्रूर जनावरांशी येथे लढण्यास सांगितले जात असे. त्यांपैकी कुणी तरी मृत झाल्याशिवाय खेळ संपत नसे. तेथे क्रौर्य होते, परंतु शौर्यही तेथे नाव मिळवून जाई. जो जिंके त्याच्यावर सारे रोम प्राणाची कुर्बानी करावयास तयार असे. इ. स. ७२ ते ८० या सालात ते बांधले गेले असे सांगितले जाते. रोमचा राजा नीरो याचा सोन्याचा पुतळा या ॲम्फिथिएटरच्या बाहेर होता. ते सुवर्ण त्या साम्राज्याबरोबर लयाला गेले. रोमन वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून हे खुले समरक्षेत्र गौरविले जाते. वर्तुळाकार अशा स्टेडियमच्या पायऱ्या चढून सर्वांत वर गेले की सबंध रोम गाव जवळजवळ दिसू लागते. बड्यांसाठी केलेली खास व्यवस्था अजूनही त्यामधून वेगळी काढता येते.

या भव्य ॲम्फिथिएटरच्या अनेक भिंती आता कोसळल्या आहेत. परंतु यापेक्षा अधिक एक शिलाही आम्ही कोसळू देणार नाही अशी आवेशपूर्ण घोषणा मी येथे ऐकली. कारण चमत्कारावर विश्वास असलेल्या रोमन लोकांची अशी भावना आहे की, ज्या दिवशी हे कोलोझियम कोसळेल त्या दिवशी रोम कोसळेल; आणि रोम कोसळले, की जग राहण्याचा प्रश्नच येत नाही. त्या दिवशी जग उरणार नाही.

या जुन्या कल्पना, हे अवशेष यांच्यामध्ये गुंतून किती दिवस राहावयाचे याचा संभ्रम येथे अनेकांना पडलेला आहे. रोम म्हणजे भूतकालीन अवशेष की एक अत्याधुनिक शहर, हा येथे एक वादाचा विषय आहे. ‘उचलून टाका हे सारे अवशेष व नवी घरे येथे आपण बांधू या’ अशी मागणी आज रोमन तरुणांची आहे. रोमला पूर्वी ‘क्वीन ऑफ वॉटर्स’ म्हटले जाई. त्याची स्मृती ही सुंदर कारंजी देत आहेतच. या कारंज्यांतून उडणाऱ्या पाण्याबरोबर नव्या विचारांचे प्रवाह रोमला अस्वस्थ करीत आहेत. ती तांबूस रंगाची घरे आपला मोहरा बदलू पाहात आहेत. प्राचीन रोमचे दर्शन घेऊन मी परतलो, तेव्हा दिव्यांच्या लखलखाटात रोम न्हाऊन निघाले होते. रोममध्ये प्रचंड इमारती अनेक आहेत. त्या सर्व पाहण्यास एक आठवडा तरी रोममध्येच राहावयास हवे. पोपचे व्हॅटिकन पाहण्याला एक दिवस लागतो. रोम गावापासून ते ५ मैल दूर आहे. प्राचीन वास्तू पाहण्याच्या नादात रोमच्या रस्त्यावर भटकण्याचे सुख जाईल म्हणून आम्ही परतलो. सर्व बार उघडले होते. लोकांचा जल्लोष सुरू झाला होता. गोबऱ्या गालांच्या, मोठ्या नाकाच्या इटालियन तरुणी वेगळा रंग घेऊन बाहेर पडल्या होत्या. जीवनाचा आनंद घेण्यात रोम रंगले होते.

रगदार पेयाचे घुटके घेत आम्हीही त्यात सामील झालो. बाहेर रोम जणू वाहात होते. आम्हांला तर आता निवासस्थानही उरले नव्हते. कोणत्याही मोठ्या हॉटेलात जाऊन राहण्याइतके चलन आमच्या माबाप सरकारने आम्हाला दिले नव्हते व स्वस्तातील हॉटेले ठाऊक नव्हती. थंडी मी म्हणत होती व प्राचीन रोमचा इतिहास आठवीत व नव्या रोमची नवलाई चाखीत आम्ही रात्र बाहेरच काढणार होतो; परंतु चालून अखेर दमलो व विश्रांतीसाठी व थंडी चुकविण्यासाठी एका सिनेमागृहाचा आम्ही आश्रय घेतला.

एक चित्र तेथे चालू होते. युरोपातील चित्रपटगृहात एक फार मोठी सोय आहे. चित्रपटांच्या वेळांबाबत तेथे फारसे बंधन नाही. तिकीट असले तर कोणताही चित्रपट अर्धा संपल्यानंतरही आत शिरावे, व दुसऱ्या ' शो 'चे वेळी पहिला भाग पाहून बाहेर पडावे. हा चित्रपट रोममध्ये फार लोकप्रिय झाला होता. याचे कारण एका इटालियन स्त्रीने इंग्रजी माणसाशी विवाह केल्यानंतर दोघांच्या चालीरीतीतील फरकाने उडालेला गोंधळ या चित्रपटात दाखविलेला होता. इटालियन स्त्री ही आळशी, फटकळ बोलणारी, ' मॅनर्स 'ची फारशी काळजी न घेणारी व जेवणात घोटाळे निर्माण करणारी दाखविलेली होती. साहेबांच्या अती टापटिपीचीही त्यात थट्टा होती. रोममध्ये आम्ही इंग्रजसाहेबाची उडविलेली टिंगल पाहिली तर लंडनमध्ये अमेरिकन लोकांची. एक देश दुसऱ्या देशातील लोकांकडे कोणत्या नजरेने पाहतो याची ही प्रात्यक्षिके.

अखेर चित्रपटही संपला. बार बंद झाले. रोम कालच्या रात्रीप्रमाणे पुन्हा झोपी गेले. आम्ही पुनः जागेच; परंतु आता शेवटचा निवारा म्हणून एअर टर्मिनसच गाठले. कडक थंडी व झोंबरे वारे सहन करणे आता अशक्य झाले होते. अंगावर सूट होता; परंतु आत स्वेटर नव्हता. पोटातील व्हिस्कीच्या गुंगीवर मी फिरत होतो. टर्मिनसवर गेलो. विमानाची तिकिटे ताब्यात घेतली. आम्ही येथेच आता बसून आहोत अशी त्याला सूचना दिली आणि लगेच चांगले कोच पाहून आडवे झालो. झोप केव्हा लागली हे कळलेच नाही.

परंतु मध्येच इटालियन पोलिसाने मला जागे केले. " Is it your passport ? " म्हणून तो मला विचारीत होता. तिकिटे ताब्यात घेण्याच्या गडबडीत तो पासपोर्ट खाली कधी पडला हे मला कळलेच नाही. जिवापलीकडे प्रयत्न करून मिळविलेला व जतन केलेला पासपोर्ट म्हणजे परदेशी निघालेल्या प्रवाश्याचे सर्वस्व. फोटोवरून तो माझ्याकडे आला होता. त्याचे मी मनापासून आभार मानले. नंतर अशी वेळ पुन्हा आली नाही; परंतु ती आठवण मी विसरू शकत नाही. पुन्हा थोड्या गप्पा करून मी व श्री. प्रभाकर

नुलकर तेथे झोपी गेलो. थोड्या वेळाने पुन्हा एका माणसाने आम्हांला उठविले. विमानाची वेळ झाली असे समजून आम्ही ताडकन उठलो; परंतु घड्याळात पाहिले तर पहाटेचे चारच वाजले होते. त्याचे शब्द नीट ऐकूच आले नाहीत. रोम विमानतळावरचे आमचे सामान आता सापडत नसल्याचे तो सांगत होता. क्षणभर आम्ही गारठलोच. आता झोप येणे शक्य नव्हते. रोम विमानतळ गाठावयाचा व सामान शोधून काढावयाचे असे आम्ही ठरविले. आधीचे विमान आम्ही चुकविले असले तरी सामानाने चुकविले नसण्याची शक्यता होती. कोच सुटण्याची वेळ झाली तेव्हा काउंटरवर आम्ही जाऊन उभे राहिलो. तेव्हा सर्वप्रथम त्यांनी आमच्याकडे मागणी केली ती १,५०० लिरांची. त्यात कोचसाठी ८०० लिरा होत्या. उरलेली रक्कम होती ती कराची. २४ तासांपेक्षा अधिक आम्ही रोममध्ये राहिलो होतो व त्याबद्दल ७०० लिरा कर त्यांनी आमच्याकडून घेतला. दोघे मिळून तीन हजार लिरा अर्पण करण्याखेरीज गत्यंतर नव्हते. मुसाफिरीला आम्ही तयार होतो. पुन्हा उत्साहाने निघालो. आता डोळ्यांसमोर होते ते लंडन. लंडन गाठावयाचे होते. रोम सोडावयाचे होते. मनातून मात्र रोम सुटत नव्हते. दिवसभर पाहिलेल्या गोष्टी मनात तरंगत होत्या. वाटत होते, की हे रोम गतेतिहासाचा अभिमान सोडू शकत नाही. एकीकडे आधुनिकतेची हाक त्याला अंतर्मुख करीत आहे. दुसऱ्या महायुद्धाने त्याचे डोळे उघडले आहेत; परंतु रोमचा इटालियन माणूस अजून अघळपघळ आहे. साहेबाची शिस्त व प्रामाणिकपणा सर्वसामान्यपणे कमी. बाजारात वस्तू विकताना एक दर ते कधी सांगणार नाहीत. त्यांचे मांजरावर मात्र भारी प्रेम. कारंजाचे तुषार झेलीत, पक्ष्यांशी खेळत रोमचा रंगेल माणूस स्वतःला विसरतो. जगाला विसरतो. त्याचे स्वप्नमय 'रोम' आता मागे पडत होते. छोटी बस वेगाने धावत होती. 'लिओनार्द डी व्हिन्ची' या प्रचंड विमान-तळाचे दिवे पुन्हा दिसू लागले होते.

प्रकरण चौथे

# राणीच्या राजधानीत

"हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे"

बालकवींनी राणीच्या या निसर्गरम्य राजधानीत न येताच या काव्यपंक्ती कशा लिहिल्या कुणास ठाऊक. आपल्या हिरव्या तळकोकणाने ही स्फूर्ती त्यांना दिली असावी. ब्रिटनला येण्यापूर्वी एक महिनाच आधी मी कोकणात फिरून आलो होतो. रत्नागिरीचा काळा कातळ इंग्लंडच्या या हिरवळीसमोर परीभोवती नाचणाऱ्या राक्षसासारखा भासतो; परंतु नंतर सावंतवाडीकडे जाताना हिरव्या तळकोकणाचे दर्शन मलाही घडले होते. हिरवेगार डोंगर व हिरवीगार झाडी. परंतु इतक्या चौरस भारतात हिरव्या पाचूंनी नटलेली विस्तीर्ण पटांगणे कधी दिसत नाहीत. लंडनसारख्या राजधानीच्या, गजबजलेल्या शहरात सर्वांत प्रथम काही जाणवत असेल तर हे हिरवे माळ. हरित तृणांच्या मखमलीचे हे गालिचे. सुंदर, रुपेरी वस्त्राने सर्वांग झाकणाऱ्या एखाद्या स्त्रीसारखी ही धरणी जणू हिरव्या शालूने नटली आहे. राणीच्या राजधानीचे हे पहिले दर्शन मला घडले ते आकाशयानातून. ती नवलनगरी समोर, खाली, सभोवार मी पाहात होतो. रोमहून सकाळी ६-३० वाजता सुटलेले आमचे विमान पॅरिसला बगल देऊन थेट इंग्लिश खाडीवर अडीच तासांत दाखल झाले होते. इंग्लिश खाडी! ब्रिटनचे महायुद्धात रक्षण करणारी इंग्लिश खाडी! लहानशी चिंचोळी, परंतु युद्धाच्या लाटा थोपवू शकणारी. त्या लाटांवर आरूढ होऊन पोहत जाण्याची जिद्द

तरुणांच्या मनात निर्माण करणारी. ती पाहावी म्हणून सारा प्राण डोळ्यांत आणून मी खाली डोकावले; परंतु खाली अथांग मेघसागर पसरलेला. विमान ढगांवरून उडत असल्याने ती इंग्लिश खाडी अखेर मला दिसलीच नाही. इतक्यात लंडन जवळ आल्याची घोषणा झाली व विमान मेघडंबरीतून खाली उतरले. भाटाने आधी सौंदर्य गावे व नंतर छुमछुम पावले टाकीत मुखड्यावरचा जाळीदार पडदा दूर सारीत एखाद्या लावण्यवतीने प्रवेश करावा, अशा थाटात ही राणीची राजधानी माझ्यासमोर प्रकट झाली. उगवत्या सूर्यप्रकाशात चेहऱ्यावरील धुक्याचे वस्त्र बाजूला करीत एके काळी साऱ्या जगाचे राजकारण खेळणारे, प्रेरणा देणारे लंडन माझ्या दृष्टिपथात आले होते.

हिरवेगार विस्तीर्ण माळ, त्यांच्या आडोशाला उभी असलेली ती एकसारखी दिसणारी दुपाखी घरे. तांबड्या लाल कौलांनी झाकलेली. ती साधी धुराडी कशी मिनाराच्या ऐटीत त्या घरांवर मिरवणारी. रंग पिवळट किंवा मातट; परंतु घरांची ठेवण इतकी सारखी व दोन घरांतील अंतरही इतके कमी, की एकमेकाला भिडून उभ्या राहिलेल्या सैनिकांसारखी जणू त्यांची कवायत चालली आहे, असे वाटावे. आमचे नशीबही इतके जोरदार, की त्या वेळी सूर्याची ही लहरी स्वारी या राणीच्या राजधानीत आली होती. त्या प्रकाशात उजव्या हाताला दूरवर पार्लमेंटचा मनोरा व त्याच्याजवळून वाहणारी ती टेम्स नदी दिसत होती. आजीबाईच्या ऐटीत चालणाऱ्या एखाद्या चिमुरड्या पोरीसारखी ती टेम्स नदी मला भासली.

लंडन शहर ओलांडून विमान पुढे चालले होते. विमानतळ पुन्हा राजधानीपासून दूर. शहराबाहेर जोडणारे लांबच लांब व अगदी सरळ असलेले रस्ते झरझर मागे पडत होते. एकमेकांच्या डोक्यावरून धावणारे अनेक रस्ते त्यात होते व अगणित मोटारी एकमेकांचा पाठलाग करीत धावत होत्या. सारी रीघ लंडनकडे लागली होती.

आता रोमच्या आठवणी मागे पडत होत्या. उरलेल्या लिरा सुव्हनिर म्हणून मी जपल्या होत्या. मिलनच्या यात्रेला निघालेल्या इटालियन तरुणीची छोटी प्रतिकृती असलेली बाहुली मी रोम-विमानतळावर विकत घेतली होती. रोम-साम्राज्यातून आणलेली ही एव्हढीच लूट. प्रवास चालला होता ‘ क्ान्टास ’ या ऑस्ट्रेलियन कंपनीच्या विमानातून. ‘ अलिटालिया ’ नंतर ‘ क्वान्टास ’. विमान भव्य होते. हवाई सुंदरी प्रभातीच्या उत्साहाने बोलत होती, वावरत होती. आमच्या मनात दडलेली एका गोष्टीबद्दलची भीती मधेच डोके काढी. रोम-विमानतळावर आमचे सामान सापडलेले नव्हते. आम्ही चुकविलेल्या विमानाने त्याने लंडन गाठले असावे अशी आम्ही आशा धरून होतो. उतरल्याबरोबर सर्वप्रथम सामानाचा

शोध करणे आवश्यक होते. विचारांपेक्षा अधिक वेगाने विमान धावत असावे. लंडन विमानतळाच्या भव्य इमारती समोर दिसू लागल्या व काही क्षणांतच विमानाने भूमीवर पाय टेकले.

प्रत्येकजण हा जसा आपल्या देशाचा तसा सबंध जगाचाही नागरिक आहे ही भावना प्रथम मनात येते, ती अशा विमानतळावर उतरल्यावर. त्या भव्य विमानतळावर सर्वत्र गर्दी होती. एका मागोमाग एक विमाने उतरत होती. त्यामुळे बाहेर पडण्यासाठी ज्या ओळीत मी उभा होतो तीत सबंध जगातील देशांचे प्रतिनिधी उभे होते. पुढे-मागे साऱ्या खंडांतील लोक होते. काळे, गोरे. कानात बोलणे ही राणीच्या राज्यातील मुख्य पद्धत; परंतु नव्याने आलेल्या जागतिक प्रवाश्यांनी ती अजून स्वीकारली नव्हती. जगातील सर्व भाषांनी तो विमानतळ बोलत होता. पासपोर्ट, व्हिसा दाखवून बाहेर पडलो, तेव्हा लक्षात आले की, लंडन-विमानतळाच्या अनेक इमारतींपैकी एका इमारतीत आम्ही होतो. विमानतळाच्या एका भागातून दुसऱ्या भागात बसने अगर महागड्या टॅक्सीने जावे लागते हे सांगितले म्हणजे या विमानतळाच्या स्वरूपाची कल्पना येईल.

सुदैवाने सामान सुखरूप मिळाले. "तुमच्याकडे सिगारेट किती आहेत" या एकाच प्रश्नाला उत्तर दिल्यावर बॅगेवर कस्टम अधिकाऱ्याने खडूची रेघ मारली. बोरीबंदर स्टेशनवर हमाल शोधावा या थाटात आम्ही "कुली, कुली" करू लागलो. तेव्हा समोर गणवेषात असलेल्या हमालांनी नाके मुरडलीच. तेव्हा कस्टमचा एक अधिकारी जोरात म्हणाला, "Do you want a porter?"

कुली व पोर्टर या शब्दातील मान-सन्मानाचा अर्थ उमगला व पोर्टर महाशयांना पाचारण करून आम्ही बस गाठली. लंडन-विमानतळावरून टॅक्सीने येऊ नका अशी सूचना शिष्यवृत्ती देणाऱ्या थॉमसन फाउंडेशनने दोन-दोनदा दिली होती. बस घेते फक्त पाच शिलिंग व टॅक्सी भारत सरकारचे तीन पौंडी चलन एका खेपेतही खाऊ शकते. लंडन-विमानतळ ते शहर हे अंतर २२ मैल आहे.

जे रस्ते आम्ही विमानातून पाहिले होते त्याच रस्त्यांवरून आमची बस आता धावत होती. विमानातून पाहिलेली घरे मी ओलांडीत होतो; परंतु सकाळची घाईगर्दीची वेळ असूनही लंडन कसे अगदी शांत होते. मोटारी आवाज न करता धावत होत्या. या घरांतून माणसे राहात असावीत असे काही वाटत नव्हते. कुणीही भर रस्त्यात उभे राहून कुणाला हाक मारीत नव्हते किंवा बाहेरची मौज पाहात कुणी खिडकीत उभे नव्हते. खिडक्या बंद,

दारे बंद. शर्लाक होम्सच्या चित्रपटात दिसणाऱ्या घरांसारखी ती सारी घरं मला भासत होती. सुंदर पडदे तेवढे लक्ष वेधून घेत होते.

ब्रिटिश युरोपियन एअरवेजच्या टर्मिनसवर आम्ही उतरलो. आता ‘ हॉटेल युरोप ’ गाठावयाचे होते. या टर्मिनसवरच एक भारतीय स्त्री चौकशी-काउंटरवर बसलेली होती. ब्रिटिश साम्राज्यावरील भारतीय आक्रमणाची ही पहिली चाहूल. हॉटेल रस्त्यापलीकडेच होते. त्यामुळे ‘ पोर्टर ’ या अभिधानाचा ‘ कुली ’ घेऊन आम्ही हॉटेल गाठले. त्याला टिप दिली तेव्हा त्यांनी आम्हाला आंगठा दाखविला. भारतात असतो तर त्याच्या एक तोंडात दिली असती; परंतु साहेबाच्या भूमीवर या आंगठ्याचा अर्थ ‘ ओके ’ असा होतो हे नंतर कळले. त्यानंतरचे चार महिने आम्हांला अनेकजणांनी व अनेकांना आम्ही असे आंगठे दाखविले.

लंडनच्या टेलिफोनची चुणूक तेथे पोहोचताच घेतली. ब्रिटनमधील टेलिफोननंबर हा तीन इंग्रजी अक्षरांनी सुरू होतो. नंतर आकडे. हे सर्व फिरवावे लागते. ब्रिटनमध्ये स्थायिक झालेले सर्व भारतीय टेलिफोनवरून बोलताना “ हां हां ! ! हां, हां ” असे प्रत्युत्तरादाखल इंग्रजी थाटात बोलतात. तो सूर मात्र मोठा मोहक येतो.

हॉटेलची खोली ताब्यात मिळताच मात्र आमचे सारे श्रम आठवले. दोन रात्रींची झोप डोळ्यांवर दाटली होती. स्नान, भोजन करून अंग टाकले व गाढ झोपी गेलो.

माझ्या खोलीतील टेलिफोनची घंटा खणखणली तेव्हा मी दचकून जागा झालो. त्या झोपेने मी लंडनमध्ये आलो आहे ही आठवण पुसटही ठेवलेली नव्हती. दोन मिनिटे मला या नव्या जगाशी समरस होण्यास लागली. सायंकाळचे सात वाजलेले होते. लंडन शहरात रात्र जागविणाऱ्यांची पहाट झाली होती आणि या नव्या जगाची पहिली ओळख करून देण्यासाठी माझे नातेवाईक व स्नेही डॉ. यशवंतराव प्रधान तेथे आले होते व त्यांनीच खालून टेलिफोन केला होता.

लंडन शहराचे खरे पहिले दर्शन मी त्या रात्री घेतले. केन्सिंग्टन स्ट्रीटवरून भ्रमंती सुरू झाली ती मार्बल आर्च, ऑक्सफर्ड स्ट्रीट, ट्राफलगार स्क्वेअर करीत पिकॅडलीला आली. रात्री लंडन फुलते ते पिकॅडलीमध्येच. दोन दिवसांच्या पहिल्या मुक्कामात हे जाणवले, की खरे लंडन आहे पिकॅडलीमध्ये, ट्यूब रेल्वेमध्ये व शेकडो लोकांना उचलणाऱ्या, उतरविणाऱ्या एस्कॅलेटर्समध्ये. जमिनीखालच्या या गाड्यांनी सारे लंडन पोखरले आहे. पाय ठेवला, की तो जिना तुम्हाला पाखरासारखा खाली घेऊन जातो. पुन्हा चटकन पाय टाका, तोच जिना

तुम्हाला वर उचलून नेतो. या जिन्यांच्या पायऱ्यांसारखे सतत व वेगाने उघडझाप करणारे जीवन लंडनचे आहे. काही क्षणांत हा जिना आपल्याला खाली नेईल हे माहीत असतानाही खरे लंडनवासी त्या फिरत्या पायऱ्यांवरही उड्या मारीत जातात. ट्यूब गाडी कोठून येते कळत नाही. वाऱ्याचा झोत आला की गाडी क्षणात येते आहे असे समजावे. दरवाजा उघडला जातो, तुम्ही आत शिरता व दार बंद होते. गाडी सुटते ती वेगातच. लंडन शहर डोक्यावर नाचवीत या ट्यूब गाड्या खाली धावत आहेत. लोक अधिक उतरतात ते पिकॅडलीला. पिकॅडली म्हणजे गंधर्वनगरी. दिव्यांचा, निऑन लाईटस्‌चा झगझगाट, त्यात नटलेली दुकाने यांनी पिकॅडली फुलते ती रात्रीच. कपड्यांच्या दुकानांच्या ' शो रूम्स् ' म्हणजे सुंदर पऱ्यांचा रंगीबेरंगी पोशाखात चाललेला विलास. या पऱ्या निर्जीव आहेत असे त्यांच्याकडे पाहून वाटत नाही. जवळच्या नाईट क्लबमधून येणाऱ्या सुरांवर त्याही नृत्य करीत असाव्यात. खरे लंडनवासी आपल्यासारखे ताटकळत दुकानांसमोर उभे राहात नाहीत. स्त्रिया बहुतेक उंच व मोठ्या ऐटीत चाललेल्या. थोड्या तरी मिश्या ओठांवर असल्याशिवाय अस्सल इंग्रजी माणसाला बरे वाटत नसावे. सकाळपेक्षा अधिक उत्साहाने हा साहेब सायंकाळचे वृत्तपत्र वाचतो.

वृत्तपत्र हाती घेऊनच तो ट्यूबसाठी अगर त्या हिरव्या बससाठी धावतो. घरी जाण्याची घाई नसेल तर कॉफीगृहात किंवा अधिक ' पब 'मध्ये शिरतो. ' सेल्फ सर्व्हिस 'च्या हॉटेलांची साम्राज्यवादी लंडनमध्येही आता भरपूर गर्दी झाली आहे. आपल्याला हवे ते उचलावे व बाजूला खात बसावे. ' पब 'प्रमाणे एका दांडीवर उभारलेल्या त्या कुशन्सवर बसून गप्पांत रंगावे.

पब्जचा नूर थोडा वेगळा. तेथे गप्पा व सिगारेटचा धूर यांचे सारे साम्राज्य. दिवे कसे मंद व पेयांची रंगसंगती खुलविणारे. स्त्रियांनी कुठे नोकऱ्या करावयाच्या याबद्दलचा भेद उरला नसल्याने पब्जपासून बसपर्यंत सर्वत्र स्त्रियांची हजेरी. पब्जमध्ये तर काउंटरवर स्त्रियाच अधिक. लंडनच्या बसमध्ये आता साऱ्या देशांचे नागरिक कंडक्टर्सच्या वेषात आढळतात. आफ्रिका खंड अर्थात अधिक पसरलेले. ब्रिटनमध्ये आलेल्या प्रत्येक माणसाला येथे प्रथम जाणवतो तो प्रामाणिकपणा. पैशांची देवघेव करताना इंग्रजी माणूस तुम्हाला कधी फसवणार नाही. १ पौंडाचे २० शिलिंग व १२ पेन्सचा एक शिलिंग हे सारे शाळेत पाठ केले असले तरी सुरुवातीला पैसे घेता-देताना भारतीय गडबडतोच. हाफ क्राउनचे नाणे हाती येताच ते दोन शिलिंग सहा पेन्सचे आहे हे लक्षात येत नाही.

ब्रिटन हे किती परंपरापूजक आहे हे या चलनावरून लक्षात येते. साऱ्या जगाने दशमान पद्धती स्वीकारली, ब्रिटन ती आता स्वीकारणार आहे. ' टू पेन्स 'ला ' टपेन्स ' म्हणावयाचे हे दोन दिवसांनी अंगवळणी पडते.

दोन दिवसांत लंडनचे जीवन आमच्या बरेचसे परिचयाचे झाले. ' प्लीज ' व ' थँक्यू ' यांचा हा देश आहे हे उमगले. सूर्यप्रकाशाचे कौतुक उठल्या-बसल्या करावे लागते हे लक्षात आले. आम्ही येताना वसंत घेऊन आलो होतो म्हणून सारेजण आम्हाला धन्यवाद देत होते व तो खरोखरच खिशात घालून आम्हीच आणला आहे असे मानून हे धन्यवाद स्वीकारीत होतो. सूर्यप्रकाशाचे ब्रिटनच्या जीवनात किती महत्त्व आहे हे तिथे राहिल्याशिवाय कळणार नाही. सूर्यप्रकाश पाहून बाहेर पडावे, पबमध्ये शिरून बियर घेत बसावे. थोड्या वेळाने बाहेर यावे तर सूर्यप्रकाश केव्हाच लुप्त झालेला असतो. ' इंग्रज तरुणीवर विश्वास टाका पण हवामानावर नको ' असा सल्ला एकाने मला दिला होता.

शिशिराचा त्याग करण्यासाठी धडपडणारे लंडन मी पाहात होतो. ब्रिटनमध्ये फुलेही म्हणे आयात केली जातात. हे फुलांचे गुच्छ घेण्यासाठी केवढी धडपड. परंतु त्या फुलांना थोडाही सुवास नव्हता. चमेलीचे गजरे येथे मांडून ठेवावे असे क्षणभर मनात आले.

या फुलांमागोमाग घोटाळणाऱ्या ब्रिटनच्या नव्या पिढीचे दर्शन ठिकठिकाणी होत होते. ' बिटनिक्स 'चे घोळके ' पब्ज ' बाहेर उभे होते. आपल्याच विश्वात मश्गूल झालेली ही मंडळी. झिपऱ्या केसांची. प्रेम करावयास आजूबाजूच्या जगाची अडचण मुळीच न मानणारी. ती दृश्ये पाहताना फक्त एकच मनात आले. लंडनमध्ये सर्व आहे, पण एक गोष्ट नाही. ' चोरटे चुंबन ' येथे नाही. " Stolen kisses are the sweetest. " हे वाक्य लंडनवासी विसरला आहे.

स्थलाम
७४०१२
४०५

प्रकरण ५ वे

# कोळशातून जन्मलेले कार्डिफ

आमचे मुख्य वास्तव्य व्हावयाचे होते कार्डिफला. कार्डिफ ही वेल्स परगण्याची राजधानी व पश्चिमेकडील एक उत्तम बंदर. तेथून प्रसिद्ध होणाऱ्या 'वेस्टर्न मेल' व 'साऊथ वेल्स एको' या दैनिकांचे 'थॉमसन हाउस' हे आमचे नवे स्फूर्तिस्थान ठरावयाचे होते.

थॉमसन फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळाल्यानेच मी लंडनमध्ये दाखल झालो होतो. हे फाउंडेशन स्थापन करणारे लॉर्ड थॉमसन ही पाश्चात्त्य वृत्तसृष्टीतील विलक्षण असामी. आठवड्याला एके काळी दीड पौंड पगार मिळविणाऱ्या या कॅनेडियन कारकुनाच्या मालकीची अनेक देशांतील आज ११० वृत्तपत्रे आहेत. लंडन 'टाइम्स' म्हणजे ब्रिटिश वृत्तपत्रांचा बादशहा. त्याचा खप १३ लक्षांच्या घरात आहे. अर्थात खपापेक्षा प्रतिष्ठा व वैचारिक सामर्थ्य लंडन 'टाइम्स'चे मोठे. ती विकत घेण्याची घोषणा करून या कॅनेडियन उद्योगपतीने ब्रिटिशांची जणू सारी इभ्रतच विकत घेण्याचा घाट घातला आहे. परंतु लॉर्ड थॉमसन यांच्या या आकांक्षांत असले हेतू नाहीत. वृत्तपत्रांची मालकी मिळविण्यात व लक्षाधीश होण्यात त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक मानलेले नाही. वृत्तपत्रसृष्टीला नवे वळण लावण्याच्या महत्त्वाकांक्षेने ते भारावलेले दिसतात. अर्धविकसित व मागासलेल्या देशांतील वृत्तपत्रेही सुधारली पाहिजेत व तेथील वृत्तपत्रस्वातंत्र्याची जोपासना झाली पाहिजे या हेतूने त्यांनी थॉमसन फाउंडेशनची स्थापना केली. त्यासाठी ५० लाख पौंडांची — अवमूल्यनानंतरच्या रुपयांत सांगायचे म्हणजे ११ कोटी रुपयांची ठेव या

फाउंडेशनच्या हवाली लॉर्ड थॉमसन यांनी केली आहे. या रकमेवर जे आज नुसते व्याज येते त्यामधूनच दरवर्षी २५ पत्रकारांना ते उच्च शिक्षण देऊ शकतात. आशिया व आफ्रिका यावर साहजिकच त्यांचे अधिक लक्ष आहे. हे शिक्षण देण्यामागे त्यांचे कोणत्याही तऱ्हेचे राजकीय हेतू नाहीत. परंतु ब्रिटनच्या भूमीवर उतरणारा प्रत्येक नागरिक लोकशाही प्रेमाचे गोडवे गातच परततो. व्यक्तिस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचे प्रगल्भ दर्शन मनावर कायमचा संस्कार करून जाते. लंडनच्या ' हॉटेल युरप 'मध्ये आम्ही असताना थॉमसन फाउंडेशनचे डायरेक्टर श्री. डॉम रोलँडस् हे दारावर टक् टक् करीत आमच्याकडे आले. आमचे येथे कसे स्वागत होणार, आम्हांला कसा पाहुणचार मिळणार याची दिलखुशी चुणूक श्री. रोलँडस् यांच्या उत्साहाने ओसंडणाऱ्या चेहऱ्यावरच त्या दिवशी दिसली. वाऱ्याने कपाळावर येणारी केसांची बट बालकाप्रमाणे सारखी दूर करीत ते आमच्याशी बोलत होते. इंदूरच्या ' नई दुनिया ' या दैनिकाचे मालक-संपादक श्री. अभय छजलानी व ' सोलापूर समाचार ' चे सहसंपादक श्री. प्रभाकर तुलकर हे माझे दोन भारतीय सहकारी. आम्ही तिघे आता येथे भारताचे प्रतिनिधित्व करीत होतो. एकंदर नऊ देशांतून १२ पत्रकार तेथे आले होते. साऱ्यांची उठाबस श्री. रोलँडस् जातीने करीत होते. त्यांच्या बॅगा उचलत होते. ते आपल्या सौजन्यपूर्ण वागणुकीने आम्हांला ओशाळे करीत होते.

विविध देशांतील प्रतिनिधींबरोबर राहण्याचा माझा अनुभवही हा पहिला. या १२ पत्रकारांत दोघे नायजेरियन्स होते. एक सिओरे लिओन या नव्यानेच स्वतंत्र झालेल्या आफ्रिकी देशाचा प्रतिनिधी होता. सिरीया, टर्की, लाओस, जमाइका या देशांतून चौघे पत्रकार आले होते. इराकमधून असिया तुराही ही स्त्री-पत्रकार आली होती. बारा जणांच्या या ताफ्यातील ही एकमेव स्त्री — अनेक वर्षांनी आपण विद्यार्थी झाल्यासारखे आम्हांला वाटले. श्री. डॉम रोलँडस् हे आमचे जणू मास्तर. परंतु आम्हांला काय हवे–नको ते सतत विचारणारे.

दि. २३ एप्रिल रोजी सकाळी हा १२ विद्यार्थ्यांचा ताफा रोलँडस् मास्तरांबरोबर लंडनच्या पॅडिंग्टन स्टेशनवर गेला. मुंबई शहराला जशी अनेक स्थानके तशी ही लंडनची. व्हिक्टोरिया स्टेशन अर्थात मोठे. तेथूनच कॅलेकडे गाडी जाते. पॅडिंग्टन स्टेशनही असेच भव्य व चकचकीत. पहिल्या वर्गात बसून आम्ही बारा पत्रकार व एक मास्तर आता कार्डिफकडे निघालो होतो.

लंडन शहराबाहेरील इंग्लंड आता प्रथमच मला दिसणार होते. विस्तीर्ण हिरवे माळ

समोर दिसू लागले होते. नुकत्याच पडलेल्या पावसाने भिजलेली घरे उन्हात अंग वाळवीत बसलेल्या ओलेतीसारखी दिसत होती. कुठे क्रिकेटचा सामना चालला होता. मधूनच कारखाने दिसत होते. श्री. रोलँडस अगदी पहिलटकरणीच्या उत्साहाने आम्हांला सर्व सांगत होते. गाडीला विशेष गर्दी नव्हती. इंग्लंडमधील गाड्यांत कधीच गर्दी नसते हे नंतर चांगलेच समजले.

जेवण आले. बियरचे व व्हिस्की पेगचे बंद टिन मिळत होते. जॅमचा टिन विकत घ्यावा तशी बियर-व्हिस्की घ्यावी. गोबऱ्या गालाचा–लठ्ठ 'वेअरर' मिशीला कुरवाळीत ते टिन चटकन फोडून देई. सुखाच्या प्रवासाची तर ही नुसती सुरुवात होती. मस्त हवा पडली होती. 'Bright sunshine! Bright sunshine!!' डॉम रोलँडस् भुवया उडवीत प्रत्येकाला सांगत होते. इंग्लंडच्या हिरव्या आगगाडीतील, पहिल्या वर्गाच्या डब्यातील ते जेवण, ते पेयाचे घुटके संपूच नयेत असे वाटले. परंतु अडीच तास कुठे गेले कळले नाही व कार्डिफ आले.

"नाऊ यू आर इन् वेल्स. दीस इज कॅर्र्डीफ!" कार्डिफचा वेल्श उच्चार करीत श्री. रोलँडस् म्हणाले.

हे 'कॅर्र्डीफ' मग आमच्या किती लौकर परिचयाचे झाले! सवयीने सारे कसे अंगवळणी पडते. काही दिवसांतच कार्डिफ हे आमचेच गाव असे आम्हांला वाटू लागले.

रोज सकाळी पेनार्थहून आम्ही कार्डिफला येत असू. दिवसभर 'शाळा' चाले. 'थॉमसन हाउस'जवळची मुख्य टपालकचेरी आमची सर्वांत प्रिय. एके काळच्या रोमन साम्राज्याची आठवण करून देणारी भिंत व किल्ला असलेले हे शहर एक ऐतिहासिक ठिकाणच दिसे. पुण्याला जसे शनिवारवाड्याभोवती अनेक रस्ते तसे 'कार्डिफ कॅसल' भोवतीच मुख्य रस्त्यांचे फाटे फुटलेले. कार्डिफ कॅसलची रमणीयता तेथे गेल्याशिवाय जाणवणार नाही. वेल्स हा महाराष्ट्रासारखाच गडकिल्ल्यांचा देश. बहुतेक गावी लहान-मोठे किल्ले व त्यांचा मग इतिहास. कार्डिफ कॅसलभोवती रुंद खंदक. त्या खंदकावर लाकडी फळ्यांचे पूल टाकलेले. किल्ल्याच्या तटबंदीचा रंग पिवळसर. सूर्यकिरणांचे मोल भारतात राहून काय कळणार? रोमन शिल्पाची ती तटबंदी उन्हात फुले व त्या किल्ल्या-समोरचा क्वीन स्ट्रीट शनिवारी माणसांनी फुले. 'सॅटर्डे शॉपिंग' व 'नाइट लाइफ' या दोन गोष्टी भारतीय जीवनात नाहीतच. क्वीन स्ट्रीट, सेंट जॉन स्ट्रीट हे दोन रस्ते म्हणजे आमचे फोर्टचे दोन भाग. 'मार्क्स ॲन्ड स्पेन्सर' व 'वुलवर्थ' या दोन दुकानांचा

फाउंडेशनच्या हवाली लॉर्ड थॉमसन यांनी केली आहे. या रकमेवर जे आज नुसते व्याज येते त्यामधूनच दरवर्षी ३५ पत्रकारांना ते उच्च शिक्षण देऊ शकतात. आशिया व आफ्रिका यावर साहजिकच त्यांचे अधिक लक्ष आहे. हे शिक्षण देण्यामागे त्यांचे कोणत्याही तऱ्हेचे राजकीय हेतू नाहीत. परंतु ब्रिटनच्या भूमीवर उतरणारा प्रत्येक नागरिक लोकशाही प्रेमाचे गोडवे गातच परततो. व्यक्तिस्वातंत्र्य व वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचे प्रगल्भ दर्शन मनावर कायमचा संस्कार करून जाते. लंडनच्या ' हॉटेल युरप ' मध्ये आम्ही असताना थॉमसन फाउंडेशनचे डायरेक्टर श्री. डॉम रोलँडस् हे दारावर टक् टक् करीत आमच्याकडे आले. आमचे येथे कसे स्वागत होणार, आम्हांला कसा पाहुणचार मिळणार याची दिलखुषी चुणूक श्री. रोलँडस् यांच्या उत्साहाने ओसंडणाऱ्या चेहऱ्यावरच त्या दिवशी दिसली. वाऱ्याने कपाळावर येणारी केसांची बट बालकाप्रमाणे सारखी दूर करीत ते आमच्याशी बोलत होते. इंदूरच्या ' नई दुनिया ' या दैनिकाचे मालक-संपादक श्री. अभय छजलानी व ' सोलापूर समाचार ' चे सहसंपादक श्री. प्रभाकर नुलकर हे माझे दोन भारतीय सहकारी. आम्ही तिघे आता येथे भारताचे प्रतिनिधित्व करीत होतो. एकंदर नऊ देशांतून १२ पत्रकार तेथे आले होते. साऱ्यांची उठाबस श्री. रोलँडस् जातीने करीत होते. त्यांच्या बॅगा उचलत होते. ते आपल्या सौजन्यपूर्ण वागणुकीने आम्हांला ओशाळे करीत होते.

विविध देशांतील प्रतिनिधींबरोबर राहण्याचा माझा अनुभवही हा पहिला. या १२ पत्रकारांत दोघे नायजेरियन्स होते. एक सिओरे लिओन या नव्यानेच स्वतंत्र झालेल्या आफ्रिकी देशाचा प्रतिनिधी होता. सिरीया, टर्की, लाओस, जमाइका या देशांतून चौघे पत्रकार आले होते. इराकमधून असिया तुराही ही स्त्री-पत्रकार आली होती. बारा जणांच्या या ताफ्यातील ही एकमेव स्त्री — अनेक वर्षांनी आपण विद्यार्थी झाल्यासारखे आम्हांला वाटले. श्री. डॉम रोलँडस् हे आमचे जणू मास्तर. परंतु आम्हांला काय हवे-नको ते सतत विचारणारे.

दि. २३ एप्रिल रोजी सकाळी हा १२ विद्यार्थ्यांचा ताफा रोलँडस् मास्तरांबरोबर लंडनच्या पॅडिंग्टन स्टेशनवर गेला. मुंबई शहराला जशी अनेक स्थानके तशी ही लंडनची. व्हिक्टोरिया स्टेशन अर्थात मोठे. तेथूनच कॅलेकडे गाडी जाते. पॅडिंग्टन स्टेशनही असेच भव्य व चकचकीत. पहिल्या वर्गात बसून आम्ही बारा पत्रकार व एक मास्तर आता कार्डिफकडे निघालो होतो.

लंडन शहराबाहेरील इंग्लंड आता प्रथमच मला दिसणार होते. विस्तीर्ण हिरवे माळ

समोर दिसू लागले होते. नुकत्याच पडलेल्या पावसाने भिजलेली घरे उन्हात अंग वाळवीत बसलेल्या ओलेतीसारखी दिसत होती. कुठे क्रिकेटचा सामना चालला होता. मधूनच कारखाने दिसत होते. श्री. रोलँडस अगदी पहिलटकरणीच्या उत्साहाने आम्हांला सर्व सांगत होते. गाडीला विशेष गर्दी नव्हती. इंग्लंडमधील गाड्यांत कधीच गर्दी नसते हे नंतर चांगलेच समजले.

जेवण आले. बियरचे व व्हिस्की पेगचे बंद टिन मिळत होते. जॅमचा टिन विकत घ्यावा तशी बियर-व्हिस्की घ्यावी. गोबऱ्या गालाचा–लठ्ठ 'बेअरर' मिशीला कुरवाळीत ते टिन चटकन फोडून देई. सुखाच्या प्रवासाची तर ही नुसती सुरुवात होती. मस्त हवा पडली होती. 'Bright sunshine! Bright sunshine!!' डॉम रोलँडस् भुवया उडवीत प्रत्येकाला सांगत होते. इंग्लंडच्या हिरव्या आगगाडीतील, पहिल्या वर्गाच्या डब्यातील ते जेवण, ते पेयाचे घुटके संपूच नयेत असे वाटले. परंतु अडीच तास कुठे गेले कळले नाही व कार्डिफ आले.

"नाऊ यू अर इन् वेल्स. दीस इज कॅर्र्‌डीफ!" कार्डिफचा वेल्श उच्चार करीत श्री. रोलँडस् म्हणाले.

हे 'कॅर्र्‌डीफ' मग आमच्या किती लौकर परिचयाचे झाले! सवयीने सारे कसे अंगवळणी पडते. काही दिवसांतच कार्डिफ हे आमचेच गाव असे आम्हांला वाटू लागले.

रोज सकाळी पेनार्थहून आम्ही कार्डिफला येत असू. दिवसभर 'शाळा' चाले. 'थॉमसन हाउस'जवळची मुख्य टपालकचेरी आमची सर्वांत प्रिय. एके काळच्या रोमन साम्राज्याची आठवण करून देणारी भिंत व किल्ला असलेले हे शहर एक ऐतिहासिक ठिकाणच दिसे. पुण्याला जसे शनिवारवाड्याभोवती अनेक रस्ते तसे 'कार्डिफ कॅसल' भोवतीच मुख्य रस्त्यांचे फाटे फुटलेले. कार्डिफ कॅसलची रमणीयता तेथे गेल्याशिवाय जाणवणार नाही. वेल्स हा महाराष्ट्रासारखाच गडकिल्ल्यांचा देश. बहुतेक गावी लहान-मोठे किल्ले व त्यांचा मग इतिहास. कार्डिफ कॅसलभोवती रुंद खंदक. त्या खंदकावर लाकडी फळ्यांचे पूल टाकलेले. किल्ल्याच्या तटबंदीचा रंग पिवळसर. सूर्यकिरणांचे मोल भारतात राहून काय कळणार? रोमन शिल्पाची ती तटबंदी उन्हात फुले व त्या किल्ल्या-समोरचा क्वीन स्ट्रीट शनिवारी माणसांनी फुले. 'सॅटर्डे शॉपिंग' व 'नाइट लाइफ' या दोन गोष्टी भारतीय जीवनात नाहीतच. क्वीन स्ट्रीट, सेंट जॉन स्ट्रीट हे दोन रस्ते म्हणजे आमचे फोर्टचे दोन भाग. 'मार्क्स ॲन्ड स्पेन्सर' व 'वुलवर्थ' या दोन दुकानांचा

निकटचा परिचय आमचा कार्डिफमध्येच झाला व या परिचयाने सारे ब्रिटन आम्हांला घरासारखे वाटू लागले. ब्रिटन म्हणजे काय या प्रश्नाचे साधे उत्तर असे — दोन सारखे दिसणारे रस्ते. सारख्या अंतरावर बांधलेली एकाच पद्धतीची, दुमजली कौलारू घरे. मार्क्स ॲन्ड स्पेन्सर व वुलवर्थ या दोन दुकानांनी सजलेली बाजारपेठ. जोडीला बर्क्लेज बँक. 'बूटस्' या औषध कंपनीचे सोबतीला दुकान. बेटिंग्ज घेणाऱ्या कचेऱ्या आणि 'स्मोकिंग रूम' या नावाने ओळखले जाणारे पब्ज म्हणजे ब्रिटन. कार्डिफमध्ये यापेक्षा काही वेगळे नव्हते.

थॉमसन हाउस हे कार्डिफ स्टेशनच्या अगदी जवळच्या चौकात होते. समोर एक छोटे तयार कपड्यांचे दुकान होते. तथाकथित थॉमसन 'स्कॉलर्सचे' हे दुकान झाले होते. हे दुकान चालवत असे एक बाई. पोक्त दिसणारी. परंतु सोनेरी रंगाचे केस असलेली. विविध देशांतून येणारे 'विद्वान' पत्रकार किती खरे बद्दू आहेत याची चाचणी ती पहिल्या भेटीतच घेई. आमच्या 'शाळेला' दुपारची सुटी लागली की बाजारपेठेत फेरफटका चालेच.

एक दिवस तिच्या दुकानात शिरलो तर तिने माझे बावखट पकडले व आरशासमोर मला नेऊन उभे केले.

" See. How do you look like ? " तिने प्रश्न केला.

" Quite smart ! " मी उत्तरलो.

" Oh, no ! " पुन्हा ती.

आणि असे म्हणून तिने माझ्या कोटाची तिन्ही बटने सोडली. मधले बटन फक्त पुन्हा लावले. इतर दोन उघडी ठेवली.

" And now see. You don't know how to button your coat. " ती म्हणाली.

येथून सर्व सूचना घेऊन गेलो तरी तेथे गेल्यावर कोणत्या आफती येतात याची ही एक झलक. परंतु ती आपल्या बोलण्याने साऱ्यांना आपलेसे करी. आम्ही सर्वजण तिच्याशी मनमोकळेपणे बोलत असू.

तरीही तिने आम्हांला एक दिवस धक्का दिलाच. संध्याकाळी आम्ही तिच्या दुकानात शिरलो तर २० वर्षांची एक भरदार अंगाखांद्याची युवती दोन वर्षांच्या मुलीला कडेवर घेऊन उभी होती. दुकानात आत शिरताच आमचे लक्ष तिच्याकडे गेलेच.

ताबडतोब मालकीणबाई उद्गारल्या,

" She is my daughter."

" I see, and she has come with your grand-daughter!"

आम्ही आमची हुषारी दाखविण्याचा प्रयत्न केला.

" Oh no, the little girl is also my daughter! I am not so old to become a grand-mother!"

तिने आमची जणू टोपीच उडविली.

अशा गप्पा करून ती आपल्या दुकानातील माल थॉमसन फाउंडेशनतर्फे येणाऱ्या पाहुण्यांमार्फत विविध देशांत पाठवीत असे. एक दिवस आमचा सिओरे लिओनचा मित्र ग्रे कोकर दुपारच्या सुटीत वर्गात परतला तो एक मोठे उंच बोचके घेऊन. मोठ्या ख्रिसमस केक्सची रास आणली असे क्षणभर सर्वांना वाटले.

वर्गातच त्याचे पुडके सोडले गेले. त्यात इंग्रजी पद्धतीच्या स्त्रियांच्या पगड्या होत्या. रंगीबेरंगी, तुरे खोवलेल्या, रेशमी कापडाच्या. सारेजण खळखळून हसले. साहजिकच प्रश्न झाला, " राव, हे सारे कुठून आणले ? " " समोरच्याच दुकानातून ", उत्तर आले आणि पुन्हा तीन मजली हास्य उडाले.

काही तरी गोड बोलून समोरच्या दुकानातील त्या सोनेरी केसांच्या मालकिणीने आपल्याकडील साऱ्याच टोप्या सिओरे लिऑनला रवाना केल्या होत्या.

कार्डिफच्या अशा अनेक दुकानांशी आमची दोस्ती झाली होती. हॉट डॉग्ज, सॉसिजेस, बीफ बर्जर्स यांची छोटी दुकाने तर बहुजन समाजाने व्यापलेली. केव्हाही अशा दुकानात शिरावे व पातळ कागदात पकडलेले ' हॉट डॉग्ज ' खावे.

कार्डिफवासियांना मात्र अभिमान दोन गोष्टींचा. टॅफ नदीचा व कार्डिफ कॅसलच्या मागे उभारलेल्या सिव्हिक सेंटरचा. ' टॅफ ' ही वेल्सची गंगा. ' टॅफियन्स ' हे कार्डिफियन्सचे खरे आवडते नाव. ही टॅफ नदी कार्डिफ शहरामधून वाहते. तिच्या एका तीरावर सोफिया गार्डन्स व दुसऱ्या बाजूला ब्यूट पार्क. सिव्हिक सेंटर ही नवी निर्मिती. परंतु त्याची भव्यता खरोखरच अभिमान वाटण्यासारखीच आहे.

या सिव्हिक सेंटरमध्ये जाऊन उभे राहिले की लक्ष वेधतो तो ' सिटी हॉल '. कार्डिफ महापालिकेची ही प्रासादतुल्य कचेरी. मुंबईच्या टाउन हॉलसारख्याच पायऱ्या. पुतळे व चित्रे यांनी सजवलेली ही इमारत येथे बांधण्यापूर्वी पुष्कळ वाद झाला. `नगरपालिका म्हटल्या, की जगातील सर्व सारख्याच. या जागेवर सिव्हिक सेंटरची स्थापना करू नये

म्हणून एका गटाने तेव्हा फक्त भारतीय पद्धतीचा सत्याग्रह केला नाही इतकेच. समोरच्या दालनात प्रचंड तैलचित्र दिसते ते एका मोठ्या लढाऊ बोटीचे. पहिल्या महायुद्धात पराभूत जर्मनीच्या नौदलाची शरणागती स्वीकारण्यासाठी एक प्रचंड युद्धनौका कार्डिफ बंदरातून गेली. त्या युद्धनौकेची व त्या प्रसंगाची अभिमानाने जतन केलेली ही स्मृती. पलीकडेच वेल्सचे राष्ट्रीय पुराणवस्तुसंग्रहालय. मुंबईच्या म्युझियमसारखीच इमारत. उजव्या बाजूला सारी कॉलेजेस. वेल्श कॉलेज ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, न्यू आर्टस ब्लॉक ऑफ युनिव्हर्सिटी कॉलेज, युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ साउथ वेल्स ॲन्ड मॉनमाउथशॉयर यांच्या इमारती. या इमारती सर्व वर्तुळाकार बांधलेल्या, व मध्ये हिरवीगार पटांगणे कशी काळजीपूर्वक जोपासलेली. या प्रचंड चौकात फक्त एकच पुतळा उभा आहे. वेल्सचा तो नायक. पहिल्या महायुद्धात ब्रिटनला विजय मिळवून देणारे लॉइड जॉर्ज येथे भाषण करण्याच्या पवित्र्यात उभे आहेत. लॉइड जॉर्जचे प्रभावी वक्तृत्व ऐकत आधुनिक कार्डिफचा हा प्रचंड चौक जणू मुलामाणसांनी फुलला आहे असे वाटते.

कार्डिफची आजची वस्ती अडीच लाख. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला या गावात १०० लोक फक्त राहात होते. कार्डिफ निर्माण झाले ते कोळशाच्या राशीतून. कार्डिफ बंदरातून ‘ काळे हिरे ’ साऱ्या जगात गेले. कार्डिफ बंदराची वाढ ज्यांनी केली त्यांनीच नव्या कार्डिफच्या विकासाचा पाया घातला.

या कोळशाच्या खाणींनी वेल्सला श्रीमंती आणली त्याबरोबरच या भागात कामगारांचे प्राबल्य वाढले. वेल्स हा नेहमीच मजूर पक्षियांचा बालेकिल्ला राहिला. कार्डिफची महापालिका मजूर पक्षाच्या हाती. अनुरिन बेव्हान हा वेल्श नेता मोठा झाला तो या कोळशाच्या खाणींतील मजुरांच्या पाठिंब्यामुळेच. चर्चिलबद्दल वेल्समध्ये थोडेही प्रेम नाही. चर्चिल-स्मारक-निधीला वेल्सने मनापासून प्रतिसाद दिला नाही. इतकेच नव्हे या निधीबद्दलची भित्तीपत्रके जेव्हा कार्डिफमध्ये लावण्यात आली तेव्हा काही लोकांनी ती फाडून टाकली. भारताला स्वातंत्र्य देण्यास तयार नसलेले साम्राज्यवादी चर्चिल वेल्सपेक्षा भारतात अधिक लोकप्रिय आहेत असे आमच्या अनेक वेल्स मित्रांना मी सांगे तेव्हा ते बुचकळ्यात पडत.

कार्डिफ महापालिका मजूर पक्षाकडे होती तरी तिला फार अल्प बहुमत होते. कार्डिफची मेयर महिला होती. त्याही मजूर पक्षीय नेत्या. त्यांची-आमची भेट झाली ती एका वार्ताहर परिषदेच्या निमित्ताने. पन्नाशी उलटलेली ही महिला महापौर म्हणजे एक बिजलीच होती. या अल्पमताधिक्याने अनेक पेचप्रसंग या महापालिकेच्या कारभारात निर्माण होत होते.

'ग्रामर स्कूल' की 'पब्लिक स्कूल' हा हुजूर व मजूर पक्षियांतील मोठा वाद. मजूर पक्षाकडे कार्डिफ महापालिकेची सूत्रे येताच त्यांनी बहुतेक ग्रामर स्कूलचे पब्लिक स्कूलमध्ये रूपांतर केले. अभ्यासक्रमात बदल, सर्व विद्यार्थ्यांचा समावेश करण्याची पब्लिक स्कूलची कल्पना यामुळे ग्रामर स्कूलमधील सरदार-दरकदार यांची मुले तक्रार करू लागली. सामाजिक समता निर्माण करणाऱ्या या नव्या शाळा म्हणजे वृत्तपत्रातील मोठा वादाचा विषय. 'वेस्टर्न मेल' च्या अंकात आठवड्यातून एक तरी लेख या विषयावर असे. वेल्स मजुरांनीही आपली मुले बड्यांच्या मुलांसारखी व्हावी म्हणून पब्लिक स्कूलमध्ये घातली होती. तेथील अधिक खर्च अंगावर घेऊन. त्यामुळे या वर्गातही थोडी फूट पडली होती परंतु पालकांना सर्वांत मोठी भीती वाटे ती ही की, महापालिकेत हुजूर पक्षियांचे बहुमत आले तर शाळांचे पुन्हा ग्रामर स्कूलमध्ये रूपांतर होईल. ही अदलाबदल विद्यार्थ्यांचे नुकसान करणारी होती. त्यामुळे ज्या शाळांवर महापालिकेचे नियंत्रण नव्हते त्या शाळांकडे मुले वळत होती.


महापालिका गृहबांधणीच्या कामात किती पुढाकार घेऊ शकते त्याचे आदर्श उदाहरण येथे पाहावयास मिळते. गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाचे काम महापालिकेने अंगावर घेतले पाहिजे. आपल्याकडे तसा प्रयत्न फारसा दिसत नाही. आज कार्डिफमधील १९ हजार घरे महापालिकेची आहेत व स्वस्त भावात ती लोकांना राहावयास दिली आहेत. ज्यांना घर बांधावयाचे असेल त्यांना महापालिकाच कर्ज देते. अशा तऱ्हेने कार्डिफमधील ५० टक्के लोक महापालिकेने बांधलेल्या अगर त्यांच्या कर्जावर बांधलेल्या घरात राहतात. बस सर्व्हिस ही महापालिकेच्या अखत्यारीतील बाब नव्हती. ती स्वतंत्र. तिचे कार्डिफमधील आजचे वार्षिक उत्पन्न १५ लक्ष पौंडांच्या वर आहे. कार्डिफच्या परिसरात २५ मैलांपर्यंत या बसेस धावतात.

कार्डिफच्या वास्तव्यात एक उद्घाटन सोहळा पाहावयाचा योग आला. उद्घाटन-समारंभ होता भाजी व फळे यांच्या मार्केटचा. आणि उद्घाटनास कोण आले होते अशी आपली कल्पना आहे? खुद्द ब्रिटनची सम्राज्ञी — राणी एलिझाबेथ! बरोबर प्रिन्स फिलीप यांना घेऊन. एका भाजी मार्केटचे उद्घाटन करण्यास राणीने यावे याचे आम्हांला मोठे नवल वाटले. परंतु त्यामागेही कारण-मीमांसा होती. शेतीला कमी प्राधान्य देणाऱ्या आपल्या देशात हे नवल ठरावे. राणी एखाद्या परिषदेचे उद्घाटन करण्यास जात नाही, परंतु हे मार्केट शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करणारे म्हणून मोठ्या कौतुकाने ही सम्राज्ञी येथे

आली होती. बटाटे कुटून आले, किती उत्पन्न तेथे येते यापासून प्रत्येक गोष्टीची चौकशी चालली होती. प्रिन्स फिलीप फळांचे नमुने अभ्यासत होते. शेतकऱ्यांचे कौतुक राणीने करावे याला अर्थ होता. पिवळ्या रंगाचा सुंदर वेष राणीने परिधान केला होता. एका छोट्या टूमवजा गाडीतून तिने मार्केटभोवती फेरफटका मारला. प्रिन्स फिलीप एखाद्या आज्ञाधारक पतीसारखा चालला होता. परंतु आपली पत्नी सम्राज्ञी आहे हे लक्षात ठेवून तो मागे काही पावलांवर चालत होता. राणी एखाद्या कुटुंबवत्सल स्त्रीसारखी दिसत होती व भाज्यांच्या व फळांच्या राशीत तिने पाककुशल कुटुंबिनीसारखा रस घेतला होता.

स्त्रियांनी व मुलांनी अर्थात राणीला पाहण्यासाठी तुफान गर्दी केली होती. त्यांपैकी बहुतेकांनी राणी एलिझाबेथला आधी पाहिलीही असेल. परंतु तो उत्साह न उमजणारा होता. जगाला लोकशाहीचे धडे देणाऱ्या ब्रिटनचे राजेशाहीवरचे प्रेम जराही कमी झालेले दिसत नाही. राणीवर होणारी टीका लोकांना आवडत नाही. स्त्रियांना तर मुळीच नाही. कार्डिफमधील हा समारंभ अनेक प्रश्न मनात निर्माण करून गेला.

सतत तीन महिने ज्या कार्डिफमध्ये आम्ही रोज येत होतो ते कार्डिफ एक दिवस सोडले तेव्हा वाटले आम्ही पुन्हा परत येणारच आहोत. क्वीन स्ट्रीटवर भटकायचे आहे. मार्क्स अॅन्ड स्पेन्सरमधून अजून किती तरी वस्तू घ्यावयाच्या आहेत. बसमध्ये बसून पॉन्टिप्रिडच्या खुल्या बाजारात पुन्हा एकदा यायचे आहे. एक नवे जग स्वप्नासारखे समोर आले व एक दिवस बर्फासारखे वितळले.




अगदी अल
दिसणारे थ
मार्शल स्टॅलि




ब्रिटनमधील 'पब' उत्तम बातम्यांचा सुगावा लागण्याचं एक ठिकाण




अल्वर्टा प्लेस हे आमच्या पेनार्थजवळचे स्टेशन. कार्डिफला जाणारे आम्ही शंभर विद्यार्थी हेच या स्टेशनचा उपयोग करीत. आतापर्यंत हे स्टेशन बंदही झाले असेल.



टाईम्स हे ब्रिटिश वृत्तपत्र सृष्टीचे वैभव.
लंडन टाईम्सची ही नवी इमारत.



राजा राममोहन यांची समाधी. ब्रिस्टलच्या स्मशानभूमीत
पहिल्या भारतीय समाजसुधारकाचे हे समाधी मंदीर.





रोज कोळशाच्या खाणीत उतरणारे हे वेल्श मजूर आपला कामगार दिन साजरा करण्यासाठी मोर्चा घेऊन निघाले आहेत

:करण सहावे

# रॉबर्ट क्लाइव्हच्या पेनार्थमध्ये

पेनार्थ हे कार्डिफचेच एक उपनगर. येथे आम्ही तीन महिने राहिलो. कोणत्याही गावात चार दिवस राहिले तरी रस्ते, दुकाने परिचयाची होतात. तीन महिन्यांच्या वास्तव्यात पेनार्थची व आमची जवळीक निर्माण झाली यात नवल नाही. तेथील छोटे थिएटर, स्टेशनबाहेरचा बार, सामानाची दुकाने, दाट जंगलाची बाग, टपालकचेरी हे सारे कसे पायाखालचे झाले. ब्रिस्टलच्या खाडीवर हे गाव वसले आहे. ब्रिटनच्या नकाशात अनेक मुखांनी समुद्र भूमीत घुसलेला दिसतो, तसाच येथे तो शिरला. परंतु खूप उंच डोंगरच आडवा आल्याने उसळलेल्या लाटांना थांबावे लागले व पेनार्थ गाव तयार झाले. सारे गावच एका उंच व लांबच लांब डोंगरावर वसलेले. कार्डिफहून मोटारीने आम्ही प्रथम पेनार्थला गेलो तेव्हा श्री. रोलँडस् यांनी आमचे समोर लक्ष वेधले ते त्या डोंगर-शिखरावरील चर्चकडे. "पेनार्थची ही सर्वांत उंच जागा" रोलँडस् म्हणाले आणि त्यांनी आम्हा भारतीयांकडे वळून म्हटले, "हे सबंध पेनार्थ गाव खरे तुमचे आहे. कारण रॉबर्ट क्लाइव्हने भारतात जी संपत्ती मिळविली ती घेऊन परतल्यावर त्याने ही पेनार्थची सर्व जमीन त्या पैशात विकत घेतली. पेनार्थ गावातील बहुतेक घरे ही त्याचीच होती. मी राहतो ते घर अजूनही क्लाइव्हच्याच वंशजांकडे आहे. भारतात मिळविलेल्या पैशात क्लाइव्हने पेनार्थ उभे केले."

"हरकत नाही, आम्ही त्यापैकी आता थोडा पैसा पुन्हा वसूल करून जाऊ." मी

म्हटले.

श्री. रोलँडस् गाडी चालवीत होते. एका उतारावरून गाडी खाली आली व थांबली. श्री. रोलँडस् म्हणाले, " हं, येथे राहून तो पैसा तुम्ही आता वसूल करू शकाल. "

" हे तुमचे ' इंटरनॅशनल हाऊस '. पुढचे तीन महिने तुमचा मुक्काम येथे राहणार ". श्री. रोलँडस सांगत होते. आम्ही नेहमीच्या संवयीने आमच्या बॅगा कुणी तरी उचलेल म्हणून थांबलो. श्री. रोलँडस यांनी दोन हातांत दोन मोठ्या बॅगा उचलून चाल सुरू केली तेव्हा साहजिकच साऱ्यांचे हात उचलले गेले.

रेव्हरंड व सौ. जोन्स यांनी आमचे स्वागत केले. या ' इंटरनॅशनल हाउस 'चे हे यजमान. रेव्हरंड जोन्स यांचे डोळे अगदी वाघासारखे वाटले. त्यांनी एकेक कटाक्ष टाकून या आंतरराष्ट्रीय पत्रकारांचे अवलोकन केले व चेहऱ्यावर हिमालयाचे हास्य आणून आमच्याशी हस्तांदोलन केले. एका नव्या जगात आम्ही आता राहणार होतो. ' इंटर-नॅशनल हाउस ' मध्ये आंतरराष्ट्रीय जीवनाची चुणूक घेणार होतो. वर्णविद्वेष, निग्रोंचे लढे, हे सारे आतापर्यंत नुसते वाचलेले विषय आता थोडेसे अनुभवावयास येणार असे येथे आल्यापासूनच वाटू लागले होते. कारण नायजेरियातील आमचे मित्र श्री. आदिदेजी व श्री. रॉबीन हे लंडनला उतरल्यापासूनच बंडखोरीच्या आवेशात होते. " हे गोरे लोक वर नाटक करतात, परंतु मनात वर्णभेद मानतात ", असे श्री. आदिदेजी मला नेहमी नंतर सांगत असे. मलाही हा सहवास नवा होता. सुरुवातीला त्याच्या मजल्यावरील खोलीत मी होतो. पहिल्याच दिवशी जाग आली ती घोरण्याच्या प्रचंड आवाजाने. नायजेरियाचा आदिदेजी इतक्या मोठ्याने घोरत होता की जणू पाच मजली ' इंटरनॅशनल हाउस ' ने ऐकावे. तो पुढे कायमचा थट्टेचा विषय बनला. आदिदेजीचे घोरणे दोन मजल्यांवर नेहमीच ऐकू जाई व विशेषतः रविवारी दुपारीही ते चाले. त्यांच्यातील राकटपणाचे असे काही मासले आमच्या नेहमीच अनुभवास येत.

या कृष्णवर्णियांखेरीज आम्हाला सहवास लाभणार होता तो एका चिनी पत्रकाराचा. उत्तर व्हिएटनाममध्ये जन्मलेला व लाओसमध्ये काम करणारा चँग हा ' true representative of Chinese wisdom ' आहे हे नंतर उमजले व त्यांनी तर आपल्या मनमिळाऊ व चाणाक्ष बुद्धीने साऱ्यांनाच जिंकले. भारत–चीन मैत्रीचा आमचा हा काल एक वेगळा अनुभव देऊन गेला. त्याशिवाय तुर्कस्तान व सीरियाचे दोन प्रतिनिधी होते. आसिया तुराही ही इराकी पत्रकार बगदादची; परंतु ती स्त्री असल्याने तिला ' चीफ ऑफ

बगदाद ' म्हणता येत नसे. थोड्याच दिवसांत चँगने तिला एका लोकप्रिय चित्रपटाचे नाव दिले. ' रशिया विथ ल्व्ह ' हा सीन कोनेरीचा चित्रपट त्या वेळी तेथे अतिशय गाजत होता. एक दिवस चँग ' ब्रेकफास्ट ' ला बसला व समोरून आसिया येताच म्हणाला, " Here comes Asia with love ". सारे खळखळून हसले. थट्टा, विनोद व विश्वविद्यालयीन खेळकर वातावरण याने ' इंटरनॅशनल हाउस ' भारलेले होते. आम्हा बागजणांशिवाय आणखी ३० मंडळी तिथे होती. ती पुन्हा वेगवेगळ्या देशांतील होती. मेक्सिकोच्या आमंदापासून ते टोगोलँडच्या मोबोपर्यंत अनेकजण तिथे होते. पाकिस्तानचा अली तेथे होता. चिनी चँग, पाक अली व आम्ही भारतीय हा आंतरराष्ट्रीय संसार तीन महिने तिथे इतका सुखाने चालला, की या तीन देशांतही अशीच शांतता नांदण्यास हरकत फक्त राजकीय नेत्यांची असावी असे वाटले. कच्छची लढाई जुंपली तेव्हा आम्ही तेथे होतो. टेलिव्हिजनवर कच्छ लढाईची दृश्ये दाखविली जात होती. अली व आम्ही ' इंटरनॅशनल हाउस ' मध्ये एकत्र बसून हे सारे पाहात होतो. चँग खूप थट्टा उडवी. पाकची मुद्दाम बाजू घेई. रेव्हरंड जोन्स खोचक प्रश्न करीत व त्या हाउसच्या दारातच लावलेले एक चित्र दाखवीत. सबंध जग एका छत्राखाली येथे राहते असे प्रतीकात्मक चित्र तिथे काढलेले होते. येथे राहणाऱ्यांपैकी बहुतेकजण शिक्षक, प्राध्यापक व डॉक्टर्स होते. ब्रिटिश कौन्सिलच्या प्राध्यापक-शिक्षकांना मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या घेऊन ते आले होते. पाचव्या मजल्यावर माझी स्वतंत्र खोली होती व शेजारी चार देशांतील चार डॉक्टर्स राहात असत. ' मी आजारी पडलो तर माझा हे लोक ' एकच प्याला ' तील तळीराम करतील ' असे नेहमी वाटे. एकदा तेथे जेवता जेवता या डॉक्टर मंडळींना ' तळीराम ' प्रकरण मी सांगितले तेव्हा तसा प्रवेश इंग्रजीत लिहून सादर करावा असा आग्रह त्यांनी केला. डॉक्टर-वैद्य याऐवजी चार देशांतील चार डॉक्टरांच्या भूमिका करण्यास ते तयार होते. या डॉक्टरांत तर एक कोरियन होता. कोरियन युद्धाच्या हकिगती सांगताना तो म्हणे, " मॅकार्थरने चीन-वर त्या वेळी हल्ला केला असता तर भारताला तो आज उपकारक ठरला असता असे नाही तुम्हांला वाटत ? " त्या वेळी चीनकडे पाहण्याची आपली दृष्टी किती वेगळी होती !

पाश्चात्त्य जगाकडे पाहण्याची ही नवी दृष्टी आम्हाला या वास्तव्यात लाभली. आम्ही ' इंटरनॅशनल हाउस 'मध्ये प्रवेश केला तेव्हा प्रथम चहापान झाले. सर्वजण तळमजल्या-वरील ' लाँज 'मध्ये बसलो होतो. इतक्यात एक दुमजली व चकचकीत हातगाडी ढकलीत एक सुहास्य-वदना, सुंदर ललना समोर आली.

" अरे वा, येथील वेट्रेसही इतकी सुंदर!" साऱ्यांच्याच मनात आले असावे. साऱ्यांना तिने चहा दिला. केक्स घेण्याचा आग्रह केला. रेव्हरंड जोन्स हे तेथे राहण्याबद्दलच्या सूचना देण्यात गुंतलेले असल्याने तिची ओळख करून देणे राहिले होते. हे 'आंतरराष्ट्रीय गृह' मेथॉडिस्ट चर्चचे आहे. त्यामुळे त्यांचे धर्मनियम थोडे चटका देऊन गेले. कारण आपले वाघासारखे तीक्ष्ण डोळे आमच्यावर फिरवीत रेव्हरंड जोन्स नम्रपणे म्हणाले, " Dear friends, drinks are completely prohibited here". या वाक्याने सारेच जरा 'नर्व्हस' झाले. चँगनी उगाच पाय हालविले. श्री. रोलँडस मिस्किलपणे सर्वांकडे पाहून हसत होते.

सारे खोल्यांकडे सामान घेऊन गेले तरी बहुतेकांच्या डोक्यात दोन विषय होते. एक 'पेयबंदी' व दुसरा चहापेय देणारी ती सुंदर सेविका.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्टला गेलो तेव्हा 'भोजनगृहात' सर्वांच्या स्वागतास पुन्हा तीच उभी. नायजेरियाचा आदिदेजी उगाच पुढे घुसू लागला. ती सर्वांबरोबर मोकळे-पणाने बोलत होती. 'Good Morning' चे पुकार करीत होती. चौकशी सुरू झालीच व सारेजण पेयबंदीच्या घोषणेनंतर थंड पडले तसेच गप्प झाले. इंगा ही जर्मन तरुणी अशीच एक विद्यार्थिनी होती. शिष्यवृत्ती अपुरी असल्याने हे सेविकेचे काम ती करीत होती. त्या दिवशी संध्याकाळी टेलिव्हिजन पाहात आम्ही सर्वजण बसलो होतो. इतक्यात एक गोरापान उमदा तरुण, तांबड्या टायवरची सोनेरी पिन सारखी करीत दरवाजाशी आला. दार किलकिले करून त्याने आत डोकावताच इंगा उठली व त्याच्याबरोबर चालू लागली.

" इंगाचा हा प्रियकर. त्यांचे लग्न जमले आहे." एकाने खुलासा केला. दुसऱ्या दिवसापासून तिच्या हातचा चहा आमच्या नायजेरियन मित्राला तर अगदीच निगोड लागू लागला.

असे अनेक धक्के आम्हांला मिळत असत. खोली झाडावयास येणाऱ्या म्हातारीनेही आम्हांला एकदा असेच गार केले. मिसेस हार्पर या नावाची ही स्त्री रोज 'गुड मॉर्निंगचा' पुकारा करीत येई. त्या मजल्यावरची लॅट्रिनसपर्यंतची सर्व साफसफाई ही स्त्री करीत असे. वय साठीपुढचे. म्हातारी नाना चौकशा करी. 'मुले किती' विचारी व 'डान्स येतो' का तेही विचारी. माझ्या तरुणपणी मी नेहमी नृत्यांच्या कार्यक्रमांना जाई असे एक दिवसाआड सांगे. आपले तारुण्य लोपले याचा खेद तिला अस्वस्थ करीत असावा. तिचा पती निवृत्त झाला होता. तिचा एक मुलगा कुठे दूर नोकरी करीत होता. रिकामा दिवस खायला उठे

म्हणून ती नोकरी करी. एक दिवस सायंकाळी आम्ही ‘ इंटरनॅशनल हाउस ’कडे परतत होतो. ह्या मिसेस हार्पर जवळच्या एका इमारतीत आम्हांला दिसल्या.

त्या चहा घेत होत्या. हात उंचावून, त्यांनी आम्हाला सलामी दिली. दुसऱ्या दिवशी त्या भेटल्या तेव्हा मी सहज विचारले,

“ काल तुम्ही शेजारी कुठे बसला होतात ? ”

तिने हसत उत्तर दिले.

“ का ? मी घरीच होते, पतीबरोबर माझा चहा चालला होता. ते दुमजली मोठे घर हे आमचेच स्वतःचे. तेथेच मी राहते. ”

दुसऱ्या दिवशी जाताना त्या घराकडे दृष्टी फेकणेही मला कठीण गेले. एक लक्ष रुपये किंमतीच्या घराची मालकीण आमचा मजला झाडीत होती, या कल्पनेनेच मी दिङ्मूढ झालो.

सकाळच्या न्याहारीची वेळ ही येथील सर्वांत मजेची. सकाळी आठ वाजता हॉस्टेल-सारखी घंटा वाजे. सौ. जोन्सची साहाय्यक लिफ्टने प्रत्येक मजल्यावर येऊन हा ठणठणाट करी. त्यानंतर बरीचशी उठाऊठ होई. चँगवर तर या ठणठणाटाचाही फारसा परिणाम होत नसे. कारण रोज रात्री १ पूर्वी व पेयपानाचा यथेच्छ कार्यक्रम झाल्याशिवाय तो कधीच झोपत नसे. माझ्या शेजारच्या खोलीत तो होता. सकाळी रोज ब्रेकफास्टला जाताना चँगचा दरवाजा ठोठवावा लागे. उठून बाहेर आला तर प्रथम बोले एकच गोष्ट. “ Gadkari, my horse must win the race today. Otherwise blame will be yours. ” उठल्यापासून चँगच्या डोक्यात घोड्याची रेस असे. डोळे चोळीत व हातातील ‘ वेस्टर्न मेल ’ ने दिलेले ‘ फेवरिटस ’ पाहात तो भोजनगृहात येई. तिच्या मागोमाग एक दुसरी व्यक्ती आत शिरे.

ही व्यक्ती भोजनगृहात शिरली की एखाद्या सम्राज्ञीचे जयघोषाने स्वागत व्हावे तसे तिचे होई. हातातील चमचे, पावाचे तुकडे फडकावीत सर्वजण हात उंचावीत. कारण तिच्या हाती असलेल्या ‘ पुडक्यात ’ साऱ्यांच्या भावना होत्या. ती ‘ पोस्टवुमन ’ होती. ब्रिटनमध्ये अशी अनेक कामे स्त्रियाच करतात. निळा गणवेश तिच्या अंगावर असे. डोक्यावर आपल्या मुंबईच्या बसड्रायव्हरसारखे शिरस्त्राणही ती घाली. अर्धशतकाच्या वाटेकडे वळलेली ती स्त्री दूर देशाहून आलेल्या आम्हा सर्वांच्याच भावना जाणे व “ आहे, आहे, तुझे पत्र आहे ” असा दिलासा प्रत्येकाला देई. सर्वांनाच पत्रे नसत. एखादा चेहरा

हिरमुसलेला दिसला की जवळ येऊन त्याचा गालगुच्चा घेई व म्हणे,

" I am sorry, your wife has not written to you." " Your wife has forgotten you". असे म्हणून ती एखाद्याची टरही उडवी.

दक्षिण व्हिएटनामचा एक तरुण तर पत्रासाठी उभाच असे. तेथे येऊन त्याला एक वर्ष झाले होते. व्हिएटनाममधील युद्ध व त्या युद्धाच्या छायेत तेथे असलेले त्याचे कुटुंब याने तो मनात खिन्न असे. संध्याकाळी ' इंटरनॅशनल हाउस ' मध्ये परतल्यावर त्याला आपल्या पत्नीची व मुलाची आठवण येई. एक दिवस तो मला म्हणाला, की ही वेळ फार जड जाते. म्हणून मी एक काम शोधून काढले आहे. सायंकाळी त्या आवारातील झाडांना तो पाणी घालीत असे.

पत्रांचे वाटप झाले की सारे मित्र कसे अलग होत. प्रत्येकजण कुठे तरी कोपरा पकडे व आपल्या ' प्रियेचे ' पत्र वाचीत बसे. पत्रे वाचीतच आम्ही गाडीसाठी स्टेशनकडे जाऊ.

आमचे हे रेल्वे-स्टेशन म्हणजे असेच मोठे गमतीदार. ' आल्बर्टा प्लेस ' हे त्याचे नाव. कार्डिफकडून येताना हे पेनार्थच्या पुढचे स्टेशन. कल्याण स्टेशनपुढच्या उल्हासनगर-सारखे. परंतु ब्रिटिश रेल्वेची शोकांतिका या ' अल्बर्टा प्लेस 'च्या रूपाने आम्हांला रोज अनुभवावयास येई.

या स्टेशनवर ' इंटरनॅशनल हाउस 'चे फक्त उतारू. एखाद्या पडीत स्टेशनासारखे ते दिसे. तिकीटकचेरी मागेच बंद झाली होती. काचा साफ फुटल्या होत्या. प्लॅटफॉर्मवर एक मोडके बाक व त्यामागची एकुलती एक पाटी स्टेशन लढवीत होती. युरोपात मोटार हेच महत्त्वाचे वाहन झाल्याने गाडीला कोण विचारतो ? ब्रिटिश रेल्वेचा विकास कार्यक्रम कोणता असा प्रश्न जर कुणाला विचारला तर उत्तर मिळेल, " एकामागून एक स्टेशन्स बंद करण्याचा ". ही योजना " बीचिंग प्लॅन " म्हणून ओळखली जाते. स्थानके कमी करून रेल्वे किफायतशीर कशी करावयाची हे या योजनेत सुचविले आहे.

अशा या अल्बर्टा प्लेसवर आमच्या स्वाऱ्या सकाळी ९-३० वाजता दाखल होत. हिरव्या रंगाची सुरेख गाडी फलाटावर येई. प्रत्येकासाठी जणू स्वतंत्र डबा होता. कारण त्या गाडीत एकही प्रवासी नसे. तिकिटाशिवाय आम्ही सारेजण गाडीत चढत असू. पुढचे स्टेशन पेनार्थ. दीड मिनिटात येई. तेथे तिकीट काढावयाचे. पेनार्थ ते कार्डिफ. एक शिलिंग टू पेन्सचे रिटर्न. म्हणजे अल्बर्टा प्लेस ते पेनार्थ हा प्रवास साऱ्यांना निमंत्रणा-दाखल फुकट. एकजण सर्वांचे पैसे गोळा करी. कधी तिघे-चौघे उतरत. गाडी थांबली की

पेनार्थला बाहेर जाऊन तिकिटे काढावयाची. तोपर्यंत गाडी जाण्याचा प्रश्नच नाही. तेथे कार्डिफला बाजाराला निघालेल्या काही बायाबापड्या असत. त्या आपल्या लहान मुलांना बाबागाडीत बसवून आणीत. त्या सर्व बाबागाड्या गार्डबाबू ब्रेकमध्ये चढवी. आई, आजी, पोरं-नातवंडं घेऊन डब्यात बसत. मग प्रवास चालू. परंतु हे फार झपाट्याने होई. पुन्हा आरडाओरड नाही. गार्डने ' ओके ' चा अंगठा दाखविला की गाडी सुरू. गाड्यांचा वेगही पन्नाशीचा. यामुळे स्टेशने झरझर येत. कार्डिफला उतरले की भुयारी मार्गाने पलीकडे.

हा आमचा रोजचा कार्यक्रम. संध्याकाळचे जेवण ६-१५ ला असे. ते फार गैरसोईचे होते. तेव्हा भूक नसे. कारण दुपारचे जेवण दीडला होई आणि पुन्हा ते ऐसपैस असे. पेनार्थला या जेवणासाठी परतावे लागे. पुन्हा कार्डिफला जायचे तर गाडी नाही. गाडीचा दर सकाळी ९-३० नंतर अर्धा. परंतु तो ४ पर्यंत; नंतर दुप्पट. बसही महागडी. त्यामुळे भूक असेल तितके जेवायचे व टेलिव्हिजन पाहात अगर समोर समुद्रकिनारी भटकायचे हा रोजचा उद्योग.

माझ्या पाचव्या मजल्यावरून दिसणारे समुद्राचे दृश्य असेच मनोवेधक. ' इंटरनॅशनल हाउस 'च समुद्रकिनारी बांधलेले. पलीकडे खाली गोल्फ ग्राउंड व किनाराच. किनाऱ्यापलीकडे ब्रिस्टल, न्यूपोर्टचे दिवे चमकत. मधली ब्रिस्टलची खाडी ही मात्र नेहमी शांत असे. पेनार्थचा हा भाग तसा उंचवट्याचा. त्यामुळे समुद्र खाली हात न लावता येण्याजोगा. परंतु सायंकाळी तेथील हिरवळीवर, गवतातून डोकावणाऱ्या डेझी फुलांना संभाळीत चालणे हा रोजचाच कार्यक्रम. तो किनारा इतका शांत होता, की ती शांतता फार अस्वस्थ करी. जुहूच्या किनाऱ्यावरील गर्दीने वैतागलेल्या मुंबईकरांना पेनार्थच्या तीरावरील ही धीरगंभीर शांतता मोठी मोहक वाटेल. आम्हांलाही काही दिवस ती सुखावह वाटली. परंतु पुढे ती अस्वस्थ करू लागली. पेनार्थचे प्रत्यक्ष बंदर खाली थोडे दूर होते. तेथे एक लांबच लांब धक्का समुद्रात शिरलेला आहे. तेथे खूप वर्दळही असे. समोरचे पब्ज भरलेले असत. परंतु ते सारे चुकवून या किनाऱ्याकडे लोक येत ते एकान्त शोधीत. समुद्राच्या लाटाही ती शांतता आपल्या आवाजाने कधी भंग करीत नसत. अखेर गोल्फ ग्राउंडवरची माणसेही पांगत आणि सूर्यास्त होताना आमच्या समोरच्या त्या लांबच लांब रस्त्यावर एक चिटपाखरूही नसे. सिओरे लिओनचा ग्रे कोकर कोपऱ्यावरच्या खोलीत होता. तो म्हणे, " हा शांत समुद्र, हा निवांत किनारा, हा रिकामा रस्ता, ही बंद घरे पाहून मी योगी होईन की

काय असे वाटू लागले आहे."

एक दिवस तो माझ्या खोलीत धावत आला आणि बालकाच्या उत्साहाने माझ्या खिडकीत उभा राहून सांगू लागला.

"समोर पाहिलीत, एक बोट दिवे उजळीत समोर येऊन उभी राहिली आहे."

त्या दिवशी ती बोट तेथेच थांबली व आम्ही सारेजण ती बोट पाहात लहान मुलांसारखे खिडकीत बसून:राहिलो.

प्रकरण सातवे

# वेल्श कुटुंबातील एक संध्याकाळ

वेल्श लोक हे गोव्यातील लोकांसारखे अघळपघळ. किनाऱ्याजवळची सर्वच माणसे नाकात बोलत असावीत. कारण वेल्श लोकांनाही तीच संवय होती. इंग्रज वेगळे, वेल्श वेगळे, स्कॉट निराळे व आयरिश आगळे हे राणीच्या राज्यात गेल्याशिवाय कळावयाचे नाही. वेल्श माणूस इंग्रजांपेक्षा उंचीने कमी. वेल्श स्त्रिया बहुतेक पतीपेक्षा उंच. चेहरे गोल व हसरे. ओळख करून दिल्याशिवाय इंग्रज माणूस बोलत नाही असे सांगितले जाते. परंतु वेल्श माणसाला रस्त्यात सलाम केला नाही तर राग येतो. सकाळी असंख्य स्त्री-पुरुषांना ' सुप्रभात 'चा मुजरा करीत आम्हा सर्वांनाच जावे लागे. लंडनमध्ये ही अपेक्षा नाही. म्हणून तर वेल्सचे वेगळे राज्य झाले पाहिजे, असे प्रत्येक वेल्श माणसाला मनातून वाटते. परंतु संकुचित राष्ट्रीयत्वाचे विपरित परिणाम उमजण्याइतका तो समजूतदार आहे. उघड बोलून दाखविणारेही आहेत. त्यांच्या विचारांना वेल्श वृत्तपत्रे भरपूर प्रसिद्धीही देतात.

वेल्श भाषेचा अभिमानही त्यांना कमी नाही. शाळांतून ती भाषा अजूनही मुलांना शिकविली जाते. हे ' Pure Welsh Music ' आहे. हे ' Undiluted Welsh song ' आहे अशी प्रास्ताविके मी तेथे रोज ऐकत होतो. गेल्या सात-आठ शतकांतील जुन्या वेल्श घरांचे नमुने उचलून आणून त्यांचा संग्रह या लोकांनी एके ठिकाणी करून ठेवला आहे. या घरांत त्या त्या कालातील फर्निचर मांडलेले आहे. वेल्श शेतकऱ्याचे घर मोठे रम्य होते. खोल्याखोल्यांत शेकोट्या होत्या. पलंग तर फार मोठमोठे. कार्डिफपासून

जवळच हा वेल्श म्युझियम आहे. कुणाही प्रथितयशाचे नाव काढले की ' After all he was a Welshman ' असे म्हटल्याशिवाय वेल्शमन राहणार नाही. मग बेव्हानसारखा दिवंगत राजकीय नेता असो किंवा राजकन्या मार्गारेटचा पती अर्ल ऑफ स्नोडाउन असो. आर्मस्ट्राँग जोन्स हे ' प्युअर ' वेल्श नाव त्यांनी टाकले तरी स्नोडाउन हे नाव उत्तर वेल्शमधील हिमशिखरावरून कसे घेतले हे ही मंडळी रंगवून सांगतील. प्रिन्स चार्लस्‌बद्दल साऱ्या वेल्श म्हाताऱ्या कशा कौतुकाने बोलतात. कारण तो ' प्रिन्स ऑफ वेल्स ' आहे. किती लहान ही ब्रिटिश बेटे! त्यात वेल्श हा अर्धा डोंगराळ व अर्धाच दाट वस्तीचा भाग. परंतु आपला इतिहास, आपल्या परंपरा यांचा अभिमान ते विसरू शकत नाहीत.

काही वेल्श कुटुंबांशी माझा जवळून परिचय झाला होता. त्यांच्या घरी मी अनेकदा गेलो. त्यांपैकी एका वेल्श कुटुंबात घालविलेली एक संध्याकाळ माझ्या मनावर संस्कार करून गेली. सूर्य समोर मावळताना दिसला की, ती रमणीय संध्याकाळ मला नेहमी आठवते.

तेथील संध्याकाळच मोठी विलक्षण होती. न संपणाऱ्या रात्री व मैफली आपण अनुभवितो, परंतु न संपणारी संध्याकाळ मी तरी कधी पाहिली नव्हती. ती रेंगाळणारी संध्याकाळ मी रोज पेनार्थमध्ये अनुभवीत होतो. चाहूल लागू न देता ती येई व ' जाते ' म्हणून निरोप घेणाऱ्या पण न जाणाऱ्या प्रियेसारखी ती ताटकळत राही. सूर्याचा निरोप घेण्यास संध्येने वेळ तरी किती लावावा?

रात्रीचे दहा वाजण्याची वेळ आली की संध्याकाळ आपला पसारा गुंडाळीत असे. ' इंटरनॅशनल हाऊस 'च्या पाचव्या मजल्यावरील माझ्या खोलीच्या खिडकीतून डाव गोळा करणारी संध्याकाळ मी पाहात असे. ब्रिस्टलच्या खाडीपलीकडचे दिवे चमचमू लागत. पेनार्थच्या किनाऱ्यावर रेंगाळलेले लोक परतू लागत. एखादा फेल्ट घातलेला बुढ्ढा, केसाळ कुत्रा ओढीत चाललेला असे. संध्याछायेच्या पडछाया जाणवू लागत. वातावरण कसे धुंद असे. जिना उतरून टेलिव्हिजनच्या खोलीत शिरले तर बिटल्सचे नृत्य व गायन चालू असे. " Where are you, now my love, " ची आर्त लकेर, गहिऱ्या सुरात व गिटारच्या उन्मादक तालात दिली जाई. संध्याकाळ निरोप घेई ती पुन्हा येण्यासाठी.

परंतु वेल्श कुटुंबात घालविलेली एक संध्याकाळ संपली असे मला कधी वाटले नाही. माझ्या नव्या आंतरराष्ट्रीय मित्रांबरोबर मी तिथे गेलो तेव्हा ते सर्व वेल्श कुटुंबच आमचे

स्वागत करण्यास दरवाजात उभे होते. कुटुंब म्हणजे आपल्यासारखे नुसते पती, पत्नी नव्हे तर त्यांची मुलेही. घरात पाहुणे आले की मुलांना आपण दुसऱ्या खोलीत किंवा बाहेर पाठवतो. येथे प्रत्येक ठिकाणी आलेल्या पाहुण्यांबरोबर मुलेही रमलेली पाहावयास मिळतात. एक माणूस मात्र स्वागताला बाहेर उभे नव्हते. समोरच्या दिवाणखान्यात शिरलो तर ती व्यक्ती एका कोचावर बसून सर्वांचे हसत स्वागत करीत होती. आमच्या यजमानांची ती वृद्ध आई होती. एकंदरीत सारे कुटुंबच तेथे हजर होते. दहा वर्षांचा सायमन व बारा-तेरा वर्षांची रोझ मेरी यांनीच स्वागत-व्यवस्थेचा ताबा घेतलेला दिसत होता. प्रत्येकाला बसावयास नीट जागा मिळाली की नाही याची पाहणी त्यांच्या आईने चालविली होती. परंतु मुले त्या आधीच प्रश्न सोडवीत होती. आजीने दोन पाहुण्यांना आपल्या शेजारी घेतले होते व मध्ये बसून म्हातारीने कौटुंबिक चौकशीस सुरुवात केली होती.

इतक्यात त्या वेल्शघरातील दिवाणखान्यात रविशंकरांच्या सतारीचे सूर ऐकू येऊ लागले. अली अकबरांची साथ जाणवत होती. त्या वेल्श स्त्रीने रेकॉर्ड प्लेअर सुरू केला होता तो भारतीय संगीताने आणि अल्प वेळात सर्व जगाचे संगीत तिथे घुमू लागले. हे भारतीय संगीत फार संथ वाटते असे नायजेरियन मित्र म्हणू लागताच नायजेरियन संगीताची तबकडी वाजू लागली. इंग्रजी संस्काराचे ते संगीत सुरू होताच सर्वांनी ताल धरला. एकीकडे सायमन व रोझ मेरी खाद्यपदार्थांच्या बश्या पाहुण्यांसमोर धरीत होत्या. इतक्यात आमचे यजमान हातातील रंगीबेरंगी पेयांचे ग्लासेस सावरीत नृत्य करीत आले. त्यांचा हा उत्साह पहिल्या फेरीपुरता नव्हता. त्या न संपलेल्या संध्याकाळी हसतमुखाने, अखंड उत्साहाने ते असेच नृत्य करीत दिवाणखान्यात शिरत होते. पत्नी रेकॉर्ड प्लेअरजवळ बसून होती. प्रत्येकाशी बोलून त्याला हवी असलेली रेकॉर्ड लावीत होती. ती संगीतावर चर्चा करीत होती. स्वतः ओळी गुणगुणत होती. ताल धरीत होती, सूर देत होती. बोलता बोलता आमचा नायजेरियन मित्र नृत्य करू लागला होता. रोझ मेरी त्याला साथ देत होती. यजमान बश्या व ग्लासेस घेऊन येत होते. पत्नीने पाहुण्यांबरोबर बसावयाचे व नवऱ्याने स्वयंपाकघरातून बश्या आणून पाहुण्यांना द्यावयाच्या ही कल्पना आमच्या भारतीय स्त्रियांना एकदम पसंत पडेल. ‘ तुमचे पाहुणे फार येतात ’ ही तक्रार त्यांना मग करावीशी वाटणार नाही. त्याच वेळी ती वृद्ध आई आपल्या शेजारी बसलेल्या दोन परदेशी पाहुण्यांना दुसऱ्या महायुद्धाच्या आपल्या आठवणी सांगत होती. कोणी कुणाजवळ फार काळ बसत नव्हते. माणसे सारखी फिरत होती. “ जर्मन लोकां-

बद्दल मला प्रेम कधीच वाटणे शक्य नव्हते, परंतु सायमनचा जर्मन मित्र आमच्या घरी रहावयास आला व हिटलरचे चित्र माझ्या डोळ्यांसमोरून निघून गेले ", ती वृद्ध स्त्री मला सांगत होती. या सर्व धामधुमीत सायमन रंगला होता. त्याच्या हातात कसले तरी पुस्तक होते. ते घेऊन एका लहान स्टुलावर तो प्रत्येकासमोर येऊन बसे आणि त्यामधील कोडी टाकी. एकदा तो माझ्यासमोर येऊन बसला व कोंबडीच्या पिलाचे तीन दिवसांनंतर काय होईल ? असा गंभीर प्रश्न त्याने माझ्यापुढे टाकला. मी डोके खाजवत आहे हे पाहून एकदम हसत तो ओरडला, " हे पिलू चार दिवसांचे होईल, हे कसे तुमच्या लक्षात येत नाही ! " दिलखुलासपणा हा त्या संध्याकाळचा आत्मा होता. पाहुण्यांची ऊठबस करण्यात दंग झालेले आमचे यजमान आपला अधिकार, आपले ऐश्वर्य साफ विसरले होते. मधून एखाद्याला आपल्याजवळच्या मौल्यवान पुस्तकाचा परिचय करून देत. तर पेय देता देता, सायमन येऊन काही तरी कोडे टाकी. त्याची उत्तरे ते सुचवीत. आमच्यापैकी काहींनी त्या मुलांना कोडी टाकण्यास सुरुवात केली होती. त्यांची उत्तरे मिळविण्यासाठी ती मुले आई-वडिलांकडे मग धरणे धरीत. पाहुण्यांसमोर आपल्या मुलांना शक्यतो हटकण्याची संवय असणाऱ्या आम्हा भारतीयांना ते दृश्य वेगळे होते. ती मुले आपल्या आजीसह सर्व पाहुण्यांत रंगून गेली होती. सारे घर रंगले होते. संगीताने ती संध्याकाळ बोलकी केली होती. त्या कुटुंबाने आपल्या प्रेमळ व मनमोकळ्या वागणुकीने ती नटविली होती. सात देशांचे प्रतिनिधी एका भावनेने तेथे रंगले होते. म्हणूनच ती संध्याकाळ संपू नये असे सारखे वाटत होते. संध्येचे प्रियाराधन असेच चालावे असे सारखे जाणवत होते आणि खरोखर ती संध्याकाळ रेंगाळत राहिली, त्या दिवशी आणि आता माझ्या मनात कायमची !

प्रकरण आठवे

# जेव्हा वसंत फुलतो

Where the grass is green,
Sky is ever blue,
Let us go !

एक गायिका उंच स्वरात ही रसीली हाक नभोवाणीवरून देत होती. ऑर्गनच्या सुरात भिजलेले ते बोल ऐकताच आमचा प्रवास सुरू झाला होता. ब्रिटनची राणी प्रवास करते त्या ' ऑस्टिन प्रिन्सेस 'मध्ये मी बसलो होतो रोल्स रॉइसचा हा प्रवास माझ्या जीवनात नवा होता. कुणाची तरी पुण्याई मी भोगीत होतो. आमच्या जुन्या राज्यकर्त्यांच्या निमंत्रणावरून उत्तर वेल्सच्या दौऱ्यावर मी चाललो होतो. काळ्या रंगाच्या त्या ऐसपैस गाडीत आरामात बसून ते बाहेरचे हिरवे माळ व निळे आकाश मी अधीरतेने पाहात होतो. मोटारीत लपलेला तो रेडिओ त्या निसर्गरम्य दृश्यात, पेल्यात शांपेन ओतावी तसा सूर भरीत होता.

" इंग्लंडमध्ये आता वसंत फुलला असेल, मी तिथं असावयास हवे होते " असे तळमळीने लिहिणाऱ्या व:त्या वेळी रोममध्ये वास्तव्य करीत असलेल्या ब्राउनिंगची मला त्या दृश्याने सर्वप्रथम आठवण झाली. माझ्या भाग्याने फुललेला वसंत मी पाहात होतो. डोळ्यांत साठवीत होतो.

अथांग सागरासारखेच पसरलेले हिरवे माळ. त्यांवर रंगीबेरंगी फुले फुललेली. लहान-मोठ्या आकारांची. ' डेझी ' या पांढऱ्या व सुंदर फुलांच्या रूपाने या वसुंधरेच्या कणा-

कणातून वसंत फुलला आहे असे वाटे. या हिरव्या माळावरून चालताना ही फुले एकसारखी पायांखाली येतात. वाऱ्यावर डुलत. अखेर तुम्ही पाय पुढे टाकू शकत नाही.

गवतातून अधिक उंच मान करून पाहणारी फुले म्हणजे 'बटरकप्स्'. त्यांचे सुरेख वर्णन ब्राउनिंगने त्याच कवितेत केले आहे. ही फुले आपल्या पिवळ्या शेवंतीसारखी दिसतात. हिरव्या माळावरची ही पिवळी शेवंती जेव्हा वाऱ्यावर डुलते तेव्हा वसंताच्या आगमनाने बहरलेली ही वसुंधरा नववधूप्रमाणे एकसारखी लाजते आहे असे वाटते. इतक्यात वर्डस्वर्थला दिसलेले —

"A host of golden daffodils"

दिसतात. पूर्णपणे उमलणारी ही फुले त्याच्या पाकळ्या वसंतराजाच्या भेटीने वाकतात.

"Ten thousand saw I at a glance"

या वर्णनाप्रमाणे डॅफॉडिल्सचे फुललेले ताटवे दिसू लागतात. तुमच्या दोन डोळ्यांच्या तबकात ते मावू शकत नाहीत.

ही फुले पाहात असतानाच, पाइन वृक्षांच्या रांगा तुमच्यासमोर सैनिकांच्या पलटणीसारख्या येऊन जाऊ लागतात. हिरव्या गर्द झाडीने उघडे माळ दिसेनासे झाले. पाईन व ओक वृक्षांच्या गर्द झाडीतून आमची 'ऑस्टिन प्रिन्सेस' क्षणार्धात धावू लागली. लहान डोंगर व सुंदर सरिता ओलांडून ती चालली होती. काही डोंगरांवर गर्द झाडी होती तर काहींवर नुसती हिरवळ आणि त्यावर चरणारे मेंढ्यांचे पुंजके. लोकरीच्या भाराने वाकलेले. दुरून तर त्यांची विशेष हालचालही दिसत नव्हती. हिरव्या डोंगरावर पडलेल्या पिवळसर फुलांसारखेच हे पुंजके दुरून दिसत होते.

या सर्वांपेक्षाही वेड लावणारे दृश्य दिसते ते नदीकाठी. कोकणातील काही दृश्यांची आठवण करून देणारे. परंतु शीतल हवा, सूर्यकिरणांची बरसात, गर्द हिरवी झाडी, खळखळणारे परंतु बेताचे पाणी अशी सर्व गुणांनी नटलेली सरिता क्वचित वाट्याला येते. प्रवाहाजवळ एखाद्या शिळेवर जाऊन उभे रहावे. समोर दूरवर डोंगरांची रांग दिसते. नंतर सर्व हिरवी गर्द झाडी पाइन वृक्षांची. त्या झाडांना बगल देत सरिता येते. दगडांच्या पायऱ्यांवर उड्या घेत असल्याने पाणी कसे फेसाळलेले. वर्षातील अनेक महिने बर्फाने झाकल्यामुळे दगडांचा रंगही कसा धुपट, तपकिरी दिसतो. या सर्व दृश्यावर मधूनमधून डोकावणारे सूर्यकिरण. वसंताचे ते पंख!

धावत्या मोटारीतूनही अशी दृश्ये किती तरी दिसत. नदीच्या पुलावरून गाडी गेली की,

दोन्ही बाजूंची दृश्ये चटकन टिपण्यासाठी डोळे झेप घेत. मधून मधून गळ टाकून माशांचा व जीवनाचा वेध घेत कुणी तरी बसलेला दिसे. त्याची टोपी व तोंडातील चिरूट निःस्तब्ध आकृतीला वाचा आणी.

ही निसर्गदृश्ये पाहात आम्ही प्रथम थांबलो ते एका पुरातन उपाहारगृहाशी. शेवटचा प्रिन्स ऑफ वेल्स ' लेवलिन ' याचा ज्या घरात इंग्रज आक्रमकांनी वध केला ती ही जागा. वेल्श व इंग्रज यांच्यामधील लढाया हा येथील नागरिकांचा आवडता विषय. इंग्रजांनी अखेर आमच्या राजपुत्राला मारून वेल्स हा प्रांत अन्यायाने गिळंकृत केला असे त्यांना प्रामाणिकपणे आजही वाटते. त्याची स्मृती कायम ठेवण्यासाठी एका व्यवहारी गृहस्थाने ते घरच विकत घेतले व तेथे उपाहारगृह सुरू केले. गेली दीडशे वर्षे त्या कुटुंबाकडे ते घर आहे. ती जागा पाहण्यासाठी प्रवासी थांबतात व या शेवटच्या वेल्स राजपुत्राच्या समाधीचे दर्शन घेतात. ही समाधी उपाहारगृहापासून जवळच आहे. ती पाहात असताना, ' राजपुत्र चार्लस हा " प्रिन्स ऑफ वेल्स ", केवळ लादलेला, आमच्या मूळ घराण्यातील नव्हे ', हे सांगावयास वेल्श माणूस विसरत नाही. हा नवा प्रिन्स ऑफ वेल्स ब्रिटनचा उद्याचा राजा आहे.

' ॲबरस्विथ ' हे वेल्स किनाऱ्यावरचे आणखी एक सुंदर गाव. जुहूच्या किनाऱ्याची आठवण करून देणाऱ्या या किनाऱ्यावर आम्ही जाऊन पोहोचलो तेव्हा सूर्यदर्शनासाठी हपापलेले आमचे साहेब व त्यांची मंडळी खुर्च्या टाकून उन्हात न्हात होती. याच गावात असलेले एक गवत संशोधन केंद्र पाहण्यासाठी आम्हांला नेण्यात आले. वर्षभर पाऊस व शीतल हवा त्यामुळे ब्रिटन वर्षभर हिरवेगार राहते. तरीही गवताच्या नुसत्या रंगाने समाधान मानणारे येथील लोक नसल्याने गवताचे अधिक सकस प्रकार शोधण्याचे प्रयोग त्यांनी चालविले आहेत. भारतातही अशा प्रकारची केंद्रे आहेत. या ठिकाणी आम्हांला काही भारतीय विद्यार्थी भेटले. इतर अनेक देशांतील विद्यार्थी तिथे होते. गवताची बरीच चवीने केलेली चर्चा येथे ऐकली. वेगवेगळ्या हवामानाची काचेची घरे तेथे होती. " हे ८०° उष्णतामानाचे घर. तुमच्या देशातील उष्णतामान इतकेच असते ना ? " एकाने विचारले. त्या काचेच्या घरात शिरण्यास जणू कुणी धजत नव्हते. मी आत एक फेरी मारून आलो. मुंबईत फेरी मारल्यासारखे वाटले, दुसरे काय ? तिथे ' कडक ' उन्हाळ्याचा वसंतऋतू म्हणजे दिल्लीतील नोव्हेंबरचा हिवाळा हे बाहेर आल्यावर अधिक पटले. हवामानामुळे तेथील लोकांना कामाचा उत्साह अधिक वाटतो. अर्थात थंडीच्या

बाबतीत हे विधान करता येणार नाही.

तेथून ॲटॉमिक पॉवर प्लँट पाहण्यासाठी आम्हांला जायचे होते. आपल्याकडे ठाणे जिल्ह्यात तारापूर येथे ज्या धर्तीचे न्युक्लिअर पॉवर स्टेशन तयार झाले आहे त्याचा नमुना मी येथे पाहिला. 'मेरिओनेथ' या गावी ते आहे. वीज अगर पाण्याचा भरपूर पुरवठा नाही असे एक गाव नसलेला हा देश. अर्थात आमच्या व या देशाचा आकार तुलना करताना सारखा जाणवतो. परंतु आमच्याकडेही अशा गोष्टी आहेत व नव्या उभ्या राहात आहेत, असे सांगितले, की येथील लोकांना नवल वाटते. आमच्या अन्नप्रश्नाने आमची परदेशात भरपूर बदनामी मात्र करून ठेवली आहे.

'हार्लेक' या गावी एक अभिनव संस्था आम्ही पाहिली. 'कॉलेज ऑफ सेकंड चान्स' म्हणून ही संस्था ओळखली जाते. आयुष्यात अनेकदा आपला मार्ग चुकला असे अनेकांना वाटते. मी करतो त्यापेक्षा वेगळा व्यवसाय मला हवा होता असे अनेकदा किती तरी लोकांना वाटत असते. परंतु वाटचाल चालू झालेली असते व परत फिरणे शक्य नसते. तसे वाटू न देणारी ही संस्था. जगातील कोणतीही व्यक्ती येथे येऊ शकते. कंडक्टर्सपासून कामगार-कार्यकर्त्यांपर्यंत अनेकजण येतात. काहींना व्यवसाय बदलायचा नसतो, परंतु काहींना विशिष्ट दर्जाचे अध्ययन करावे असे वाटत असते. काही महिन्यांच्या मुदतीचे शिक्षणक्रम येथे घेतले जातात. त्यासाठी शिष्यवृत्त्या आहेत. उत्तर प्रदेशामधील दोन सामान्य कामगारांना येथे शिक्षणासाठी आणावे म्हणून या कॉलेजातील विद्यार्थ्यांनी नागरिकांच्या मदतीने रक्कम जमा केली आहे. दोन उत्तर भारतीय आपला चुकलेला जीवनक्रम बदलण्यासाठी लौकरच तेथे येणार होते. भारतीय कामगार कार्यकर्तेही तेथे पाठविले जाणार होते.

हार्लेक हे एक अगदी किनाऱ्यावरचे गाव. हे गाव प्रसिद्ध आहे ते तेथील किल्ल्यामुळेच. कोकणातील किल्ल्यांनी नावारूपास आलेल्या गावासारखेच हे एक गाव. पलीकडे पुन्हा एक गाव दिसत होते. भरती-ओहोटीवर चालणारा एक पूल मध्ये होता. त्यावरूनच आम्ही जाणार होतो. टेकड्या, किल्ले, हिरवे माळ यांनी सजलेले हे हार्लेक गाव सोडताना वाटले की, या सुंदर गावात आपण राहावयास हवे होते.

परंतु तो पूल ओलांडून विसाव्यासाठी आम्ही पलीकडच्या तीरावर गेलो तर समोर दिसलेले गाव तर अगदी स्वप्नासारखे होते. केवळ ते पाहण्यासाठी दूरवरून लोक येतात. लॉर्ड बर्ट्रंड रसेल यांचेच हे गाव. या गावातील सागरतीरावरची प्रचंड जागा एका स्थापत्य-शास्त्रज्ञाने विकत घेतली व त्यावर एक इटालियन खेडे उभे करावयाचे ठरविले.

या खेड्यानेच हॉटेलचे रूप घेतले. खेड्यात अनेक घरे असावीत तसे अनेक घरांचे हे हॉटेल ‘ पोर्ट मेरियन ’! प्रत्येक घर वेगळे, परंतु इटालियन पद्धतीचे रंगीबेरंगी. डोंगर-उतारावर ही सर्व घरे बांधली आहेत. त्यामुळे सारखे चढउतार करीत या वस्तीत फिरायचे. ‘ हॉटेल पोर्ट मेरियन ’ची नवलाई पाहिल्याशिवाय उमजायची नाही. मधूनच घरांना उंच शिखरे. चर्चसारखे मनोरे. कुठे वेगळ्याच रंगाचे दिवे लावलेले. काही घरांच्या बाहेर दिव्यांची झुंबरे लटकलेली. त्या दिव्यांप्रमाणे भिंती रंगविलेल्या. एक घर अनेक रंगांत रंगविलेले. १९२७ पासून हा कलावंत ही नगरी बांधतो आहे, परंतु अजून काम अपुरेच आहे. क्ल्व विलियम एलीस हे या कलावंताचे नाव. सध्या हा गृहस्थ ८३ वर्षांचा आहे. नुकताच त्याचा वाढदिवस साजरा झाला. ९३ वर्षांच्या लॉर्ड रसेल यांनी आपल्या गावकरी मित्राला पत्र लिहिले. त्या पत्राची सुरुवात होती,

‘ My dear young man ! ’

ही सर्व घरे समुद्रकिनाऱ्यावर आहेत तर पाठीमागे अगदी गर्द झाडी आहे. गजबजलेल्या शहरापासून आपण शेकडो मैल दूर आहोत असे त्या जंगलातून हिंडताना वाटते, तर समुद्र-किनाऱ्यावर येऊन बसले तर समोरचे न थकणारे जग दिसते. येथून समोरचे हार्लेक गाव व त्या गावाचा वैभव असलेला किल्ला किती सुंदर दिसतो ! या हॉटेलच्या अनेक घरांचा अर्धा रंग पिवळा तर अर्धा निळा. सजावटीसाठी अनेक पक्ष्यांच्या आकृती कुठे वर्तुळाकार तर कुठे चौकोनी अशा चितारलेल्या. प्रत्येक गोष्ट वेगळ्या आकाराची करायची याचेच वेड या कलावंताला असावे. परंतु या सर्व वस्तूंचा प्राण कोणता असेल तर तेथील पब !

पेयाचे घुटके न घेताच प्रवाश्याला वर्तमानकालातून भूतकालात घेऊन जाणारा हा पब होता. जागा थोडीशी अंधारलेली. सिगारेटच्या वलयांचे ढग हातांनी बाजूला करीतच माणूस आत शिरतो. खुर्च्या साधारण ३०० वर्षांपूर्वीच्या जमान्यातील. टेबलाऐवजी लोकांच्या पोटात रिकामी झालेली पिंपे उपडी करून ठेवलेली. त्याहीपेक्षा नाविकाच्या पुरातनकालीन बॅगेपासून ते सैनिकाच्या चिलखतापर्यंत असंख्य वस्तू तेथे अशा टांगल्या होत्या की, वर्तमानकाळाचे भानच कुणाला राहू नये. कुठे मंदिरातील घंटा टांगल्या आहेत तर जुन्या भांड्यांचे एक प्रदर्शनच तिथे भरविले होते. जंगली फळे व विविध देशांतील पुरातन दिवे यांची अशी गर्दी तिथे केलेली होती की, एका वेळी सर्व गोष्टी नजरेतही येऊ नयेत. या रंगीबेरंगी दिव्यांतून पसरणारा मंद प्रकाश ही सारी सजावट खुलवून टाकीत

होता. पेयाचे रंग बदलीत होता. सिगारेटचा धूर सोनेरी रंग घेत होता. गप्पा मारीत, घुटके घ्यावे व जग विसरावे. सकाळी माझ्या राहत्या खोलीत मला जाग आली तेव्हा त्या खोलीची ऐट व सजावट पाहून मी क्षणभर चमकलोच. बाहेर पक्ष्यांची किलबिल सुरू होती. सागर-संगीत वाऱ्यावर ऐकू येत होते. खिडक्यांचे झिरझिरीत पडदे बाजूला करून मी उताराकडे पाहिले. तो त्या कलावंताचे ते अपुरे स्वप्न जागे होत होते.

६४०१२
४४५
स्वतंत्र
ग्रं. ५
५६३६०
१०६५

प्रकरण नववे

# बर्ट्रांड रसेल — एक ओझरती भेट

PENRHYNDEUDRAETH ! ज्याची हिंमत असेल त्याने या शब्दाचा उच्चार करून दाखवावा. ज्याची वाणी हे शब्द बोलेल त्याच्या चरणी नतमस्तक व्हावयास मी तयार आहे. कारण एका जागतिक कीर्तीच्या तत्त्ववेत्याचे हे गाव आहे. आपल्या आयुष्याची संध्याकाळ तो तेथे घालवतो आहे, आणि तीही निवांतपणे नव्हे. व्हिएटनामच्या प्रश्नावर अमेरिकेचे अध्यक्ष श्री. जॉन्सन यांच्यावर खटला भरण्याची योजना ते तेथून आखीत आहेत. कर्तृत्ववान व्यक्तीच्या नावाने गावाचेही नाव होते ते हे असे; आणि ती व्यक्ती आपल्या विद्वत्तेचा असा ठसाही गावावर उमटून ठेवते. गावाच्या नावाशीच मी जेथे अडलो तेथे या तत्त्वज्ञान्याच्या लेखनाचे आकलन मला कसे होणार ?

' पेनन्हिनदिउद्रिएथ ' या गावात दिनांक २८ मे १९६५ रोजी मी गेलो, आणि तेथील आलिशान हॉटेलच्या रंगतदार बारमध्ये चमकत्या ग्लासातील पेयाचे घुटके घेत असताना सहज कुणीतरी म्हणाले, " बर्ट्रांड रसेल या गावात राहतात. परंतु अगदी एका बाजूला ". क्षणभर सारेच स्तब्ध झाले. या शतकातील एक महान तत्त्वज्ञ येथे राहतो व त्याची भेट होऊ नये, त्याचे दर्शन आपल्याला होऊ नये हे कुणाला पटेना. आमच्या-बरोबर अनेक देशांतील लोक होते. प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगळ्या, राजकीय मते निराळी. मुलाखत आधी ठरविल्याशिवाय त्यांची भेट होऊ शकणार नाही असे आग्रही प्रतिपादन आमच्याबरोबर आलेल्या राणीच्या प्रतिनिधीने केले. रसेल यांच्या भेटीत जो वेळ

जाईल त्यामुळे स्नोडोनियाच्या शिखरावर नेणारी छोटी गाडी चुकेल हेही एकाने निदर्शनास आणले. परंतु अखेर रसेलवाद्यांचा विजय झाला. ब्रिटिश परंपरेतील सारे नियम मोडून रसेल यांच्या भेटीला जाण्याचा निर्णय झाला. साऱ्यांनी ग्लास उंचावले व निर्णयावर शिक्का-मोर्तब केले.

बर्ट्रांड रसेल यांच्या या भेटीबद्दल राजकीय दृष्ट्या भारतातीलही अनेकांना विशेष औत्सुक्य वाटणार नाही हे खरे. ब्रिटनप्रमाणे येथेही कम्युनिस्टांचे सहप्रवासी म्हणून ते ओळखले जातात. अमेरिकेचा निषेध करणारी वक्तव्ये ते फार तत्परतेने करतात व रशियाच्या बाबतीत ओलावा राखतात ही त्यांच्याबद्दलची प्रमुख तक्रार. परंतु त्यांच्या भोवतीचे हे राजकीय वलय दूर सारून त्यांच्या व्यक्तित्वाचा मी क्षणभर विचार करू लागलो, तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर आपल्या विचारांसाठी, मतांसाठी, तत्त्वज्ञानासाठी नेटाने झुंजणारी एक आकृती दिसू लागली. अप्रियतेची पर्वा न करणारी, अधिकाराच्या जागा, मानाचे किताब झटक्यासरशी फेकून देणारी, वयाने वाकलेली परंतु मतांनी न नमलेली. ९३ वर्षांचे बर्ट्रांड रसेल आज लंडनपासून दूर एका खेड्यात येऊन एकाकीपणे राहतात हीच गोष्ट माझ्या मनाला अधिक भिडली. " The last survivor of a dead epoch " असेच आपले स्वतःचे वर्णन रसेल करतात.

मुख्य गाव संपले व डावीकडे एक छोटासा कच्चा रस्ता लागला. आमच्या दोन्ही गाड्या तेथे थांबल्या. आत शिरण्यापूर्वी पुन्हा विचार करा असा सल्ला आमच्या मार्गदर्शकाने दिला. कारण हा रस्ता संपतो लॉर्ड रसेल यांच्या घरावरच. त्यांच्या घरावरून सहज-पणे पुढे जाण्याची शक्यता नव्हती. अनपेक्षितपणे त्यांच्या दारी दोन मोटारी नेऊन उभ्या करणे आमच्या मार्गदर्शकाला प्रशस्त वाटत नव्हते. परंतु आधल्या रात्रीच्या पेयांनी दिलेली बंडखोरी माघार घेण्यास तयार नव्हती. गाड्या सरळ वळल्या व खाचखळगे ओलांडीत लॉर्ड रसेल यांच्या आवारातच येऊन थडकल्या.

त्या गाड्यांचे आवाज ऐकून खुद्द लॉर्ड रसेलच बाहेर आले. अर्धी लढाई जिंकल्या-सारखे साऱ्यांना वाटले. माझ्यासमोर लॉर्ड रसेल उभे होते. एक कालखंड हादरून टाकणारी ही व्यक्ती असावी असे क्षणभर वाटले नाही. एक किरकोळ आकृती माझ्यासमोर उभी होती. बेताची उंची, अंगात निळसर रंगाचा सूट, आत जाकीट. आणि ते घड्याळ व त्याची साखळी त्यावर उठून दिसणारी. डोक्यावरचे पांढरे व लांब केस वाऱ्यावर भुरभुरत होते. चेहरा अगदी सुरकुतलेला. विद्वत्तेचे मजले कपाळावरच्या आठ्यांनी मोजावेत. त्यांच्या

कापऱ्या हातात मी माझा हात दिला होता. उभे राहण्याचे विशेष सामर्थ्य त्यांच्या शरीरात नव्हते. परंतु काळाला थांबवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या नजरेत दिसले. विषयाचा भेद करणारे डोळे, लहान मुलाच्या डोळ्यांसारखे ते लकलकत होते.

लॉर्ड रसेल यांच्याशी हस्तांदोलन करीत असताना मी चटकन नेहरूंच्या पहिल्या पुण्यतिथी-दिनाची त्यांना आठवण दिली. कारण आदल्याच दिवशीचा तो दिवस होता. लॉर्ड रसेल यांचा चेहरा क्षणातच बदलला. " त्यांच्या निधनाने झालेल्या नुकसानीची मला जाणीव आहे. " इतकेच ते म्हणाले.

आमचा निरोप घेऊन लॉर्ड रसेल वळले तरी आम्ही तिथे उभेच होतो. ती कृश आकृती हळूहळू आत घरात गेली.

आता त्यांच्या आवारात फिरण्यास आम्ही मोकळे होतो. घराभोवती सुंदर अंगण होते. समोरचे दृश्यही मोहक होते. कारण एका टेकडीवर हे घर होते व पुन्हा समोर समुद्र दिसत होता. पुढल्या दाराच्या बागेतील पायऱ्यांवर बसून टेकडीच्या पायथ्याशी लोटांगणे घालीत येणाऱ्या सागराचे दर्शन घ्यावे. या समुद्राच्या पलीकडच्या तीरावर होते पोर्ट मॅडॉक हे एक सुप्रसिद्ध बंदर. समुद्रावर बांधलेला व या बंदराकडे नेणारा पूल या बागेतून दिसत होता त्या पुलावरून धावणाऱ्या मोटारी व पलीकडच्या गावातील तांबडी घरे लक्ष वेधून घेत होती. ही चलच्चित्रे पाहात व विश्वकल्याणाचा विचार करीत बर्ट्रांड रसेल याच बागेत बसत असावेत. बाजूला बसत असेल त्यांची सहचारिणी. चौथ्या लग्नाची.

लॉर्ड रसेल यांच्या या चौथ्या पत्नीचे वय आहे सध्या ६४ वर्षांचे. जन्माने अमेरिकन, अतिशय हुषार अशी ही स्त्री वयाच्या ५२ व्या वर्षी बर्ट्रांड रसेल यांची पत्नी झाली. बर्ट्रांड रसेल या विवाहाचे वेळी ८० वर्षांचे होते. तिसरी पत्नी होती त्यांची एकेकाळची खाजगी चिटणीस. १९३६ ते १९५२ पर्यंत या पत्नीबरोबर लॉर्ड रसेल यांनी संसार थाटला. त्यांना एक मुलगा झाला. दुसरी पत्नी तर प्राध्यापिका होती. तिला एक मुलगा व दोन मुली झाल्या. पहिल्या पत्नीशी तर त्यांनी १९२१ मध्येच घटस्फोट घेतला होता. विवाह-संस्थेविषयी व स्त्रीसुखाविषयीची त्यांची मते अतिशय स्फोटक आहेत. अत्याधुनिक समजल्या जाणाऱ्या अमेरिकेलाही ती पचविता आली नाहीत. न्यूयार्कमधील त्यांची प्राध्यापकाची मानाची जागा केवळ त्यांच्या या विषयाबद्दलच्या मतांमुळे गेली. स्त्रिया बंड करून उठल्या. तत्त्वज्ञ स्वस्थपणे बसून राहिला. जागा सोडीना. तेव्हा न्यूयॉर्कच्या महापौराने अर्थसंकल्पातून या जागेसाठी केलेली तरतूद रद्दबातल केली. रसेल मग बाहेर

पडले. आयुष्याच्या सुरुवातीला केंब्रिज येथील ज्या कॉलेजात त्यांना मानाची जागा दिली होती, तेथूनही त्यांना हुसकावून लावण्यात आले. कारण पहिल्या महायुद्धाच्या निमित्ताने त्यांनी मांडलेले युद्धविषयक विचार. फेलोशिप गमावलीच, परंतु वर तुरुंगवास वाट्याला आला. राजकीय तत्त्वज्ञ तुरुंगात बसला तो गणितज्ञ म्हणून. गणितावरचे पहिले पुस्तक त्यांनी या तुरुंगवासात लिहिले; आणि मग गणितज्ञ व तत्त्वज्ञ अशी दुहेरी वाट लॉर्ड रसेल अखंडपणे चालते राहिले. १९५० मध्ये त्यांच्या या सेवेबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले.

४३ व्या वर्षी तुरुंगात गेलेले लॉर्ड रसेल वयाच्या ८९ व्या वर्षी पुन्हा तुरुंगात गेले. लोकशाहीचे धडे सबंध जगाला देणाऱ्या खुद्द ब्रिटनमध्ये ! हाइड पार्क या लोकशाहीच्या खुल्या व्यासपीठावर परवानगीशिवाय दूरध्वनिक्षेपक लावून सभा घेतली म्हणून लॉर्ड रसेल यांना शिक्षा दिली गेली. " Ban the Bomb ! " " Public is condemned to die ! " या त्यांच्या घोषणा होत्या. उद्या अणुयुद्ध पेटले तर न्यूझीलंड व आफ्रिकेचा काही भाग फक्त या जगात शिल्लक उरेल असे त्यांना वाटते. यासाठी अण्वस्त्र करार व तटस्थतेचे परराष्ट्रीय धोरण याचा पुरस्कार ते करतात. " माझ्या लेखनाने लोकांना विचार करावयास लावले आहे. इतके यश मी मिळविले आहे, " असे लॉर्ड रसेल लिहितात. तटस्थतेचे – अलिप्ततेचे धोरण नेहरूंनी भारतासाठी स्वीकारले तो ह्याच विचारांचा वारसा.

लॉर्ड रसेल यांच्याबद्दलच्या गप्पा मारीत आम्ही तेथे कितीतरी वेळ रेंगाळलो. घराचे आवार सोडून आम्ही बाहेर आलो तो लक्ष वेधले ते जवळच्या पाटीने. ' पेनगुरी पेनऱ्हीन ' अशी एक जुनी पाटी दरवाजाजवळच्या एका झाडावर लटकलेली आहे. ' पेनगुरी ' म्हणजे मॅन्शन व ' पेनऱ्हीन ' हा शब्द गावाच्या नावातील पहिल्या सात अक्षरातून बनलेला. ' पेनऱ्हीनचे घर ' हे याचे साधे रूप.

लॉर्ड रसेल यांचे घर आम्ही सोडले व पुन्हा त्या लहानशा वाटेला लागलो. दुतर्फा असलेली गर्द झाडी ओलांडीत आम्ही पुन्हा मुख्य रस्त्याकडे चाललो होतो. दोन्ही बाजूला एकही घर नव्हते. दीड मैलाची ही कच्ची सडक संपवून आम्ही मुख्य रस्त्यावर आलो. दुसऱ्या दिवशी त्यांचे जीवनचरित्र चाळताना आपल्या जीवनाबद्दल त्यांनी एके ठिकाणी मोठ्या तळमळीने लिहिलेले शब्द सापडले. " जे उदात्त आहे, जे सुंदर आहे व जे विनम्र आहे त्याचा ध्यास मी घेत आलो आहे. माझ्या जीवनाचा अर्थ याखेरीज जगाने दुसरा कोणताही लावला तरी त्याची मला तमा नाही. "

## प्रकरण दहावे

# कीर्तिवंतांची घरे आणि स्नोडोनियाची शिखरे

मोठ्या माणसांच्या व्यक्तित्वाबद्दल आपल्या अनेकदा काही खुळ्या कल्पना असतात. सामान्य माणसापेक्षा त्याचे नाक, डोळे वेगळे असल्याची आपली कल्पना असते व यामुळे हा कीर्तिवंत पुरुष ' आननी ' कसा दिसतो हे पाहण्यासाठी आपण अनेकदा धावत असतो. मोठ्या व्यक्तीच्या घराबद्दल, निवासस्थानाबद्दलही आपल्याला अशीच ओढ असते. त्याच्या घराच्या विटा अगर शिला या सामान्यांच्या घरापेक्षा काही तरी वेगळ्या असाव्यात असे उगीचच वाटत असते. त्या व्यक्तीच्या कीर्तीप्रमाणे त्या वास्तूबद्दलचेही एक भव्य चित्र आपण डोळ्यांसमोर उभे करीत असतो.

बकिंगहॅम पॅलेसबद्दल माझ्या मनात अशाच खुळ्या कल्पना होत्या. परंतु लंडनमधील हाइड पार्क जवळून वळल्यावर ' ही बकिंगहॅम पॅलेसची भिंत ' म्हणून एका सामान्य भिंतीकडे, माझ्या मित्राने माझे लक्ष वेधले तेव्हा खरेच वाटेना. वरती तारेचे कुंपण असलेली, एका जुनाट वाड्याची, रंग उडालेली अनाकर्षक भिंत समोर दिसत होती. त्या भिंतीच्या कडेने चालत खुद्द बकिंगहॅम पॅलेससमोर येऊन उभा राहिलो तरी आमच्यावर १५० वर्षे राज्य करणाऱ्या महाराणीचा हा राजवाडा आहे असे वाटेना. थंडीच्या दिवसांत बर्फ पडू लागले, की धुराड्यातील धूर येथील घरांच्या भिंतींना चिकटून बसतो असे मला कुणी सांगत होते. अजूनही हा वाडा अतिशय धुरकटलेला दिसतो. परंतु याचे स्वरूप यापेक्षाही ' धुराडे ' होते असे मला कळले. एका सौंदर्यप्रेमी अमेरिकन प्रवाश्याला हा बेरंग पाहणे

अशक्य झाले. त्याने वृत्तपत्रात जाहीर पत्र लिहून आपल्या भावना व्यक्त केल्या. तेव्हा बकिंगहॅम पॅलेसची साफसफाई करण्यात आली, असे मला ब्रिटनमध्ये कळले.

परंतु ती वास्तू कशीही असली तरी त्या वास्तूचे माहात्म्य व वेगळेपण अखेर तेथे राहणारी व्यक्ती ठरविते. नाहीतर लंडनमधील अशाच एका सर्वसामान्य घरापुढे मी जाऊन उभा राहिलो नसतो. या अफाट राजधानीतील अनेक घरांसारखे एक घर. व्हिक्टोरिया राणीच्या ब्रिटनची आठवण कायम ठेवणारे. दुमजली. परंतु सबंध जगाचे भवितव्य ठरविण्याचे सामर्थ्य मनगटात असलेली एक ऐतिहासिक व्यक्ती येथे राहिली. अनेक वर्षे राहिली. आपल्या राजकीय जीवनाची चढती-उतरती कमान अनुभवीत राहिली आणि एक दिवस या घरातूनच निघून गेली. विन्स्टन चर्चिल यांच्या लंडनमधील २८, हाइड पार्क गेट या निवासस्थानाशी मी जाऊन उभा राहिलो, तेव्हा या लहानशा रस्त्यावर अधीरतेने उभ्या राहिलेल्या गर्दीची अनेक चित्रे माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली. परिपूर्ण जीवन जगलेला हा जागतिक मुत्सद्दी शेवटचे क्षण या घरात मोजत होता तेव्हा जगाच्या कानाकोपऱ्यांतील लोकांच्या भावना त्याच्यासाठी उचंबळून आल्या होत्या.

याच घरातून थोड्याच दिवसांपूर्वी लेडी चर्चिल उमराव सभेतील आपले स्थान घेण्यासाठी गेल्या. त्या घराचा भव्य लोखंडी दरवाजाही गतस्मृतींनी त्या दिवशी गहिवरला असेल. परंतु थोड्याच दिवसांनी वाचले की, लेडी चर्चिल हे घर आता विकून टाकणार आहेत. त्यावर ब्रिटनमध्ये थोडेसे वादळही उठले. परंतु व्यापारी इंग्रजाला त्याचे विशेष नाही. फार तर तेथे एक फलक लागेल. “ब्रिटनला आणि स्वतंत्र जगाला दुसऱ्या महायुद्धातून वाचविणारे विन्स्टन चर्चिल येथे राहिले.” ते घर राष्ट्रीय स्मारक म्हणून वाचविण्याचे मात्र फारसे कुणाच्या मनातही नाही.

उत्तर वेल्सच्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही अशाच एका ऐतिहासिक घराच्या दरवाज्यात जाऊन उभे राहिलो तेव्हा चर्चिल यांच्या योग्यतेच्याच एका माजी ब्रिटिश पंतप्रधानाची कन्या आमच्या स्वागतासाठी समोर उभी होती; आणि तीही त्या कर्तृत्ववान पित्याचा राजकीय वारसा तितक्याच धडाडीने चालविणारी.

दुसऱ्या महायुद्धाचा शिल्पकार म्हणून चर्चिल यांना जे स्थान व श्रेय दिले जाते तेच श्रेय पहिल्या महायुद्धात मिळविले लॉईड जॉर्ज यांनी. चर्चिल ज्या परिस्थितीत ब्रिटनचे पंतप्रधान झाले त्याच परिस्थितीत लॉईड जॉर्ज यांच्याकडे ब्रिटनचे पंतप्रधानपद आले. हुजूर पक्षाने आयत्या वेळी कच खाल्ली व युद्धाची जबाबदारी या लिबरल पक्षाच्या नेत्याच्या

खांद्यावर येऊन पडली. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी कसे वागावे लागेल याचे जणू प्रात्यक्षिक लॉईड जॉर्ज यांनी जगापुढे व विन्स्टन चर्चिल यांच्यापुढे ठेवले.

ड्विफोर नदीच्या काठावरच्या एका खेड्यात आम्ही आलो होतो. लॅनिस्तुडी हे त्या गावाचे नाव. एका सामान्य कुटुंबात लॉईड जॉर्ज यांचा जन्म झाला. " फर्स्ट कॉटेज-ब्रेड प्राईम मिनिस्टर " असा त्यांचा उल्लेख केला जात असे. चपला-जोडे दुरुस्त करण्याचे लॉईड जॉर्ज यांच्या काकाचे दुकान होते. तेथे बसून या तरुणाने आपल्या भावी जीवनाचे आराखडे आखले. जमीन सुधारणा होणे किती आवश्यक आहे याबरची पहिली चर्चा या चपला-जोड्यांच्या दुकानात झाली. सामान्य जनतेचा प्रतिनिधी म्हणून १८९० मध्ये लॉईड जॉर्ज ब्रिटिश पार्लमेंटमध्ये शिरले. ते १९१६ मध्ये ब्रिटनचे पंतप्रधान झाले. बर्ट्रांड रसेल यांच्या घरासमोर दिसणाऱ्या पोर्ट मॅडॉक या बंदरात, सॉलिसिटरच्या कंपनीत कारकुनी करणारा हा तरुण ब्रिटिश जनतेचा पहिल्या महायुद्धातील उद्धारकर्ता ठरला. पॅरिसच्या सुप्रसिद्ध तहाच्या कलमांची चर्चा या ड्विफोर नदीच्या तीरावर आधी झाली. आपल्या सबंध राजकीय धामधुमीच्या काळातही या नेत्याने आपले गाव व तेथील घर यांचा कधीच विसर पडू दिला नाही.

त्या घराची खोली अन् खोली, वस्तू अन् वस्तू लेडी मेगन जॉर्ज उत्साहाने आम्हांला दाखवीत होत्या. लेडी मेगन या मजूर पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्या व पार्लमेंटच्या सदस्य. ब्रिटिश पार्लमेंटचे अधिवेशन त्या वेळी पहाटेपर्यंत चालत होते. मजूर पक्षाचे मताधिक्य अतिशय अल्प असल्याने सर्व खासदारांना हजर राहावेच लागे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन ब्रिटिश संसदेच्या आवारात खासदारांना झोपण्याची व्यवस्था करावी अशी सूचना पुढे आली. घर दाखविताना राजकारणावरील गप्पा चालूच होत्या. भारताबद्दल अतिशय प्रेम असलेल्यांपैकी लेडी मेगन जॉर्ज या एक. भारतात त्या दोनदा येऊन गेल्या व दोन्ही वेळी त्या नेहरूंना भेटल्या होत्या.

" या टेबलाभोवती कोण कोण बसून गेले सांगता येणार नाही ! " लेडी मेगन बोलत होत्या. " चर्चिल यांच्यापासून एच. जी. वेल्सपर्यंत सर्व क्षेत्रांतील व्यक्ती येथे येऊन बसल्या आहेत. " १९०९ मध्ये हे दुमजली घर लॉईड जॉर्ज यांनी बांधले व तेव्हापासून राजकारणी व्यक्तींचे हे एक स्फूर्तिस्थान बनले. लॉईड जॉर्ज यांच्या यशाचे प्रमुख रहस्य होते त्यांच्या वक्तृत्वात. " झाडावरचे पक्षीही त्यांच्या वक्तृत्वाने मंत्रमुग्ध होऊन डोलत असत," असा एका चरित्रकाराने त्यांच्या वक्तृत्वाचा गौरव केला आहे. महायुद्धाच्या काळात

चर्चिल यांच्याप्रमाणे केवळ वक्तृत्वाच्या जोरावर लॉईड जॉर्ज यांनी ब्रिटनचे नैतिक धैर्य कायम टिकविले. बेल्जियमबद्दलच्या कराराचा उल्लेख जर्मन नेत्याने ' कागदाचा कपटा ' असा केला तेव्हा एका जाहीर सभेत लॉईड जॉर्ज गरजले, " तुमच्या हातात पौंडाच्या नोटा आहेत काय ? जाळून टाका त्या ! तेही कागदाचे कपटेच आहेत. परंतु तुम्ही तसे करणार नाही. कारण ब्रिटिश साम्राज्याची इभ्रत त्या कागदाच्या कपट्यात आहे. " उपमा-उत्प्रेक्षांनी त्यांची भाषणे सजलेली असत. धिप्पाड शरीर, रुंद कपाळ, नाक ओबडधोबड व मोठे, पांढरे केस वाऱ्यावर भुरभुर उडणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व. आणि दमदार आवाजात त्यांनी एकदा भाषणास सुरुवात केली की पार्लमेंट निःस्तब्ध होई.

आपल्या शब्दांनी ज्या पार्लमेंटचे सभागृह त्यांनी गाजविले त्या सभागृहाचे काही निखळलेले कोपरे लॉईड जॉर्ज यांच्या वाड्यात आज पडलेले आहेत. व्हर्साइल्सच्या ऐतिहासिक तहावर ज्या पेनने लॉईड जॉर्ज यांनी ब्रिटिश पंतप्रधान म्हणून सही केली ते फाऊंटन पेन त्यांच्या टेबलावर अजूनही ठेवलेले आहे. १९१६ मध्ये जेरुसलेमवर जो ब्रिटिश झेंडा झळकला तो फाटक्या अवस्थेत, परंतु स्मृती म्हणून या घरात जतन करून ठेवला आहे. " लिंकन हा माझा आदर्श आहे, " असे लॉईड जॉर्ज नेहमी म्हणत. त्यांना खास भेट मिळालेल्या त्या अमेरिकन नेत्याचा मुखवटा दिवाणखान्यात जुन्याच जागी कायम आहे.

भिंतीवर लॉईड जॉर्ज यांच्यासंबंधीची अनेक व्यंगचित्रे लटकाविलेली आहेत. त्या काळातील ख्यातनाम इंग्रज व्यंगचित्रकारांनी लॉईड जॉर्ज यांना आपल्या कुंचल्याने खुलविले. त्यांची थट्टाही उडविली. ही सारी चित्रे — काहींच्या मूळ प्रती या घरात आज आहेत.

हे सारे लेडी मेगन आम्हाला दाखवीत होत्या. पित्याचे कर्तृत्व कन्येच्या जिव्हाळ्याने सांगत होत्या. त्यांची ती थोडी खांद्यात वाकलेली मूर्ती माझ्या अजूनही डोळ्यांसमोर आहे. अल्प बहुमत असल्यामुळे मजूर मंत्रिमंडळाला डोळ्यांत तेल घालून कसे काम करावे लागत आहे याच्या हकिगती त्या सांगत होत्या.

त्या दिवशी आम्ही त्या ड्विफोर नदीच्या तीरावर इतके रेंगाळलो की, आमच्या मार्गदर्शकाला अखेर ' आता चला ' म्हणून आग्रह करावा लागला. या नदीच्या तीरावर लॉइड जॉर्ज यांनी राजकारण व प्रेम या दोन्हींची बहुविध रूपे पाहिली. याच नदीच्या तीरावर त्यांनी चिरनिद्रा घेतली. नदीकिनाऱ्यावरील ज्या दगडावर लॉइड जॉर्ज अनेक वर्षे विचार

करीत वसत ती प्रचंड शिला त्यांच्या समाधीवर ठेवण्यात आली आहे. या समाधीच्या जवळच एक वस्तुसंग्रहालय आहे. लॉईड जॉर्ज यांच्या जीवनाचे विविध दर्शन या वस्तुसंग्रहालयातून घडते. वेल्स परगण्याने हे सारे आपले वैभव म्हणून जपले आहे. त्या वैभवाचा व लेडी मेगन यांचा निरोप घेऊन आम्ही लॅनिस्तुडी हे छोटे गाव सोडले. कीर्तिवंतांची घरे पाहिल्यावर स्नोडोनियाची शिखरे पाहण्यासाठी आम्ही आता निघालो होतो.

वाटेत आमची 'ऑस्टिन प्रिन्सेस' कॅरनॅरव्हॉन या गावात शिरली. ब्रिटनचा किनारा नकाशात प्रत्येक ठिकाणी नागमोडी वळणाचा दिसतो याचे प्रत्यंतर येथे पहावयास मिळते. या गावाच्या पोटातच समुद्र शिरलेला आहे, तर किनाऱ्यावर कॅरनॅरव्हॉनचा अतिशय भव्य व सुंदर असा किल्ला आहे. लॉईड जॉर्ज हे या किल्ल्याचे १५ वर्षे किल्लेदार होते. सूर्यप्रकाशासह उमललेल्या एका शनिवारी आम्ही तिथे होतो. हे गाव आहे आजूबाजूच्या अनेक खेड्यांची बाजारपेठ. शनिवारी सूर्यप्रकाशाबरोबर बाजारही कसे फुलतात याची कल्पना पाहिल्याशिवाय येणार नाही. शनिवारी 'शॉपिंग' करणे हा या साऱ्यांचाच मोठा छंद. त्यासाठी बाहेर पडलेल्या तरुणींच्या मुखावर फुललेले गुलाब पाहून कोवळ्या सूर्यकिरणांनाही मोहात टाकलेले दिसत होते. आम्ही त्या मोहात पडू नये म्हणून आमचे सोनेरी केसांचे मार्गदर्शक व नवे मित्र ॲलन ग्रिडी एकदम म्हणाले, "इनफ ऑफ दॅट टेम्प्टेशन!" आणि स्नोडोनियाच्या शिखरांकडे आमच्या गाड्या पुन्हा वळल्या.

गिर्यारोहणाचा नाद असलेल्यांना ही स्नोडोनियाची शिखरे वेड लावतील. त्यात ब्रिटनच्या गिर्यारोहकांची ही काशी आहे. भारताला या ठिकाणी मोठे सन्मानाचे स्थान आहे. कारण केवळ एव्हरेस्ट! एव्हरेस्टचे माहात्म्य न चढता समजून घ्यायचे असेल तर स्नोडोनियाच्या पायथ्याशी असलेल्या या पुरातन उपाहारगृहात यावे. तेनसिंग येथे अनेकदा येऊन राहतो. ज्या दिवशी आम्ही तेथे गेलो त्या दिवशी रात्रीच्या भोजनाला तेनसिंग तेथे यावयाचा होता. स्नोडोनियाच्या जीवनातील हा सर्वांत आनंदाचा क्षण. १८४७ मध्ये 'पेन-इ-ग्विद्' या नावाचे हे उपाहारगृह केवळ गिर्यारोहकांसाठी एका हौशी गिर्यारोहकानेच येथे उघडले. त्याचे वंशज अजूनही हॉटेलातील कामापेक्षा संकटात सापडलेल्या गिर्यारोहकांना वाचविण्याच्या कामात अधिक गुंतलेले दिसत होते. काळ्या फत्तराचा हा पहाड आहे, व दगडी पायऱ्यांसारखे परंतु सरळ उंच असे त्याचे स्वरूप आहे. गिर्यारोहकांचे, पायथ्याशी ठिकठिकाणी तळ पडलेले होते. कमरेला दोऱ्या बांधलेल्या गिर्यारोहकांच्या टोळ्या डोंगरावर सर्वत्र दिसत होत्या. निसर्गाशी मानवाचा हा सामना

अखंड चालवयाचा आहे. एक लहान आगगाडी हौशी प्रवाश्यांना या पर्वतशिखरांवर घेऊन जाते. बट्रॅंड रसेल यांच्या भेटीच्या बदल्यात आम्ही ही सहल नाकारली होती. त्यामुळे स्नोडोनियाची ती शिखरे अजिंक्य राहिली. मनात आले, की त्यामुळेच या पर्वतशिखरांचे आकर्षण अधिक वाटले. रेंगाळणाऱ्या ढगांनी त्यांना वेढले होते. ऊनही वेताचे होते. आम्ही तडक गाठले ते उपाहारगृह व त्याचा बार.

त्या उपाहारगृहात व बारमध्येही गिर्यारोहणावरच सर्व चर्चा चालू होती. तेनसिंग–हिलरीच्या पथकातील जॉर्ज बँड याची पत्नी तेथे येऊन राहिलेली होती. हिलरी व बँड सायंकाळी तेथे येणार होते. त्यांच्या स्वागताची तयारी चालू होती.

कोणतेही शिखर न गाठता आम्हांला येथे राणीचे पाहुणे म्हणून मेजवानी मिळणार होती. आमचे मार्गदर्शक ॲलन ग्रिडी हे हरहुन्नरी गृहस्थ. त्यांना चित्रकलेपासून गिर्यारोहणा-पर्यंत सर्वांत रस होता. ते स्वतः उत्तम गिर्यारोहक होते. पाइप पेटवीत ते बोलत व मधून मधून कुरळ्या केसांवरून हात फिरवीत. आपण स्वतः त्या उपाहारगृहाचे व्यवस्थापक आहोत अशा थाटात त्यांनी एकेक खोली दाखविण्यास सुरुवात केली.

त्या उपाहारगृहातील खोल्यांचे वस्तुसंग्रहालयच बनलेले आहे. त्यामधील एक खोली तर साल न काढलेल्या झाडांच्या फळ्या लावून बनविलेले होती. छतावर एक काचेचे तावदान होते व त्यावर एव्हरेस्ट विजेत्यांच्या सह्या होत्या. प्रत्यक्ष तेथे येऊन केलेल्या. तेनसिंगची स्वाक्षरी पाहण्यासाठी असंख्य लोक तेथे येतात. जगातील सर्वोत्कृष्ट पर्वतशिखर हे भारतात आहे याचे महत्त्व जाणवते ते अशा ठिकाणी. या खोलीला बारचेच स्वरूप दिलेले आहे. त्यामुळे हातात बियरचा ग्लास घेऊन, थकून परतलेले गिर्यारोहक त्या छताकडे पाहात बसतात. त्यांचे आदर्शच जणू त्या छतावर स्वाक्षऱ्यांच्या रूपाने प्रकट झाले होते.

पलीकडच्या खोलीत तेनसिंग व त्याचा भाऊ इत्यादींची छायाचित्रे होती. एव्हरेस्ट शिखरावरचा एक लहान दगड तेथे मंदिरात शिवलिंग ठेवावे तसा ठेवलेला होता. या खोलीच्या बाहेर मुख्य बार. त्या बारच्या उंच आसनावर बसले की समोर खिडकीबाहेर स्नोडोनियाची शिखरे दिसतात. खोलीत जुन्या पद्धतीची शेकोटी धगधगत असते. तिच्याजवळ उभे राहून पेयाचे घुटके घ्यावे व गिरिशिखरांकडे पाहात गप्पा माराव्या. दोन दिवसांच्या सफरीवरील गप्पा सुरू झाल्या होत्या. आशा-आकांक्षांची शिखरे माणसाच्या नजरेसमोर नेहमीच तरंगत असतात. प्रत्येकाच्या आयुष्यात हिमालय ओलांडण्याची संधी आली नाही तरी संकटाचे हिमालय काही चुकत नाहीत. परंतु ही संकटे ओलांडली, की

माणसे कीर्तिशिखरावर चढतात. लहानपणी लॉईड जॉर्ज काय, किंवा हिलरी व तेनसिंग काय ज्यांनी जीवनाचे आव्हान स्वीकारले त्यांच्या पायांशी पर्वतशिखरेही नमली. कर्तृत्वाने व्यक्तीचे वैभव वाढते. वास्तूचे वैभव अखेर व्यक्तीच वाढविते. मग ते कोणतेही क्षेत्र असो. स्वतःचे घर असो, देश असो किंवा उत्तुंग गिरिशिखर असो.

गप्पांच्या नादात शेकोटीजवळून कधी हललो व भोजनाला केव्हा बसलो हे कळलेच नाही. ब्रिटनमध्ये भोजन म्हणजे गप्पा. तासन्तास चालणाऱ्या. ॲलन ग्रिडींनी आम्हांला आणखी एक नवा मंत्र दिला. बियर व्हिस्कीचा अभ्यास आमचा एव्हांना दांडगा झाला होता. गिनेस ही आमची आवडती बियर. व्हिस्की घ्यावयाची तर अगदी 'neat'–'on the rocks'! परंतु ॲलन ग्रिडींनी आम्हाला मधुरतम अशा वाइन्सचा परिचय करून दिला. मासळीबरोबर व्हाइट वाईन व चिकनबरोबर रेड वाईन हा द्वंद्वसमास आम्हांला त्यांनीच समजून दिला. त्या दिवशी रेड वाईन व चिकन यांचा दरबारी थाट उडाला होता. वेल्श भाषेतील सुंदर कागदी रुमाल 'सुव्हनिर' म्हणून या जेवणाच्या वेळी आम्हाला दिले होते. ते अजूनही माझ्याकडे आहेत; आणि त्याबरोबरच त्या आठवणी. गिरिशिखरांच्या आडोशाला, घालविलेल्या अनेक सुखद क्षणांच्या आठवणी. स्नोडोनियाच्या कडेकडेने पुन्हा आमची ऑस्टिन प्रिन्सेस धावू लागली. त्या वेळी नजरेसमोर सतत होती ती पाहिलेली कीर्तिवंतांची घरे आणि ही स्नोडोनियाची शिखरे!

हे सारे पाहिले त्याला आता काही दिवस झाले. लंडनचा 'गार्डियन' नेहमीप्रमाणे टपालाने मुंबईत मिळाला. पहिल्या पानावरच लेडी मेगन यांचे छायाचित्र पाहून मी अधाशीपणाने वार्तेकडे वळलो. लेडी मेगन यांच्या निधनाची वार्ता त्या पानावर होती. लॉईड जॉर्जची ही अविवाहित कन्याही निधन पावली होती. व्हर्साइल्सच्या तहावर ज्या पेनने लॉईड जॉर्जने सही केली ती लेखणी कौतुकाने दाखविणाऱ्या लेडी मेगनही आता निवर्तल्या होत्या. त्या घरात त्या एकट्याच राहात. कीर्तिवंताचे ते घर आज कसे उदास झाले असेल?

## प्रकरण अकरावे

# वेल्श मजुराच्या जीवनाची रुपेरी कडा

" How Green Was My Valley " हा चित्रपट पाहून अनेक वर्षे झाली परंतु तोच चित्रपट जणू मी येथे पुन्हा पाहात होतो. वास्तव स्वरूपात. हिरव्यागार डोंगरांच्या कुशीतील तेच ते खोरे. निसर्गसंपन्न भूमीच्या उदरातून काळी पण लाख मोलाची संपत्ती खोदून काढणारे ते मजूर. जीवनाचा बेरंग करून टाकणारे खाणीतील ते अपघात. अपघातानंतरचा तो कोलाहल. मातीच्या ढिगाऱ्याखाली दडपल्या गेलेल्यांच्या विचाराने मोकळ्या हवेत उभे राहूनही गुदमरून गेलेले ते गावकरी. परंतु अखेर हा संग्राम बेदरकारीने पाठीवर घेऊन पुन्हा कामावर जाणारे हे खाणकामगार. ' ऱ्होंदा ' हे त्या खोऱ्याचे नाव. ब्रिटनच्या खाणमजुरांचे हे स्फूर्तिस्थान.

त्या सुप्रसिद्ध इंग्रजी चित्रपटातील जणू जग पाहात मी फिरत होतो. उत्तर वेल्सच्या दौऱ्यावर निघालेली आमची ' ऑस्टिन प्रिन्सेस ' ऱ्होंदा खोऱ्यात शिरली तेव्हा माझ्या मनात विचारांचे हे सारे काहूर उठले. हिरवे माळ व फुले यांच्याऐवजी कोळशाच्या प्रचंड राशी माझ्या डोळ्यांसमोर उभ्या होत्या. दुतर्फा पसरलेल्या डोंगराच्या पाठीही काळ्या होत्या. खाणीची ती प्रवेशद्वारे व त्यामधून येणारे आगगाडीचे रूळ लक्ष वेधून घेत होते. हे दृश्य पाहात असतानाच दोन डोंगरांना सांधणारी एक रेल्वे लाईन आमच्या डोक्यावरून गेली. खाणीतील कोळसा सरळ कार्डिफ बंदरात नेणारी ही रेल्वे लाईन. मुख्य शहराला डावलून डोंगर नोखरून तर काही ठिकाणी जमिनीखालून ती जाते.

कोळशाच्या राशी दिसेनाशा झाल्या व ऱ्होंदा खोऱ्यातील मजुरांची घरे दिसू लागली. डोंगरउतारावरच बांधलेली. सबंध ब्रिटन जणू एकाच स्थापत्यशास्त्रज्ञाने रेखाटलेले असल्याने इथून तिथून घरे अगदी एकसारखी आढळतात. ब्रिटनमधील मजुरांची घरे कशी आहेत हे पाहण्याची मला अधिक उत्सुकता होती. ऱ्होंदा खोऱ्यातील या खाण-कामगारांसाठी त्या विभागातील पालिकेने घरे बांधलेली आहेत. प्रत्येकाच्या घरात एक बसायची खोली, दोन झोपण्यासाठी खोल्या, एक स्वयंपाकघर इतके कमीत कमी आहे. या जागेसाठी त्याला आठवड्याला आठ शिलिंग्ज (साधारण ६ रुपये) भाडे पडते. वेल्समधील खाणमजुराचा साधारण पगार ११ पौंड (साधारण १४३ रुपये) प्रत्येक आठवड्याला आहे. वेल्समध्ये आज जवळ जवळ पाच लाख खाण-कामगार आहेत. हा हिशेब अवमूल्यनापूर्वीचा. कारण अवमूल्यन येथे झाले, तसे आता ब्रिटनमध्ये झाले आहे.

परंतु शास्त्रीय प्रगतीने कोळसा, कोळसाच ठरला आणि वेल्समधील या प्रमुख उद्योगाला उतरती कळा लागली. उत्तर वेल्सच्या दौऱ्याच्या निमित्ताने वेल्सच्या औद्योगिक जगाचे एक वेगळे दर्शन मला घडले. कोळशाच्या खाणीतून बाहेर पडण्यास वेल्श कामगार आता फार उत्सुक आहे. जॅक जोन्स या एका ख्यातनाम लेखकापासून गेली ३० वर्षे या कामगारांमध्ये कार्य करणाऱ्या एका अनुभवी नेत्याशी चर्चा करण्याची संधी आम्हाला मिळाली. दर आठवड्याला सहा हजार मजूर या खाणीतील नोकऱ्या सोडून नव्या उद्योगधंद्यात आता जात आहेत. ही गळती अशी चालू राहिली तर या खाणी एक दिवस अजिबात बंद होतील अशी त्यांना भीती वाटते. 'मर्थर' नावाचे छोटे गाव वाटेत लागले. 'मर्थर' म्हणजे 'मार्टियर'. इंग्लिश व वेल्श भाषेतील हा फरक लक्षात येण्याजोगा आहे. एका वेल्श देशभक्ताला या गावात इंग्रजांनी जिवंत जाळले म्हणून हे गाव हुतात्म्याचे गाव झाले. परंतु याच गावात सबंध जगातील पहिला पोलाद कारखाना निघाला. आज ब्रिटनमध्ये सर्वांत लोकप्रिय असलेली हूव्हर वॉशिंग मशीन्स येथे तयार होतात. अशा तऱ्हेने एकीकडे या खाणीच्या परिसरातच प्रचंड उद्योगधंदे उभे होत आहेत व त्याच वेळी या खाणीत होणारे अपघात थोडेही कमी होत नाहीत. आम्ही तेथे असताना कार्डिफपासून २० मैलांवर असलेल्या एका गावाजवळच्या खाणीत अपघात झाला व जवळ जवळ तीनशे मजूर मृत्युमुखी पडले. त्या गावाला त्या दिवशी आलेली अवकळा पाहिल्यावर पुन्हा या गावातील तरुण कोळशाच्या खाणीत उतरतील असे मला वाटले नाही.

परंतु एक दिवस कोळशाच्या खाणीतून जखमी होणाऱ्या कामगारांना उपचार करण्या-

साठी उभारलेले एक केंद्र पाहण्यासाठी आम्ही गेलो व या मजुरांच्या जीवनाचे एक वेगळे दर्शन घडले. मोडलेले हातपाय तंदुरुस्त करून पुन्हा कोळशाच्या खाणीत उतरण्याची जिद्द असलेले अनेक तरुण मला तेथे भेटले. अनेक वयस्क कामगार होते. भारताबद्दल विलक्षण प्रेमाने ते बोलत होते. अधांतरी टांगलेला मोडका पाय सावरीत वेल्श व भारतीय आर्य मूळचे कुठचे व कोणत्या शतकात ही वाटचाल सुरू झाली याची माहिती एका कामगाराने मला दिली.

' टॅलीगर्न ' या गावी हे केंद्र आहे. केंद्र म्हटले की, ॲस्बेस्टॉसचे पत्रे टाकलेले एकमजली चाळीसारखे काहीतरी डोळ्यांसमोर उभे राहते; परंतु येथे आम्ही एका भव्य वाड्यात शिरलो होतो. दुतर्फा झाडी होती व मोटारीने बरेच अंतर कापल्यावर एक आलिशान प्रासाद दिसू लागला. वेल्समधील कोळशाच्या खाणीत राबणाऱ्या कामगारांच्या मालकीचा हा प्रासाद आहे.

प्रासादात शिरलो तेव्हा समोरच्या भव्य दालनात तांबडेलाल गालिचे पसरलेले होते. या प्रासादावर कोणत्या पक्षाच्या नेत्यांची सत्ता आहे याची सूचना देणारा हा रंग होता. खाण-कामगारांच्या स्वतःच्या निधीतून तीन लक्ष रुपयांना हा प्रासाद १९२३ मध्ये विकत घेण्यात आला. आज १५ लक्ष रुपये त्याची किंमत होईल. खाणीत कामगाराला अपघात झाला की त्याला ताबडतोब येथे आणले जाते व सर्व तऱ्हेच्या अत्याधुनिक वैद्यकीय साधनांनी त्याच्यावर उपचार केले जातात. येथे एक १६ वर्षांचा मुलगा उपचार घेताना पाहिला तेव्हा अपघाताने खचून जाणारे हे मजूर नाहीत हे जाणवले. त्याच्या एका हातावर दगड व माती कोसळल्याने तो पक्षाघाताने दुबळा व्हावा तसा झाला होता. कुणाचा पाय दुखावला होता, हाड मोडलेले अनेक जण होते. येथे प्रत्येकासाठी साधारण दर आठवड्याला १९२ रुपये खर्च केला जातो. व्यायामाचे विविध प्रकार वापरून त्याचे हातपाय पुन्हा ठीक केले जातात व महिन्या-दोन महिन्यांनी हा खाणकामगार दिवा घेऊन पुन्हा खाणीत उतरतो.

वेल्शच्या खाण-कामगार युनियनचे अनेक वर्षे चिटणीस म्हणून काम केलेले श्री. इव्हान्स आमचेबरोबर होते. १९५१ मध्ये ब्रिटिश सरकारने हे केंद्र आपल्या हाती घेतले. आरोग्य खात्यातर्फे आता या केंद्राचा बहुतेक खर्च केला जातो. तरी प्रत्यक्ष कामात ढवळा-ढवळ न करण्याचे येथील सरकारचे नेहमीचे धोरण असल्याने या केंद्राची सत्ता बरीचशी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांकडे आहे. ' मी ' कम्युनिस्ट आहे याचा मला अभिमान आहे असे इव्हान्स मधूनमधून आम्हांला ऐकवत होते.

या प्रासादातील दिवाणखान्यात कामगार झोपतात. डौलदार सोफासेटवर विश्रांती घेतात. बरे वाटले की टेबल टेनिसपासून बिलियर्डस्पर्यंतचे खेळ खेळतात. या प्रासादाचे मौल्यवान लाकडाचे जुने राजेशाही दरवाजे व जिने इतके चकचकीत ठेवले आहेत की त्याकडे पाहूनही माणसाच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी.

खाण-कामगारांच्या निमित्ताने येथील कामगार चळवळीचे अवलोकन करीत असताना चळवळीचे एक वेगळे चित्र डोळ्यांसमोर उभा करणारा एक अभूतपूर्व मोर्चा मी पाहिला. जवळ जवळ ४० हजार खाणकामगार सहकुटुंब सहपरिवार या मोर्चात सामील झाले होते. मागण्यांसाठीच कामगारांचा मोर्चा काढायचा अशी कल्पना येथे नाही. तसेच मोर्चात घोषणा-फलक असतात. परंतु घसा फोडून घोषणा कुणी देत नाही. येथील राज्यकर्ते बहिरे नसणे हे त्याला एक कारण असावे.

शनिवारी सकाळी ११ वाजता हा मोर्चा कार्डिफच्या 'सिटी सेंटर'मधून निघायचा होता. साडेदहा वाजता मी तेथे जाऊन उभा राहिलो तेव्हा पोलिस बंदोबस्तात मोर्चाची तयारी चालू होती. वर्षातून सर्व कामगारांना सहकुटुंब एकत्र आणावयाचे या कल्पनेने जून महिन्यातील तिसऱ्या शनिवारी हा 'दिन' साजरा केला जातो. जवळ जवळ ९० खाण-केंद्रांतील कामगार भल्या पहाटे उठून, आपल्या घरातील म्हाताऱ्याकोताऱ्यांसह, बाया-बापड्यांसह येथे येऊन दाखल झाले होते. दादरच्या शिवाजी पार्क विभागातील उच्च मध्यमवर्गीयांचा मोर्चा ज्या श्रेणीचा दिसेल त्या दर्जाचे हे सर्व खाणकामगार दिसत होते. तीन पिढ्या या मोर्च्यात सामील झाल्या होत्या. मुलांचे पोषाख ऐटबाज होते. स्त्रिया नटल्या होत्या. लहान मुलांसाठी बहुतेकांनी बाबागाड्या आणल्या होत्या. आजी, मुलगा, सून, मुले, बाबागाडी आणि घरचा कुत्रा असे सर्व या मोर्च्यात सामील झाले होते. आणि हे सर्व चालत होते बँडवादनाच्या चालीवर. प्रत्येक गटाचा स्वतंत्र बँड होता. रंगीबेरंगी पोशाखातील. त्यात काही लहान मुले होती तर काही पथकांत स्त्रियाही होत्या. घोषणाफलक अनेकांच्या हातात होते. मखमली कापडावर, रंगीत सुतांनी भरलेले प्रचंड फलक प्रत्येक गटाच्या आघाडीवर होते. 'समाजवादाकडे जलद वाटचाल' अशी मागणी प्रामुख्याने होती. 'व्हिएतनाम' हा दुसरा प्रमुख विषय. मजूर पक्षातर्फे संघटित केलेला एक खाण-मजुरांचा गट होता. हुजूर मंत्रिमंडळातील काही मंत्र्यासारखा पोषाख व 'सोंग' करून त्यांची थट्टा या गटातील काही तरुण-तरुणींनी चालविली होती. डझनभर बँडपथके व त्यांच्या चालीवर चाललेला हा कौटुंबिक मोर्चा. सारे खाणकामगार आपण एका कुटुंबातील

आहोत अशा भावनेने व मोठ्या ऐटीत चालले होते. रस्त्याच्या दुतर्फा मोर्चा पाहण्यास प्रचंड गर्दी लोटली होती. ' अरे, कधी आलात ? संध्याकाळी माझ्याकडे राहावयास या ', अशी आमंत्रणे गर्दीतून मोर्च्यातील मंडळींना दिली जात होती. ब्रिटनने खरोखर किती प्रगती केली आहे याचे हे मला प्रतीक वाटले. आपल्या मागण्या बाजूला ठेवून आमचे कामगार एक दिवस असा आनंदात घालवू शकणार नाहीत काय ? त्यात राजकारण होतेच. ' सोफिया गार्डन्स ' या ठिकाणी जेथे हा मोर्चा विसर्जित झाला तेथे पोहोचण्यापूर्वी ब्रिस्टलचे ' खासदार ' व टपालमंत्री श्री. वेजवुड बेन या मोर्च्यात सपत्नीक सामील झाले. श्री. वेजवुड बेन हे भारताचे जुने मित्र, गोव्याचा प्रश्न यांनीच हुजूर मंत्रिमंडळाच्या अमदानीत पार्लमेंटमध्ये उपस्थित केला. त्यांचे व खासदार मायकेल फूट यांचे तेथे प्रभावी भाषण झाले. बगिच्यात व्यासपीठ उभारले होते. समोर सर्व कुटुंबे बसली होती. श्री. वेजवुड बेन यांचे भाषण फारच जोरदार झाले. अगदी अल्प बहुमत असल्याने विल्सन मंत्रिमंडळ राजीनामा देईल अशी कुणाची कल्पना असल्यास ती खोटी असल्याचे त्यांनी सांगितले. निळ्या सुंदर पोषाखातील त्यांच्या पत्नी मोठ्या रसिकतेने पतीचे भाषण ऐकत होत्या. मजूर मंत्रिमंडळातील हा उगवता तारा असल्याचे एकाने मला तेथे सांगितले.

मायकेल फूट यांच्याशी माझी भेट झाली. विल्सन यांच्या नेतृत्वाखाली मजूर मंत्रिमंडळ ज्या तडफेने काम करू इच्छिते त्यांना मायकेल फूटसारख्या अधिक डाव्यांची मोठी प्रेरणा आहे. राजकारण व कौटुंबिक आनंद यांचे मिश्रण सांधणारा हा मोर्चा व मेळावा मला नवीन होता. वयोवृद्धांचे तेथे सत्कार झाले. युद्धाच्या खुणा ही काय चीज आहे, व श्रम-साफल्य हा काय अनुभव आहे, हे त्या म्हाताऱ्या खाणकामगारांच्या चेहेऱ्यांवर मी पाहू शकत होतो. अंगावरच्या चांगल्या पोषाखाने त्या झाकल्या गेल्या नव्हत्या. अपघातातील मृत झालेल्या सबंध जगातील खाणकामगारांसाठी हा जनसंमर्द क्षणभर उभा राहिला. " बिहारमध्ये सर्वात अधिक खाणकामगार अपघाताने नुकतेच मेले, त्यांच्या कुटुंबियांची आम्ही आज आठवण करीत आहोत " असे हे एकजीव झालेले वेल्श खाणकामगारांचे कुटुंब बोलत होते. त्यांच्यात मी दुपारपर्यंत भटकत होतो. लहान मुले हा कोणी भलताच माणूस आपल्यात भटकतो आहे म्हणून आईचे लक्ष वेधीत. आईबाप हसत. मुलाशी हस्तांदोलन केले की मुलेही खूष होत.

प्रकरण बारावे

# वेल्सचे मामा वरेरकर

" लेखनासाठी मी जगेन किंवा मरेन ! "

आमच्यासमोर बसलेली एक वृद्ध व्यक्ती हातवारे करीत बोलत होती. तोच आवाज. तीच बोलण्याची अघळपघळ ढब ! थेट मामा वरेरकरांसारखी ! भारताच्या राजधानीत परदेशी पाहुण्यांना पहिले मराठी लेखक भेटत ते मामा. मी लंडन येथे परदेशी. मलाही तेथे प्रथम भेटली ती मामांचीच प्रतिकृती. त्यांच्या गुणदोषांसह.

" I am a working class author " वेल्सचे मामा वरेरकर जॅक जोन्स गर्जत होते. " कुणाचीही नोकरी करायची नाही असे मी ठरवले आणि लिहू लागलो. माझी पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली; आणि कामकरी जीवन जगलेल्या लेखकाचा आवाज आमचे लोक ऐकतात, त्याचे लेखन वाचतात हे सिद्ध झाले. "

वयाच्या बाराव्या वर्षी बापाबरोबर कोळशाच्या खाणीत उतरलेला हा मुलगा; अशिक्षित; यौवन सारे कोळशाच्या खाणीत गेलेले. परंतु संवेदनाशील मन खाणीतील कोळसा उकरताना सहकाऱ्याच्या जीवनातील सुखदु:खेही उकलत होते. मनात साठवीत होते.

आणि अखेर एके दिवशी ती नोकरीही गेली. ब्रिटनमध्ये आर्थिक मंदी आली तो काळ. जॅक जोन्स बेकार झाले. घरी बसले आणि कोळशाच्या खाणीतच वेचलेले अनुभवाचे हिरे कागदावर जमवू लागले. परंतु प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात होईपर्यंत अनेक वर्षे गेली. कामगाराचे लेखकात होणारे हे परिवर्तन पुरे झाले, तेव्हा जॅक जोन्स पन्नास वर्षांचे झाले

होते. ज्या खाणीत ते राबले तेच जीवन त्यांनी या पहिल्या कादंबरीत रंगवले. ' ऱ्होंदा राऊंड अबौट ' हे तिचे नाव. वेल्सच्या खऱ्या मानकऱ्याचे, कोळशाच्या खाणीतील जुरांचे जीवन ब्रिटनने शब्दरूपाने प्रथम पाहिले ते या कादंबरीत. जॅक जोन्स यांना या कादंबरीचे पंचवीस पौंड प्रकाशकाकडून मिळाले. त्या वेळी तर त्यांना अक्षरशः आभाळ ठेंगणे वाटले. थकलेली बिले भागवण्यात ते पैसे खर्ची पडले. ह्या वेळी एका मोच्याच्या दुकानामागे जॅक जोन्स राहात होते. नंतरही काही वर्षे ते तेथेच राहिले. कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा त्यांच्या थोरल्या मुलीला मुलगा झाला होता. जॅक जोन्स आजोबा झाले होते. या आजोबांची म्हातारी आई त्या वेळी हयात होती. छापून आलेले पुस्तक तिला दाखविण्यासाठी जॅक जॉन्स गेले तेव्हा ती अशिक्षित आई पुस्तक हातात चाळवीत इतकेच म्हणाली, " Well ! Well you wrote this ! " परंतु त्यांच्या पत्नीला मात्र आपला पती लेखक झाला याचा खूप आनंद झाला होता. " त्यानंतर घरात मला प्रतिष्ठा प्राप्त झाली, " असे हसत हसत जॅक जोन्स आम्हाला सांगत होते. ही सर्व कथा ३० वर्षांपूर्वीची. जोन्स आता ८२ वर्षांचे झाले आहेत. ' ब्लॅक परेड ' ही त्यांची दुसरी कादंबरी. ती प्रसिद्ध झाली तेव्हा प्रकाशकाकडून त्यांना आगाऊ ३५ पौंड मिळाले. अर्थात आर्थिक प्रश्न तसा सुटला नव्हता.

एके दिवशी ही स्वारी उदारमतवादी पक्षाच्या एका खासदारासाठी निवडणूक-सभेत बोलली. काही महिने तरी नोकरी करा असा आग्रह पत्नी करीत होती. म्हणून या खासदाराने त्यांना एक नोकरी दिली. ती होती एका सिनेमागृहाच्या दुय्यम व्यवस्थापकाची. ' How do you do ? ' चा जप करीत जॅक जोन्स थिएटरवर खेळाच्या वेळी उभे राहू लागले. सर्वांचे स्वागत करू लागले. परंतु येथे त्यांना वेगळेच जग दिसले. एक दिवस शो संपला आणि ते आपल्या घरी गेले. पुन्हा मात्र त्या सिनेमागृहात ते गेलेच नाहीत. पण त्यातून ' शॅडो शो ' नावाची नवी कादंबरी जन्माला आली.

दरम्यान त्यांची पहिली कादंबरी लोकप्रिय ठरली होती. आणि जॅक जोन्सनी तिचे नाटक केले होते. लंडनमधील ग्लोब थिएटरमध्ये त्या नाटकाचे प्रयोग झाले. " माझ्या नाटकाला सामान्य लोक मोठ्या प्रमाणावर आले, परंतु बडे लोक मात्र आले नाहीत. वास्तवता विसरण्यासाठी बडे लोक नाटकाला जातात. ते कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या कामगारांचे वास्तव जीवन पाहण्यास कशाला येतील ? " त्यांच्या तोंडून हे ऐकताना ' धावता धोटा ', ' सत्तेचे गुलाम ' लिहिणारे मामा वरेरकरच बोलत आहेत, असे मला क्षणभर वाटले.

परंतु जॅक जोन्स वेल्सचे सर्वांत प्रमुख लेखक ठरले ते त्यांच्या आत्मचरित्राने.

' न संपलेला प्रवास ' ( Unfinished Journey ) या आत्मचरित्राचा पहिला भाग प्रसिद्ध झाला व जॅक जोन्स यांचे नाव ब्रिटनमध्ये सर्वतोमुखी झाले. कोळशाच्या खाणीत काम केलेल्या एका कामगाराचे पुस्तक मागण्यासाठी हॅमिल्टनसारखे प्रकाशक आले. " शंभर पौंड आगाऊ मिळाले आणि माझ्या आयुष्यात प्रथमच बँक अकौंट उघडण्याची वेळ आली ". शर्टची कॉलर ताठ करावी अशा आविर्भावात चेहेऱ्यावरची दाढी कुरवाळीत जॅक जोन्स म्हणाले.

दुसरे महायुद्ध सुरू झाले. दोन मुले लढाईवर गेली. एक रणांगणावरच कामास आला आणि एक घायाळ होऊन घरी परतला. तोही मृत्यू पावला. " माझे लेखन संपले असे मला वाटले. काही वर्षे मी लेखन केलेच नाही. " हिवाळा गेला आणि वसंत आला. जॅक जोन्स पुन्हा लिहू लागले. आत्मचरित्राचा दुसरा भाग लिहून झाला ' Me And Mine '. दुसऱ्या महायुद्धाची छाया पडलेला हा भाग प्रसिद्ध होताच अल्पावधीत संपला.

पुढे भाषण देण्यासाठी त्यांना अमेरिकेचे आमंत्रण आले. ते न्यूयॉर्कला गेले. परंतु तेथे ते एकाएकी आजारी झाले. त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवले. पुन्हा आत्मचिंतन सुरू झाले. तेथून ते परतले ते आत्मचरित्राचा तिसरा भाग लिहिण्यासाठी. बायरनच्या ओळींनी त्यांच्या मनाचा वेध घेतला होता. ' Give me back my heart ! ' त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या तिसऱ्या खंडाला हेच नाव दिले.

जॅक जोन्स बोलत होते, चहाचा घोट घेत. नाटकांची चर्चा करताना शॉपासून सर्वांच्या वैशिष्ट्याचा उल्लेख करीत होते. हेमिंग्वे पाठ बोलून दाखवीत होते. पॅस्टरनॅकचे वैशिष्ट्य उकलून दाखवीत होते. त्यांना आळस कसला तो माहीत नव्हता ! रेडिओ व टेलिव्हिजन यावरील कार्यक्रमासाठी त्यांना सतत बोलावले जाते. दुसरे दिवशी सकाळच्या गाडीने ते जायचे होते टेलिव्हिजनच्या कार्यक्रमासाठी, रेडिओच्या सल्लागार समितीच्या बैठकीसाठी. अगदी मामा वरेरकरांसारखे.

अकरा कादंबऱ्या, एक नाटक आणि आत्मचरित्राचे तीन खंड लिहून जॅक जोन्स पुन: चिरतरुण आहेत. ८२ व्या वर्षी नवे काय लिहावे याचे चिंतन करीत आहेत. कार्डिफच्या शिक्षणवर्गात असे अनेक पाहुणे येऊन गेले. त्यांच्यापैकी न विसरता येण्याजोगी ही व्यक्ती. प्रत्येकाला त्यांनी उठून स्वत: चहा दिला. प्रत्येकाशी हस्तांदोलन केले. आम्हांला म्हणत होते, " जगापेक्षा मोठा आहे सामान्य माणूस. आपण एकमेकांना विसरता कामा नये. "

प्रकरण तेरावे

# स्वप्नात रंगलेले ब्रिस्टल

ब्रिस्टल ! राजा राममोहन यांच्या समाधीमुळे भारतीयांना जवळचे वाटणारे ब्रिस्टल ! ब्रिस्टल खाडीच्या तीरावरच मी राहात होतो. माझ्या खोलीच्या खिडकीतून समोर फक्त तीन-चारशे पावलांवरच ब्रिस्टल खाडीचे पाणी वाहताना दिसत असे. या खाडीला आकार समुद्राचा आहे. मात्र उसळणाऱ्या लाटा तेथे नव्हत्या. चंद्र उगवला की लाटांचा आवाज मला ऐकू येई. परंतु कसा, धीर-गंभीर ! तपोवनातील ऋषिमुनींच्या मंत्रघोषासारखा.

या लाटांवर तरंगत दृष्टी दूरवर नेली तरी किनाऱ्यापलीकडचे ब्रिस्टल दिवसा दिसत नसे. ती सीमा इंग्लंडची. वेल्श लोक त्या किनाऱ्याकडे थोड्या तुच्छतेने पाहतात. लंडनहून मी कार्डिफला आलो तेव्हा वाटेत ब्रिस्टल लागले होते. गाडीने ब्रिस्टल सोडले व ती थोड्याच वेळात एका बोगद्यात शिरली. डोंगरातून आमची गाडी धावत असावी ही नेहमीची भावना. परंतु ब्रिस्टल खाडीच्या पोटातून आमची गाडी चालली होती. इंग्लंडची हद्द सोडून वेल्समध्ये गाडी शिरते ती हा चार मैल लांबीचा पाण्याखालचा बोगदा ओलांडून.

या बोगद्यामुळे कार्डिफ-ब्रिस्टलमधील अंतर ४० मैलांनी कमी झाले आहे. मोटारने हे अंतर अजून ९० मैल पडते. गाडी पाण्याखालून आली, परंतु मोटार पाण्यावरून तरी नेता यावी यासाठी एक प्रचंड पूल सध्या या खाडीवर बांधला जात आहे. वेल्स व इंग्लंड यांना जोडणारा हा दुवा आता पुरा झाला असेल. ' सेव्हर्न ब्रिज 'चे उद्‌घाटन झाले

की वेल्सच्या विकासाचे नवे दार उघडले जाणार आहे. लंडन कार्डिफपासून ५५ मैल जवळ येईल. आणि ब्रिस्टल! गेलेले वैभव पुन्हा मिळविण्याचे स्वप्न ब्रिस्टल आताच रंगवीत आहे.

ब्रिस्टलचे हे स्वप्न पाहात एका पुलावर मी उभा होतो. ब्रिस्टलमधील २५० फूट उंचीवरचा हा पूल म्हणजे जगातले एक आश्चर्य आहे. कलकत्त्याच्या हावडा ब्रीजसारखा एक झुलता पूल. परंतु इतक्या उंचीवर अमेरिकेतही झुलता पूल नाही अशी नोंद त्या पुलाच्या दरवाजावर आहे. तब्बल दीड हजार फूट लांबीच्या या पुलाला मध्ये आधार नाही. हिंदोळ्याला दोऱ्यांनी सावरावे तसे या पुलाला सावरलेले आहे. ' सस्पेंशन ब्रिज ' म्हणजे ब्रिस्टलचे वास्तवात उतरलेले एक स्वप्न. एका शतकापूर्वीच ब्रुनेल नावाच्या स्थापत्यशास्त्रज्ञाने ते उभे केले.

थंडगार व जोरदार वाऱ्याकडे दुर्लक्ष करून ती अफाट नगरी मी समोर पाहात होतो. डाव्या व उजव्या हाताला उंच डोंगर. या दोन डोंगरांना सांधण्याचे काम हा पूल करतो. उतरणाऱ्या विमानातून पाहावे तसे दृश्य खाली दिसते. ब्रिस्टलमध्ये शिरलेला खाडीचा प्रवाह खाली वाहतो आहे. त्यामधून चाललेली मालवाहू जहाजे बुटक्या माणसासारखी दिसत होती. उजव्या बाजूला डोंगर-उतारावर एक रेल्वे लाईन. विशेष चाहूल लागू न देता त्यावरून गाडी धावते आहे. डाव्या डोंगराच्या पायथ्यावर मोटारीसाठी बांधलेले एक-मार्गी रस्ते आणि न संपणारा पाठलाग करणाऱ्या त्यावरच्या त्या रंगी-बेरंगी मोटारी. इतक्यात डोक्यावरून एक विमानही गेले. मानवाने हस्तगत केलेली वाहतुकीची सर्व साधने त्या पुलावरून मी एका वेळेस पाहात होतो.

पुलाच्या दुसऱ्या बाजूला दिसणारे दृश्य वेगळे होते. खाडी कुठून गावात शिरली ते डोंगरामुळे दिसत नव्हते. डाव्या बाजूला हिरवीगार झाडी तर उजव्या बाजूला शिखरावर डौलत उभी असलेली वेधशाळेची छोटी इमारत. घर आले की येथे बगीचा आलाच. या क्लिफ्टन टेकडीवर सुंदर हिरवळ व रम्य बगीचा यांच्या सहवासात ही वेधशाळा निसर्गाचा अंदाज घेते आहे. उजव्या बाजूला डोंगराचे अनेक तुटलेले कडे दिसत होते आणि ते चढून जाण्याचा प्रयत्न दोन तरुण करीत होते. पावसाने सर्व डोंगर निसरडे झालेले. परंतु साहस व यौवन यांचे साहचर्य कालातीत असावे. देशाच्या मर्यादाही त्याला पडत नसाव्यात. त्या पुलावरून माझी नजर जेथे ठरू शकत नव्हती तेथे एक तरुण चढत होता. जीवन जगायला तो अधिक लायक होता.

समोर दूरवर पसरलेले ब्रिस्टल आपल्या जुन्या आठवणी मला सांगत होते. लंडनच्या खालोखाल एकेकाळी ब्रिस्टलला मान होता. ब्रिस्टलचे हे एक अप्रतिम बंदर. पश्चिमेची ही राजधानी समजली जाई. देशोदेशीची जहाजे येथे आली. त्या जहाजांनी हे गाव फुलवले. मदिरेची विविधता येथे चाखली जाई. सर्व देशांतून रंगी-बेरंगी वेषात ती येथे येई. आवाजाने ग्लासातील ' शेरी ' हालू नये म्हणून जहाजातील माल उतरून नेणारी दूरवरची आगगाडीही तिथे हळूहळू चाले. जगाच्या बाजारातील चिजा आल्या तशा अनेक कलाही येथे रंगल्या. ब्रिस्टल ओल्डव्हिक कंपनी ही ब्रिटनमधील सर्वांत जुनी नाटक कंपनी. १७८६ मध्ये ती स्थापना झाली व लंडनच्या खालोखाल हिचा मान. हिटलरची विमाने लंडनवर बॉम्बवर्षाव करू लागली तेव्हा राजधानीतील रंगभूमी ब्रिस्टलच्या आसऱ्याला आली. येथील कंपनीची नाटके लंडनच्याच नव्हे तर न्यूयॉर्कच्याही रंगभूमीवर गाजली आहेत. शनिवारी येथे होणारे नाटकाचे प्रयोग पाहण्यासाठी दूरवरून लोक येतात. हे सर्व प्रेक्षक नाटकाचे अभ्यासू असे असतात. त्यामुळे या प्रेक्षकांनाही फार मोठा मान आहे. रसिक, जागृत व चिकित्सक प्रेक्षक तयार करण्याचे कार्य ही नाटक कंपनी अशा तऱ्हेने करते. मराठीतील नवनाटककारांची मागणी येथे पुरी होऊ शकेल. परंतु त्यासाठी साता-समुद्रापलीकडे जावयास हवे.

ही नाटके जेथे होतात ते थिएटर रॉयल व आकाशाशी गुजगोष्टी करणारे कॅथेड्रल हे ब्रिस्टलचे खरे वैभव. जुन्या प्रचंड इमारती, लंडनच्या पिकॅडलीचा नखरा असलेली बाजारपेठ, व्हिक्टोरिया राणीच्या अमदानीतील ती एकसारखी घरे म्हणजे बाकीचे ब्रिस्टल. त्यात ब्रिस्टल विश्वविद्यालय व त्याचा परिसर कोणालाही प्रेरणा देणारा. आवारातील ती हिरवळ माणसाचे वय विरघळून टाकते. या विश्वविद्यालयाचे विन्स्टन चर्चिल सतत ३६ वर्षे कुलपती होते. इंग्रजी ज्ञान व व्यापार या भूमीवर विशेष रुजला.

ब्रिस्टलचे प्राणिसंग्रहालय पाहण्यासाठी बरीच गर्दी एका दिशेने चालली होती. आम्हीही त्यात सामील झालो. साऱ्यांची उत्सुकता होती एकाच प्राण्याबद्दलची. त्या प्राणिसंग्रहालयात शिरलो तर पुन्हा गर्दी एकाच पिंजऱ्याभोवती. जवळ गेलो तेव्हा लक्षात आले की त्यात भारतीय पाहुणे होते. पांढरे वाघ त्या पिंजऱ्यात होते. भारतातून ते खास आणले होते. अर्थात पांढरे वाघ आम्हीही प्रथम पाहिले ते येथेच. टिळकपंथीय गोखल्यांच्या पक्षात गेल्यावर जसे दिसत असतील तसे ते परदेशात दिसत होते. पांढरा शुभ्र रंग व त्यावर तपकिरी काळे पट्टे मोठे उठून दिसत होते. बाकीचे सर्व इतर प्राणि-

संग्रहालयाप्रमाणेच. जेथे मोठी माणसे वय विसरतात, आपला दर्जा विसरतात अशी ही जागा. आइसक्रीम सतत खाणारी लाल गुबगुबीत मुले यांनी तो परिसर नुसता फुलून गेला होता. सबंध दिवस असे आम्ही ब्रिस्टल फिरत होतो. अजून एका ठिकाणी जायचे होते. तेथे गेल्याशिवाय ब्रिस्टलची भेट पुरी होणार नव्हती. प्राणिसंग्रहालयातून एकदम स्मशानभूमीकडे जायचे होते. सामाजिक सुधारणेची ज्योत प्रथम लावणाऱ्या राजा राममोहन रॉय यांच्या समाधीचे दर्शन घ्यावयाचे होते. बंगालमधल्या राधानगरीत जन्मास आलेला हा सुपुत्र अखेरची निद्रा घेण्यास ब्रिस्टलला आला. २७ सप्टेंबर १८३३ रोजी त्यांचे येथे निधन झाले. आता या गोष्टीला १३५ वर्षे झाली.

स्मशानभूमी शोधून काढणे फार सोपे जाईल अशी आमची कल्पना होती. परंतु तीही फोल ठरली. सकाळी आम्ही ज्या स्थानकावर उतरलो तेच चुकीचे निघाले. ब्रिस्टल या एका शहरालाच नवी दिल्ली, जुनी दिल्ली प्रमाणे दोन स्थानके होती. त्यामुळे थोडी रपेट झाली. त्यामुळे गाव अधिक जवळून दिसले. तीन स्मशानभूमींचे संशोधन केल्यावर आम्ही योग्य ठिकाणी पोहोचलो. आपल्याकडे स्मशान म्हटले की ओसाड जागा डोळ्यापुढे येते. परंतु साहेबाची दहनभूमी म्हणजे जवळजवळ एक बगिचाच. प्रत्येक स्मशानभूमीबाहेर मोटारींची रीघ लागली होती. ती कुणाच्याही अंत्ययात्रेची नव्हती. त्या दिवशी रविवार होता. त्यामुळे आपल्या कुटुंबातून निघून गेलेल्या आपल्या माणसाच्या दहनभूमीवर फुले वाहण्यासाठी हे सारे आले होते. त्यामुळे बाहेर गाड्या, आत सर्वत्र फुलेच फुले असे दृश्य दिसत होते. स्मशानभूमीजवळच या शेवटच्या यात्रेची तयारी करणारी अनेक दुकाने होती. परंतु तीही अशी थाटाची की मृत्यूचे सावट तेथे कुठे दिसतच नव्हते. इमारतीचा इंटिरियर डेकोरेटर असावा तसाच हा ' फ्युनरल डेकोरेटर ' दिसत होता. इतकेच नव्हे तर दुकानांवर पाट्या मोठ्या गमतीदार होत्या. ' डायरेक्टर ' ' मॅनेजर ' असे शब्द तेथे झळकत होते. राजा राममोहन रॉय आपला देश सोडून अखेर येथे का आले ते ही दुकाने पाहिल्यावर अधिक पटले.

अखेर एका स्मशानभूमीवर आम्ही पोहोचलो व समोरच भारतीय पद्धतीचे हे मंदिर दिसले. एका वृक्षाच्या छायेत, पिवळ्या रंगाचे हे मंदिर म्हणजेच राजा राममोहन रॉय यांची समाधी. त्या समाधीवरही चार फुले ठेवून कुणी गेले होते. तांबूस रंगाची व टवटवीत. काळाने शतकांचे अंगरखे बदलले तरी न कोमेजून जाणाऱ्या देशभक्ताच्या—समाजसुधारकाच्या कार्यासारखी.

दिवस खूप मोठा असल्याने संध्याकाळ संपत नव्हती. आम्ही पुन्हा गाडी गाठली व कार्डिफला परतलो. परतताच आमचे स्वागत केले ते पावसाने. पेनार्थच्या इंटरनॅशनल हाऊसवर पोहोचलो तर कळले की आज दिवसभर पावसाची रिपरिप येथे चालू होती. ब्रिटनच्या हवामानाचा लहरीपणा इतका की याच ब्रिस्टल खाडीच्या एका तीरावर दिवस-भर ऊन होते तर दुसऱ्या तीरावर दिवसभर पाऊस. सकाळी आम्ही बाहेर पडलो तेव्हा कुणी तरी म्हणाले, "ब्रिस्टलला आज पाऊस पडणार, तुम्ही जाऊ नका. हवामान-खात्याचा तसा अंदाज आहे." आणि तरीही आम्ही गेलो. परत आल्यावर म्हटले की हवामान खात्याचा अंदाज फक्त भारतातच चुकतो असे म्हणण्याचे आता कारण नाही.

प्रकरण चौदावे

# बदलणारे बर्मिंगहॅम !

बर्मिंगहॅम ! ब्रिटनची उद्योगनगरी म्हणून लहानपणी भूगोलात वाचलेले बर्मिंगहॅम ! त्याच बर्मिंगहॅममध्ये बसून हा लेख मी लिहिला. बी. एस. ए. सायकलवरील ' बर्मिंगहॅम ' या अक्षराचे शालेय जीवनात किती कौतुक वाटे. त्या सायकलवरून बर्मिंगहॅमला जाण्याची स्वप्ने आम्ही त्या वेळी रंगविली होती. सातासमुद्रापलीकडच्या या उद्योगनगरीत मी खरो-खरच कधी येईन असे मात्र वाटले नव्हते.

परंतु मी तेथे पोहोचलो होतो. आणि आपल्या अस्तित्वाचे शतक ओलांडलेल्या ग्रँड हॉटेलच्या एका आलिशान खोलीत बसून मी या भव्य औद्योगिक नगरीचे माझ्या मनात उमटलेले चित्र शब्दांकित करीत होतो.

बर्मिंगहॅमला ही माझी दुसरी भेट. पहिल्या वेळेस आलो तेव्हा बर्मिंगहॅमचे अंतरंग पाहिले. राणीचा पाहुणा म्हणून पुन्हा आलो तेव्हा या बदलणाऱ्या बर्मिंगहॅमचे बाह्य स्वरूप अवलोकिले. भारतीयांना बर्मिंगहॅमइतके जवळचे वाटणारे दुसरे परदेशी शहर नाही. आमच्या पंजाबी मित्रांनी तर बर्मिंगहॅमला पंजाबचाच एक तालुका मानले असावे. ब्रिटनच्या औद्योगिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांचा कुणाला अभ्यास करावयाचा असेल तर बर्मिंग-हॅमला जाऊन राहावे. ब्रिटनचे सर्व ज्वलंत प्रश्न येथे धगधगत आहेत.

पंधरा दिवस बर्मिंगहॅममधील काळ्या-गोऱ्यांचा प्रश्न येथे वृत्तपत्रांतून व टेलिव्हिजनवर गाजत होता. काही भारतीय व जमाइकन्स यांच्या घरांसमोर ' कु क्लुक्स क्लॅन 'च्या

हस्तकांनी जळते क्रॉस ठेवल्याने येथे बरीच खळबळ उडाली होती. वातावरण बरेच तंग झाले. राष्ट्रकुल मंत्री काही खासदारांसह ताबडतोब बर्मिंगहॅमला गेले. 'कु क्लुक्स क्लॅन' चळवळीचे अमेरिकन नेते रॉबर्ट शेल्टन ब्रिटनला यावयास निघाले होते. त्यांच्यावर प्रवेश-बंदीचा हुकूम ब्रिटिश सरकारने जाहीर केला.

बर्मिंगहॅमचे हे अंतरंग येथील चान्स टेक्निकल कॉलेजचे प्राध्यापक श्री. पद्माकर थोरात यांच्यामुळेच मी पाहू शकलो. श्री. हॅरॉल्ड विल्सन यांचे उजवे हात श्री. गॉर्डन वॉकर यांच्या 'स्मेथिक' या मतदार-संघात आम्ही प्रथम गेलो. मजूर व हुजूर पक्षाच्या अनेक परस्परविरोधी विचारप्रणालींचा संघर्ष या मतदारसंघात लागलेला आहे. येथील काळ्या-गोऱ्यांची समस्या ही दोन्ही राजकीय पक्षांची. या मतदार विभागातीलच नव्हे तर सबंध बर्मिंगहॅममधील राजकीय चळवळींचा मुख्य भाग बनली आहे. कौंटि कौन्सिल्स हुजूर पक्षाच्या हाती तर मुख्य सरकार मजूर पक्षाचे. यामुळे एक विलक्षण झुंज तेथे लागलेली दिसली. श्री. गॉर्डन वॉकर यांचा मागील निवडणुकीत पराभव करून निवडून आलेले हुजूर खासदार श्री. ग्रीफीथ हे तरुण गृहस्थ उत्तम वक्ते आहेत. त्याशिवाय ते या भागातील आहेत. श्री. वॉकर हे बाहेरून लादलेले उमेदवार असा प्रचार हुजूर पक्षाने गेल्या निवडणुकीत केला व तो त्यांच्या उपयोगी पडला.

या निवडणुकीच्या निमित्ताने येथील काळ्या-गोऱ्यांच्या समस्येची काही मनोरंजक माहिती मला मिळाली. बर्मिंगहॅमला उतरल्यावर ताबडतोब आम्ही कृष्णवर्णीयांच्या वस्तीत जाऊन दाखल झालो. भारत-पाकिस्तानमधल्या एका गावातून आपण फिरत आहोत असेच क्षणात जाणवू लागले. सरदारजी सुतारकाम करीत आहे, एक पंजाबी मित्र भाजीचे दुकान टाकून बसला आहे, कुणी दिल्लीकर केस कापण्याचे सलून चालवीत आहे तर कुणी शिंप्याचे दुकान थाटून बसला आहे! लिहिता वाचता न येणारे भारतीय लोक इंग्रजीत बोलत आहेत.

ही सारी मंडळी आपली मायभूमी सोडून येथे का आली? त्या वेळी हुजूर पक्षाचे लॉईडसारखे नेते ब्रिटनमधील या आयातीवर तुटून पडले होते. ब्रिटन या पाहुण्यांपासून आता वाचविले पाहिजे अशी हाकाटी त्यांनी सुरू केली होती. या वाद-विषयावर तेथील वृत्तपत्रांतून उलटसुलट चर्चा धूमधडाक्याने चालू होती. दरवर्षी ७६ हजार नवे पाहुणे आशियाई व आफ्रिकी देशांतून येथे येतात. 'गार्डियन' या दैनिकाने या प्रश्नावर लिहिताना 'हे सारे का येतात?' असा साधा सवाल विरोधकांना टाकला होता.

‘ तुमच्या देशातील कडक थंडीशी झुंज देत ते का राहतात ? आपल्या मायभूमीपासून दूर राहून त्यांना काय साधायचे असते, ’ असे साधे परंतु परिणामकारक प्रश्न ‘ गार्डियन ’ने एका अग्रलेखातून विचारले होते.

या प्रश्नांची उत्तरे बर्मिंगहॅमने दिली आहेत. ‘ वर्कशॉप ऑफ दि वर्ल्ड ’ म्हणून बर्मिंगहॅम आज अनेक शतके ओळखले जाते. ज्याच्या हाती कसब आहे, किंवा यांत्रिक कौशल्य आत्मसात करण्याची ईर्षा आहे तो बर्मिंगहॅममध्ये येतो. उद्योगपतींची ‘ मक्का ’ असाही बर्मिंगहॅमचा एक उल्लेख मी वाचला. ज्याच्या जीवनाची क्षितिजे संकुचित राहू शकत नाहीत तो गावाची वेस ओलांडतो. नाहीतर एक हजार वर्षांपूर्वी नऊ कुळे राहात असलेले व २० शिलिंगचे वार्षिक उत्पन्न असलेले हे बर्मिंगहॅम जगाची उद्योगभूमी झाली नसती. लोहारांनी बर्मिंगहॅमचा सर्व ताबा घेतला. लोखंड व कोळसा ही दोन्ही खनिज द्रव्ये मुबलक असलेल्या या भागाकडे कारखानदारांबरोबर संशोधक आले. जगाच्या यांत्रिक युगाची भूपाळी बर्मिंगहॅमने गाइली. वाफेचे इंजिन शोधून काढणाऱ्या जेम्स वॅट-सारख्या संशोधकाच्या मुखाने ती गाइली. ब्रिटनच्या औद्योगिक क्रांतीचा पाया बर्मिंगहॅमने घातला. बर्मिंगहॅमच्या परिसरातील ते प्रचंड कारखाने पाहिले की डोळे दिपून जातात. कॅडबरीसारख्या चॉकोलेटस् विकणाऱ्या कारखानदाराने जणू आपले स्वतःचे स्वतंत्र तेथे गाव वसविले आहे. ‘ बोर्न ’ हे कॅडबरीकरांच्या गावाचे नाव आहे हे माहीतही नसेल. या ‘ बोर्न ’च्या आसमंतात फिरून ही ‘ चॉकोलेट नगरी ’ मी पाहिली. जुन्या दगडी इमारती, पटांगणे, नोकरवर्गासाठी उत्कृष्ट घरे, साऱ्या सोयी उपलब्ध असलेला हा विभाग. रोज ५० लाख चॉकोलेट ब्लॉक्स या कारखान्यातून बाहेर जातात. ऑस्टीन मोटारीचे बर्मिंगहॅम हे माहेर. आठवड्याला १८ हजार ऑस्टीन गाड्या या कारखान्यातून बाहेर पडतात असे कळले. डनलॉप टायर्सची मूळ कंपनी येथे आहे. आज दहा हजार कामगार त्या कारखान्यात काम करीत आहेत. जगभर आपल्या वैज्ञानिक प्रगतीचा प्रकाश टाकणारी ‘ लुक्स ’ कंपनी हीसुद्धा खरी बर्मिंगहॅमची. खिळ्यांपासून आगगाडीपर्यंत सर्वांना जन्म देणारी ही भूमी. जेव्हा अण्वस्त्रे नव्हती तेव्हाच्या युद्धासाठी या गावाने तलवारी निर्माण केल्या. बंदुकीचे युग आल्यावर बंदुकी तयार केल्या. बर्मिंगहॅमची बंदूक मुंबईच्या अब्दुल रहिमान स्ट्रीटवर अजूनही मानाचा मुजरा घेत आहे. काही वर्षांतच बर्मिंगहॅम हे ब्रिटनचे नुसत्या भौगोलिक अर्थानेच नव्हे तर सर्वार्थाने हृदय ठरले. लंडननंतरचे दुसऱ्या क्रमांकाचे शहर म्हणून बर्मिंगहॅमला आज स्थान आहे.

याच आकर्षणाने साऱ्या जगातून येथे लोक आले आणि मग नवे प्रश्न निर्माण झाले. इंग्रजी माणसाचे घर हे एखाद्या किल्ल्यासारखे असते. आपल्या शयनघरात फक्त तो आपल्या पत्नीलाच शिरू देईल. इंग्रजी कुटुंबातील चार महिन्यांच्या लहान मुलांनाही आई आपल्याजवळ झोपण्यास घेत नाही. त्याच्याकरिता वेगळी लहानशी खोली असते. मूल रडले अगर रात्री उठले तर आई उठून त्या खोलीत येईल. उठण्या-बसण्याच्या खोलीत रात्री खुर्च्या, कोच सरकवून अंथरुणे पसरण्याची पद्धती इंग्रजांना ठाऊक नाही. त्यामुळे घरात बेताची माणसे व पुरेशी जागा हे एकच समीकरण साहेबाला ठाऊक होते. या कारखान्यांनी जे कामगार आणले त्यांच्या राहण्याचा प्रश्न सर्वप्रथम उभा राहिला. मग कृष्णवर्णीयांना जागा देण्यास 'साहेब' तयार होईना. स्वच्छता ही तक्रारीची खरी बाब. या प्रश्नात मग आघाडी मारली ती जमाइकन्सनी. आशियाई लोकांपेक्षा ते अधिक संख्येने बर्मिंगहॅममध्ये आहेत व आपल्या लोकांपेक्षा भरपूर चैनही करीत आहेत. घरे मिळण्याची अडचण पडू लागताच काही जमाइकन्सनी एकत्र येऊन भागीत घरे विकतच घेण्यास सुरुवात केली. विकत घेतलेल्या घरात मग पाहुणे मंडळींची गर्दी सुरू झाली. ज्या घरात एक गोरे कुटुंब राहात असे तेथे १० ते १५ जमाइकन्स राहू लागले. या घराचे वसतिगृहात रूपांतर झाले व मग मुंबईला मद्रासच्या गाड्या जशा भरून येतात तशा जमाइकन्सच्या बोटी भरून येऊ लागल्या. बसके परंतु ढोबरे नाक, अरुंद कपाळ, वरती खुरटे केस परंतु धिप्पाड शरीराचे ते जमाइकन्स हे बर्मिंगहॅमच्या औद्योगिक क्षेत्रात सर्वत्र चमकू लागले. आज त्यांच्यापैकी अनेकांकडे मोटारी आहेत, अनेकांचे विवाह इंग्रज कन्यकांशी झालेले आहेत आणि मोठ्या मजेत व बेफिकिरीत हे लोक तेथे राहात आहेत.

परंतु त्यांच्या घरे विकत घेण्याच्या पद्धतीने नवी समस्या निर्माण केली. एक घर कृष्ण-वर्णीयाने घेतले की शेजारच्या घरांच्या किमती एकदम खाली येत. त्यामुळे आपल्या वस्ती-मधील घर कुणी काळ्या माणसाला विकू नये यासाठी चळवळ सुरू झाली. हुजूर व मजूर पक्षीय कार्यकर्त्यांची पहिली चकमक या प्रश्नावर घडू लागली. हे जमाइकन्स अधिक भाव देऊन घरे विकत घेत असल्याने पैशाच्या अपेक्षेने घरे विकणारे स्थानिक मालक होतेच. या खरेदीमुळे काही वसाहती कृष्णवर्णीयांच्या झाल्या. भारत-पाकिस्तानी नागरिकांच्या वसाहतीत मी फिरत असताना सर्वांत जाणवली ती अस्वच्छता. येथील घरासमोरचा व घरामागचा पसारा पाहिला की 'कीप ब्रिटन क्लीन' या घोषणेचा पुकारा करणाऱ्या ब्रिटनमध्ये आपण

आहेत असे वाटत नाही. मग मारामाऱ्या व आरडाओरड आलीच. अशा एका बकाल वस्तीमधील एका बारमध्ये आम्ही गेलो. तेथील दृश्य मुंबईच्या भेंडीबाजाराला साफ लाजविणारे होते. पोरी नाचत होत्या. पेयाचे घुटके व सिगारेटचे झुरके यामध्ये बाकीचे रंगले होते. इंग्रजी सोडून इतर भाषाच तेथे बोलल्या जात होत्या. जमाइकन्सचा एखादा घोळका शिरे व नुकत्याच संपलेल्या घोड्याच्या शर्यतीचा निकाल आपल्या मित्रांना सांगे. ते सर्व दृश्य पाहात आम्ही एका कोपऱ्यात बसून होतो. सहज पलीकडे पाहिले! एक जमाइकन नवीनच घेतलेल्या लांब पात्याच्या चाकूची धार आपल्या मित्राला दाखवीत होता.

त्या रात्री जमाइकन्सच्या वस्तीमधील एका नृत्यगृहात आम्ही गेलो तेव्हा येथून सही-सलामत परत येऊ असे अखेरपर्यंत वाटत नव्हते. एका भव्य रस्त्यावर या क्लबचा मुख्य दरवाजा होता. परंतु पुढची सर्व दारे बंद. मागले गल्ली-बोळ ओलांडल्याशिवाय प्रवेश नव्हता. परंतु त्या गल्ली-बोळात या पाहुण्यांच्या मोटारींची केवढी झुंबड उडाली होती. दुसऱ्या देशात गेल्यावर तेथील जीवनाशी समरस होऊन जास्तीत जास्त यश व संपत्ती पदरात पाडून घेण्यात या मंडळीचा कुणी हात धरू शकणार नाही. एखाद्या गोऱ्या स्त्रीला रस्त्यातून जाताना हा जमाइकन बगलेत धरून जाईल. इतर गोरी मंडळी आपल्याकडे पाहात आहेत याची फिकीर तो करणार नाही. भारतीय अगर पाकिस्तानी तितके धाडस करीत नाहीत. जेथे ते काम करतात तेथे या जमाइकन्सची एकजूटही जबरदस्त असते. कुठचेही मेहनतीचे काम ते करू शकतात. याचे कारण त्यांचे दणकट शरीर. बर्मिंगहॅमच्या नाक्या-नाक्यावर अतिशय जुने असे बार्स आहेत. एखाद्या कलेक्टरच्या बंगल्यापेक्षा चांगल्या दिसणाऱ्या इमारतीत अनेक वर्षांपूर्वी उघडलेले हे मदिरेचे अड्डे. या मिश्र वस्ती-मुळे याचे आपोआप वर्ग पडले आहेत. कामगारमंडळीचे बार वेगळे व बड्या साहेबांचे बार वेगळे. परंतु या बारमध्ये बर्मिंगहॅमचे सर्व प्रश्न चर्चिले जातात. कोणती घरे विकायची आहेत व ती तिघा-चौघांनी मिळून कशी घ्यायची याचा निर्णय बिअरच्या ग्लासावर येथे होतो.

वर्ण-प्रश्नावर हुजूर व मजूर पक्षाची लढत ज्या एका रस्त्यावरील घरांच्या निमित्ताने लागली तो 'मार्शल स्ट्रीट' पाहण्यासाठी मी मुद्दाम जाऊन आलो. याच 'मार्शल स्ट्रीट'वर मुस्लिम निग्रोंचे नेते माल्कम एक्स यांना मुद्दाम आणण्यात आले होते. बी. बी. सी. ने त्यांना या रस्त्याच्या नाक्यावर उभे करून त्यांची मुलाखत घेतली होती. येथून ते अमेरिकेस परतले व सात-आठ दिवसांनीच त्यांचा खून झाला.

या मार्शल स्ट्रीटवरची घरे काळ्या लोकांना द्यायची नाहीत असा येथील नागरिकांनी

निर्धार केला. कौन्टी कौन्सिलने त्यांना पाठीशी घालायचे ठरविले. कारण त्या वेळी ते हुजूर पक्षीयांच्या हाती होते. त्यामुळे विक्रीस काढलेले घर कौन्टी कौन्सिलनेच विकत घेण्याचे ठरविले व गोऱ्या माणसालाच आम्ही ते भाड्याने देऊ असे जाहीर केले. मजूर मंत्रिमंडळाने या निर्णयाला विरोध केला व वर्णविग्रहाच्या धोरणाचा धिक्कार केला. या रस्त्यावर काही जुने कृष्णवर्णीय राहात आहेतच. त्यामुळे ही वस्तीही मिश्र आहे असा मजूर पक्षीयांचा दावा. परंतु एका वस्तीत गोऱ्यांसाठी घरे राखण्याची जर तुमची योजना असेल तर प्रत्येक वस्तीत काळ्यांसाठीही घरे राखून ठेवा अशी मागणी मजूर पक्षीयांनी केली. अखेर प्रकरण कोर्टात गेले. हुजूर पक्षीयांचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

एकीकडे हा संघर्ष चालू असतानाच बकाल बर्मिंगहॅमचे सुंदर नगरीत रूपांतर करण्याच्या कामात कौन्टी कौन्सिल जराही कुचराई करीत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. कार्डिफहून मी बसने बर्मिंगहॅमला आलो. दिगबेथ बस स्टॉपवर उतरून मी बर्मिंगहॅममध्ये प्रवेश केला त्या दिवशी शनिवार होता. शनिवार हा ' शॉपिंग 'चा दिवस. कौन्टी कौन्सिलने उभारलेली समोरची ' बुल रिंग ' ही बाजारपेठ अशी फुललेली होती की, ती मिश्र गर्दी पाहून नवा माणूस बिचकूनच जाईल. सर्व तऱ्हेच्या लहानमोठ्या वस्तू मिळणाऱ्या दुकानाची ही बाजारपेठ एका खेपेस कुणास पाहता येणेही शक्य नाही. १९ विद्युत जिने या इमारतीत आहेत व २८ हजार माणसांची ये-जा काही तासांत त्यावरून अशा शनिवारी होते. यावरून त्याचे भव्य स्वरूप लक्षात येऊ शकेल. पंधरा ते सोळा मजली इमारती कौन्टी कौन्सिलने बांधल्या आहेत व जुन्या घरांतील लोकांना माफक भाड्यात तेथे जागा दिल्या आहेत. एकूण पाच कोटी पौंड या कौन्सिलने नवे बर्मिंगहॅम उभे करण्यासाठी खर्च केले आहेत. उरलेल्या बकाल वस्त्या पाडून टाकून तेथेही मोठमोठ्या इमारती बांधण्याचा कौन्सिलचा संकल्प आहे. येत्या पाच वर्षांत बर्मिंगहॅमचे स्वरूप साफ बदलून जाईल असा त्यांना विश्वास आहे. त्यासाठी आणखी पाच कोटी पौंडांचा अर्थसंकल्प त्यांनी केवळ घरांसाठी तयार केला आहे. ज्यांची घरे पाडली जातात त्यांना नव्या इमारतीत जागा मिळते व ती माफक भाड्यात मिळते. भरमसाट भाडी आकारणारे हौसिंग बोर्ड तेथे नाही. कर्ज देण्यास पैसेच नसलेले हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशनही तेथे नाही. आमचे घर अगर झोपडे कसे पाडता ते पाहतो असे म्हणणारे नागरिकही नाहीत व त्यांना डावलून वशिल्याने दुसऱ्यालाच नवे घर देणारे अधिकारीही नाहीत. अमेरिकन पद्धतीची वर्तुळाकार अशी भव्य इमारत येथे कचेऱ्यांसाठी बांधलेली आहे.

'इजबस्टन' हे बर्मिंगहॅमचे एक नवे उपनगर. क्रिकेटचे मोठे सामने येथे होतात. तेथे गेल्याशिवाय नव्या बर्मिंगहॅमचे दर्शन होणार नाही. तेथील कॅनन हिलवर बांधलेली मिडलॅंडस् आर्टस सेंटरची वर्तुळाकार इमारत लंडनलाही लाजविणारी आहे. बर्मिंगहॅम युनिव्हर्सिटी तर शहरात शिरतानाच लागते. पुढील पाच वर्षांत जुने बर्मिंगहॅम कदाचित दिसेनासेच होईल.

या सर्व इमारती दिव्यांच्या झगझगाटात उजळून निघतात तेव्हा तेच बर्मिंगहॅम वेगळे दिसते. दुकाने बंद झालेली असतात व त्यांच्या प्रवेशद्वाराचे कोपरे प्रेमिकांनी अडविले जातात. मदनाच्या राज्यात आपण आलो आहोत असेच वाटते. त्यात बीटनिक्सचा धुमाकूळ. रात्रीचा एक वाजला होता. बदलणाऱ्या बर्मिंगहॅमचे दर्शन घेऊन आम्ही परतत होतो. बर्मिंगहॅमचे सकाळचे दैनिक 'संडे मर्क्युरी'ची पहिली आवृत्ती रात्रीच बाहेर आली होती. 'मिसिंग गोया फाऊंड इन बर्मिंगहॅम!' ठळक अक्षरांतील ती बातमी पाहून लोक अंकासाठी धावत होते. लंडनच्या नॅशनल गॅलरीतून दोन वर्षांपूर्वी चोरीस गेलेले हे चित्र. गोया या सुप्रसिद्ध चित्रकाराने काढलेले लॉर्ड वेलिंग्टनचे हे तैलचित्र — बर्मिंगहॅम रेल्वे स्थानकाच्या क्लोकरूममध्ये मिळाले होते. ज्याने ते तेथे ठेवले त्याने येथील 'डेली मिरर' या पत्राला पत्र लिहून आपण तेथे ठेवल्याचे कळविले होते. त्याप्रमाणे बर्मिंगहॅमला त्या दिवशीच ते मिळाले होते. वर्तमानपत्रांच्या अनेक उद्योगांपैकी हा एक. 'डेली मिरर'चा तो अंक मी पाहिला होता. ते चित्र पाहण्यासही मी उत्सुक होतो. लंडनला आल्यावर नॅशनल गॅलरीत जाऊन मी मुद्दाम ते चित्र पाहिले. एक साधा पोर्ट्रेट यापेक्षा त्यात विशेष काही नव्हते. वृत्तपत्रांनीच तो विषय अधिक रंगविला होता. 'संडे मर्क्युरी'चे गठ्ठे समोर संपत होते. एक अंक घेऊन आम्ही घरी परतलो. अतिशय दमून, परंतु न थकलेले बर्मिंगहॅम अजून जागेच होते.

प्रकरण पंधरावे

# एव्हनच्या तीरावर

एव्हन नदीचा तीर बर्मिंगहॅमपासून २३ मैलांवर. चारशे वर्षांपूर्वी या तीरावर अशी एक व्यक्ती जन्माला आली की, तिने जगाच्या कानाकोपऱ्यातील माणसे या किनाऱ्यावर आणली. सबंध जगाच्या साहित्य सरोवरातील हंस या एव्हन नदीच्या पात्रातील त्या शुभ्र पक्ष्यांशी गुजगोष्टी करण्यास आले. बेन जॉन्सन हा शेक्सपिअरचा समकालीन नाटककार. शेक्सपिअरचे वर्णन तो एव्हनचा राजहंस असे करीत असे. वर्षांची कितीतरी पाने उलटली तरी ज्याच्या नाटकांची पाने हिरवीगार राहिली असा हा राजहंस जेथे जन्मला, जेथे त्याने चिरनिद्रा घेतली त्या वास्तू पाहण्यासाठी असंख्य लोक येतात, तसे आम्हीही गेलो.

एव्हनच्या या तीरावर कधीतरी एक किल्ला होता. त्या तटबंदीचे स्ट्रॅटफोर्ड झाले व गावाने ते नाव कायमचे घेतले. इतिहासाचा कानोसा घेत आम्ही स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनमध्ये शिरलो तेव्हा क्षणभर वाटले की, आपण त्याच जमान्यात आहोत. चार घोड्यांच्या बग्गीतूनच हा दूरचा प्रवास आपण केला आहे. क्लॉप्टन ब्रीजवर कोचमनने गाडी उभी केली आहे, व गाव आल्याची वर्दी तो खाली उतरून देत आहे. आमच्याच बग्गीने उडविलेली धूळ डोळ्यांवरून बाजूला करीत आम्ही समोर दिसणाऱ्या गावाकडे नजर फेकीत आहोत. पंधराव्या शतकाचा हा काळ. गावाचा पोषाख व मन दोन्ही ग्रामीण आहे. भरपूर लाकूड वापरून बांधलेली ती दुपाखी घरे, काही घरांना मात्र अनेक पाखी.

कमानीसारखी, घरांना शोभा आणणारी. मातट रस्ते व त्यावर खूप रुंद फेल्टस् घालून चाललेले लोक. नदीत शिडाच्या बोटी. पुलाच्या आडोशाने उभ्या असलेल्या.

बग्गीतून उतरून आम्ही चालत जातो व हेन्ले स्ट्रीटवर येतो. वसंत फुलला असल्याने सारे कसे हाशहुश करीत रस्त्यावर फिरत आहेत. या हेन्ले स्ट्रीटवरील एका घरात थोडी गडबड चालू आहे. घर दुमजली व असेच दुपाखी. लाकडाच्या चौकटीत मधून मधून विटा वापरलेल्या. त्यामुळे अर्धे अधिक घर दिसते लाकडीच. आत भरपूर प्रकाश यावा म्हणून समोरच्या भागात घराला वर तीन कमानी काढलेल्या. त्यात खिडक्यासारखे झरोके. घराच्या उजव्या बाजूच्या टोकाला पहिल्या मजल्यावर एक लहानशी बाल्कनी बाहेर काढलेली. घराला पाया नाहीच. रस्त्यावरून पाय उचलावे व पहिल्या खोलीत टाकावे.

या घरात जॉन शेक्सपिअर या नावाचा एक गृहस्थ राहतो आहे. लोकर विकण्याचा त्याचा धंदा आहे. हातमोजेही तो बनवितो. त्याला मार्गारेट या नावाची एक अडीच वर्षांची मुलगी आहे. या घरातील वरच्या मजल्यावरून नव्याने जन्मलेल्या बालकाचा आवाज येतो आहे. आज तारीख आहे २३ एप्रिल १५६४. जॉन शेक्सपिअरचा पहिलाच मुलगा जन्माला आला आहे. त्याचा आनंद एव्हन नदीने जाणला आहे. पण लोक दैनंदिन कामात मग्न आहेत. त्याचे नाव विल्यम ठेवले आहे. बापाची भरभराट होऊ लागली आहे. पुढच्या वर्षी तो नगरपिता होतो. आणखी दोन वर्षांनी गावचा प्रमुख बेलीफ म्हणून त्याची नेमणूक होते. त्या लाकडी चौकटीच्या घरात विल्यम राहात असतो, मोठा होत असतो. त्या घराला अनेक खिडक्या आहेत. त्यामधून तो डोकावत असतो. पायऱ्या उतरून खाली आला तर जवळ रस्ता आहे. स्वारी शाळेला जाण्याच्या मनःस्थितीत नाही. वडिलांनी अभ्यासाकरिता आणलेले लाकडी डेस्क पहिल्या मजल्यावरच्या शेकोटीजवळ आहे. किंग एडवर्ड ग्रामर स्कूलमध्ये तो मधून मधून जातो. गावात नाटके चालू आहेत. थोडा अभ्यास, अधिक उनाडक्या करीत विल्यम मोठा होतो आहे. गावातील शॉटरी या भागातील एका मुलीच्या घराकडे तो आता अधिक जाऊ लागला आहे. विल्यमने नुकतेच १८ वे वर्ष ओलांडले आहे. त्या गवताळ छपराच्या घरातील मुलगी अ‍ॅन हॅथवे त्याच्यापेक्षा ८ वर्षांनी मोठी आहे, परंतु क्लॉप्टन ब्रिजवर सवंगड्यांबरोबर प्रेमाच्या गप्पा मारणारा विल्यम तिच्या प्रेमात सापडला आहे. हेन्ले स्ट्रीटवर अ‍ॅन हल्ली वरचेवर येते. तळमजल्यावरील खालच्या खोलीतील बैठकीच्या जागी विल्यम व अ‍ॅनच्या गप्पा चालू आहेत. भिंतीलगत शाळेच्या बाकासारख्या बसण्यासाठी फळ्या लावल्या आहेत. मध्ये एक जुने

पद्धतीचे वर्तुळाकार टेबल ठेवले आहे. तिथे दोघांचे प्रणयाराधन चालू आहे. ॲनच्या गवती छपराच्या घरातील उंबरठ्यावर असेच एक फळकूट आहे. विल्यम तेथे तासन्तास बसत आहे. दिवसामागून दिवस जात आहेत. एव्हन नदीतून वाहणाऱ्या पाण्यासारखे. विल्यम शेक्सपिअर व ॲन हॅथवे यांचा विवाह होतो आहे. २८ नोव्हेंबर १५८२ चा तो दिवस.

विल्यम शेक्सपिअर व ॲन हॅथवे यांचा संसार हेन्ले स्ट्रीटवरील घरात आता चालू आहे. शेक्सपिअर आता गावात मास्तरकी करू लागला आहे. सुसन्ना या त्यांच्या पहिल्या कन्येचा जन्म झाला आहे. १५८५ साल उजाडले आहे व स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनमध्ये चारचौघांसारखा संसार करणारा विल्यम आपले गाव सोडून निघाला आहे.

विल्यम शेक्सपिअरने एव्हन नदीचा निरोप घेण्याचे का ठरविले आहे? गावात दोन भूमका उठल्या आहेत. सर थॉमस लूसी या एका उमरावाच्या वाड्यात मारून आणलेली शिकार विल्यम व त्याच्या मित्रांनी लंपास केली असे कुणी म्हणते आहे. त्याबद्दल विल्यमला अटक झाली आहे. कुणी त्यांच्या टोळक्याने बिडफोर्ड या जवळच्याच एका खेड्यात जाऊन दारू पिऊन धुडगूस घातल्याचे सांगतात. दोन्ही घटना गाजल्या त्या या शिमग्यानंतरच्या कवित्वाने. सर थॉमस लूसी हे वॉर्विकशर परगण्याचे मॅजिस्ट्रेट. त्यांच्यावर 'लॉडझी लूसी' या नावाचे कुचेष्टेचे काव्य या विल्यमने लिहिले व गावात पसरविले. 'बिडफोर्ड सोसायटी ऑफ सिपर्स'च्या या टोळक्याने जो धुमाकूळ घातला त्यावरही एक असेच वाह्यात काव्य या विल्यमने लिहिले. यापैकी कशाचा तरी परिणाम इतका झाला आहे की, विल्यम शेक्सपिअर व ॲन हॅथवे स्ट्रॅटफोर्ड सोडून निघाले आहेत.

विल्यमचा बाप तिथेच राहिला आहे. एक वर्षाने त्याचे नगरपितेपदही गेले आहे. तेथील कारभारात त्यानी गोंधळ केला असे गावकरी म्हणतात. विल्यम शेक्सपिअरने स्ट्रॅटफोर्डबाहेर सात वर्षे नंतर काय केले याचा पत्ता लागत नाही. तो लंडनमध्ये होता हे निश्चित. काही दिवस तो खलाशी बनला. सैनिक बनला. कधी वकिलाचा कारकून बनला तर एक दिवस तो रुजू झाला तो एका नाट्यगृहाबाहेर बग्गीतून येणाऱ्या प्रेक्षकांचे घोडे संभाळणारा मोतद्दार म्हणून. परंतु १५९७ मध्ये शेक्सपिअर पुन्हा स्ट्रॅटफोर्डला परतला आहे तो एक नामांकित नाटककार व कवी म्हणून. 'न्यू प्लेस' या नावाचा एक सुंदर बंगला त्याने आता विकत घेतला आहे. त्या घराची ६०० पौंड किंमत या विल्यम शेक्सपिअरने दिली आहे. बरोबर ॲन आहे. त्याच्या हॅमेट या मुलाचे पूर्वीच निधन झाले

आहे. बरोबर कन्या सुसान्ना आहे. या प्रासादाला सुंदर बाग आहे. हिरवळीचा गालिचा आहे. शेक्सपिअरच्या कीर्तीला अशीच हिरवी पालवी फुटलेली आहे.

परंतु स्ट्रॅटफोर्डचे शासन एका पुराणमतवादी कौन्सिलकडे गेले आहे. लंडनच्या ग्लोब थिएटरात ज्याची नाटके गाजत आहेत, ग्लोब थिएटरच्या मालकीत ज्याचा वाटा आहे असा हा विल्यम शेक्सपिअर ज्या गावात जन्मला व आता राहतो आहे तेथे त्याच्या नाटकांवर मात्र बंदी आहे. १५९७ ते १६११ अशी पाच वर्षे शेक्सपिअर येथे राहतो आहे. परंतु या काळात लंडनहून त्याचा या क्षेत्रातील प्रिय मित्रही येऊ शकलेला नाही. त्याचे नाटक स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनच्या थिएटरात होऊ शकत नाही. कारण कौन्सिलने थिएटरच बंद करून टाकले आहे. नाट्यप्रयोगांवर संपूर्ण बंदी घातली आहे. समाजाला बिघडविणारी ही रंगभूमीच कौन्सिलला मान्य नाही.

२३ एप्रिल हा विल्यमचा जन्मदिवसच पुन्हा उजाडला आहे. परंतु साल आहे १६१६. वसंताची प्रभा मृत्यूच्या कृष्णछायेने झाकली आहे. त्या सुरेखशा ' न्यू प्लेस 'मध्ये विल्यम शेक्सपिअरचे निधन झाले आहे. एव्हनमधील राजहंसाने जगाचा निरोप घेतला आहे. नदीच्या पात्रातील ते शुभ्र पक्षी आज सतत पंख फडफडवीत आहेत. अनेक लोकांना दुःख झाले आहे. परंतु नाटककाराला गावात तशी प्रतिष्ठा कुठे आहे? सुसंस्कृत समाजाने मान्य केलेले कार्य त्याने थोडेच केले आहे? क्लॉप्टन ब्रिजवरून ज्या होली ट्रिनिटी चर्चचा मनोरा विल्यम शेक्सपिअरने उमद्या वयात पाहिला व हृदयी साठविला तिथे विसावण्यासाठी तो आता निघाला आहे.

होली ट्रिनिटी चर्चची तीच ऐतिहासिक इमारत. तेच भव्य सभागृह. एका कठड्याला टेकून आम्ही उभे होतो व समोर शेक्सपिअरचे थडगे पाहात होतो. मनात आले, या दगडी फरशीखाली भावनांच्या प्रतिकृती फुलविणारा विल्यम शेक्सपिअर खरंच असेल का? हाती मोरपिसांचे कलम घेतलेला थोडा उग्र चेहऱ्याचा त्याचा डावीकडचा अर्धपुतळा व त्या समाधीवरील अक्षरे ही घटना सत्य असल्याचे सांगतो आहे. शेक्सपिअरचा जन्मदिन व मृत्युदिन हा एकच असावा हा योगायोगही किती विलक्षण. सातच वर्षांनी त्याची प्रेयसी व पत्नी ॲन निवर्तली. तिचेही शेजारीच दफन झाले. त्याच वर्षी शेक्सपियरच्या सर्व नाटकांचा एकत्र संग्रह प्रकाशित झाला. हेमिंग व कॉन्डेल ह्या त्याच्या लंडनच्या रंगभूमीवरील मित्रांनी तो प्रकाशित केला. जिरार्ड जॅनसेन याने तो चुनखडीचा अर्धपुतळा त्या चर्चच्या प्रासादात उभारला. एव्हन नदीच्या पात्रातून खूप पाणी वाहून गेले तेव्हा

कुठे गावाचा शेक्सपिअरबद्दलचा अभिमान वाढीला लागला — परंतु तोपर्यंत त्या उपेक्षेच्या पाण्यात एक महत्त्वाची वास्तू वाहूनही गेली होती.

स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनला आलेला प्रवासी ते तसेच ठेवलेले शेक्सपिअरचे जन्मघर, ॲन हॅथवेचे ते गवताळ घर पाहून येतो तो या होली ट्रिनिटी चर्चमध्ये. तेथून मग बाहेर पडतो तो शेक्सपिअर ज्या घरात अखेर इतमामाने राहिला व निधन पावला ते 'न्यू प्लेस' पाहण्यासाठी. परंतु तिथे आज काय शिल्लक आहे ? फक्त त्या घराच्या पायातील दगड. शेक्सपिअरभक्तांच्या त्रासाला कंटाळून हा बंगला त्या घराच्या मालकाने अखेर कसा जमीनदोस्त केला याची कथा येथे ऐकावयास मिळते.

"शेक्सपिअरने स्वतः लावलेले मलबरीचे झाड आम्हाला दाखवाल काय ?" असे विचारीत भर दुपारी लोक येत. दार ठोठावीत. पुराणमतवादी धर्मगुरूला या प्रश्नाची चीड येई. रागाच्या भरात त्याने ते झाडच एक दिवस मुळासकट उपटून टाकले. परंतु लोक आता येऊ लागले ते शेक्सपिअरचे ज्या घरात निधन झाले ते घर पाहण्यासाठी. धर्मगुरूला आपल्या घराचे लोकांनी चालविलेले हे प्रदर्शन असह्य झाले व त्यांनी एक दिवस तो सबंध प्रासाद जमीनदोस्त केला. शेक्सपिअर या घरात राहिला तेव्हा धर्मगुरूच्या आज्ञेने गावात त्याची नाटके होऊ शकली नाहीत. त्याच्या मृत्यूनंतर जगातील नागरिक ते घर पाहण्यासाठी आले तर त्या गर्दीचा राग येऊन ते घर दुसऱ्या धर्मगुरूने पाडून टाकले. १७५३ ची ही घटना, व रेव्हरंड फ्रान्सिस हे त्या अरसिकाचे नाव. शेक्सपिअरची बंडखोरी धर्ममार्तंडांना अजून मानवत नव्हती असाच त्याचा अर्थ. शॉयलॉकच्या कठोरतेने या धर्मगुरूने तो प्रासाद पाडला तरी लोक अजूनही उरलेल्या शिळांचे दर्शन घेण्यास जातात. दोन विहिरी तेथे शिल्लक आहेत. तर काही तळघरे. परंतु या शिळांच्या अवतीभोवती उभी राहिलेली बाग पाहण्यासाठी आज लोक येतात. शेक्सपिअरचा आत्मा येथे फुलणाऱ्या फुलांत आहे, त्यांच्या रंगात आहे, असे रसिकांना वाटत असावे.

हा भास तर स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनच्या अनेक वास्तू पाहताना आज होतो. क्लॉप्टन पुलावरची वर्दळ पाहात एका स्तंभावरील खुर्चीवर बसलेला विल्यम शेक्सपिअर व त्याच्याभोवती पहारा करणारी त्याच्या नाटकातील चार पात्रे सजीव नाहीत असे येथे कोण मानतो ? डेन्मार्कचा राजपुत्र हॅम्लेट तेथे उभा आहे. लेडी मॅकबेथ, फॅलस्टाफ व राजपुत्र हॅल तेथे आहेत. तत्त्वज्ञान, शोकान्तिका, सुखान्तिका व इतिहास यांचे हे प्रतिनिधी विल्यम शेक्स-

पिअरच्या भोवती उभे केले आहेत. त्यांच्यासमोर शेक्सपिअरचे स्मारक म्हणून उभे राहिलेले मोठे थिएटर होते. ज्या स्ट्रॅटफोर्डमध्ये शेक्सपिअरचे नाटक होत नव्हते त्याच्या जन्मदिनाचा महोत्सव साजरा करण्यासाठी त्याच्याच नाटकांतील गाजलेला नट गॅरिक स्ट्रॅटफोर्डला आला. शेक्सपिअरच्या कविता म्हणत त्याने गावातून मिरवणूक काढली. हातात मलबरी वृक्षाची एक फांदी त्याने धरली होती. शेक्सपिअर त्याच्या दृष्टीने नाटककारापेक्षा नाटक्याच अधिक. या गॅरिक महाशयाने महोत्सव केला, परंतु शेक्सपिअरचे एकही नाटक केले नाही. बॉस्वेल त्या वेळी हजर होता. सप्टेंबर महिन्यात हा उत्सव झाला व पावसाने त्यावर धार धरली तरी गॅरिकचा उत्साह मावळला नाही. शेक्सपिअरचे नाव स्ट्रॅटफोर्डने अभिमानाने प्रथम घेतले ते या उत्सवात. तेव्हापासून या एव्हनला शेक्सपिअर-प्रेमाचा जो पूर आला त्यात त्या खुर्चीवरील पुतळ्यासमोरचे थिएटर उभे राहिले. परंतु एक दिवस तेही जळून खाक झाले. परंतु त्या थिएटरने स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हनला सबंध जगाची नाट्यपंढरी बनविले होते. येथे नाटक करणे हा मान समजला गेला. येथे नाटक पाहण्यात आयुष्याची इतिकर्तव्यता मानणारे असंख्य निघाले. एक थिएटर जळले तर दुसरे नवे आधुनिक थिएटर बांधण्याची ईर्षा साऱ्या जगाने धरली, आणि त्यामधूनच एव्हनच्या तीरावरचे नवे थिएटर निर्माण झाले. नामवंत नटांनी येथे आपली कला सादर करून या श्रेष्ठ नाटककाराला अभिवादन केले. मिस एलिझाबेथ स्कॉट या महिलेने रेखाटलेल्या स्वप्नातून हे थिएटर निर्माण झाले. कोणत्याही बाजूने ते पाहिले तरी थिएटरसारखे दिसते हे त्याचे वैशिष्ट्य. या इमारतीला ' थिएटर सेन्स ' आहे असे उद्गार बर्नार्ड शॉने काढले होते. एव्हन नदीचे सान्निध्य इतक्या खुलावटीने वापरले आहे की तांबड्या विटांच्या सजावटीने उभे राहिलेले हे थिएटर सूर्यकिरणांत तांबूस माणकासारखे चकाकते. सूचीपर्णी वृक्षांची महिरप मोठी गहिरी. एव्हनच्या पाण्यात या थिएटरची पडलेली पडछाया पाहण्यासाठी विल्यम शेक्सपिअरनेच यावयास पाहिजे. परंतु त्या खुर्चीत तो जो बसला आहे तो चक्क या थिएटरला पाठ करून. परंतु एखाद्या चांदण्या रात्री तो एव्हनच्या तीरावर येत असावा. आत थिएटरमध्ये जाऊन लॉरेन्स ऑलिव्हरचे हॅम्लेटचे काम त्याने पाहिले असावे. किनाऱ्यावरच्या शिळेवरही तो येऊन बसत असावा. नदीतील छोट्या छोट्या होड्यांत त्याच्या मानसकन्या विहार करीत असाव्यात. " I did love you once " या हॅम्लेटच्या वाक्यावर " Indeed my lord, you made me believe so " असे म्हणणारी निष्पाप ऑफीलिया मलबरी वृक्षाची एक फांदी घेऊन त्या प्रवाहातून वाहात

जाताना त्याला दिमत असावी. एखाद्या होडीत ज्यूलियट असावी, तर दुसऱ्या होडीत दुर्दैवी डेस्डिमोना. तशाच 'मिडसमर नाइटस् ड्रीम'मधील त्या हर्मिया व हेलेना. एखाद्या झाडामागे पोर्शिया उभी असावी. रक्ताचा थेंब न पाडता 'पौंड ऑफ फ्लेश' खुशाल घे म्हणून शॉयलॉकला सांगणारी. पश्चात्ताप पावलेला आयागो कुठेतरी दूर एका दगडावर येऊन बसत असावा. आपले सारे मानसपुत्र व मानसकन्या या मर्त्य जगात चिरंजीव ठरल्या आहेत, या आनंदाने हा कवी बेहोश तर होत नसेल? एव्हनने चांदण्याचे चंदेरी वस्त्र ल्यायले असेल. त्या प्रकाशातही खिन्न मनाने उभ्या राहिलेल्या हॅम्लेटच्या खांद्यावर उबाऱ्यासाठी शेक्सपिअरने आपल्या अंगावरचा लांब कोट तर घातला नसेल? आपल्या या साऱ्या प्रिय अपत्यांवर त्याचे सारखेच प्रेम असेल नाही? एव्हनच्या तीरावर आज सारे जग जमते ते या अपत्यांवरील प्रेमानेच. विश्वाची चिरंतन सुखदु:खे अमर करणारी ही अपत्ये. अशा अमर अपत्यांना जन्म देणाऱ्याचे जन्मगावी पाय घोटाळत राहिले तर त्यात नवल कोणते?

प्रकरण सोळावे

# पूर्व इंग्लंडची सफर

थॉम्पसन फाऊंडेशनने आयोजित केलेला अभ्यासक्रम संपला व आम्ही पेनार्थ व कार्डिफ सोडले. दुसऱ्या दिवसापासून ब्रिटिश सरकारच्या माहिती खात्यातर्फे १० दिवसांचा दौरा सुरू व्हावयाचा होता. आमचे सामान कार्डिफहून परस्पर लंडनला पाठवून गाडीने आम्ही बर्मिंगहॅमला निघालो. नेहमीप्रमाणे गाडीत कमी प्रवासी. पहिल्या वर्गात तर फक्त आम्ही तिघे भारतीय पत्रकार. श्री. पु. ल. देशपांडे यांनी वर्णन केल्याप्रमाणे कोणत्याही स्टेशनवर चहा, सिगारेट, विडी, पानाची आरोळी नव्हती. बर्मिंगहॅम स्टेशनवर सरकारी प्रतिनिधी श्री. पेनी यावयाचे होते. साहेबाचे नाव मोठे सोपे होते. फलाटावर गर्दी नसेल व नावाने हे गृहस्थ पेनी असले तरी त्यांचा आकार हाफ क्राऊनचा असेल अशी अपेक्षा करून आम्ही तेथे उतरलो. पेनी यांनी आमची अपेक्षा पुरी केली व स्वागतही केले. त्यांच्या सहवासात ' पेनी वाइज ॲन्ड पाऊंड फुलिश ' बनायचे नाही असे आम्ही ठरविले होते. तरी मधून मधून देशाची स्थिती आठवे व खिशात परकीय चलन किती उरले ते आपोआप चाळले जाई.

बर्मिंगहॅमहून आम्ही वळलो ते कॉव्हेन्ट्रीला. कॉव्हेन्ट्रीला प्रवासी जातात ते जर्मन बॉम्बहल्ल्यामुळे चर्च कोसळले तरी अग्नी भोगूनही उभा राहिलेला क्रॉस पाहण्यासाठी. जर्मन बॉम्बहल्ल्यांनी येशू ख्रिस्तालाही सोडले नाही व त्याच्या मंदिराचीही गय केली नाही. युद्धाच्या राखेतून उभे राहिलेले नवे गाव आपण पाहात आहोत असे कॉव्हेन्ट्री पाहताच वाटले.

कॉव्हेन्ट्रीला आम्ही गेलो त्या दिवशी शनिवार होता. त्यामुळे बाजार नुसता फुलला होता. ब्रिटन पाहावे ते वसंत ऋतूतील एखाद्या शनिवारीच. कॉव्हेन्ट्रीचे नवे मार्केट बायाबापड्यांनी नुसते भरले होते. मार्केट नवे बांधावयाचे ठरले की, प्रथम व्यवस्था करावी लागते ती मोटारींची. नव्या कॉव्हेन्ट्रीने मोटारींसाठी मार्केटवर मजले बांधले आहेत. तिथे भटकंती करून खाली आलो तर समोर नवे चर्च दिसत होते.

परंतु त्यापूर्वी लक्ष वेधून घेत होता तो राणी गोडाविियाचा पुतळा. कॉव्हेन्ट्री जर्मनांनी नंतर गाजविली. आधी गाजविली ती या राणी गोडावियाने. शत्रूचे कॉव्हेन्ट्रीचे स्वातंत्र्य व जनतेचे रक्षण यांची सांगड एक दिवस राणी गोडावियाच्या पावित्र्याशी घातली. तिने गावात घोड्यावरून नग्न फेरी मारली तर कॉव्हेन्ट्रीला मुक्त करण्याचे शत्रूने कबूल केले. लोकरक्षणासाठी राणीने ते दिव्य केले. त्या दिवशी लोकांनी आपली दारे, खिडक्या लावून घेऊन तिच्या पावित्र्यावर पडदा टाकला. राणी गोडवियाचे ते शिल्प तसेच आजही तेथे आहे. घोड्यावर राणी एका बाजूला दोन्ही पाय टाकून नग्नावस्थेत मान खाली घालून बसली आहे. तिच्या हाती शिल्पकाराने एक वस्त्र दिले आहे.

कॉव्हेन्ट्रीचा हा इतिहास जुना. नवा घडला तो त्या चर्चमध्ये. एक उद्ध्वस्त वास्तू व दुसरी परिपूर्ण वास्तू यांचे हे द्वंद्व माणसाच्या मनातही विचारांचे द्वंद्व निर्माण करते. त्यासाठीच तर कॉव्हेन्ट्रीचे बॉम्बज्नी झोडपलेले चर्च मुद्दाम ठेवले आहे. या सेंट मायकेल चर्चची भिंत तीन चतुर्थांश उभी आहे व मध्ये उरला आहे अर्धा जळका क्रूस. विनाशाला आवरण्याची ईश्वरी शक्ती हा क्रूस प्रकट करतो. ती स्मृती जागविण्यासाठी दोस्तांनी तेथे एक उत्तुंग व आधुनिक असे चर्च बांधलेले आहे. सर बेशिल स्पेन्स यांचा हा आलेख. या प्रार्थनामंदिराच्या दरवाजावरच उजवीकडे २५ फूट उंचीचे सेंट मायकेलचे शिल्प आहे. पंख असलेला हा शांतिदूत, हाती भाला घेऊन अवतरला आहे तो खाली शृंखलांत बद्ध केलेल्या सैतानालाही जणू माणसात आणण्यासाठी. आतील गाभारे असेच भव्य व भारदस्त. रंगीबेरंगी काचांच्या तुकड्याची सारी तावदाने. त्यामधून सूर्यकिरणे डोकावतात व सबंध गाभारा कसा उजळला जातो. पाश्चात्त्यांच्या जीवनात कितीही आधुनिकता आली तरी देवाधर्मावरचा त्यांचा विश्वास अढळ ठरला आहे. कम्युनिझमचे वारे त्यांच्या डोक्यावरून गेले. धर्ममंदिरांसाठी होणारा हा खर्च पाहिला की, ही सारी मंडळी खरोखरच आधुनिक आहेत किंवा नाहीत याची शंका येऊ लागते.

कॉव्हेन्ट्रीहून स्ट्रॅटफोर्ड अपॉन एव्हन करून आम्ही सायंकाळी लंडन गाठले व तेथून

रात्री मुक्कामाला इप्सविचला गेलो. बर्मिंगहॅमहून या आधी एकदा परतताना मी ऑक्सफर्ड पाहिले होते. आता केंब्रिज पाहणार होतो. सबंध जगाच्या ऑक्सफर्डबद्दल किती भव्य कल्पना आहेत ! तेथे आताही भव्य इमारती, सुंदर हिरवळ, चर्चचे मनोरे सारे काही आहे. परंतु इतर फारसे या विद्यापीठाबद्दल सध्या चांगले बोलले जात नाही. ' पूर्वीचा दर्जा उरला नाही. पोरं बिघडली आहेत ', अशी आरडाओरड सबंध जगातच चालू असावी. या विद्यापीठनगरीत नुसता फेरफटका मारला तरी या विद्वत्तेचे तेज अंगावर चढत असल्याचे भासते.

जिसस् कॉलेज, क्राइस्ट चर्च कॉलेजचा तो ' टॉम टॉवर ', न्यू कॉलेजचे ते भव्य चॅपेल, ती बॉडलिअन लायब्ररी, ते हुतात्मा स्मारक, ते ऐतिहासिक शेल्डोनियन थिएटर, सेंट मेरी दी व्हर्जिनचे तेथले मॉडलिन कॉलेज, क्वीन्स कॉलिजचे ते जुन्या वास्तुशिल्पातील ग्रंथालय, फेरवेल नदीवरचा तो पूल हे सारे तेथे जसेच्या तसे आहे. त्या हाय स्ट्रीटवरून प्राचार्यांचा पोशाख घातलेले विद्वान छत्री घेऊन बाजाराला चालले आहेत. ऑक्सफर्डला लंडनहून येणाऱ्या थेम्सचा फेरवेल नदीबरोबर संगम होतो. ब्रिटनमधील साऱ्या विद्वत्तेचा जन्म या संगमावरील सरस्वतीच्या मंदिरात होतो. आतापर्यंत तरी तो होत असे. दोन महा-युद्धे डोक्यावर आली तरी ऑक्सफर्ड-केंब्रिजची शांतता भंग पावली नाही. तेथील सारे वातावरणच असे आहे की, या जीवनाची सार्थकता सारी विद्यार्जनात आहे असे मनोमनी पटावे. येथे अधिक शिक्षण होते ते सुट्टीत. वर्गातील अभ्यास कमी दिवस व सुट्ट्या अधिक दिवस असा येथील प्रघात आहे. प्राध्यापक या सुटीच्या काळात विद्यार्थ्यांकडून अधिक अभ्यास करून घेतात. ऑक्सफर्ड व केंब्रिज ही गावे शिक्षणासाठीच वसविली गेली असे वाटते. परंतु प्रत्यक्षात जुना इतिहास तसा नाही. प्राचार्यांचा ' गाऊन ' व मूळचे ' टाऊन ' यांचा अनेक वर्षे संघर्ष झाल्यावर व काही विद्वानांचे गावकऱ्यांनी प्राण घेतल्यावर आजचे हे सख्य दिसत आहे.

कॅम नदीवरचे केंब्रिज हे ऑक्सफर्डपेक्षा मला अधिक सुंदर वाटले. कारण ऑक्स-फर्डला मोटार कारखाने अवतरले आहेत. केंब्रिजवर हा हल्ला अजून झालेला नाही. ट्रिनिटी कॉलेज व जवळच्या चर्चमधील पुतळे पाहण्यात आमचा कितीतरी वेळ गेला. न्यूटनपासून मेकॉले, टेनिसनपर्यंत सर्वांचेच पुतळे येथे आहेत. कॅम नदीवरील न्यूटनची स्मृती जागविणारा ' मॅथेमॅटिकल ब्रिज, ' त्या नदीत होड्या पिटाळणारे विद्यार्थी, झाडांखाली चाललेली गप्पाष्टके, मोठमोठ्या इमारतीमधील लहान गल्लीबोळ व सारा हिरवा

माळ म्हणज कांब्रज. ब्रिटनचेच नव्हे तर अनेक देशांचे नेते या दोन विद्यापीठांत शिकले.

या ट्रिनिटी कॉलेजातच न्यूटन राहिला. तेथील जिनाही 'न्यूटन स्टेअरकेस' म्हणून ओळखला जातो. पहिल्या मजल्यावर न्यूटनची खोली आहे. परंतु तिचे स्मारक न करता विद्यापीठाने ती विद्यार्थ्यांना राहण्यास दिली आहे. खोलीच्या अभिमानाने नव्या विद्यार्थ्याने अध्ययन करावे हा त्यात हेतू. पदवीपूर्व शिक्षण घेणारा कादंबरीकार ठॅकरे येथे खालच्या मजल्यावर राहिला. लॉर्ड मेकॉले चॅपेलजवळच्या तळमजल्याच्या खोलीत राहात असे. त्या पुतळ्यात सर्वांत सुंदर पुतळा आहे तो न्यूटनचाच. केंब्रिजचा खरा 'हिरो' न्यूटनच. डॅफॉडिल्सचे संगीत गाणारा कवी वर्डस्वर्थ केंब्रिजमध्ये जवळच राहात असे. येथील सेंट जॉन कॉलेजचाच तो विद्यार्थी. त्याला आपल्या घराच्या खोलीतून ते चॅपेल दिसे. न्यूटनचा पुतळा त्याला आठवे. त्यावर वर्डस्वर्थने लिहिलेले काव्य आता न्यूटनच्या पुतळ्याखाली कोरलेले आहे. "Voyaging through strange seas of thought alone" असे न्यूटनच्या मनाचे वर्णन वर्डस्वर्थ करतो.

येथे फिरत असताना एक पाटी सारे लक्ष वेधून घेई. "Fellows and scholars can only walk on this grass" केंब्रिज व ऑक्सफर्डच्या या हिरवळीवर पाय ठेवू शकतात ते फक्त विद्वान्. ज्या हिरवळीवर फक्त विद्वान चालनात तेथे आपल्याला रमण्याचा कोणता अधिकार असे ठरवून आम्ही विद्यापीठाच्या बाहेर पडलो. कॅम नदीतील खळखळीने आमच्या पोटातील खळखळ अधिक वाढली. दुपारचे जेवण घ्यावयाचे होते. विद्यापीठ आवाराचे बाहेर आलो तर समोरच एक भारतीय हॉटेल. भात किंवा पुलावा खाण्यास मिळणार म्हणून सारेच खूष झाले. एकूण येथील बऱ्या पाश्चात्य विद्वानांचे 'पोषण' भारतीयाच्या हाती असलेले दिसले. केंब्रिजमध्ये हे हॉटेल अतिशय लोकप्रिय आहे.

आमची मार्गदर्शिका ॲन फोर्ड हिच्या स्वतःच्या घरी दुपारचा चहा होता. तिचे सोहम गाव केंब्रिजपासून तीन मैलांवरच होते. एखाद्या छोट्या खेड्यासारखे. घराबाहेर घोडे, गुरे बांधली होती. तिचे वडील हे तेथील शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांच्या मनातील द्वंद्व चहा पिता पिता बाहेर आलेच. त्यांना ब्रिटनमधील नवी सर्वगोलंकारी शिक्षण-पद्धती मान्य नव्हती. जुनी पिढी व नवी पिढी हे द्वंद्व जेथे तेथे आहे.

आमचा प्रवास सतत चालला होता. 'ईस्ट अँग्लिया' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावरील भागात आम्ही फिरत होतो. या दौऱ्याच्या निमित्ताने ग्रामीण

इंग्लंडचे दर्शन आम्हाला घडले. सकाळी उठून बॅसिल्डन या एका नव्या गावात आम्ही गेलो. खेडी ओस पडू नयेत व शहरांची भरमसाट वाढ होऊ नये म्हणून सरकार तेथे सतत लक्ष देते. जुने खेडे विकसित व्हावे परंतु त्याचे मूळ ग्रामीण स्वरूप नष्ट होऊ नये म्हणून जवळच एखादे औद्योगिक उपनगर बसविले जाते. बॅसिल्डन हे असेच एक नवे केंद्र. शेतीच्या अवजारांचा कारखाना पाहण्यासाठी आम्ही तेथे गेलो. आपल्याकडे जमिनीचे काही इतके लहान तुकडे आहेत की, त्यांना या कारखान्यातील छोटी यंत्रणाही वापरता येणार नाही. तुकडे-जोडीचा आपणही कार्यक्रम हाती घेतला आहे. परंतु ते काम चालले आहे कूर्मगतीने. विल्सन यांच्या मजूर मंत्रिमंडळानेही कुळांच्या हातीच शेती गेली पाहिजे असा हट्ट न धरता यांत्रिक शेतीवर भर दिला आहे. अहमदनगरजवळच्या एका प्रगतिशील बागाईतदाराने काढलेला अवजारांचा कारखाना मी पाहिला होता त्याची मला आठवण झाली. जपानी मित्रांनी दिलेली यंत्रेही खोपोलीच्या शेतकी फार्मवर आहेत. परंतु आपला सामान्य शेतकरी अजून यांत्रिक शेतीकडे वळलेलाच नाही.

दुसऱ्याच दिवशी आम्ही शेतकऱ्यांच्या एका नव्या वस्तीत गेलो. हा प्रयोगही भारतात करता येण्याजोगा आहे. फॉक्स ॲश हे त्या खेड्याचे नाव. तेथे एक लँड डेव्हलपमेंट असोसिएशन होती. १९३६ च्या सुमारास ब्रिटनमध्ये बेकारीची समस्या उभी राहिली. त्या वेळी ही योजना निघाली. ग्रामीण भागातील लोकांना त्या भागातच उपजीविकेचे साधन मिळवून द्यावे या हेतूने अशा संस्था स्थापन करण्यात आल्या. या संस्थांच्या हवाली सरकारने लागवडीखाली नसलेली जमीन दिली. या संस्थेनेही ही जमीन शेतकऱ्यांना देण्याचे ठरविले. जिल्हा पत्रात जाहिराती देण्यात आल्या. शेतीचा अगर बागायतीचा व्यवसाय हा ज्यांचा पिढीजात व्यवसाय असेल त्यांना अधिक पसंती देण्यात आली. अनेक कष्टकरी मजूर आले. त्यांच्या बायकांच्या मुलाखतीही या संस्थेनी घेतल्या. “पतीबरोबर येथे राहण्यास व स्वतः काम करण्यास तुम्ही तयार आहात का”, असा प्रश्न त्यांना विचारला जाई. ज्यांनी समाधानकारक उत्तरे दिली त्यांना एक जमिनीचा तुकडा मिळाला. तेथे छोटेसे घर बांधण्यासाठी कर्ज मिळाले. संस्थेचा ट्रॅक्टर व इतर अवजारे भाड्याने मिळाली. या खर्चासाठीही कर्ज मिळाले. हे सारे कर्ज १५ वर्षांच्या मुदतीचे. त्यावर सहा टक्के साधारण व्याज. सहकारी सोसायटींचेच हे एक स्वरूप. उत्पादित धान्य व भाजीपाला हा अर्थातच या संस्थेमार्फत विक्रीला जातो. या संस्थेचे वेगळेपण दोन गोष्टींत आहे. जी जमीन पडीत होती तेथे जागेवर प्रत्यक्ष जाऊन या संस्थेने आपले प्रस्थान मांडले, ती

लागवडीखाली आणली इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांना तेथे कायमचे वास्तव्य करावयास लावले.

असे एक शेतकरी मिस्टर बॉडस्वर्थ यांच्या घरी आम्ही गेलो. त्यांच्याशी हस्तांदोलन केले तेव्हाच तो कणखर शेतकऱ्याचा हात आहे हे जाणवले. त्यांची पॅन्ट गुडघ्यावर रफू केलेली होती. एकंदर १० एकर जमीन बॉडसूवर्थ यांच्याकडे आहे. त्यात अनेक पिके ते काढतात. टोमॅटोपासून बटाट्यापर्यंतची पिके आहेतच. टोमॅटो दाखवून ते आम्हाला म्हणाले, " हा माझा मासिक पगार. या टोमॅटोत मी माझे वेतन काढतो. " भाजीपाल्याची बहुतेक व्यवस्था पत्नी व मुलाकडे होती. या शेतातील माल आता डेन्मार्कपर्यंत जातो. श्री. बॉडस्वर्थ यांच्या सासूबाईही तेथे होत्या. त्यांचा मुलगा आता शेती विद्यापीठात आहे. त्या कुटुंबाचा निरोप घेऊन आम्ही आणखी एका मळ्यावर गेलो.

हा मळा होता वॉशब्रुक या खेड्यातील. वॉशब्रुक हा सुप्रसिद्ध क्रिकेटपटू या गावचाच असावा. मळ्याचे नाव होते ' रुकरी फार्म '. ५६० एकरांचा हा मळा होता. एका बड्या जमीनदाराचाच हा मळा. गहू, बार्ली व गवत ही मुख्य उत्पन्ने. त्याचबरोबर दुधाचा जोड व्यवसाय तितकाच महत्त्वाचा. सर्व आधुनिक पद्धतीने चालणारा. येथून इप्सविचलाच रोज ३०० गॅलन दूध जाते. मुख्य रस्त्यावर दुधाचे कॅन्स ठेवले की, तेथून ते उचलून नेले जातात व पुन्हा रिकामे आणून ठेवले जातात. दुधाचे चबुतरे रस्त्यालगत अनेक ठिकाणी आम्हाला लागत होते. दूध चोरणारे कृष्ण मात्र ब्रिटनमध्ये नाहीत. या रुकरी फार्मवरील कामगाराला आठवड्याला १० पौंड पगार होता. ४५ तास त्याने काम करावयाचे. गुरे ठेवण्याची व्यवस्था, मलमूत्र शेतात परभारे वाहून नेण्याची व्यवस्था आदर्श होती. गवतासाठी हा मळेवाला बाहेर जात नाही. तो स्वतः आपल्यापुरते गवत पिकवितो.

हा मळा पाहून आम्ही एक खत संशोधन केंद्र पाहण्यास गेलो. कोणत्या जमिनीला कोणते खत देणे आवश्यक आहे याची सतत तपासणी करून हे केंद्र शेतकऱ्याला मार्गदर्शन करते. फायसन फर्टिलायझर रिसर्च सेंटर हे त्याचे नाव. आज अनेक देशांत या फायसन कंपनीचे कारखाने आहेत. बागायतीसाठी कोणती खते वापरावी याचे मार्गदर्शन हेच केंद्र करते. दररोज येथे कोणते तरी शेतकरी आपल्या शेतातील मातीचे नमुने घेऊन येतात. तेथील अनेक तज्ज्ञ आम्हांला भेटले व त्यांनी आपल्या प्रयोगशाळा दाखविल्या. वर्षाला साधारण ३० हजार मातीचे नमुने येथे येतात. हे मार्गदर्शन संपूर्ण विनामूल्य केले

जाते. १० दिवसांत शेतकऱ्याला अहवाल मिळतो. खताचे खाजगी क्षेत्रात कारखाने काढावयाचे किंवा नाही या वादात आमची स्वातंत्र्यानंतरची १७ वर्षे गेली. येथे एक खत उद्योगसमूह असे केंद्र स्वखर्चाने चालवितो व तेही ग्रामीण भागात की शेतकऱ्यांना त्याचा सहज लाभ व्हावा.

दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील एखादी नगरपालिका पाहावी तसे एका ग्रामीण जिल्ह्याचे कौन्सिल कसे काम करते ते पाहण्यास आम्ही गेलो. गावाचे नाव होते नीडॅम मार्केट. अनेक खेड्यांचा बाजार तिथे भरत होता, हे गावाच्या नावावरूनच सिद्ध होत होते. त्या जिल्ह्यातील प्रमुख नदीचे नाव गिपींग. तेच नाव जिल्ह्याने घेतले होते. नीडॅम मार्केट या गावी कौन्सिलच्या कचेरीत आम्ही गेलो तेव्हा श्री. बेनेट यांनी आमचे स्वागत केले. आमच्या बेनेट कोलमन कंपनीचे ते पूर्वीही कधी मालक नव्हते याची सुरुवातीलाच मी खात्री करून घेतली. त्यांचा हुद्दा होता क्लार्क. क्लार्क या शब्दाचा व हुद्दयाचा आपल्याकडे सध्या जो हुरडा पडला आहे त्यावरून हा माणूस सामान्य ठरावयाचा. परंतु क्लार्क ऑफ दि कोर्ट प्रमाणे हा या गिपींग रूरल डिस्ट्रिक्टचा प्रमुख होता. ४९ खेड्यांचा कारभार त्यांच्या हाती होता. या कौन्सिलचे ३८ सभासद होते. १२४ मैलांच्या परिसरावर त्यांचा हक्क चालत होता.

या कौन्सिलची काही वैशिष्ट्ये अनुकरणीय आहेत. आपल्याकडे कोणतीही नगरपालिका अगर जिल्हा परिषद गावातील नागरिकांच्या घरांचा प्रश्न कधी सोडवीत नाही. गटारे बांधण्याने अगर ड्रेनेज आणण्याने आपल्या पालिकांचे काम संपते. हे छोटे कौन्सिल घरे बांधण्यात अधिक गुंतलेले होते. येथे राजकीय पक्ष कुणी कधी आणत नाही व मतदान कधी पक्ष पातळीवर होत नाही. आरोग्यापासून पाणी-व्यवस्थेपर्यंत सर्व काम हे कौन्सिल करतेच. पॅरीश ( ग्रामपंचायत ), डिस्ट्रिक्ट कौन्सिल व कौन्टी कौन्सिल या तीन पायऱ्यांवरील संस्था स्थानिक कारभार पाहतात. ग्रामपंचायतीकडे रस्त्यांचे दिवे, दफनभूमीची व्यवस्था असे विषयच असतात. कौन्टी कौन्सिलमध्ये राजकारण असते. पक्ष असतात. वाद असतात. त्यांच्या हाती शाळा, हमरस्ते, विकास योजनांचे नियोजन, पोलीस व्यवस्थेवर देखरेख हे सारे येते. श्री. बेनेट यांनी एक आश्चर्यकारक विधान आमच्याजवळ केले. "लोक शहरांचा त्याग करून ग्रामीण भागाकडे परतत आहेत" असे ते म्हणाले. त्याचबरोबर ही शहरातील मंडळी ग्रामीण संस्थांत -राजकारणही आणीत आहेत. परंतु येथे तरुण अशा संस्थांकडे वळत नाहीत. या गिपींग रूरल डिस्ट्रिक्टच्या चार स्त्री सभासदही

आहेत. या जिल्हा कौन्सिलने ६३–६४ या एका वर्षात केवळ घरबांधणीवर ३२ हजार पौंड खर्च केले. गलिच्छ वस्त्यांचे उच्चाटन करण्यासाठी आपणाकडील अशा स्थानिक संस्थांनी घरबांधणीचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. त्यांनाही सरकारी कर्ज मिळते. आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थांनाही कर्ज मिळू शकेल. महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड हे काम आपल्याकडे करते. ते अधिक होते शहरात. ग्रामीण अर्थरचनेचा व विकासाचा आमचा कार्यक्रम हा अजून शहराभिमुख आहे. त्याचे तोंड वळवून तो खेड्याकडे फिरविला पाहिजे. आपल्या येथील स्थितीबद्दल अनेक प्रश्न तेथील लोक आम्हांला करीत, तेव्हा उत्तरे देणे कठीण जाई.

त्या रात्री आमचा मुक्काम लोवस्टॉफ या अगदी पूर्व किनाऱ्यावरील बंदरात होता. ब्रिटनच्या पश्चिम किनाऱ्यावरील कार्डिफ बंदरात तीन महिने राहून अगदी उलट्या दिशेला आम्ही आता आलो होतो. समोरच्या समुद्रातून बोट हाकारीत गेलो तर हॉलंडचा किनारा दूर नव्हता. लोवस्टॉफला समुद्रकिनाराही सुंदर होता. त्या रात्रीच आम्ही किनाऱ्यावर भटकण्यासाठी बाहेर पडलो. कोणताही समुद्र रात्री कसा गंभीर दिसतो. दिवसाचे चक्र जसे फिरते तसा माणसाचा व निसर्गाचाही 'मूड' बदलतो. या किनाऱ्यावर बसून आम्ही शांतपणे तो सागर-सहवास घेत होतो. परंतु एक दिवस या किनाऱ्यानेच सर्वांचा 'मूड' बिघडवून टाकला होता. कारण या किनाऱ्याच्या पलीकडील युरोपच्या भूमीवर हिटलरने पाय रोवले होते व एक दिवस तो आपले रणगाडे घेऊन ब्रिटनवर चालून येईल अशी भीती सर्वांना वाटत होती. नंतर आम्ही मिन्समेर या छोट्या गावाच्या किनाऱ्यावर गेलो. तेथे तर चक्क काँक्रीटचे प्रचंड धक्के बांधलेले पाहावयास मिळाले. हिटलरचे रणगाडे थोपविण्यासाठी बांधलेले हे चौकोनी धक्के अजून पाडलेले नाहीत. रणगाडे शिरणार नाहीत इतके जवळ हे धक्के बांधलेले आहेत. हिटलर ब्रिटनवर चालून येईल हे गृहीत धरून केवढी तयारी चर्चिलनी केली होती.

सकाळी उठून आम्ही लोवस्टॉफची मच्छीमार सोसायटी पाहण्यास गेलो. बोटी नुकत्याच मासे घेऊन आल्या होत्या. मुंबईच्या ससून डॉक बंदरातच सकाळी जे दृश्य दिसते तेच येथे होते. परंतु एक मोठा फरक येथे होता. त्या गर्दीत एकही गोरी 'कोळीण' नव्हती. या व्यवसायात ब्रिटनमध्ये स्त्रिया नाहीत. त्यामुळे त्यांचा कलकलाट नाही. 'मावशे' म्हणून हाक नाही. त्यांच्या अनुपस्थितीने हा व्यवसाय मला अगदी निर्जीव वाटला. सारे कसे गंभीर चेहरे करून त्या चवदार मासळीचे विच्छेदन करीत होते. पापलेट बरोबर मध्ये अर्धे कापून त्यामधील काटा काढून टाकला जात होता. हे काटे एका

पिंपात जमविले जातात व तेही स्वतंत्रपणे विकले जातात.

मासे पकडण्याच्या अत्यंत आधुनिक अशा बोटी या बंदरात आहेत. नॉर्वेच्या किनाऱ्यापर्यंत या बोटी जातात. १२–१३ दिवसांनंतर ते परततात. दोन दिवस घरी राहून ते पुन्हा सफरीला निघतात. या किनाऱ्यावर रोज १० हजार पौंडांच्या मासळीचा व्यवहार होतो. यावरून येथील उद्योगाची कल्पना येईल. येथे १२ वेगवेगळ्या कंपन्या हा धंदा करतात. परंतु त्यांनी आपल्यासाठी बर्फाचा कारखाना मात्र सहकारी पद्धतीने काढला आहे. या व्यवसायातील लोकांनाच शेअर्स विकण्यात आले. त्यामुळे स्वस्त बर्फ त्यांना मिळू लागला. या गावाचेही एक साप्ताहिक आहे. त्यामधील जाहिराती व बातम्या पाहिल्या की, हे बंदरातील पत्र आहे हे चटकन जाणवते.

या बंदरात बर्फच बनतो असे नाही तर सर्व तऱ्हेच्या बोटी बनविणारे दोन कारखाने येथे आहेत. नौदलात ब्रिटनशी स्पर्धा ही गोष्ट अशक्य मानली जाते ती अशा बोट बांधणीच्या अनेक कारखान्यांमुळे. त्यांपैकी ब्रुक मरीन शिपयार्ड पाहण्यासाठी आम्ही गेलो होतो. साधारणतः वर्षाला येथे ८ बोटी बांधल्या जातात. हा कारखाना ९० वर्षांचा जुना आहे. सबंध जगात या कारखान्यातील बोटी गेल्या. एखादे घर बांधावे तसे बोट-बांधणीचे काम तेथे चालले होते. तेथे पडलेले पोलादी पत्र्यांचे ढिगारे पाहून 'भारतीय' प्रश्न माझ्या मनात आलाच. ब्रिटनची औद्योगिक भरभराट का झाली व सबंध जगाला इतक्या छोट्या देशाने व्यापार का शिकविला याचे उत्तर मला त्यात मिळाले. "तुम्हांला या पोलादाचा पुरेसा साठा उपलब्ध होतो का?" असे विचारताना भारताची स्थिती माझ्या डोळ्यांसमोर होती. परंतु लोखंड, पोलाद व कोळसा या तीन गोष्टी या देशात भरपूर उपलब्ध असल्यानेच या देशाच्या अर्थकरणाला पोलादी कणा लाभला. युरोपच्या सामायिक बाजारपेठेत ब्रिटनला येऊ देण्याचे नाकारून हा कणा ठिसूळ करण्याचा प्रयत्न फ्रान्सने केला आहे. महायुद्धातही ब्रिटन तगले याचे कारण ही सामुग्री. ऑस्ट्रेलिया त्यांना हवे असलेले दुग्धपदार्थ भरपूर पुरवते. बाकी ब्रिटनची सारी बुद्धिमत्ता 'इंजिनिअरिंग गुडस्' तयार करण्यात गुंतलेली.

शेती अवजारांचा कारखाना, खतांचे संशोधन केंद्र, शेतकऱ्यांचे मळे, जिल्हा कौन्सिलचे कार्य, मच्छिमार व्यवसायाचे स्वरूप हे पाहिल्यावर राणीचे पाहुणे म्हणून आम्ही गेलो ते इंग्लंडमधील काही पक्ष्यांच्या भेटीला. अर्थात ही भेट हस्तांदोलन पद्धतीची नव्हे. दुरून, त्यांना आम्ही दिसणार नाही अशा जागेवरून आम्ही त्यांना भेटलो. खरे म्हणजे आम्ही

त्यांना पाहिले. ते त्यांच्या नैसर्गिक स्वरूपात. ही भेट होती मिन्समेरे या गावच्या एका 'नेचर रिझर्व्ह'ला. गर्द झाडीच्या, कच्च्या रस्त्यावरून खूप आत गेल्यावर एका घराशी आम्ही थांबलो. श्री. एच्. ॲक्सेले यांनी आमचे स्वागत केले. या पक्ष्यांना मोकळेपणाने, त्यांच्या इच्छेप्रमाणे राहता यावे म्हणून या गृहस्थाने रॉयल सोसायटी फॉर दी प्रोटेक्शन ऑफ बर्डस् ही संस्था येथे स्थापन केली. या संस्थेच्या ब्रिटनमध्ये २५ शाखा आहेत. त्यांच्या ताब्यात आज ७ हजार एकरांवर जमीन आहे. या कार्याबद्दल श्री. ॲक्सेले यांना राणीने एम्. बी. ई. ही पदवी दिली.

एका जीपने आम्ही त्या राखीव जागेला वळसा घालून दूर छोट्या झोपड्या होत्या तेथे गेलो. त्यात तिकीटविक्रीची खिडकी असते तसा झरोका काढलेला होता. त्यामधून समोर दिसणारी पक्ष्यांची लीला पाहावयाची. त्यांच्यासाठी खुरटी झाडे, दलदलीच्या जागा, मधूनमधून तळी मुद्दाम तयार केलेली. रंगीबेरंगी पक्ष्यांचा विहार तेथे मोकळेपणाने चाललेला. दैनंदिन जीवनाचा संघर्ष टाळून, किंबहुना त्याकडे दुर्लक्ष करून पशुपक्ष्यांच्या मागे लागलेली वेडी माणसे आपण अनेक पाहतो. येथे अशा वेड्यांची नेहमी गर्दी. या संस्थेने हा छंद असणाऱ्या १८ वर्षांखालील मुलांचे क्लब्ज स्थापन केले आहेत. पशुपक्ष्यांमागे ही मुले सुटीत फिरत राहतात. हवामानाप्रमाणे हे अनेक पक्षी मोसम बदलला की जातात व पुन्हा येतात. हे सारे आम्ही पाहून बाहेर पडलो तर आमच्या गाडीचा पन्नाशीतील ड्रायव्हरच टॉम थंडपणाने म्हणाला, "काय लोक वेडे आहेत. यात काय पाहायचं कळत नाही!"

आमच्यापैकी काहींच्या मनात तसेच आले होते. परंतु जगातील साऱ्याच गोष्टींची गोडी अशी व्यक्तिपरत्वे बदलणारी असते. अनेकदा त्यात वेडेपणाच अधिक असतो. परंतु वेडे झाल्याशिवाय स्वतःला विसरून त्या विषयातील खरा आनंद कुठे घेता येतो? पक्ष्यांचा जवळून किलबिलाट ऐकू येत होता. तो सारा परिसरच कसा मनुष्याच्या आक्रमणातून वाचलेला वाटत होता. सारे वातावरणच निर्भय होते. जवळ समुद्र घोंघावत होता. आणि किनाऱ्यावर दिसत होते ते हिटलरचे रणगाडे रोखण्यासाठी बांधलेले चौकोनी चबुतरे. पक्ष्यांना त्याची दाद नव्हती. युद्धकालातही त्यांनी ती घेतली नसावी. त्या पक्ष्यांचे जर्मनीबरोबरचेच काय, परंतु सर्व देशांशी राजनैतिक संबंध तेव्हाही चांगले होते, निकटचे होते. त्या वाळूतून आम्ही चाललो होतो व पक्ष्यांचा एक मोठा थवा जोराने कलकलाट करीत डोक्यावरून समुद्राकडे गेला. ब्रिटनचे पक्षी हॉलंडला चालले होते.

प्रकरण सतरावे

# चार्ल्स डिकन्सचे इप्सविच!

स्ट्रॅटफोर्ड अपॉन अॅव्हनचा दौरा आटपून गाडीने आम्ही लंडनला परतलो ते पूर्व इंग्लंडच्या दौऱ्यावर जाण्यासाठी. लंडनच्या पॅडिंग्टन स्टेशनवर उतरलो तेव्हा समोर कुठे कुणी दिसेना. खाकी रंगाचा, मोठा सरकारी लिफाफा घेतलेला असामी कुठे दिसतो का याचा शोध आम्ही सुरू केला. कारण ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधीची भेट झाली नाही तर त्या रात्री लंडनमध्ये राहावयाचे कुठे हा आमच्यासमोर प्रश्न होता.

प्लॅटफॉर्मच्या बाहेर आलो तर वेल्सच्या अॅलन ग्रीडी व बर्मिंगहॅमच्या पेनीसारखे दुसरे उत्साही प्रतिनिधी श्री. केनियन उभे होते. त्यांच्या हातातील लिफाफा दिसताच आम्ही त्यांना ओळखले. आमचे बावळट भारतीयत्वही त्यांच्या चांगलेच नजरेस आले असावे. एक क्षणाचाही विलंब न करता त्यांनी आम्हाला टॅक्सीत घातले.

"आता आपण कुठे जात आहोत", आम्ही उत्सुकतेने विचारले.

"लिव्हरपूल स्ट्रीट स्टेशन."

"पुन्हा स्टेशनवर!"

"हो, तुम्ही आताच इप्सविचला जात आहात!"

अनेक गोष्टी आम्हांला पहिल्या उच्चारात समजत नसत; तसे गावचे नावही कळले नाही. एकूण पुन्हा गाडीत आम्ही बसणार होतो व रात्री लंडनला मुक्काम पडणार नव्हता.

इप्सविच फार दूर नव्हते. संध्याकाळी ७ च्या सुमारास, दोन तासांच्या प्रवासाने

इप्सविच आले. आता ग्रीडी, पेनी, केनियन यांचा नवा वारसदार कोण भेटतो याबद्दल आम्हांला उत्सुकता होती.

गाडी इप्सविच स्टेशनवर थांबली. ब्रिटनमधील रेल्वेत माणसे असत नाहीत, नुसतेच डबे प्रवास करतात हे मागे मी सांगितलेच. फर्स्ट क्लासमधील आम्ही इन मिन तीन प्रवासी. गाडी थांबली आणि समोर दार उघडण्यासाठी एक पंचविशीतील तरुणी उभी होती.

" मी ॲन फोर्ड. तुमचे स्वागत करण्यासाठी आले आहे " ॲनने स्वतःची ओळख करून दिली. आम्ही आपली ' तारीफ ' सांगितली. पुढील दौऱ्याची ॲन हीच मार्गदर्शिका होती. ब्रिटिश सरकारच्या माहिती खात्यात ती नोकरीस आहे. केंब्रिज हे तिचे मुख्य ठाणे. केंब्रिजला आपण जाणार असे तिने सांगताच आमचे दौऱ्याचे औत्सुक्यही वाढले.

वेल्समधील कार्डिफ हे येते ग्लमॉर्गन परगण्यात, ब्रिस्टल ग्लॉस्टर परगण्यात. बर्मिंगहॅम, स्ट्रॅटफर्ड अपॉन अव्हन, वॉर्विकशायरमध्ये, तर इप्सविच सफोल्क परगण्यातील. ब्रिटनच्या पश्चिम किनाऱ्यावर तीन महिने राहिल्यावर अगदी उलट्या दिशेला — पूर्वेला आम्ही आता फिरणार होतो. ' ईस्ट ॲंग्लिया ' या नावाने हा भाग ओळखला जातो. इप्सविच हे या भागातील प्रमुख गाव. एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणासारखे. ' कार स्ट्रीट ' हा गावाचा एकच प्रमुख रस्ता. याच रस्त्यावर टाऊन हॉलची प्रचंड इमारत. येथेच मुख्य टपाल कचेरी. या कचेरीजवळच्याच ग्रेट लायन या फार जुन्या हॉटेलात आमची उतरावयाची व्यवस्था होती. इंग्लंडमधील एक जुने घर घेऊनच त्यामध्ये हे हॉटेल थाटलेले होते. परंतु तेवढ्या जागेत बार, गप्पा मारत बसायला लाऊँज, जेवण्यासाठी स्वतंत्र जागा हे सारे होते.

' ईस्ट ॲंग्लिया 'चे मुखपत्र म्हणजे ' ईस्ट ॲंग्लियन डेली टाइम्स ' हे या इप्सविच-मधूनच निघते. या मुख्य रस्त्यावरच त्याची कचेरी व मुद्रणालय. कौन्टी पत्र कसे असते याचा हा एक नमुना. ' ईव्हिनिंग स्टार ' हे सायंदैनिक याच कंपनीचे. ' इव्हिनिंग स्टार ' मुंबईच्या ' इव्हिनिंग न्यूज 'च्या आकाराचे. दोन्हीच्या पहिल्या पानावर ब्रिटनमधील व आंतरराष्ट्रीय वार्ता. बाकीच्या पानांत सर्व परगण्याच्या बातम्या. शेती व उद्योगधंदे यांनी व्यापलेला हा भाग. त्यामुळे खते, गुरांची विक्री, मासळीचा लिलाव यांच्या बातम्यांना अधिक स्थान.

जाहिराती प्रचंड. दैनिकाचे संपादक श्री. बी. आर. विल्सन हा एक जुन्या थाटाचा मिस्किल गृहस्थ. त्यांचा छापखाना आम्ही पाहिला. तसेच एकत्र खानाही झाला. ताज्या बातम्या लोकांना पुरविणे इतकेच वृत्तपत्राचे कार्य आहे असे मानणारे हे संपादक आहेत.

अग्रलेखाचे पान आम्ही फार ' पवित्र ' मानतो. ' ईस्ट अँग्लिकन डेली टाइम्स 'च्या अग्रलेखाच्या डाव्या बाजूला दोन कॉलम सिनेमाच्या व नाटकाच्या चक्क जाहिराती. त्याबद्दल आम्ही श्री. विल्सन यांना विचारले. तेव्हा ते मिस्किलपणे हसत उत्तरले. " अग्रलेखाकडे वाचकांचे लक्ष वेधण्यास दुसरा इतका सोपा उपाय कोणता ? "

सकाळच्या व संध्याकाळच्या या दैनिकांनी आमच्या भेटीच्या वार्ता छायाचित्रांसह छापल्या. संपादकांबरोबर जेवण घेतल्याने आमच्यामागे त्यांनी आपला छायाचित्रकारही पाठविला होता. ब्रिटन हा देश अगदी छोटा. त्यामधील एका परगण्याचे हे दैनिक. त्यांना बातम्यांचे फार दुर्भिक्ष्य असावे. सकाळच्या दैनिकातील बातम्या ते चक्क पुन्हा संध्याकाळी जागा भरावयास छापत असतात, असे आढळले. शेतकऱ्यांसाठी या दैनिकात स्वतंत्र पान आहे. या दैनिकातील एका जाहिरातीने माझे जीवन बदलले असे सांगणारा एक शेतकरी पुढे आम्हाला दौऱ्यात भेटला.

इप्सविचचे नाव आज ब्रिटनमध्ये घेतले जाते, ते चार्लस डिकन्सच्या तेथील वास्तव्या-मुळे. हास्य आणि अश्रू यांचा हा निर्माता येथे राहात नसे. तो सरकारी कामासाठी दौऱ्यावर येथे येत असे. परंतु तो जेथे येऊन राहात असे, त्या ' ग्रेट व्हाइट हॉर्स ' हॉटेलने आज जागतिक कीर्ती संपादन केली आहे. कारण डिकन्सने ' पिकविक पेपर्स ' मध्ये या हॉटेलचा नावानिशी उल्लेख केला व तेथे घडलेला एक समरप्रसंग आपल्या ग्रंथात जसाच्या तसा घेतला.

मिस्टर पिकविक म्हणजे स्वतः डिकन्स या पथिकाश्रमाच्या दारात येऊन उभा राहिला की त्याचे कसे स्वागत होई याचे सुंदर वर्णन डिकन्सने ' पिकविक पेपर्स ' मध्ये केले आहे. " पंधरा दिवस न धुतलेला रुमाल हातावर टाकलेला हॉटेल मालक. त्याच्या वयाइतकेच जुने झालेले मोजे सारखे करीत कडवट चेहऱ्याने मिस्टर पिकविक यांचे स्वागत करी. " " माशाच्या व मांसाच्या तुकड्यासाठी तासन् तास तिष्ठत बसून राहावे लागे. " असे डिकन्स लिहितो. परंतु मालक शेकोटीची व्यवस्था असलेली, दोन बिछान्यांची खोली मिस्टर पिकविक यांना देतो. तेव्हा या मालकाबद्दल वाईट उद्गार काढल्याचा त्याला खेद होतो.

ज्या खोलीत डिकन्सला त्या मालकाने आणले ती ३६ नंबरची खोली या हॉटेलात अजूनही दाखविली जाते. ती डिकन्सची खोली म्हणून खास संभाळून ठेवली आहे. ही खोली आता प्रवाश्यांना दिली जात नाही. " ह्या खोलीतून बाहेर पडल्यावर ती खोली

पुन्हा शोधून काढणे" डिकन्सला अशक्य होईल. त्या हॉटेलचे जिने अजूनही थोडे विचित्र आहेत. मानवी जीवनातील सुखदु:खाचे विडंबन वक्रोक्तीपूर्ण शैलीने करणाऱ्या या डिकन्सच्या खोलीत रात्री चुकून एक बाई शिरते. आपलीच खोली समजून केस कुरळे करण्यासाठी लावलेल्या पिना अजून तिच्या डोक्यावर असलेली. डिकन्स म्हणजेच हे पिकविक महाशय आपल्याच खोलीत शिरले आहेत या समजुतीने ती भांडण सुरू करते. डिकन्सचे त्या बाईबरोबर झालेले वाग्युद्ध तसेच्या तसे 'पिकविक पेपर्स'-मध्ये आले आहे.

त्या खोलीत शिरून मिस्टर पिकविक यांचा जुना संग्राम आम्ही आठवीत होतो. डिकन्सच्या कालातील पलंग व इतर फर्निचर तिथे आणून ठेवले आहे. हॉटेलमधील एक साधी खोली. पण डिकन्सच्या वर्णनाने जगातील प्रवाश्यांचे ते आज आकर्षण ठरले आहे. 'पिकविक पेपर्स'च्या २२ व्या प्रकरणात चार्लस् डिकन्स या 'ग्रेट व्हाइट हॉर्स'चे वर्णनही मोठे सुरेख करतो. "इप्सविचच्या मुख्य रस्त्यावर, डाव्या हाताला, टाऊन हॉलच्या समोरची मोकळी जागा ओलांडून पुढं गेलं की एक खाणावळ लागते. 'ग्रेट व्हाइट हॉर्स' या नावाने दाही दिशांना ती परिचित. एक दगडी पुतळा सर्वांचे आधी लक्ष वेधतो. पुढच्या पायाच्या टापा उचलून हल्ला करण्याच्या पवित्र्यात उभा असलेल्या एका घोड्याचा हा पुतळा. त्याची आयाळ व शेपटी गतीने जणू उडालेली आहे. परंतु मुख्य दरवाजावर उभारलेला हा प्राणी एखाद्या बग्गीच्या वेड्या घोड्यासारखा वाटतो."

ह्या पथिकाश्रमाला तसा १५१८ पासूनचा इतिहास आहे. आठव्या हेन्रीच्या अमदानीत ही 'इन' होती. भव्य लाकडी महिरपी असलेले प्रवेशद्वार या खाणावळीचे होते. अठराव्या शतकाचे काही अवशेष अजूनही या हॉटेलच्या तीन मजली इमारतीत आहेत. आजचे बाह्य स्वरूप हे १८१८ मधील. परंतु दोन महायुद्धे डोक्यावरून गेली तरी इंग्लंडने डिकन्सची स्मृती सांभाळली आहे. डिकन्सच्या काळाचे आवरण तसेच्या तसे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. डिकन्सने वर्णन केलेला घोडा रानटी वाटल्याने जरा मवाळ आहे इतकेच.

पथिकाश्रमातील पुढचा भाग जुन्या वाड्यातील चौकासारखा आहे. अगदी थेट गावच्या वतनदार देशमुखांच्या वाड्यासारखा. त्याला थोडे आधुनिक रूप दिले असले तरी जुने वातावरण कायम ठेवण्याचा प्रयत्न पुरातन वास्तू मांडून केला आहे. या चौकातील टेबला-भोवती खुर्च्यांवर बसून रंगीबेरंगी पेयांच्या घुटक्याबरोबर व धूम्रवलयांवर या गंमती आम्ही

ॲन फोर्डकडून ऐकत होतो.

ब्रिटनमधील सर्व वाहतूक घोड्यांच्या बगीतून होत असे तेव्हा या ' ग्रेट व्हाईट हॉर्स 'ला कितीतरी भाव होता. घोड्यांच्या बग्गया येथे ' पार्क ' होत व त्यामधील बडे पाहुणे इथेच राहात. पूर्व इंग्लंड व लंडन यांच्या वाटेवरचे इप्सविच हे मुख्य ठाणे. येथे घोडे बदलले जात. या घोड्यांनीच पथिकाश्रमाला नाव दिले व एक ' व्हाईट हॉर्स ' ' ग्रेट ' ही उपाधी लावून दरवाजावर उभा राहिला तो कायमचा. इंग्लंडचा राजा दुसरा जॉर्ज, फ्रान्सचा राजा राजा १८ वा लुई व लॉर्ड नेल्सन जेथे येऊन राहिले तिथे आम्ही येऊन बसलो होतो.

परंतु या सर्व राजांना विसरून इप्सविचचा हा ऐतिहासिक पथिकाश्रम संपूर्ण रंगला आहे तो डिकन्समध्ये. आज त्या पथिकाश्रमात सर्वत्र मि. पिकविक व त्याचे पराक्रम यावरची व्यंगचित्रे सर्वत्र लटकलेली आहेत. त्यापैकी अनेक फार जुनी आहेत. ती पाहण्यात अनेकजण रंगतात. तिथे जेवावयास येतात त्यांचे हे सारे पाहूनच पोट भरते. मग पुन्हा पेये. पुन्हा धूम्रवलये. मि. पिकविक दारात येऊन उभे तर राहणार नाहीत, असेच क्षणभर त्या वातावरणामुळे मनात येते.

## प्रकरण अठरावे

# ब्रिटिश वृत्तपत्रांचे जग

"दी स्ट्रीट ऑफ इंक" हा धडा मला शालेय पाठ्यपुस्तकात होता. तो शिकत असताना 'शाईच्या रस्त्यावर' मी एक दिवस जाईन असे मनातही आले नव्हते. काहीतरी अगम्य, काहीतरी खूप दूरचे ही भावना तो लेख शिकत असताना होती व त्यामुळेच त्या लेखात अधिक रस वाटत असावा. आता मी येथे मृगभाटात भटकावा तसा फ्लीट स्ट्रीटवर फिरत होतो. समोर "डेली एक्सप्रेस" ही अक्षरे चकाकत होती. उंच इमारतीवरील 'डेली टेलिग्राफ' ही अक्षरे लक्ष वेधून घेत होती. 'रॉयटर्स'च्या इमारतीत आम्ही नुकतेच जाऊन आलो होतो. एका इमारतीतून सबंध जगाला आंतरराष्ट्रीय बातम्या पुरवणाऱ्या या संस्थेच्या प्रत्येक विभागात आम्ही फिरलो होतो. 'आशिया' भागात गेलो तर शेख अब्दुल्ला यांना अटक करून उटीला नेल्याची बातमी तेथे आली होती. रॉयटरकडून कोणत्याही देशाला मिळणारी बातमी ही लंडनहून — येथून येते. ज्या देशात ती घडते तेथून येत नाही. तेथून ती लंडनच्या कचेरीत जाते व मग तेथून प्रसारित केली जाते. खाली उतरलो तर जिथे तिथे कोणत्यातरी वृत्तपत्राची पाटी. रस्त्यावर फिरत असणारे सारेच पत्रकार नसले तरी तेथील बसमध्ये बसलेले गप्पिष्ट हे पत्रकारच आहेत यात संशय नव्हता. परंतु लंडनमधील वृत्तपत्रांची संख्या इतकी वाढली की, त्या सर्वांना या एका रस्त्यावर जागा मिळणे शक्यच नव्हते. त्यांनी रस्त्याच्या आजूबाजूला पाय पसरले. जवळच्या गल्लीत वळले की 'लोकप्रिय' दैनिकाचा आदर्श अशा 'डेली मेल'ची इमारत लागते. ब्रिटनचे सारे वैभव ज्या दैनिकात

सामावले आहे तो 'टाइम्स' मात्र फ्लीट स्ट्रीटवर नाही. 'टाइम्स'ची नवी इमारत जुन्या लंडनमध्ये आहे व ती बकिंगहॅम राजवाड्यापेक्षा कितीतरी सुंदर आहे. इतक्या सुंदर प्रासादात एका वृत्तपत्राचा संसार असावा या कल्पनेनेच मी आनंदलो. वृत्तपत्र-स्वातंत्र्याचे संगोपन ज्या शाईच्या रस्त्याने केले त्या रस्त्यावर खूप भटकावे असे वाटत होते. तो रस्ता खूप जवळचा वाटत होता. परिचित वाटत होता.

सतत तीन महिने ब्रिटिश वृत्तपत्रांचा व त्यांनी केलेल्या प्रगतीचा अभ्यास करण्यासाठीच आम्ही येथे आलो होतो. ब्रिटनमधील बहुतेक प्रमुख दैनिकांवर फार विस्ताराने चर्चा आमच्या वर्गात होत होती. ब्रिटिश वृत्तपत्रांचे जग आम्ही त्या मानाने बरेच जवळून पाहू शकलो. भारतीय वृत्तपत्रांशी या दैनिकांची तुलना करण्याचा मोह प्रत्येक वेळेस होई. या दोन्हीतील काही बाबतीतील तफावत जाणवे.

ब्रिटिश वृत्तपत्रांचे मुख्य भाग दोन. लंडनहून प्रकाशित होणाऱ्या दैनिकांना राष्ट्रीय पत्रे ( नॅशनल पेपर्स ) मानले जाते, तर इतर भागांतील दैनिके ही प्रादेशिक पत्रे मानली जातात. आपल्याकडील दैनिकांची अगदी तशीच बरोबरी होऊ शकत नाही. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास या शहरी दैनिकांना आपण राष्ट्रीय पत्रे मानतो. परंतु खऱ्या अर्थाने ती सारीच राष्ट्रीय पत्रे नाहीत. ब्रिटन हा देश इतका छोटा आहे की, तेथे कुठेही प्रसिद्ध होणारे दैनिक देशाच्या कोणत्याही भागात त्याच दिवशी जाते. पुन्हा भाषा एकच. आमची प्रादेशिक पत्रे ही प्रादेशिक भाषांतील. आपल्याकडील इंग्रजी दैनिकांना नॅशनल पेपर्सचा मान आहे. दळणवळणाची उत्कृष्ट साधने व देश लहान असल्याने वृत्तपत्रांचा प्रसार ब्रिटनमध्ये फार सहजपणे होतो. तरी तेथील शहर आवृत्त्या वेगवेगळ्या असतातच.

सायंदैनिकांची येथील लोकप्रियता ही मला नवी होती. पाश्चात्त्य जीवन किती घाई-गर्दीचे आहे याचे प्रमाण या सायंदैनिकाच्या खपावरून कळते. ब्रिटनमध्ये सध्या एकूण दैनिके १२० च्या घरात आहेत. त्यांपैकी ६५ ही सायंदैनिके आहेत. येथे सकाळी वृत्तपत्र वाचण्यास सर्व लोकांना वेळच नाही. संध्याकाळची पत्रेच ते अधिक आवडीने वाचतात. ट्यूब ट्रेनमधून परतीचा प्रवास सुरू करण्यापूर्वी 'साहेब' वृत्तपत्र विकत घेतो — गाडीत ते वाचून पुरे होते. घरीं गेल्यावर पत्नी त्यामधील जाहिरातींवर तुटून पडते. कोणत्या वस्तू स्वस्त झाल्या आहेत व कोणत्या वस्तू हप्त्याने मिळत आहेत याच विषयावरील चर्चेत 'डिनर' होत असावे. या दृष्टीने विचार करता केवळ सकाळी वेळ कमी म्हणूनच सायं-दैनिके इंग्रज अधिक वाचतात असे नव्हे, तर त्यांना स्थानिक गोष्टीतच खरा रस असल्याने

ती भूक संपूर्ण भागवितात ती सायंकाळची दैनिके. घोड्यांच्या शर्यतीपासून, फुटबॉलच्या स्थानिक सामन्यांपर्यंत, १६ वर्षांच्या कोणत्या पोरानं पस्तिशीची पत्नी केली इथपासून, नवऱ्यानं टाकून दिलेल्या पत्नीच्या मुलाखतीपर्यंत साऱ्या गोष्टी सायंदैनिकात अधिक येत असल्याने तो त्यात अधिक रमतो. या अल्प वास्तव्यानंतर माझे मत तर असे झाले की, ब्रिटनमधील सर्वसामान्य माणसाला इतर जगाच्या उलाढालीत फारसा रसच नाही. व्हिएतनामच्या बातम्या तेथील सायंदैनिके पहिल्या पानावर कधीच छापत नाहीत. सकाळची दैनिकेही या बातमीला पहिल्या पानावर स्थान देतीलच असे नाही. त्यापेक्षा तुरुंगातून पळालेल्या कैद्याच्या हकीकतीने पहिले पान अर्धेअधिक व्यापलेले असेल.

याचे मूळ वेगळ्या परंपरेत आहे. विचाराचा प्रसार करण्यासाठी भारतीय वृत्तपत्रे निघाली तर बातम्या देण्यासाठीच ब्रिटिश वृत्तपत्रे निघाली. आमच्यासारखा स्वातंत्र्य-लढा त्यांच्या वाट्याला आलेला नव्हता. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास खरा सुरू होतो तो टिळक-आगरकरांपासून. स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतीय वृत्तपत्रांचा विकास झाला. तेथील चित्र अगदी वेगळे. वृत्तपत्र स्वातंत्र्याचा प्रश्न सुटताच दैनिकांना ब्रिटनमध्ये बहर आला. १७८५ मध्ये 'डेली युनिव्हर्सल रजिस्टर' या बालबोध नावाने जे दैनिक निघाले त्याचेच रूपांतर 'दी टाइम्स' मध्ये झाले. नेल्सनच्या ट्राफल्गार लढाईचा सविस्तर वृत्तांत 'टाइम्स' मध्ये अधिक आला व नंतर ब्रिटिश सरकारला कळला. लंडन 'टाइम्स' व 'मँचेस्टर गार्डियन' ही दोन पत्रे बरीचशी परस्पर-विरोधी दृष्टिकोण असलेली होती तरी त्यांची जात एकच होती. 'क्वालिटी पेपर्स' या नावाने ही सारी पत्रे ओळखली जात. "Men of prestige read Times," अशी जाहिरात अजूनही लंडन टाइम्स करतो. आज त्या दैनिकाची किंमत ६ पेन्स आहे. वरच्या वर्गातील काही मंडळी आपण लंडन 'टाइम्स' वाचतो ही ऐट मिरविण्यासाठी हे दैनिक घेतही असतील. परंतु आंतर-राष्ट्रीय बातम्या भरपूर देणारे 'टाइम्स'सारखे दुसरे दैनिक जगात नाही. त्याने आपला मोहराही आता बदलला आहे. दि. ३ मे १९६६ पासून लंडन 'टाइम्स'च्या पहिल्या पानावर जाहिरातीऐवजी बातम्या झळकू लागल्या. हा प्रभाव 'टाइम्स' वरही पडला याचे कारण ब्रिटनमधील आजची लोकप्रिय दैनिके.

'क्वालिटी' व 'पॉप्युलर' पेपर्स हा फरक जन्माला घातला तो १८९६ मध्ये सुरू झालेल्या 'डेली मेल'ने. त्याआधी 'डेली टेलिग्राफ'ने वृत्तपत्र किंमतीत क्रांती केली होती. प्रथम त्यांनी आपल्या दैनिकाची किंमत दोन पेन्स ठेवली होती. नंतर ती एक पेन्स

केली व " आमचे दैनिक हे वरिष्ठ वर्गासाठी नाही तर लाखो सामान्य जनांसाठी आहे ", असे त्यांनी जाहीर केले. १८६१ मध्ये त्यांचा खप लंडन 'टाइम्स'पेक्षा दुप्पट झाला. दहा वर्षांत 'डेली एक्स्प्रेस'ने विक्रीचा जागतिक उच्चांक गाठला. त्यावेळी त्यांच्या २ लाख ४० हजार प्रती संपत होत्या. शिक्षणाचा प्रसार जसजसा होत गेला तसतसे वृत्तपत्रांना अधिकाधिक गिऱ्हाइक मिळू लागले. गिऱ्हाइक जसे मिळू लागले तसे ते अधिक मिळविण्यासाठी स्पर्धा लागली. वृत्तपत्रांना आपला तोंडावळा बदलण्याची त्यामुळे वेळ आली. परंतु काहींनी लोकप्रियतेच्या आहारी जाऊन तो बदलला नाही. अनेक विषयांवर संगतवार व सविस्तर वार्ता व माहिती देणे त्यांनी अधिक पसंत केले. अधिक वेळ घालवून वाचणारे वाचकही त्यांनी मिळविले. गुणवत्ता हाच आपल्या पत्राचा निकष त्यांनी मानला. 'क्वालिटी पेपर्स' म्हणून ही पत्रे आजही ओळखली जातात.

उलट 'डेली मेल'ने भरपूर छायाचित्रांची सजावट आणली. मोठ्या मथळ्यांचा नट्टापट्टा सुरू केला. बातमी थोडक्यात द्यावयाची व अधिक विषय हाताळावयाचे असे धोरण सुरू केले. माणसाचे जीवन अधिक गर्दीत होऊ लागले तसे त्यांनी हे चटपटीत पत्र अधिक पसंत केले. चार वर्षांत 'डेली मेल'ने आपला खप १० लाखांच्या घरात नेला. हे यश पाहून आणखी वृत्तपत्रे निघाली. 'डेली एक्सप्रेस' (१९००), 'डेली मिरर' (१९०३) व 'डेली स्केच' (१९०९) यांनी आपला धडाका उघडला.

यामधून साखळी वृत्तपत्रे निर्माण झाली. लॉर्ड बिव्हरब्रुक यांचे नाव घेतल्याशिवाय ब्रिटिश वृत्तपत्रांचा परिचय होऊ शकत नाही. भारतावर सतत थुंकणारी त्यांची पत्रे ब्रिटन-मध्ये भरपूर खपत होती. मॅक्स आइटकेन हे त्यांचे मूळ नाव. परंतु १९१३ मध्ये या साम्राज्यात त्यांनी पाऊल टाकले व 'डेली एक्सप्रेस', 'संडे एक्सप्रेस' व 'इव्हिनिंग स्टँडर्ड' ही तीन पत्रे त्यांनी आपल्या अधिकाराखाली आणली.

'डेली मेल'ने वृत्तपत्राच्या स्वरूपात जशी क्रान्ती केली तशी मालकीबद्दलच्या कल्पनेत नवा पायंडा पाडला. मालकीचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर करणारे हे पहिले दैनिक. लोकप्रिय पत्रासाठी अधिक यंत्रणा, अधिक माणसे, अधिक श्रमांची जरुरी होती. लॉर्ड नॉर्थक्लिफ यांनी त्यासाठी अधिक भांडवल गोळा व्हावे म्हणून शेअर्स काढून कंपनीला सार्वजनिक स्वरूप दिले. एक नवा प्रवाह ब्रिटिश वृत्तपत्रसृष्टीत सुरू झाला. आता तीच पद्धती सर्वमान्य झाली आहे. याच पद्धतीने लॉर्ड थॉमसन यांनी मध्यंतरी लंडन 'टाइम्स' विकत घेण्याचे जाहीर केले तेव्हा केवढी खळबळ उडाली. 'संडे टाइम्स' हे

एकच लंडनमधील दैनिक त्यांच्या मालकीचे. लंडनबाहेर अनेक दैनिके त्यांच्या हाती आहेत. परंतु 'फ्लीट स्ट्रीट'वर कॅनेडियन थॉमसनना येऊ द्यावयाचे नाही हा साहेबाचा निर्धार अखेर यशस्वी झाला तो रस्त्यापुरता. ब्लॅक फायर्सच्या परिसरातील 'टाईम्स' म्हणजे एकेकाळच्या ब्रिटिश साम्राज्याचे मुखपत्रच. तेच त्यांनी विकत घेतले आहे. 'मोनॉपली कमिशन'पुढे हे प्रकरण गेले, परंतु त्यांनीही आता लॉर्ड थॉमसन यांना हे पत्र विकत घेण्याची परवानगी दिली आहे. 'गार्डियन'सारख्या पत्राने या खरेदीस पाठिंबा दिला. त्या वेळी त्यांनी एकच मुद्दा मांडला. आज अमेरिकेतील वृत्तपत्रांशी ब्रिटन स्पर्धा करू शकत नाही याचे कारण एकच. "त्यांच्याइतकी ताजी बातमी आम्ही अजूनही देऊ शकत नाही, ती देता येईल व ती स्पर्धा लॉर्ड थॉमसनच करू शकतील", असे गार्डियनने म्हटले. ताजी बातमी हा ब्रिटिश व अमेरिकन वृत्तपत्रांचा आज प्राण ठरला आहे. तेथे अग्रलेखांना महत्त्व नाही. स्फुट सूचनांना फारसा वाव नाही. जॉन्सनना इशारा कुणी देत नाही. येथे अग्रलेखातून माओला कुणी बजावत नाही. बातमी, ताजी बातमी व ती सर्वांआधी कशी द्यावयाची या एकाच विचारात ही बहुतेक पत्रे आहेत. 'क्वालिटी' व 'पॉप्युलर' यांच्यातील फरक त्यापैकी कोणती द्यावयाची, ती कशी सजवावयाची व केवढी द्यावयाची एवढ्यापुरताच मर्यादित आहे.

या विचारपद्धतीमुळे वृत्तपत्रयंत्रणेचा विकास सर्व त्या दृष्टीने झाला आहे. 'वेस्टर्न मेल' हे लार्ड थॉमसन यांचेच पत्र. कार्डिफमधून प्रसिद्ध होणारे. 'नॅशनल पेपर ऑफ वेल्स' असे त्याचे वर्णन केले जाई. तरी खऱ्या अर्थाने ते प्रादेशिक पत्रच होते. टाइम्स ऑफ इंडियापेक्षा या पत्राची इमारत लहान आहे. याचे कारण 'वेस्टर्न मेल' हे प्रभात दैनिक व 'साऊथ वेल्स एको' हे सायंदैनिक अशी दोनच दैनिके येथून प्रसिद्ध होतात. 'वेस्टर्न मेल' चा खप १ लाख व सायंदैनिकाचा दीड लाखाच्यावर. परंतु त्यांच्याकडे दोन गोष्टी अशा होत्या की त्या मलाही अगदी नवीन होत्या. रेडिओ फोटो परस्पर वृत्तपत्र कचेरीत मिळविण्याची यंत्रणा 'वेस्टर्न मेल' मध्ये होती. तारेतील अक्षरे यावीत तसे बारीक ठिपके एका कागदावर उठत होते व त्यामधूनच चित्र तयार होत होते. लंडनहून थेट कार्डिफला पाठविलेला रेडिओ फोटो तेथे प्रगटत होता. टेलिव्हिजन चित्र 'फोकस' चुकला की असंख्य ठिपक्यांत उधळताना दिसते. तेच ठिपके एकत्र केले की, सुंदर चित्र तयार होते. रेडिओ फोटो हे शास्त्र याच पद्धतीचे. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या एखाद्या प्रज्ञावंताप्रमाणे येथे ठिपक्यांतून चित्र तयार होते. ही सोय आज ब्रिटन-

मधील बहुसंख्य दैनिकांत आहे. भारतात ही यंत्रणा आज कोणत्याही दैनिकाजवळ नाही. पुन्हा हे चित्र तेथे आल्यावर फक्त १० ते १५ मिनिटांत त्याचा ब्लॉक तयार होऊ शकतो. मुंबईच्या ' टाइम्स ' संस्थेतही ही यंत्रणा नाही. एका मोठ्या यंत्राच्या एका बाजूला ते चित्र लावले जाते व दुसऱ्या बाजूला शिशाच्या पत्र्यावर ते उमटत जाते, कोरले जाते. संबंध चित्रावर ती सुई फिरावयास जितका वेळ लागेल तितक्या वेळात तेथे ब्लॉक तयार होतो. ' साऊथ वेल्स एको 'ची पहिली आवृत्ती दीड वाजता निघे. दुपारच्या जेवणासाठी बाहेर पडलेले लोक ती घेत व घोड्यांच्या शर्यतीचे निकाल पाहात. त्यानंतर तीन आवृत्त्या निघत. त्यात चित्रे बदलली जात. नव्याने येणाऱ्या चित्रांना जुनी चित्रे जागा करून देत. ताजी वार्ता, ताजे छायाचित्र, झटपट मांडणी, तीही नखऱ्याची. यात सारे कसब ओतलेले. क्रान्तीची ठिणगी येथे कुणालाच उडवावयाची नसल्याने सारे कसे स्थानिक गोष्टीत गुंतलेले.

लंडनच्या दैनिकात जेव्हा मी फिरलो तेव्हा ही सारी यंत्रणा तेथे होतीच. त्यापेक्षा मला जाणवली ती येथील साधी व्यवस्था. तेथे आमच्यासारखेच सारे मोठ्या हॉलमध्ये एकत्र बसलेले. सायंदैनिकातील लोक त्यामानाने सुखी. कारण सायंकाळी पाच वाजता ही मंडळी मोकळी होतात. परंतु प्रभात दैनिकात काम करणाऱ्यांना संध्याकाळ नाही. पाच वाजता ते आत शिरतात ते रात्री दीडपर्यंत. शेवटचा माणूस तीनला जातो. आमच्याकडे श्रमिक पत्रकार कायदा असल्याने सहा तासांच्यावर आम्हांला काम देता येत नाही. तिथे पत्रकारांना अशी सवलत नाही. तेथे पत्रकारांना ८ ते ९ तास काम पडते. पुन्हा तेथे डाक आवृत्त्या नसल्याने सकाळ-दुपारच्या पाळ्या नाहीत. साऱ्यांनाच पाचनंतर काम व साऱ्यांनाच रात्रपाळी. त्यामुळे ब्रिटनमधील तरुण वर्ग या व्यवसायाकडे वळण्यास तसा नाखूष आहे. युनियनचे कार्ड असल्याशिवाय नोकरी मिळत नाही. पत्रकाराचा कमीत कमी पगार आठवड्याला १२ पौंड आहे. परंतु येथे वर्षाला पगारवाढ देणे, कायद्याने बंधनकारक नाही. कुशलतेप्रमाणे पगार वाढतो. त्यात वशिलेबाजीही आहे. मनुष्यस्वभाव हा सर्वत्र एकच.

' डेली मेल ' या लोकप्रिय दैनिकाने यांत्रिक प्रगतीचा एक उच्चांक आम्ही तेथे असताना गाठला. आता त्यांचे पत्र मँचेस्टर व एडिंबरो या ठिकाणाहून प्रसिद्ध होते. तेव्हा लंडनमधील कचेरीतून त्यांनी रेडिओ फोटो पद्धतीने आपल्या दैनिकाचे सबंध पानच आपल्या शाखांकडे पाठविले. लंडन ते मँचेस्टर व एडिंबरो येथे फक्त २० मिनिटात ते पोहोचले. ते तसेच्या तसे ब्लॉक करून मशिनवर चढले. लंडनहून हवा असलेला मजकूर त्याच सजावटीने यामुळे पाठविता तर आलाच व त्याचबरोबर त्या शाखेचा कंपोजिंगसाठी

जाणारा वेळ वाचून अंक लौकर प्रकाशित होऊ शकला. वेळ व नोकरवर्ग वाचविणारी ही यंत्रणा या व्यवसायात एक दिवस बेकारी निर्माण करील अशी काहींना भीती वाटते.

कार्डिफपासून ६० मैलांवरील केटले या एका नव्या गावाचे सायंदैनिक पाहण्यासाठी आम्ही मुद्दाम गेलो होतो. 'नॉर्थम्पशायर स्टार' हे त्या सायंदैनिकाचे नाव. एक नवी औद्योगिक वसाहत एका भागात निर्माण होताच त्या वसाहतीसाठी एकाने जाऊन तेथे दैनिक काढले. या दैनिकाची यंत्रणा पाहण्यासाठी आम्ही मुद्दाम गेलो. कारण जगातील एका सर्वांत आधुनिक पद्धतीने येथे दैनिकाचे मुद्रण होते. छापखाना म्हटले की टाइप व शिसे प्रथम आठवते. या उद्योगाला शिसाचा धंदा असेही कधी कधी म्हटले जाते. टाइपासाठी आधी शिसे हवे, मग तुम्ही ते खिळे कसेही जोडा. परंतु ह्या छापखान्याचे वैशिष्ट्यच हे की येथे शिसे नाही. शिशाशिवाय, टाइपाशिवाय येथे पत्र निघते. तेथे जे लायनो मशीन होते त्याचे नावच फोटोग्राफिक लाइन कंपोजिंग मशीन. जी अक्षरे शिशात उठावयाची त्याची चक्क निगेटिव्ह तयार होते. त्या प्रत्येक बातमीची निगेटिव्ह लोखंडी चौकटीच्या पानात भरावी तशी एका कागदी पानावर चिकटविली जाते. अशा निगेटिव्हजमधून बनलेले सबंध पान जसेच्या तसे यंत्रावर जाते. तेथेही ब्लाक बनविण्याची पद्धती नाही. एखाद्या अक्षरात चूक झाली तर तेवढी पट्टी त्यावर चिकटायची. हे सारे फोटो-पान छपाई यंत्रावर जाते. या यंत्राच्या मुख्य भागालाच 'वेब' असे म्हणतात. त्यामुळे या पद्धतीलाच वेब ऑफसेट प्रोसेस असे नाव पडलेले आहे. मध्यपूर्वेतील लेबनॉनसारख्या देशात ही पद्धती अधिक अवलंबिली जाते असे तेथे सांगितले गेले. सुरुवातीला या यंत्रणेला भारी भांडवल लागते. परंतु एकदा यंत्रणा आणली की नोकरवर्ग सर्वांत कमी लागतो. एखाद्या लहान कुटुंबालाही हा सर्व छापखाना चालविता येईल. भारतामध्ये ही पद्धती सोईची पडेल असे ब्रिटिश जाणकारांचे मत. परंतु सुरुवातीला लागणारे लाखो रुपये गुंतविणे हे येथील प्रादेशिक पत्रांना शक्य नाही. अक्षरांचे त्यात फोटोच असल्याने छपाई अतिशय सुंदर होते.

ब्रिटनमधील दैनिकातील संपादकवर्गही वेगळ्या पद्धतीचा आहे. 'कॉपी टेकर' ही संस्था आपल्याकडे नाही. 'वेस्टर्न मेल'पासून ते 'डेली मेल' पर्यंत सर्व ठिकाणी 'कॉपी टेकर्स' मुलींची मालिका बसलेली. त्यांच्या कानाला सतत टेलिफोन व समोर टाइपरायटर. वार्ताहर येथे तारा पाठवीत नाहीत, की स्वतः येऊन लिहिण्यासाठी थांबत नाहीत. जेथे असतील तेथून फोन लावतील. या मुली ते शब्द उतरून घेतील ते परस्पर टाइपरायटरवर. त्याच्या तीन प्रती काढल्या जातात. एक प्रत वृत्त संपादकाच्या टेबलावर,

दुसरी प्रमुख उपसंपादकाकडे व तिसरी आपल्याजवळ ठेवतील. येथील वृत्त संपादक (न्यूज एडिटर) हा प्रमुख वार्ताहरच (चीफ रिपोर्टर) असतो. कारण देशच इतका लहान की, सारे ब्रिटनच कामकाजासाठी स्थानिक या सदरात धरले जाते. न्यूज एडिटर बातमीदारांना कामे वाटून देतो व येणाऱ्या टेलिफोन्सवर लक्ष ठेवतो. या सर्व तारा मग प्रमुख उपसंपादकाच्या टेबलावर जातात. तो मग त्याची जागा, स्थान हे सर्व ठरवतो. आपल्याकडील प्रादेशिक पत्राप्रमाणे येथे भाषांतराचा प्रश्न नसतो. 'फीड'वर येणाऱ्या बातम्यांची निवड प्रमुख उपसंपादक करतो. येथे बातमी पुरविणाऱ्या जागृत नागरिकाला बक्षिस मिळते. पैसे देऊन बातमी मिळवणेही गैर मानले जात नाही. लंडनच्या मोठ्या दैनिकात तर बातम्यांना मथळे देण्यासाठी वेगळा संपादकवर्ग असतो. अग्रलेख लिहिण्यासाठी 'लीडर रायटर' वेगळा असतो. संपादकाला अग्रलेख बहुतेक कधीच लिहावा लागत नाही. त्याचे मुख्य काम संघटन. धोरणविषयक सूचना देणे. आपल्याकडे संपादकाचा जाहिरात विभागाशी संबंध नसतो. वाटप व्यवस्थेकडे तो कधी पाहात नाही. परंतु येथील पत्रांचा संपादक हा या सर्व खात्यांचा खरा 'बॉस' मानला जातो. त्याच्या सूचना व आदेश हे प्रमाण मानले जातात. आज अंक किती खपला हे सांगण्यासाठी रोज संपादकाच्या खोलीत वाटप खात्याचा प्रतिनिधी येतो. त्यामुळे अंकाची सर्व जिम्मेदारी आपल्यावर आहे अशा भावनेने संपादक काम पाहतो. सकाळी ११ च्या सुमारास मुख्य संपादक येतो तो रात्री साधारण ११ वाजता पहिली आवृत्ती पाहून परततो. काही दुपारी जेवणास जाऊन सायंकाळी परत येतात.

पानाची सजावट 'ले आउट एक्सपर्ट' करतो. 'डेली मेल' मध्ये एक 'ले आउट एक्सपर्ट' नव्याने ठेवण्यात आला होता. त्याला नवी कल्पना सुचविण्याचा आग्रह झाला. त्याने एकाच वेळी दोन बातम्यांना 'फर्स्ट लीड'चे महत्त्व देऊन छापण्याची योजना काढली. पहिला ठळक मथळा पहिल्या कॉलमपासून सहाव्यापर्यंत जातो तर दुसरा मथळा जरा वेगळ्या टाइपातील, तिसऱ्या कॉलमवरून सातव्यापर्यंत जातो. अनेकदा दुसऱ्या मथळ्यातील बातमीच पहिल्यापेक्षा अधिक परिणाम करून जाते.

रविवारची वृत्तपत्रे हा तर एक लेखनाचा स्वतंत्र विषय आहे. ही रविवारची पत्रे खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वतंत्र आहेत. कार्डिफचे 'वेस्टर्न मेल' रविवार आवृत्ती काढत नाही. 'डेली मेल', 'गार्डियन' यांच्या रविवार आवृत्त्या नाहीत. शनिवारी या पत्रातील पत्रकारांना सुट्या असतात. रविवार गाजवितात वेगळी पत्रे. लॉर्ड थॉमसन यांचे 'संडे टाइम्स'

सर्वांत जुने. 'ऑब्झर्वर,' 'संडे मिरर,' 'संडे टेलिग्राफ', क्रिस्तिन कीलरच्या प्रकरणाने गाजलेले 'न्यूज ऑफ दी वर्ल्ड' ही पत्रे रविवारची. त्यांची पुन्हा लाखांनी विक्री होते. न्यूज ऑफ दी वर्ल्डचा तर खप सबंध जगात मोठा. हे २४ पानी पत्र ६ पेन्सला मिळते व त्याच्या ६० लाखावर प्रती संपतात. जाहिरातीचा दर, दर इंचाला ४८ पौंड आहे. कोर्टातील खटले व प्रकरणे यांनी हे पत्र भरलेले असते. परंतु ते वाचण्यासाठी या सुशिक्षित देशातही उड्या पडतात. 'दी पीपल' या नावाचे रविवारचे पत्र असेच लोकप्रिय. त्याचाही खप सहा लाखांच्या घरात आहे. परंतु त्यात अग्रलेख मुळीच नसतो. 'संडे टाइम्स' त्या मानाने फार भारदस्त. त्याचे संपादक श्री. हॅमिल्टन यांची आमची खास भेट झाली. 'संडे टाइम्स'चा संसार पाहण्यासाठी आम्ही मुद्दाम गेलो होतो. 'टाइम्स'ची मालकी लॉर्ड थॉमसन यांच्याकडे गेल्यावर तेच या ब्रिटनमधील सर्वश्रेष्ठ दैनिकाचे संपादक झाले. 'संडे टाइम्स'चा खप वाढविण्यासाठी लॉर्ड थॉमसन यांनी एक धाडस केले व त्यात त्यांना यश मिळाल्याने सर्वच रविवार आवृत्त्यांचे अर्थशास्त्र साफ बदलून गेले. रविवारच्या अंकाबरोबर त्यांनी एक बहुरंगी पुरवणी फुकट देण्यास सुरुवात केली. ५६ ते ६० पानांची ही पुरवणी आज वाचकांना फुकट मिळते. त्यामधील माहिती, लेख व छायाचित्रे उत्कृष्ट असतात. सुरुवातीला लॉर्ड थॉमसन यांना हा प्रयोग महाग पडला. परंतु त्यांनी नेटाने चालू ठेवल्यामुळे इतर पत्रांना तो प्रयोग सुरू करणे भाग पडले. या पुरवणीस आपोआप भरपूर जाहिराती मिळू लागल्या. ही रंगीत पुरवणी काढण्यासाठी 'संडे टाइम्स'ला आज ३० हजार पौंड खर्च दर आठवड्याला येतो. परंतु ६० हजार पौंडांची जाहिरात त्यांना दर आठवड्यास मिळते. 'संडे टेलिग्राफ'लाही ही पुरवणी छापणे भाग पडले. सध्या त्यांच्या या पुरवणीची छपाई पश्चिम जर्मनीत होते. तीन पुरवण्या साधारणतः त्यांच्या आगाऊ तयार असतात. 'संडे टेलिग्राफ'ची रंगीत पुरवणी शुक्रवारीच वाचकांना मिळते. ब्रिटनची राणी प. जर्मनीला गेली ती थोडी अचानक. या पुरवणी संपादकांना त्या मानाने आगाऊ सूचना कमी मिळाली. परंतु 'संडे ऑब्झर्वरने' त्या रविवारी आपली पुरवणी संपूर्ण पश्चिम जर्मनीवर काढून विक्रम केला. 'संडे ऑब्झर्वर' हे १७९१ मध्ये सुरू झालेले सर्वांत जुने रविवारचे पत्र. त्याचा खप ८ लक्ष २३ हजार आहे. खपाच्या दृष्टीने 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड,' 'दी पीपल,' 'संडे मिरर,' संडे एक्सप्रेस,' 'संडे टाइम्स' असे अनुक्रम लागतात. रविवारच्या या पत्रांचा एकूण खप २ कोटी ६० लक्षाच्या घरात आहे. ब्रिटन इतके वृत्तपत्रांचे भोक्ते जगात नाहीत. दर १०० माणसात तेथे ५० प्रती खपतात व त्यात

लोकवस्ती ही काही ठिकाणीच दाट असल्याने विक्री व वाटप व्यवस्था सोपी जाते. ब्रिटन हे अमेरिकेपेक्षा एक तृतीयांशाने लहान. परंतु अमेरिकेच्या 'न्यूयॉर्क टाइम्स'ची रविवार आवृत्ती फक्त तीन लाख संपते.

खपामुळे जाहिरातीचे उत्पन्न साहजिकच वाढते. खप जास्त असेल तर महागडा दरही जाहिरातदाराला परवडतो. कारण इंचाला २८ पौंड दर जेव्हा असतो तेव्हा एक हजार वाचकांमागे जाहिरातदाराने फक्त दीड पेन्सच खर्च केलेला असतो. ज्याचा खप कमी त्याचा एक हजार वाचकांमागे दर भरमसाट महाग ठरतो. आज ब्रिटिश वृत्तपत्रे जाहिरातींनी इतकी व्यापलेली आहेत की, त्यांची सजावट करणेही अशक्य. जाहिरातीमधील थोडी जागा भरण्याचे कामच संपादकांना पडते. त्यात लोकप्रिय पत्रे फार मोठ्या आकाराची छायाचित्रे टाकतात. लेखाचा मथळाही अनेक ओळी खाऊन जातो. लेखांची लांबी फार असता कामा नये हा तर या आधुनिक पत्रांचा मुख्यमंत्र.

लेख कधीही पुढच्या पानावर वाहात जाता कामा नये यावर येथील संपादकाचा कटाक्ष. 'विचार कसला करता, लेख कापा' असा संदेश आमच्या वर्गात नेहमी मिळे. येथे सुदैवाने मंत्र्यांची उद्घाटने नसतात व त्यांची छायाचित्रेही येत नाहीत. ओळीत सारेजण उभे असणाऱ्या छायाचित्राला 'फायरिंग स्क्वाड फोटोग्राफ' म्हणून येथील वृत्तपत्रात कधीच स्थान दिले जात नाही. चेहऱ्यावरचे भाव स्पष्ट दिसतील इतका मोठा ब्लॉक नेहमी वापरला जातो. इतकी अवधाने असतानाही येथील प्रत्येक पत्राने आपले वैशिष्ट्य संभाळले आहे. सर्वांत चांगले सजावटीचे पत्र म्हणजे कम्युनिस्टांचे 'डेली वर्कर'. त्यांना जाहिराती कमी असल्याने हे सोपे जात असावे. त्याचे मुख्य श्रेय या दैनिकाचे संपादक श्री. ॲलन हट यांना आहे. 'न्यूजपेपर डिझाइन' या पुस्तकाचे हे लेखक. त्यांनी आपल्या दैनिकाला चांगला आलेख दिला यात नवल नाही. 'गार्डियन' पत्र इतके भारदस्त परंतु शिळ्या बातम्या देणारे पत्र म्हणून त्याची 'फ्लीट स्ट्रीट' वर टिंगल होते. वाचकांची पत्रे हे सदर सर्वांत सुंदर सजविते 'सन' हे नवे दैनिक. 'डेली हेरल्ड' बंद पडला व दुसऱ्या दिवशी या नव्या नावाने जुन्या संपादकाकडून तो सुरू झाला. 'सन' खरोखरच सर्वांत आकर्षक दैनिक. मजूर मंत्रिमंडळाचा पाठीराखेपणा 'गार्डियन', 'सन' व 'डेली मिरर'च करणार. बाकी बहुतेक सारे हुजूर पक्षाचे चहाते. सर्वांत अधिक खपाची 'क्वालिटी' पत्रे मजूर मंत्रिमंडळामागे नाहीत हे श्री. विल्सन यांचे एक दुखणे आहेच.

प्रादेशिक पत्रांना जाहिराती कशा मिळविता येतील याबद्दल रॉय थॉमसन यांनी केलेला नवा प्रयोग महाराष्ट्रातील दैनिकांना अमलात आणता येण्याजोगा आहे. हॅचेस, मॅचेस व डिस्पॅचेस म्हणजे बर्थ, मॅरेजेस व डेथस् यांच्या जिवावर लॉर्ड थॉमसन यांनी वृत्तपत्राचे अर्थशास्त्र बसविले. कुणाला मूल झाले, कुणाचे लग्न झाले, व कुणी जगाचा निरोप घेतला हे वाचण्यात लोकांना सर्वांत अधिक रस आहे हे जाणून अशा छोट्या जाहिराती अधिकाधिक वृत्तपत्रांकडे येतील याची खटपट करणारी यंत्रणाच त्यांनी उभी केली. त्यामधून इतर जाहिरातींचे नवे क्षेत्र उपलब्ध झाले. आज ‘ वेस्टर्न मेल ’ या कार्डिफच्या दैनिकात मंजुळ आवाजात बोलणाऱ्या मुलींचा एक ताफा मिनिटाला एक जाहिरात मिळवीत आहे. टेलिफोनवरून जाहिराती घेतल्या जातात असे लोकांना कळल्यापासून लोक फोनवरूनच आपल्या सर्व तऱ्हेच्या जाहिराती देतात. त्यात जन्मवार्तेपासून कुणाला आपली बाबागाडी विकायची असते, तिथपर्यंत साऱ्या जाहिराती येतात. ब्रिटनमधील सर्वसामान्य नागरिक प्रामाणिक आहे म्हणून हा व्यवहार चालू शकतो. आपल्याकडे तो अजून चालणार नाही. परंतु तीही संवयीची गोष्ट आहे. येथे जाहिरात टेलिफोनवर येते, ती ताबडतोब छापली जाते व नंतर ग्राहकाकडे बील जाते व ते अविलंबे दिले जाते. येथे काही मुली तर टेलिफोन करून गृहिणींना ‘ तुम्हांला कोणती जाहिरात द्यावयाची काय ? ’, असे गोड आवाजात विचारतात. बोलण्याबोलण्यातच गृहिणींच्या गरजेला वाचा फुटते व ‘ वेस्टर्न मेल ’ दैनिकाला जाहिरात मिळते. आपल्याकडे विवाहाची छायाचित्रे मोफत छापली जातात. ती एका विवक्षित जागी जाहिरात म्हणून छापण्याची प्रथा छोट्या पत्रांनी सुरू केली तर ते एक चांगले उत्पन्न ठरेल. विक्रेत्याची भूमिका घेतल्याशिवाय धंदा होत नाही. धंदा केल्याशिवाय वृत्तपत्र चालत नाही. पत्रात ताजी वार्ता देण्यास सामर्थ्य लागते. ब्रिटनमध्ये विमाने घेऊन जाणारे वार्ताहर आहेत. या सबंध उद्योगाकडे एक उत्तम व्यवसाय म्हणून हा देश पाहतो. आमच्या ध्येयवादाच्या कल्पना या केवळ अधिक धडपड करावयास नको म्हणूनच सबबीदाखल पुढे केलेल्या. चांगले वृत्तपत्र कोणते, जे लोकांना वाचावेसे वाटते ते. महाराष्ट्रातील किती पत्रे वाचाविशी वाटतात ? या जुन्या कोषातून आम्ही कधी बाहेर येणार कळत नाही. उत्तम छपाई, आकर्षक सजावट, ताजी बातमी म्हणजे वृत्तपत्र. अग्रलेखाचे माहात्म्य या नव्या युगात फारसे नाही. ब्रिटनचा किनारा सोडताना ती तीस तीस पानांची दैनिके, त्या रंगीत पुरवण्या, ती अधिक आकर्षक छायाचित्रे, डोळ्यासमोर रेंगाळत होती. परत आलो व पुन्हा कचेरीत दाखल झालो तेव्हा महाराष्ट्रातील नियत-

कालिकांचा ढिगारा समोर येऊन पडला. अनेकातील छायाचित्रे उमटलेलीही नव्हती. मनात आले दोन देशांतील ही तफावत कधी दूर होणार ?

## ब्रिटिश वृत्तपत्रे

वृत्तपत्रांचा खप : डेली मिरर ५०,१९,०००; डेली एक्सप्रेस ३९,८४,०००; डेली मेल २४,६३,०००; डेली टेलिग्राफ १३,३६,०००; सन १२,७३,०००; डेली स्केच ८,४३,०००; गार्डियन ३,७०,०००; टाइम्स २,५४,०००; फाइनान्शियल टाइम्स १,४६,०००.

जाहिरातींचा दर : (प्रत्येक इंचास) डेली मिरर २८ पौंड, डेली टेलिग्राफ १५ पौंड, टाइम्स १० पौंड, फायनान्शियल टाइम्स ८·१० पौंड.

प्रकरण एकोणिसावे

# ब्रिटिश संसदेत

हिवाळ्याचे दिवस असावेत. ब्रिटिश पार्लमेंटच्या सभागृहात अंधार पडलेला असावा. अशा वेळी तेथील एखादा खासदार उभा राहतो व नम्रपणे म्हणतो, "Speaker Sir, May candles be brought in."

परंतु याचा अर्थ शब्दशः घेऊन तेथे १९६८ सालात कुणी मेणबत्त्या आणीत नाही. सभापती दिवे लावण्याची सूचना करतात. परंतु तीच सूचना परंपराप्रिय अशा ब्रिटनच्या संसदेत पहिल्या चार्लसच्या अमदानीतील भाषेत अजूनही केली जाते. आपल्याकडील एखादा मिस्किल खासदार अशा वेळी म्हणाला असता, "सभापती महोदय, या सभागृहात जरा दिवे लावा." इतर सदस्य खळखळून हसले असते. परंतु इंग्रजी भाषेत दिवे कुणी लावत नाही व पार्लमेंटची भाषा तर सारी परंपरेच्या अभिमानाने फुललेली. येथील भाषाच काय परंतु सारे व्यवहार, सारा कारभार हा परंपरानुसार चालणारा. साहेबाचे राज्यच लिखित कायद्यापेक्षा अलिखित संकेतावर चालणारे.

ते कसे चालते हे पाहण्यासाठी मी ब्रिटिश संसदेत गेलो तेव्हा ते फारच रटाळपणे चालले होते. रॉयल पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टर या भारदस्त नावाने टेम्सच्या तीरावर उभ्या असलेल्या त्या लांबलचक व प्रचंड प्रासादात इतकी सहजपणे चर्चा चालली होती की, हे पार्लमेंट आहे हे क्षणभर खरे वाटेना.

ते कॉमन्स सभागृहच मला अगदी सामान्य वाटले. सारी मंडळी कशी पिटातल्या

प्रेक्षकांसारखी बसली होती. आमच्या लोकसभेत प्रत्येकाचे आसन तसे स्वतंत्र आहे. समोर डेस्क आहे, माइक आहे. सभागृहाच्या वर्तुळाकाराने काही वेगळी शान आणली आहे. येथे एखाद्या ग्रामपंचायतीचे सदस्य बसावेत तसे दोन गट समोरासमोर बसलेले. तेही लांबलचक बाकांवर. समोर डेस्कस् नाहीत की, हात टेकायला आधार नाही. मागे पाठीला फक्त आधार. पाय चाळवीत सारे बसलेले. कुणी पाय लांब पसरून बसलेले. कमी गर्दीच्या फर्स्ट क्लासच्या डब्यात बसल्यासारखे. सभापतींच्या समोरचा दरवाजा उघडा होता व इतक्यात एक खासदार तिथे दरवाजात येऊन उभे राहिले. एखाद्या जाहीर सभेला यावे व हवे तिथे उभे राहावे तसे. कमरेवर हात ठेवून कितीतरी वेळ ते तेथे उभे होते व तेथूनच सभागृहातील चर्चा ऐकत होते. सारा प्रकार मला मोठा विचित्र वाटला. उठणारे सभापतींना मुंडी खाली घालून 'वंदन' करीत होते. परंतु सबंध जगातील लोकशाहीप्रेमाची ही गंगोत्री इतकी अनौपचारिक असेल असे मला वाटले नव्हते. कडक शिस्त, नीटनेटकेपणा, चालीरीतींचा हव्यास असलेला इंग्रज या संसदगृहात मला थोडा वेगळा वाटला.

परंतु या वेगळेपणातच या ब्रिटिश पार्लमेंटचे सारे सामर्थ्य एकवटलेले आहे. १२१५ मध्ये किंग जॉनकडून सरदारांनी मॅग्नाचार्टावर सही घेतली त्या दिवशी या इमारतीत लोकशाही व भाषण-स्वातंत्र्याचा पाया घातला गेला. १७ व्या शतकात बिल ऑफ राइटस मंजूर झाले व या पार्लमेंटमध्ये केलेल्या वक्तव्यावर कोणत्याही कोर्टात खटला भरला जाणार नाही असे जाहीर झाले. तेव्हापासून या साध्या सभागृहात राजकीय तत्त्वज्ञानाचे अनेक भाष्यकार उभे राहिले व सबंध जगाला त्यांनी मार्गदर्शन केले. "राजकारण हे गुंडांचे शेवटचे आश्रयस्थान आहे", असे म्हणणारा एडमंड बर्क येथेच गाजला. त्याची भाषणे ही राजकारणशास्त्र विषयाची क्रमिक पुस्तके बनली. नुकत्याच पडद्याआड गेलेल्या जमान्यातही याच पार्लमेंटने किती मान्यवर व्यक्ती पाहिल्या. दोन महायुद्धे झाली, परंतु या युद्धांनी ब्रिटनला दोन खंबीर नेते दिले. पहिल्या महायुद्धात लॉईड जॉर्ज पंतप्रधान झाले. त्यांच्या वक्तृत्वाने माणसेच काय, परंतु झाडावरील पक्षीही मंत्रमुग्ध होत असत असे बोलले जाई. दुसऱ्या महायुद्धाने विन्स्टन चर्चिल उदयाला आले व टाळ्यांच्या कडकडाटात ते याच सभागृहात शिरले. त्यांच्या धारदार आवाजाचा प्रतिध्वनी या सभागृहातच नव्हे तर सबंध देशात उठला. परंतु युद्ध संपताच त्याच चर्चिलना ब्रिटनने विरोधी पक्षात बसविले. तरीही त्यांची पार्लमेंटमधील जागा व स्थान हे अढळ ठरले. चर्चिल निधन पावले तरी त्यांची जागा तेथे कायम ठेवण्यात आली आहे. चर्चिल यांची 'सीट' म्हणून ती बहुतेक रिकामी

ठेवली जाते. सहसा त्यावर कुणी बसत नाही. ती ' सीट ' शोधण्याचा आमचा प्रयत्न मात्र हास्यास्पद ठरला. कारण त्या समोरच्या बाकावरील एक जागा यापलीकडे ती वेगळी काढता येत नव्हती. हात टेकण्यास आधार नसलेल्या त्या आसनावर चर्चिलही तासन्तास बसत असत.

दुसऱ्या महायुद्धाने हिटलरची विमानेही या पार्लमेंटवर आणली. १० मे १९४१ च्या रात्री लोकशाहीचे हे माहेरघर उद्ध्वस्त करण्यासाठी नाझी विमानांनी तुफान बॉम्बफेक केली व त्यात हे सभागृह खरोखरच जमीनदोस्त झाले. परंतु चर्चिलनी हा हल्ला लोकशाहीवरचा हल्ला मानला होता. त्यामुळे तितक्याच हिमतीने व चिकाटीने पार्लमेंट भरत राहिले. हाऊस ऑफ लॉर्डसने आपली जागा त्यांना खाली करून दिली. उभय सभागृहापुढे भाषण करावयास येण्यापूर्वी ब्रिटनची सम्राज्ञी जेथे आपली राजवस्त्रे चढविते त्या सभागृहात उमराव जमू लागले. चर्चिल यांच्या आग्रहावरून जुन्याच आकाराचे व तसेच्या तसे नवे सभागृह बांधण्यात आले. तशीच बाके. तशाच हिरव्या रंगाची कुशन्स. फक्त अधिक उजेड येण्याची व्यवस्था केली. हिरव्या गालिच्यावर तीच टयूडर राजवटीपासून चालू असलेली तांबडी पट्टी दोन्ही बाजूंला पुन्हा आखण्यात आली. पूर्वी खासदार मैदानी वक्तृत्वे करताना तलवारी परजत असत. त्या वेळी ही लक्ष्मणरेषा आखून देण्यात आली होती. दोन्ही पक्षांना आपल्या हद्दीतील लक्ष्मणरेषा ओलांडता येत नसे. आता तलवारी घेऊन खासदार येत नाहीत. बॉम्बहल्ल्यात पहिली लक्ष्मणरेषा पुसली गेली. तरी परंपराप्रिय ब्रिटनने ती पुन्हा आखली. इतकेच नव्हे तर खासदारांच्या प्रसाधनगृहात तलवारी काढून ठेवण्यासाठी ऐतिहासिक काळात लाल दोऱ्या असत त्याही अजून ठेवल्या आहेत. नव्याने बांधलेल्या या सभागृहात जुनीच ३४६ सदस्यांची बसण्याची व्यवस्था आहे. प्रत्यक्ष हाऊस ऑफ कॉमन्सचे सभासद ६३० आहेत. याचा अर्थ सर्व सदस्यांना एकाच वेळी बसण्यास तेथे जागाही नाही. सर्व सदस्य उपस्थित होतील अशी अपेक्षाही नसावी. परंतु युद्धाच्या धामधुमीत अगर एखादे महत्त्वाचे विधेयक येते तेव्हा सभागृहात साहजिकच उपस्थिती जोरदार असते; व मग अनेकजण उभे राहतात. काही उभे राहून बोलतात. काही कोपऱ्यातून बोलणाऱ्यांची टर उडवितात. हाईड पार्कची उद्धटता मधूनमधून येथेही अवतरते. परंतु या वास्तूचे पावित्र्य येथील भाषणस्वातंत्र्यावर व त्याचबरोबर केलेल्या विधानाच्या सचोटीवर टिकविले गेले आहे. शेक्सपिअरच्या स्टॅटफोर्ड मतदारसंघातूनच प्रोफ्युमो निवडून येत असत. त्यांना पार्लमेंट व मंत्रिमंडळ सोडावे लागले ते त्यांचे ख्रिस्तीन कीलरशी संबंध होते म्हणून नव्हे तर त्यांनी पार्लमेंटमध्ये केलेले

विधान असत्य ठरले म्हणून. पार्लमेंटच्या सदस्याला येथे मानही मोठा व त्याची प्रतिष्ठाही मोठी. ज्या चाळीस पार्लमेंट सदस्यांनी दोन महायुद्धांत प्राणार्पण केले त्यांची स्मृती याच संसदगृहात तसा आलेख कोरून जोपासली आहे. सभापतींचे या संसदगृहातील आसनही मोठे थाटाचे आहे. ऑस्ट्रेलियाने हे ' सिंहासन ' भेट म्हणून दिले. शिसवीसारख्या काळ्या लाकडाचे ते बनविले आहे. परंतु त्याचे डिझाईन जुने, अगदी जसेच्या तसे तयार करण्यात आले आहे. या खुर्चीच्या मागे हिरव्या रंगाची एक फार मोठी थैली लटकावलेली आहे. त्यात सभागृहापुढे सादर करावयाचे अर्ज, ठराव यांच्या प्रती लोकप्रतिनिधी ठेवतात. सभापतींचे स्थान हे अतिशय पवित्र मानले जाते. त्याच्या स्वातंत्र्यावर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असल्याने ब्रिटनच्या पार्लमेंटचा सभापती हा त्यानंतर कोणतीही मानाची सरकारी जागा स्वीकारीत नाही. त्यामुळे सरकार पक्षाच्या रागलोभाची पर्वा त्याला ठेवावी लागत नाही. सभापतीची जागा ही राजकीय कारकीर्दीत शेवटची जागा असे मानण्यास तेथील मंडळी तयार असतात. पार्लमेंटच्या प्रतिष्ठेचे जतन येथे जिवापलीकडे केले जाते. ' चर्चिल आर्च ' हे त्याचे प्रतीक. ही पाहण्यासाठी सारे प्रवासी क्षणभर थांबतात यात नवल नाही.

जर्मन बॉम्बहल्ल्यांनी उद्‌ध्वस्त झालेले कॉमन्स सभागृह पुन्हा जसेच्या तसे बांधण्यात आले, तरी विन्स्टन चर्चिल यांनी युद्धाची आठवण म्हणून कोसळलेल्या व तुटलेल्या दगडांचा उपयोग करून या प्रचंड प्रासादातील एक कमान उभारली. या कमानीतून लोकप्रतिनिधी कॉमन्स सभागृहात आज शिरतात. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटन कोणत्या कठीण काळातून गेले, याची स्मृती हे फुटके दगड देतील असे सयुक्तिक उद्‌गार चर्चिल यांनी त्या वेळी काढले होते. चर्चिल गेले व ती कमान आता चर्चिल आर्च म्हणून कायम राहिली आहे.

तसे म्हटले तर पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टर या नावाने उभा असलेला हा प्रचंड प्रासाद सारा दगडांचाच आहे. परंतु हे नुसते दगड नाहीत. ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाची सारी शान व इतिहासाच्या साऱ्या खुणा या दगडादगडांवर कोरलेल्या आहेत. ' बिग बेन 'चे ' ठाण् ठाण् ' असे ठोके आपल्या आवाजाने त्या स्मृतींना मधून मधून जाग आणतात.

लंडनला आलेला प्रवासी सकाळी रेडियोवर ऐकतो ते ह्या ' बिग बेन ' चेच ठोके; आणि लहान मुलाच्या उत्साहाने पार्लमेंट स्क्वेअरमध्ये येऊन तो उभा राहतो ते हे प्रचंड घड्याळ पाहण्यासाठी. या घड्याळाचे नावही पार्लमेंटमधील शेवटच्या बाकावर बसणाऱ्या एका थट्टेखोर खासदाराने ठेवले. सर बेंजामिन हॉल हे त्या वेळचे बांधकाम मंत्री होते.

सबंध जगातील मोठ्या अशा या घड्याळाचे नाव कोणते ठेवावयाचे हा प्रश्न पार्लमेंटमध्ये चर्चेला आला होता. सर बेंजामिन हॉल सर बेन हॉल या नावाने ओळखले जात व त्यांची शरीरयष्टीही धिप्पाड होती. ते हा प्रश्न घेऊन सभागृहात उभे राहताच शेवटच्या बाकावरचा एक खासदार ओरडला, "त्या घड्याळाचे नाव बिग बेन ठेवा." आणि प्रचंड हास्य-कल्लोळात ती सूचना स्वीकारली गेली. या घड्याळाचा तासाचा काटा नऊ फूट लांबीचा तर मिनिट काटा १४ फूट लांबीचा आहे. लंडनमधील प्रत्येक नागरिक या भागातून जाताना आपले घड्याळ 'बिग बेन' कडे पाहून लावल्याशिवाय राहणार नाही. कधीही बंद न पडणारे हे घड्याळ एकच वर्षापूर्वी अचानक बंद पडले. लंडनवासियांना तो आश्चर्याचा धक्काच होता. टेलिफोनवरून लोक सूचना देऊ लागले. घड्याळ बंद का पडले याचा शोध घेण्यासाठी कारागीर चढले. घड्याळाच्या कोणत्याच यंत्रणेत बिघाड झालेला नव्हता. अखेर एका कारागिराला दोष सापडला. काय झाले असेल असे आपल्याला वाटते ? एक रंगारी आतील भाग रंगविता रंगविता आपला ब्रश त्या यंत्रात विसरून गेला होता.

'बिग बेन' कडे नजर फेकीत 'वेस्टमिन्स्टर' च्या या राजप्रासादाकडे माणूस वळतो व क्षणभर थबकतो त्या सुरुवातीच्या भव्य पायऱ्या पाहूनच. ऐश्वर्य व कलात्मकता यांचा विलास येथील प्रत्येक कमानीत आहे. नक्षीदार छत व दिव्यांची झुंबरे यांनी नटलेला राणीचा महाल ओलांडून प्रवासी शिरतो तो रॉयल गॅलरीत. हेही एक सभागृहच. राजघराण्यातील अनेक व्यक्तींची मोठमोठी तैलचित्रे येथे आहेत. परंतु साऱ्यांच्या लक्षात राहते ते येथील नेल्सनचे अखेरचे क्षण रेखाटणारे भव्य तैलचित्र. ट्राफल्गारच्या लढाईत विजय मिळाल्यावर जखमी झालेला नेल्सन आपल्या सहकाऱ्यांचा अखेरचा निरोप घेत आहे. नेल्सनवर ब्रिटनने सर्वांत अधिक प्रेम केलेले आढळते. लंडनमधील ट्रॅफल्गार स्क्वेअर व तेथील उंच मनोऱ्यावरील नेल्सनचा पुतळा या प्रेमाची आणखी एक खूण. लॉर्डस सभागृह हे उमरावांच्या वैभवाला साजेसेच आहे यात नवल नाही. त्यामधील सोनेरी सिंहासन हे आत शिरताच लक्ष वेधून घेणारे. संयुक्त अधिवेशनापुढील राणीचे भाषण हे या सिंहासनावरून व्हायचे. या सिंहासनापुढे उमरावांच्या सभागृहात सभापतीसाठी ठेवलेले आसन खास ऐतिहासिक म्हटले पाहिजे. पूर्वीच्या जमान्यात उमराव सभेचा सभापती लोडाला टेकून बसेल असे ठरले व तेव्हापासून आजतागायत हा सभापती मऊ गादीच्या तक्तावर लोडाला टेकून बसतो आहे. हे सर्व बाजूला टाकून वळले तर कॉमन्स सभागृहाची 'सेंट्रल लॉबी' येते. दिल्लीच्या लोकसभेसारखा येथे सेंट्रल हॉल नाही. परंतु या अष्टकोनी घुमटाखाली,

ब्रिटिश खासदार आपापल्या मतदारसंघांतील लोकांना भेटतात. सर्वांत गर्दीची, गडबडीची ही जागा. येथूनच कॉमन्स सभागृहाकडे जाणारा कॉरीडॉर सुरू होतो. पार्लमेंटची ही खरी लॉबी. खासदारांच्या बातम्या काढण्यासाठी येथेच वार्ताहर घुटमळतात. वेस्टमिन्स्टर हॉल, सेंट स्टीफन्स हॉल ही मात्र उरली आहेत आता ऐतिहासिक स्मारके. आगीत तावून सुलाखून निघालेली. नवा आकार घेऊन जन्माला आलेली. सेंट स्टीफन्स हॉलमध्येच क्रॉमवेलने राजेशाहीविरुद्धचा आवाज उठविला. याच जागेतील पार्लमेंटमध्ये अधिवेशन चालू असताना राजाचा शेवटचा प्रवेश घडला. वेस्टमिन्स्टर हॉलमध्येच क्रॉमवेलची लॉर्ड प्रोटेक्टर म्हणून निवड झाली. नव्या जमान्यात दिवंगत झालेले पाचवे व सहावे जॉर्ज जनतेच्या दर्शनासाठी येथेच पहुडले. पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टरचे खरे वैभव दोन गोष्टींतच आहे. एक ती बिग बेन व दुसरे हे पार्लमेंट.

काळाचा महिमाच असा थोर की, परंपरावादी ब्रिटनचेही राजकीय जीवन आता बदलत चालले आहे. राणीचे माहात्म्य आता खूपच कमी झाले आहे. तिच्यावर कधी टीका न करण्याचा संकेत आता फारसा कुणी पाळत नाही. प्रिन्स चार्लस या राजपुत्राला तर सामान्यांबरोबर शिक्षण दिले जात आहे व त्याला शिक्षक शिक्षाही करीत आहेत. मध्यंतरी त्याने आपल्या सह्या देऊन पैसे मिळविल्याची बातमीही प्रसिद्ध झाली होती. राजपुत्र हा माणसात येत आहे असा त्याचा अर्थ. ' Prince is now becoming a commoner, ' असे तेथे नेहमी म्हटले जाते.

त्याचबरोबर श्री. हॅरॉल्ड विल्सन यांनी इतक्या नेकीने काम चालविले आहे की, हुजूर पक्षाला पुढील काही वर्षे तरी अधिकारपदावर येण्याची आशा नाही. मी ज्या वेळी इंग्लंडमध्ये होतो, त्या वेळी तर त्यांचे बहुमत अगदीच अल्प होते. तेथे संध्याकाळीच पार्लमेंटला खरी सुरुवात होते. आपला पराभव होऊ नये म्हणून मजूर खासदार डोळ्यात तेल घालून बसलेले होते. रात्ररात्र त्यांना जागरणे घडत. लॉईड जॉर्ज यांची कन्या लेडी मेगन यांच्या भेटीस आम्ही गेलो तेव्हा त्या म्हणाल्या, " जागरणाने आम्ही हैराण झालो आहोत. खासदार रात्री झोपी गेले की टेलिफोन खणखणू लागतो. धावा, धावा, मतदान होत आहे. असा पुकारा होतो व सारेजण पार्लमेंटकडे धावत सुटतात. रात्री पहाऱ्यासाठी पाळ्या लावाव्यात तशा पाळ्या आम्ही लावलेल्या आहेत."

श्रीमती बार्बरा कॅसल या विल्सन मंत्रिमंडळातील एक मंत्री एक दिवस रात्री गाडीने पॅरिसला जायच्या होत्या. व्हिक्टोरिया स्टेशनवर त्यांची गाडी रात्री १० वाजता सुटावयाची

होती. त्याच वेळी वाढत्या किमतीवरील विधेयकावर मतदान व्हावयाचे होते. ते रात्री १० वाजताच होणार होते. त्यांना मतदान करावयास मिळावे व मजूर मंत्रिमंडळ 'जगावे' म्हणून रेल्वे खात्याने त्या रात्री ती गाडी २० मिनिटे उशिरा सोडली. श्रीमती बार्बरा कॅसल यांनी तशी पूर्वसूचना दिली होती व रेल्वेने तशी घोषणाही केली होती. पार्लमेंटमधून त्या तडक आपले बोचके घेऊन व्हिक्टोरिया स्टेशनवर त्या रात्री आल्या. डॉक्टरच्या सल्ल्यामुळे त्यांना काही दिवसापुरता विमानप्रवास रद्द करावा लागला होता. दुसऱ्या दिवशी महत्त्वाच्या वाटाघाटी पॅरिसमध्ये व्हावयाच्या होत्या व मतदान तर तितकेच महत्त्वाचे होते.

श्री. वेजवुड बेन हे ब्रिस्टलचे खासदार त्या वेळी 'पोस्ट मास्टर जनरल' होते. आता त्यांना आणखी बढती मंत्रिमंडळात मिळाली आहे. त्यांची आमची कार्डिफमध्ये वेल्स मजुरांच्या मेळाव्यात भेट झाली. श्री. मायकेल फूट हे डावे मजूर खासदार तेथेच भेटले. श्री. मायकेल फूट हे दिसावयास अगदी कम्युनिस्ट पुढाऱ्यासारखे आहेत. वक्तृत्व तसेच गरमागरम. श्री. बेनही मोठे कडक बोलणारे. श्री. विल्सन यांचा संच आता जमत चालला आहे. त्यांचे व श्री. ब्राऊन यांचे फारसे जमत नाही, परंतु ते शक्यतो जमवून घेत आहेत. मजूर मंत्रिमंडळास सर्वांत अधिक त्रास होत आहे तो कामगार संघटनांकडूनच. तेथेही आता हक्क व प्रत्यक्ष काम यांचे व्यस्त प्रमाण पडू लागले आहे. मजूर पक्षातही डावे-उजवे गट आहेतच. डाव्यांचा व्हिएटनाम प्रश्नावर श्री. विल्सन यांना पाठिंबा नाही. ऱ्होडेशियाच्या प्रश्नात श्री. विल्सन यांचे मंत्रिमंडळ गिळले जाते की काय असे वाटत होते. फार गाजलेले पोलाद धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाचे विधेयक तर आता 'शीतपेटी'त गेले आहे. लॉर्ड बर्ट्रांड रसेल यांच्यासारखे डावे तत्त्वज्ञ तर श्री. विल्सन यांना हुजूर पक्षीयांपेक्षा वेगळे समजत नाहीत. मजूर मंत्रिमंडळ जमीनदारी नष्ट करू इच्छित नाही. त्यांनी राणीला आग्रह करून प. जर्मनीस पाठविले तेव्हा तर वृत्तपत्रांनी श्री. विल्सन यांच्यावर तुफान हल्ला केला. परंतु या सर्वांचा समाचार त्या पार्लमेंटच्या सभागृहात श्री. विल्सन इतका तडफदारपणे घेतात की, त्यांचा पराभव पुढील दहा वर्षे तरी होईल असे वाटत नाही. ब्रिटन सध्या आर्थिक संकटात आहे. संकट आले की, खऱ्या नेतृत्वाचा कस लागतो, तसा श्री. विल्सन यांचा सध्या लागत आहे. पौंडाचे अवमूल्यन त्यांना अखेर करावे लागले तरी ब्रिटनचे अवमूल्यन होऊ देण्यास ते तयार नाहीत. पार्लमेंटमध्ये ते चर्चिलप्रमाणेच पाय उचलून टाकीत येतात व आपल्या बुलंद आवाजाने ते गाजवितात. पार्लमेंटला त्यांनी पुन्हा शान आणली आहे. काळच त्यांच्या कर्तृत्वाचे योग्य मूल्यमापन करील.

## प्रकरण विसावे

# साऱ्यांचे जीवन व्यापणारे टेलिव्हिजन

टेलिव्हिजनने साऱ्याच पाश्चात्त्य लोकांचे जीवन व्यापले आहे. त्याचबरोबर वृत्तपत्र व चित्रपट व्यवसायावर जबरदस्त परिणाम करून त्याचे स्वरूपही टेलिव्हिजनने पालटले आहे. ' ब्रेकफास्ट ' झाला की, ' इंटरनॅशनल हाऊस 'मध्ये मोफत मिळणारी ' वेस्टर्न मेल ' दैनिकाची प्रत प्रत्येकजण उघडी ती टेलिव्हिजनचा कार्यक्रम पाहण्यासाठी. ' कॅबेट ' या कार्यक्रमाचे सर्वांत आकर्षण नायजेरियातील आदिदेजीला. आज कोणता चित्रपट टेलिव्हिजन-वर पाहण्यास मिळणार ही दुसरी चौकशी. 'डॅनी के शो' आज आहे हे कळले की, सर्व मुली हजर होणार हे ठरलेले. ' पॅनोरमा ' हा कार्यक्रम तसाच सर्वांचा आवडता. ' अर्ली बर्ड 'ने टेलिव्हिजनच्या क्षेत्रात तर कमाल क्रांती केली आहे. भारताचा मागासलेपणा या बाबतीत फार जाणवे. कारण आज नव्याने स्वतंत्र झालेल्या आफ्रिकेतील देशात टेलिव्हिजनचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. भारताला तो अजून परवडत नाही असे उत्तर देताना आमच्या दारिद्र्याची आम्हांला तेथे लाज वाटे. दिल्लीतील टेलिव्हिजन व त्यावरचे भिकार कार्यक्रम मी पाहिले होते. १२ मैलांच्या परिसरात फक्त ते दिसतात. तेही काही फार स्पष्टपणे दिसत नसत; आणि येथे मी काय पाहात होतो ?

मी ब्रिटनमध्ये पोहोचलो, त्याच्या आधीच्या आठवड्यातच या ' अर्ली बर्ड 'चे उद्घाटन झाले होते. एकाच वेळी संबंध जगात काय चालले आहे याचे दर्शन एका कार्यक्रमाने आम्हाला टेलिव्हिजनवर घडविण्यात आले. टेलस्टार ही काय चीज आहे याचा पत्ता तोपर्यंत

मला नव्हता ' टेलस्टार ' हा मानवनिर्मित उपग्रह सबंध जगातील कार्यक्रम एकमेकांना देण्याचे काम सहजपणे करू शकतो. अमेरिकेतील 'कार्यक्रम ' टेलस्टार 'मार्फत ब्रिटनला येतो तर ब्रिटनचा तसाच अमेरिकेत जातो. ' अर्ली बर्ड ' या उपग्रहाच्या मार्फत सादर झालेला पहिला महत्त्वाचा कार्यक्रम पाहण्याची संधी आम्हांला मिळाली. डोमिनिकन रिपब्लिकमध्ये त्या वेळी बंड चालले होते. तेथे चाललेली लढाई आम्ही पडद्यावर पाहात होतो. क्षणार्धात कॅनडातील बँक दरोडा प्रकरण सुरू झाले. कॅनडा व लंडनमधील पोलीस या कार्यक्रमातूनच एकमेकांशी बोलले. ते बोलणे आम्ही ऐकत होतो व त्यांना पाहात होतो. अमेरिकेचे अध्यक्ष श्री. जॉन्सन यांचे खास राजकीय सल्लागार श्री. बंडी यांना लंडनहून दोन संपादकांनी प्रश्न विचारले. लंडनमधील हे संपादक व त्यांना वॉशिंग्टनहून उत्तरे देणारे श्री. बंडी आम्ही एकाच वेळी पडद्यावर पाहात होतो. शास्त्रीय प्रगतीचे हे विलोभनीय दृश्य पाहात असतानाच या दोन संपादकांचे प्रश्न वॉशिंग्टनमध्ये बसलेल्या बंडींना ऐकू येईनासे झाले. " आमचे बोलणे तुम्हांला ऐकू येत नाही काय ? " असे सारखे दोन्ही संपादक बोलत होते आणि खरोखरच त्यांना काहीही ऐकू येईना. ' अर्ली बर्ड ' उपग्रह एकमेकांना चित्रे सादर करीत होता, परंतु आवाज त्या दिवशी काही पोहोचवू शकला नाही. अखेर बंडी यांच्याबरोबर तेथेच असलेल्या टेलिव्हिजन प्रतिनिधीनेच त्यांची मुलाखत घेतली. अर्थात विषय होता व्हिएटनाम. खुद्द बंडींच्या तोंडून अमेरिकेचे व्हिएटनामविषयक धोरण आम्ही ऐकत होतो. अर्थात मुत्सद्द्याची भाषा ही मोठी सौम्य असते व त्यामधून निर्णायक अर्थ फार कमी निघतो हे त्यांच्या भाषणावरून पुन्हा जाणवले. लेबॅनॉनपासून न्यूयॉर्कमधील शेअर बाजारापर्यंत प्रत्येक ठिकाणी टेलिव्हिजनचा प्रतिनिधी माइक घेऊन उभा होता व तेथील घडमोडींची सचित्र माहिती देत होता. जग किती जवळ आले आहे त्याची प्रचीतीच या ' अर्ली बर्ड 'ने आम्हांला दिली.

काही दिवसांनी एक दुसरा कार्यक्रम टेलिव्हिजनवर आम्ही पाहिला. त्यात आयसेन-हॉवर व मॉन्टगोमरी यांचे संभाषण दाखविण्यात आले. दोघेही दुसऱ्या महायुद्धातील दोस्तांचे सेनानी. त्यांनी नंतर कथन केलेल्या युद्धइतिहासाने त्यांच्यात मत भेद निर्माण झालेले. आयसेनहॉवर हा सामान्य दर्जाचा सेनापती असल्याचे उद्गार मॉन्टीच्या तोंडी काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले होते. त्यामुळे आइक व अमेरिकन जनता फार रागावली होती. तेच आइक व मॉन्टी अनेक वर्षांनी एकमेकांशी बोलत होते. परंतु दोघांच्या मध्ये अटलांटिक महासागर होता. " How are you Ike ? ", " How are you Monty ? "

" We look old now. "

अशा तऱ्हेचे अनौपचारिक प्रश्न ते एकमेकांना करीत होते. ती मुलाखत मात्र विशेष चांगली झाली नाही. कारण त्या नव्या शोधाने हे श्रेष्ठ सेनापतीही भांबावलेले दिसले. आपल्याशी एक चित्र बोलते आहे, प्रश्न विचारते आहे व ताबडतोब उत्तराची अपेक्षा करीत आहे हे पाहून युद्धआघाडीवर न गडबडलेले सेनापती या प्रसंगी मात्र थोडे घाबरलेले दिसले. वयाचाही तो परिणाम असावा.

या सर्वांपेक्षा ' अर्ली बर्ड ' ने गाजविला कार्यक्रम तो कॅशियस क्ले व सॉनी लिस्टन यांच्यामधील अजिंक्यपदाच्या लढतीचा. हा कार्यक्रम ब्रिटिश वेळेप्रमाणे पहाटे साडेतीन वाजता व्हावयाचा होता. परंतु बी. बी. सी. ने तर लोकांना जागवावयाचे ठरविले होते. सबंध रात्रभर त्या दिवशी टेलिव्हिजनवर कार्यक्रम होता. जगातील उत्तमोत्तम मुष्टियोद्ध्यांची झुंज दाखविणारे माहितीपट, इतर काही सामान्यांचे चित्रपट दाखवून बी. बी. सी. ने प्रेक्षकांची भरपूर करमणूक करावयाचे ठरविले होते. आमचे ' इंटरनॅशनल हाऊस ' तर रात्रभर जागेच होते. रात्रीची झोप विसरून टेलिव्हिजन-सेटसमोर आम्ही सर्वजण बसलो होतो. ( त्या वेळी भारतात सकाळचे आठ वाजले असतील. ) ही गाजलेली झुंज सुरू झाली व जेमतेम मिनिटभरात संपली. ' काय झाले ? ' असा प्रश्न एकमेकांस विचारीत आम्ही सर्वजण उभे राहिलो व मग त्या रात्री जी चर्चा सुरू झाली ती संपलीच नाही. ब्रिटनचा किनारा सोडेपर्यंत ती चालूच होती.

दुसऱ्या दिवसापासून वर्तमानपत्रांतून तडाखेबंद अहवाल प्रसिद्ध होऊन लागले. " खोटी झुंज ", " शुद्ध फसवणूक ", " मुष्टियुद्धाच्या इतिहासातील काळी रात्र ", " या लुटारूंना आवरा " अशा अनेक विशेषणांची लाखोली क्ले-लिस्टन यांच्यावर वाहिली जाऊ लागली.

टेलिव्हिजनच्या पडद्यावर आम्हाला प्रत्यक्ष त्या रात्री दिसले ते दृश्य असे. कॅशियस क्ले, हा सुरुवातीपासूनच एखाद्या विजेत्यासारखाच दिसत होता. त्याचे चालणे, बोलणे, वागणे राक्षसी वाटत होते. त्या मानाने लिस्टन आधीपासूनच घाबरलेला दिसत होता व त्याचा चेहराही पडलेला दिसला. सुरुवातीस एका सुप्रसिद्ध अमेरिकन गायकाने राष्ट्रगीत गायले त्यावेळी लिस्टन शिस्तीत उभा राहिला. पण क्लेने मात्र येण्याचेच नाकारले.

झुंज सुरू झाली त्या वेळी दोरीवरच्या उड्या माराव्या तसा नाचत, कॅशियस क्ले हा लिस्टनच्या समोर आला व थयथय नाचतच उभा राहिला होता. लिस्टनला चिडविण्याचा

व डिवचण्याचा हा प्रयत्न असावा असे काही क्रीडाप्रतिनिधींचे मत पडले. या लढतीस फार गर्दी लोटली नव्हती. पडद्यावर फार मोठी गर्दी दाखविण्यातही आली नाही. नंतर तर विद्यार्थ्यांना मोफत सोडण्यात आले, असे वृत्त एका चलाख बातमीदाराने प्रसिद्ध केले !

हा सारा प्रकार पुरे दीड मिनिटही चालला नाही. क्लेने उजव्या हाताने मारलेला फटका मी पडद्यावर पाहिला. त्या वेळी तरी हा फटका जोराने आदळला असे मुळीच वाटले नाही. लिस्टन खाली वाकला होता व क्षणात तो खाली पडला तो आडवाच झाला. उठण्याचा प्रयत्न त्याने एकदा केला. ढोपरावर तो उठलेला दिसला, पण पुढच्याच क्षणी तो खाली पडला.

लिस्टन पुन्हा उठला व झुंज देण्यास त्याने सुरुवातही केली. पण ही लढत रंगण्याआधीच पंच जर्सी जो वॉलकॉटमध्ये आला व सामना संपल्याचे त्याने जाहीर केले.

लिस्टन खाली कोसळला तेव्हा कॅशियस क्ले मोठमोठ्याने ओरडत होता. " यू आर नो–गुड, कॉवर्ड ! गेट अप अँड आय वुइल किल यू ! गेट अप–यू बिग अग्ली बियर ! "

झुंज संपल्यानंतरही क्लेच्या वागणुकीत फरक पडला नाही. ध्वनिक्षेपकावरून आरडाओरडा करीत त्याने फ्लाइड पॅटर्सनला समोर आणवले व लढण्याचे आव्हान दिले. प्रेक्षक मात्र कॅशियस क्लेचा द्वेष करताना दिसत होते. लिस्टनचा चेहरा त्यानंतर पडद्यावर एकदाही दाखविला नाही.

जागतिक अजिंक्यपदाच्या नावाखाली झालेली ही झुंज अगदी नकली होती असेच बहुतेकांचे मत आहे. ते मत आम्हांला ताबडतोब टेलिव्हिजनवर मुलाखतीद्वारे ऐकविण्यात आले. ब्रिटनचे अनेक नामावंत मुष्टियोद्धे अल्पावधीत टेलिव्हिजनवर आले. सोनी लिस्टनला प्राप्तीकराचे बरेच देणे झाले होते व या सामन्यात त्याला मिळणारे सारे उत्पन्न अमेरिकन सरकार जमा करणार होते. रिंगणात तो उतरलाच नसता तर हे देणे फेडण्याइतके पैसे त्याला मिळणे कठीणच होते. त्यामुळे तो नावापुरता रिंगणात उतरला व साफ आडवा झाला. शिवाय क्ले हा त्याच्यापेक्षा दसपट चपळ असल्यामुळे, लिस्टन अगदी व्यवस्थितपणे खेळला असता, तरीही त्याला जिंकण्याची आशा नव्हती. मग फुकट मार कशाला खायचा असे त्याने ठरविले असावे.

टेलिव्हिजनवर हे सारे पाहिल्यावर वृत्तपत्रात वाचावयाचे काही उरले नव्हते. दुसऱ्या दिवशी 'थॉमसन हाऊस' मधील आमच्या वर्गात गेलो तेव्हा हाच विषय तेथे चर्चिला होता. टेलिव्हिजनने वृत्तपत्रांवर कोणता परिणाम केला आहे याची तपासणीच या प्रकरणाच्या निमित्ताने आम्ही केली.

टेलिव्हिजनने वृत्त दिल्यानंतरच्या घटनांचा मागोवा घेणे वृत्तपत्रांना येथे भागच पडते. " Newspapers provide followups to the news given by television ", असे तेथे मानले जाते. बातमीतील ताजेपणा टेलिव्हिजन काढून घेते. त्यामुळे वृत्तपत्रांची फार पंचाईत होते. परंतु हीच क्ले-लिस्टन लढत व्यवस्थितपणे घडली असती तर वृत्तपत्रांची अधिक पंचाईत झाली असती. परंतु त्यांच्या सुदैवाने ती झुंज वादविषय झाली व मग वृत्तपत्रांनी तो वाद रंगविला.

ही लढत खोटी असल्याचे आपल्या खास प्रतिनिधीचे वृत्त अनेक पत्रांनी देण्यास सुरुवात केली. अनेकांनी अनेक गोष्टी निदर्शनास आणल्या. लिस्टन खाली पडला तेव्हा पंच वॉलकॉटनी आकडे मोजण्यास ( काऊंट ) सुरुवात करावयास हवी होती. पण तो खुशाल गप्प बसला. आडवा झालेल्या खेळाडूच्या कानांत हे आकडे ओरडावयाचे व त्यामुळे तो पडेल वीर त्वेषाने उठतो ही मुष्टियुद्धाची सर्वमान्य पद्धती. परंतु येथे तर रिंगणाबाहेरील टाइम कीपरने आकडे मोजले व झुंज पुन्हा सुरू झाल्यावर लिस्टन उशिरा उठल्याचे त्याने जाहीर केले.

अर्थात ' टेलिव्हिजन 'वालेही काही स्वस्थ बसले नव्हते. ते अनेकांच्या या विषयावर मुलाखती घेत होते. ही झुंज खोटी आहे असे म्हणणाऱ्याविरुद्धची बाजूही आम्ही टेलिव्हिजनवर ऐकली. क्लेने मारलेला तो फटका जपानी द्वंद्वयुद्धात ' कॅरेट ' या नावाने ओळखला जातो. कानाच्या मागे हा फटका मारावयाचा असतो व त्यामुळे माणूस प्राणही गमावतो. आपण मारलेला तो फटका ' कॅरेट ' व ' अँकर पंच ' यांचे मिश्रण होता व आपण गुप्तपणे त्याचा सराव करत होतो असे खुद्द क्लेने टेलिव्हिजनवर येऊन सांगितले.

यावर एका जपानी तज्ज्ञाचे म्हणणे एका वृत्तपत्राने प्रसिद्ध केले, ते असे की, मुष्टि-युद्धाचे हातमोजे चढविल्यावर या फटक्याचा परिणाम होऊ शकत नाही. चर्चिलचे शरीर-रक्षक म्हणून एकेकाळी काम करणाऱ्या डिलन मॅकार्थी यांनी " क्लेचा हा फटका ' कॅरेट ब्लो 'च होता व त्यावर कायद्याने बंदी घातली पाहिजे " अशी मागणी वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत केली. टेलिव्हिजन व वृत्तपत्रे यांच्या परस्पर संबंधाचा हा नवा अविष्कार मोठा बोधप्रद होता.

टेलिव्हिजन वृत्तपत्रांवर कशी मात करते याचा प्रत्यय पोलाद राष्ट्रीयीकरण प्रकरणाच्या वेळी पुन्हा आला.

मजूर मंत्रिमंडळाने ब्रिटनमधील पोलाद धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्याचे विधेयक

पार्लमेंटमध्ये आणले होते व या प्रकरणाने विल्सन मंत्रिमंडळाचा पराभव होतो किंवा काय असा प्रश्न निर्माण झाला होता. रात्री उशिरापर्यंत पार्लमेंटचे अधिवेशन चालले होते. उपनेते व अर्थमंत्री श्री. जॉर्ज ब्राऊन रात्री ९–५९ ला आपले भाषण संपवून खाली बसले. तो-पर्यंत श्री. वॅट, श्री. डोनेली व श्री. मिकार्डो हे तीन बंडखोर मजूर खासदार मंत्रिमंडळाला पाठिंबा देतील असे वाटत नव्हते. परंतु श्री. ब्राऊन यांचे उत्तरादाखल भाषण संपल्यावरही वुडरो वॅट उभे राहिले. श्री. ब्राऊन यांची खरोखरच पोलाद उद्योगातील लोकांशी बोलावयाची तयारी आहे काय असे त्यांनी विचारले. " लिसन इज दि वर्ड ", इतकेच ब्राऊन बोलले. वॅटस् व इतर दोघांनी विरोधी मत नोंदण्याचा आपला निर्णय बदलला व तिघांची मते मजूर मंत्रिमंडळाला मिळाली. हे सर्व पुरे होईपर्यंत १०–१० झाले आणि फक्त १० मिनिटांनी म्हणजे १०–२० ला टेलिव्हिजनवर ही सबंध बातमी आली. रात्री ११ पर्यंत " पोलाद राष्ट्रीयीकरण " टेलिव्हिजनने इतक्या उत्कृष्टपणे सादर केले की, दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रे वाचण्याची जरुरीच राहिली नाही. त्यांनी बंडखोर खासदार वॅट, डोनेली यांच्या मुलाखती पडद्यावर ऐकविल्या. हुजूर नेते व पोलाद विधेयकाला पोलादी विरोध उभा करणारे श्री. मॅक्लॉड यांची मुलाखत टेलिव्हिजनने घेतली. हुजूर मंत्रिमंडळ आले की पुन्हा आम्ही हे धंदे खाजगी मालकीचे करू असे त्यांनी बजावले. चाळीस मिनिटांच्या कार्यक्रमात ब्राऊनपासून मॅक्लॉडपर्यंत साऱ्यांना टेलिव्हिजनवर आणले व सर्व विषय त्यांनी सांगोपांग सादर केला. रात्री १०–१० वाजता घडलेल्या इतक्या मोठ्या घटनेची इत्थंभूत माहिती घेऊन ११ वाजता आम्ही झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्र वाचण्याचे काहीच कारण उरले नव्हते. टेलिव्हिजनचे सामर्थ्य त्या रात्री पुन्हा जाणवले.

मी तेथे असतानाच राष्ट्रकुल पंतप्रधानांची परिषद लंडनला झाली. कै. लालबहादुर शास्त्री प्रथमच या परिषदेला पंतप्रधान म्हणून आले. ही परिषद लंडनला चालली होती व मी कार्डिफला १०० मैलांवर होतो. परंतु परिषद प्रतिनिधींच्या घोळक्यातच मी वावरत आहे असे सतत मला वाटत होते. याचे कारण टेलिव्हिजन. कारण या सर्व पंतप्रधानांच्या मागे टेलिव्हिजनचा कॅमेरा धावत होता. पंतप्रधान विल्सन यांच्यापासून खोचक निवेदने करणारे टान्झानियाचे न्येरेरे यांचे विचार आम्ही सारखे ऐकत होतो. घानाचे अंक्रुमा यांच्या-भोवती तर ब्रिटिश पोलिसांची सतत साखळी होती. 'बुलेट–प्रूफ' बंद गाडीतून ते लंडनमध्ये फिरत होते. त्यांचा खून होणार असल्याच्या बातम्या तेथेही होत्या. कुणी बॉम्ब ठेवील या भीतीने त्यांची मोटार मधूनमधून तपासली जाई. या मोटारीच्या मागेही

टेलिव्हिजनचा कॅमेरा होता. त्या वेळी व्हिएटनाम प्रकरणाने या राष्ट्रकुल परिषदेला ग्रासले होते. आपले कच्छ प्रकरण नुक्तेच झाले होते. परंतु त्याकडे लक्ष देण्यास फारसे कुणी तयार नव्हते. शास्त्रीजींची तर ही पहिली भेट. त्यामुळे ते लाजल्यासारखे वागत होते. टेलिव्हिजनवर ते इतर काही पंतप्रधानांबरोबर आले. परंतु त्यांनी छाप मुळीच पाडली नाही. २१ वर्षांत भरलेली ही चौदावी राष्ट्रकुल परिषद होती व या २१ वर्षांत राष्ट्रकुलचे २१ सभासद झाले होते. इतके सभासद या परिषदेस प्रथमच आले व या २१ मध्ये आफ्रिकी राष्ट्रे ९ होती. त्यांचे नेते टेलिव्हिजनवर येऊन बोलत होते. त्यांपैकी गाजले ते टान्झानियाचे श्री. न्येरेरे. कोणत्याही प्रश्नाला ते ताडकन उत्तर देत. श्री. विल्सन यांच्याशी त्यांनी सुरुवातीलाच दोन हात केले होते. " चीन तुम्हांला अधिक जवळचा वाटतो हे खरे आहे काय ? " असा सरळ सवाल त्यांना टेलिव्हिजनवर टाकण्यात आला तेव्हा ते गरजले, " मला या प्रश्नाचा अर्थच कळत नाही. ब्रिटनशी जितकी माझी मैत्री आहे तितकीच चीनशी आहे. " झांबियाचे केनेथ कौंडा बाहेर व टेलिव्हिजनवर आवेशाने बोलत होते. काळे खंड किती जागे झाले आहे व उद्याच्या जगाचे राजकारण ते आपल्या हाती खेचून घेतील किंवा काय अशी शंका तो आवेश पाहून माझ्या मनात निर्माण झाली. नायजेरियाचे पंतप्रधान अबुबकर तालेवा हे आपला मोठा देह व त्यापेक्षा अघळपघळ पोषाख सावरीत टेलिव्हिजनवर आले. त्या वेळी आमचे नायजेरियन मित्र श्री. अदिदेजी व श्री. रॉबीन यांना आपला आनंद लपविता आला नाही. त्यांची आता माझी भेट नाही. कारण त्यांच्या तालेवांचे नायजेरियात नंतर एक दिवस शिरकाण झाले. अंक्रुमा पदच्युत झाले. तेथील राजकारणच आता बदलले आहे.

टेलिव्हिजनवरील अनेक कार्यक्रमांचा आढावा स्थलाभावी घेणे कठीण. परंतु माणसाला बहुश्रुत करणारे हे शिक्षणाचे व प्रचाराचे माध्यम आपल्याकडे लौकर येणे आवश्यक आहे यात शंका नाही. " पॅनोरमा " या कार्यक्रमात तर त्या आठवड्यातील प्रमुख राजकीय अगर सामाजिक घटनेवर एक संपूर्ण कार्यक्रम सादर होत असे. त्या विषयाचा एक ' पॅनोरमिक व्ह्यू ' देण्याचा हा प्रयत्न असे. त्याचा दर्जा अतिशय उच्च असे. ऑक्सफर्ड विद्यापीठात ' स्टडी इन डिबेट ' चा उपक्रम चालतो. ब्रिटनमधीलच नव्हे तर सबंध जगातील राष्ट्रांना उत्तम वक्ते असलेले नेते असावेत म्हणून या विश्वविख्यात विद्यापीठात वक्तृत्वाचे हे सत्र उघडले जाते. वर्षातून एकदा एका विषयावर सकाळपासून व्याख्यानांना सुरुवात होते व मग ती २४ तास अखंड चालते. एखाद्या जागतिक नेत्याला एक मुख्य

भाषण देण्यास बोलाविले जाते. त्या वेळी अमेरिकेचे डीन रस्क यांना बोलाविले होते व व्हिएटनाम हा विषय ठेवला होता. भाषणात अडथळे आणणे, उपप्रश्न विचारणे असे प्रकार सतत चालू असतात. परंतु त्यात हुल्लडबाजी नसते. ऑक्सफर्डचे विद्यार्थी काही पट्टीचे वक्ते. त्यांनी रस्क महाशयांना चांगलेच फैलावर घेतले. हा सर्व सोहळा पाहण्यासाठी ऑक्सफर्डचे माजी विद्यार्थी, इतर विद्यार्थी तेथे जातात. त्यांच्या बाहेर रांगा लागतात. जशी आत जागा होईल तसा प्रवेश मिळतो. वक्तृत्वाची ही जणू पाणपोई. हा अपूर्व सोहळा आमच्या बंद खोलीत बसून निवांतपणे पाहण्याचे सुख आम्हांला दिले ते पुन्हा टेलिव्हिजनने. तेथील वास्तव्यात आम्हांला जे ज्ञान मिळाले त्यापैकी अर्धे टेलिव्हिजनने दिले. अनेक चित्रपट आम्ही टेलिव्हिजनवर पाहिले. अनेक गाजलेले सामने पाहिले. विंबलडेनचे टेनिस सामने पाहिले. फुटबॉलचे तुफान रंगलेले सामने पाहिले.

या माध्यमाने राजकीय नेत्यांचे भवितव्यही संकटात आणलेले आहे. टेलिव्हिजनवर चांगला न दिसणारा नेता लोकप्रिय होऊ शकत नाही. श्री. हॅरॉल्ड विल्सन यांचे व्यक्तिमत्त्व इतके रुबाबदार दिसते की, त्यामुळेच ते आपल्या प्रेक्षकांना जिंकतात. हुजूरपक्ष नेते श्री. ॲलेक डग्लस ह्यूम यांना राजकारणातून उठविले ते अर्धेअधिक या टेलिव्हिजनने. त्यांचा हडकुळा चेहरा व गळा पडद्यावर इतका वाईट दिसत होता की, लोक त्यांचे भाषण ऐकण्यासही तयार नसत. दर महिन्यातून एकदा या नेत्यांना आपल्या पक्षाची भूमिका टेलिव्हिजनवर सांगण्याची संधी मिळते. त्या वेळी जो प्रभाव टाकील तो टिकला असे मानले जाते. श्री. विल्सन यांचे सहकारी श्री. ब्राऊन हेच खरे पंतप्रधान व्हावयाचे. परंतु त्यांचे टेलिव्हिजनवरील चित्र इतके बेढब, उग्र दिसले की लोकांनी त्यांना अव्हेरले. केनेडींच्या खुनाच्या दिवशी श्री. ब्राऊन यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी टेलिव्हिजनवर बोलाविण्यात आले तेव्हा ते खूप प्यायलेले होते. त्यामुळे त्यांचे बोलणे घसरले. त्यावर वृत्तपत्रातून टीका आली. तेव्हापासून श्री. ब्राऊन यांनी टेलिव्हिजनचा धसकाच घेतला. पार्लमेंटमधील चर्चा टेलिव्हिजनवर दाखवावी या मागणीस ब्रिटिश खासदारांनी प्रथम साफ नकार दिला. आपली खरी स्थिती मतदारांना कळू नये हा त्यांचा उद्देश असावा. आता निर्णयात बदल करण्यास ते तयार झाले असल्याचे कळते.

बातम्या हे टेलिव्हिजनवरील सर्वांत मोठे आकर्षण. त्यात ब्रिटनमध्ये बी. बी. सी. व टी. डब्ल्यू. डब्ल्यू. अशा दोन संस्थांतर्फे टेलिव्हिजनचे कार्यक्रम सादर होतात. दोन्ही स्वायत्त संस्था व टी. डब्ल्यू. डब्ल्यू. तर संपूर्ण खाजगी. या दोघांच्या स्पर्धेमुळे लोकांना अधिका-

धिक चांगले कार्यक्रम ऐकावयास मिळतात. बातम्या देण्यातही या दोघांत जबरदस्त स्पर्धा. रात्रीच्या बातम्या सर्वांत महत्त्वाच्या. टी. डब्ल्यू. डब्ल्यू. वर ८.५५ ला रात्री बातम्या येत तर बी. बी. सी. वर रात्री ९-१५ ला. वार्तासोबत तेथील छायाचित्रे दिली जात असल्याने ती अतिशय परिणामकारक ठरतात. श्री. यशवंतराव चव्हाण यांना संरक्षण-मंत्री या नात्याने कच्छच्या सीमेजवळ उतरताना आम्ही तेथे पाहात होतो. वाळवंटातून रणगाडे चाललेले दाखविले जात होते, आणि ही दृश्ये पाहताना पाकिस्तानी मित्र श्री. अलि शेजारीच बसलेला असे. बी. बी. सी. चे तर खुद्द विल्सन यांच्याशी वाकडे आहे. बी. बी. सी. ही हुजूरपक्षीय धार्जिणी असल्याचे श्री. विल्सन यांचे म्हणणे. भारताच्या बाबतीत तर बी. बी. सी. अतिशय पक्षपाती आहे. काश्मीर प्रकरणी तर त्यांचा आपल्या विरुद्ध सतत प्रचार चालू असतो. बातमीबरोबर छायाचित्रे देण्याच्या प्रयत्नातून गैरप्रकार कसे होतात याचा अनुभव भारताच्याच बाबतीत आम्ही तेथे घेतला. शेख अबदुल्लांची प्रथम सुटका झाली ते वृत्त तेथे टेलिव्हिजनवर दाखविताना त्यांच्या प्रचंड स्वागताची दृश्ये दाखविली जात होती. या चित्रांवरून तेथे पाहणाऱ्यांची साहजिकच कल्पना अशी झाली की, भारताने त्यांना आता तुरुंगातून सोडल्यावर ही अफाट गर्दी त्यांच्या स्वागताला झाली. लोक हार घालीत होते, फुले उधळीत होते. शेख अबदुल्लांच्या मोटारीमागून धावत होते. परंतु ही सारी दृश्ये १९४७ मधील होती. शेख अबदुल्लांची प्रथम भारताच्या मध्यस्थीनेच सुटका झाली तेव्हाची होती. त्या वेळी शेख अबदुल्ला खरेखुरे शेर-ए-काश्मीर होते. या वेळी त्यांना मिरवणूक काढण्याची संधीही मिळालेली नव्हती. परंतु जुनी चित्रे आता दाखवून बी. बी. सी. ने लोकांची चांगलीच दिशाभूल केली होती. त्यांच्या प्रतिनिधींची गाठ आमच्या शिक्षकवर्गात पडली तेव्हा त्याने सहजपणे उत्तर दिले, “ या गोष्टी जाणूनबुजून केल्या गेल्या असे समजू नका. बातमी आली की, तिला साजेशी चित्रे हवी असतात. ताजी मिळाली नाहीत तर चित्रसंग्रहालयातून ती काढली जातात. त्यामधील हा प्रकार. ” अर्थात आमचे समाधान होणे शक्य नव्हते.

काही असो टेलिव्हिजनने आम्हांला चार महिने मंत्रमुग्ध केले. हप्त्यावर ते सेट्स मिळत असल्याने बहुतेकजण टेलिव्हिजन घेतात. टेलिव्हिजनने रेडिओला मात्र साफ कालातीत ठरविले आहे. टेलिव्हिजनवरील जाहिराती हासुद्धा एक लेखनाचा स्वतंत्र विषय आहे. काही जाहिराती रोज पाहूनही आम्ही कंटाळलो नाही. “ Put a tiger into your tank ”, ह्या एस्सो कंपनीने केलेल्या जाहिरातीने तर सारे ब्रिटन व्यापले होते. मोटारी-

च्या पेट्रोल टाकीत वाघ शिरत असल्याच्या मोठमोठ्या जाहिराती अनेक ठिकाणी झळकलेल्या होत्या. टेलिव्हिजनच्या या जाहिरातीत तो विक्रेता म्हणे, " There is tiger in your tank ", आणि मग मोटारचा मालक मोठे डोळे करून टाकीत डोकावून पाही; आणि आतून वाघाची डरकाळी येई. ही घोषणा इतकी लोकप्रिय झाली होती, की ती शोधून काढणाऱ्याची मुलाखत वृत्तपत्रांनी घेतली. बी. बी. सी. आपल्या टेलिव्हिजनवर सिगारेटच्या जाहिराती घेत नाही. त्या फक्त टी. डब्ल्यू. डब्ल्यू.वर येतात. सिगारेटने कॅन्सर होतो हे बी. बी. सी. ने मान्य केलेले दिसते. मात्र मदिराक्षीचे वर्णन करताना कुणी हयगय करीत नाही. ' करेज इज दी वर्ड ' ही गिनेस बिअरची जाहिरात इंटरनॅशनल हाऊसमध्ये सर्वांत लोकप्रिय. " Good movements are worth waiting for " असे म्हणत एका आवळलेल्या मुठीतील सुंदर ग्लासात फेसाळ बिअर पडद्यावर येई. सारेजण मग कार्यक्रम सोडीत व पेनार्थ स्टेशनच्या बारकडे वळत.

प्रकरण एकविसावे

# बिटल्स व बीटनिक्स यांचे धुंद जग

यिहा...यिहा...यिहा !
आहा...आहा...आहा !
अिअिअी...अिअिअी ..ओीओीओी !

लावणीची ललकार ऐकून अस्सल मराठी गड्याचे देहभान जसे हरपते तसे हे चमत्कारिक चीत्कारही ब्रिटनमधीलच नव्हे तर संबंध पाश्चिमात्त्य जगातील तरुणांना आज मोहून टाकीत आहेत. ब्रिटनमधील माझ्या वास्तव्यात, उंच आवाजात—म्हणजेच कर्कश सुरात घुमलेले हे सूर मी अनेकदा ऐकले. पेनार्थच्या ' इंटरनॅशनल हाऊस 'मध्ये ' पॉप म्युझिक 'चा कार्यक्रम टेलिव्हिजनवर सुरू झाला की त्याची प्रतिक्रिया तेथील जिन्यावरून उतरणाऱ्या पावलांवरही होई. पाचही मजल्यांवरचे सारे आंतरराष्ट्रीय रहिवाशी खाली येत. टेलिव्हिजनचा सेट ठेवलेला हॉल तरुण-तरुणींनी भरून जाई.

" ओह ! विच पॉप ग्रुप इज सिंगिंग टु-डे ? "

" बिटल्स् "

" वंडरफुल ! "

" ओऽह. नो. बॅचलर्स ? "

" नॉट बॅड. आय् लाइक देस अल्सो. "

अशी प्रश्नोत्तरे सुरू होत. मेक्सिकोतून आलेली आमेंदा त्यात असे. इराकच्या आसिया

तुराहीची तीच भावना असे. खुर्च्या पकडण्यासाठी मग झुंबड उडे. नायजेरियाचे प्रतिनिधी मग मागे नसत. सिओरे लिओनचा पाहुणा आपला बावळटपणा विसरून डोलू लागे. जर्मन विद्यार्थिनी इंगा आपला प्रियकर आलेला दिसेल अशा बेताने जागा पकडी. परंतु देशोदेशींची बंधने तोडून लोकप्रिय झालेल्या या संगीताचे वेड काय सांगावे ? थोड्याच वेळात ही आंतर-राष्ट्रीय मंडळी त्या सुरात रंगून जात. त्या निवासस्थानाच्या नियमांमुळे व ऐकणाऱ्यांच्या वयोमर्यादेमुळे नंतरच्या बेहोषीला मुरड पडे. परंतु टेलिव्हिजनच्या पडद्यावरची दृश्ये त्या परिसीमा ओलांडून केव्हाच पुढे गेलेली दिसत. नृत्याला उधाण आलेले असे. बिटल्सचे संगीत व पोरापोरींचे बेफाम नृत्य यांनी वेग घेतलेला असे. बिटल्सचे देहभान विसरून टाकणारे ते आवाज अगदी उच्च स्वरात घुमलेले असत. गिटारचे गहिरे सूर आसमंत भरून टाकीत. तीन काठ्यांवर आडवे झालेले तीन ठाळे ठणठणू लागत व त्या उन्मादक सुरांना बेहोषी आलेली असे. मधेच ठेवलेला तो वर्तुळाकार ढलपा जोष प्रकट करी. सारे वातावरण कसे धुंद होई. चढेल सुरांनी, वाद्यांच्या कल्लोळांनी ते नृत्यगृह व्यापून टाकले जाई आणि त्या सुरांबरोबर, लाटांवर तरंगणाऱ्या होडीप्रमाणे पावले ताल धरत. तो ताल, तो ठेका सर्वांना स्वतःच्या प्रतिष्ठितपणाचा विसर पाडी.

वय, देश यांच्या मर्यादा ओलांडून मने जिंकणारी ही संगीतामधील क्रांती घडवून आणली, ती लिव्हरपूलच्या चार कामगारपुत्रांनी. जॉन, पॉल, जॉर्ज व रिंगो अशा घरगुती नावांनी ते सर्वत्र ओळखले जातात. ब्रिटिशांचे परंपराप्रेम, शिष्टाचाराचे कडक नियम यांनी वैतागलेल्या, संतप्त झालेल्या, तरुण पिढीचे प्रतिनिधी ठरतील असेच हे चारजण. व्यवस्थित पोषाख, नीटनेटकी राहणी यांच्या अतीआग्रहाने चिडलेल्या ब्रिटनमधील असंख्य तरुणांपैकी हे चार. दुसऱ्या महायुद्धाने दुभंगलेल्या जीवनाला पुन्हा नवा तजेला आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेकांपैकीच हे चार.

लिव्हरपूलसारख्या बकाल शहरात राहणाऱ्या श्रमजीवी मातापित्यांचे हे पुत्र. लिव्हरपूल म्हणजे मुंबईचा लालबाग–परळ विभाग. अर्थात इतका अस्वच्छ व चाळींचा नव्हे. त्यात तेही मोठे बंदर. देशोदेशींच्या बोटी तेथे येणार व त्याबरोबर अनेक चांगल्या-वाईट गोष्टींची आयात अपेक्षित. ब्रिटनमध्ये चातुर्वर्ण्य नाहीत. अगर जातीजमातींचे भेद नाहीत. परंतु व्यवसायाने माणसाचे इतर धर्म ठरतातच. गोदीत काम करणारा व गिरणीत राबणारा लिव्हरपूलचा नागरिक हा लंडनच्या रहिवाशापेक्षा कितीतरी वेगळा. त्याच्या आवडीनिवडी निराळ्या. त्याच्या स्वच्छतेच्या कल्पना थोड्या माफकच. ‘ लिव्हरपूल इज ए स्टिंकिंग

सिटी ' असे सांगणारे अनेकजण लंडनमध्ये भेटतात.

अशा लिव्हरपूलचे हे चार गायक. ज्यांनी ' रॉक ॲन रोल 'ची लय घेतली, आपल्या बहारदार गाण्यात ती भिजविली व बेफामपणे गाऊन ती लोकप्रिय केली असे हे चार संगीतकार. दुसऱ्या महायुद्धात नवे ब्रिटन तयार झाले. त्याबरोबर एक नवा संप्रदायही जन्माला आला. ' बीटनिक ' म्हटले की अजूनही अनेकांच्या कपाळाला आठी पडते. ब्रिटनमध्ये हाच विषय स्थानिक मंडळींकडे काढला की, त्या अप्रिय विषयाची चर्चा कशाला म्हणून अनेकजण टाळण्याचा प्रयत्न करीत.

बिटल्सचे संगीत डोक्यावर घेऊन नाचणारे बीटनिक्स व तीच प्रेरणा असणारे ब्रिटन-मधील सारे ' टीन-एजर्स ' यांची ही गर्दी प्रत्येक नृत्यगृहात आढळे. त्या गर्दीलाही तुम्ही समजून घेतले पाहिजे. ' हे करू नको ', ' ते करू नको ', म्हणून नीतिनियमांच्या शिष्टाचारांचा फाजील बाजार मांडणाऱ्या जगाला पायदळी तुडविणाऱ्यांची ही गर्दी आहे. मनात आले ते बोलावे, मनात आले ते भोगावे, मनात येईल तितके ओरडावे, गावे, नाचावे, बागडावे, धावावे. असे नुसते वाटणाऱ्या नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत आणणाऱ्या बंडखोराची ही गर्दी आहे.

याच ' क्रांतिकारी ' ( ! ) परंपरेतील लिव्हरपूलची ही चार पोरे. मळके कपडे घालणारी. जीनमध्ये भटकणारी. केसांचे झुबके मिरविणारी. जॉन लेनॉन, पॉल मॅकर्टनी व जॉर्ज हॅरिसन हे तिघेही लिव्हरपूलच्या एकाच शाळेत शिकले. प्रौढ जगाची कुचेष्टा करीत हे विक्षिप्त त्रिकूट लिव्हरपूलमध्ये भटकत राहिले. नृत्यक्लबात नाचत राहिले. नाचताना गात होते. गाताना ओरडत होते. हे ओरडणे नुकत्याच वयात येणाऱ्या पोरापोरींना आवडू लागले. आपल्या मनात जे येते व जे व्यक्त करता येत नाही, ते हे गायक व्यक्त करीत आहेत असे काही तरुणांना वाटू लागले. लिव्हरपूलच्या बंदरात नव्या बोटी येत होत्या. त्याबरोबर नवे संगीत येत होते. काही अमेरिकन खलाश्यांनी एक वेगळे लोकसंगीत आणले. या तिघांनी ते उचलले. लोकगीतातील दिलखुलासपणा त्यात होता. हे बीटनिक्स ज्या मानसिक अवस्थेत होते त्याला साजेसेच हे संगीत होते.

अमेरिकन खलाश्यांनी आणलेले हे संगीत लिव्हरपूलच्या लोकभावनात गुंतवून जनतेसमोर मांडले गेले. १९५५ मध्ये ' क्वॅरी मेन स्किफल ग्रुप ' या नावाने या तिघांनी आपला फड उभारला. नंतर या फडाचे नाव बदलले गेले. लिव्हरपूलच्या मेर्से नदीच्या तीरावर गाणारा हा गट ' मून डॉग्ज ' म्हणून ओळखला जाऊ लागला, परंतु लिव्हरपूलच्या या

सरितेने अमेरिकन खलाश्यांमार्फत सागराने पाठविलेल्या त्या संगीताला आपला खास साज चढविला होता. ‘ मेर्से साउंड ’ म्हणून तो ओळखला जाऊ लागला. हे मेर्से साऊंडचा ताल धरून गाऊ लागले. त्यांचा ताल हा त्यांच्या गायनाचा परवलीचा शब्द बनला. ताल, ठेका या अर्थाचा ‘ बीट ’ हा शब्द त्याच्या नावाचा एक भाग बनला. बीटनिकी वृत्तीत ‘ बीट ’ होताच; आता संगीतामधील ‘ बीट ’ ठेका, ताल त्यांना नवे नाव देऊन गेला. जॉर्ज, पॉल व जॉन हे बिटल्स म्हणून ओळखले जाऊ लागले. लिव्हरपूलचे बिटल्स हा संगीतक्षेत्रातील नवा शब्द ठरला. त्याचे आकर्षण लिव्हरपूलच्या एका क्लब मालकाला एक दिवस वाटले. त्यांच्या अंगावरचे ते दरिद्री कपडे पाहून, त्यांना श्रीमंत करण्यासाठी एकदम जर्मनीत हॅम्बुर्गमध्ये त्यांना काही कार्यक्रम त्याने ठरवून दिले.

लिव्हरपूलचे हे तिघे बिटल्स काही साथीदारांसह हॅम्बुर्ग बंदरात उतरले. रिंगो स्टार हा चौथा बिटल व ड्रमर त्यांच्याबरोबर नव्हता. हॅम्बुर्ग हे प्रतिलिव्हरपूलच. सबंध जगातून येथेही बोटी येतात व त्यामधील खलाश्यांना आपल्या वैयक्तिक जीवनामधील उणीव कुठेतरी भरून काढायची असते. बिटल्सने खलाश्यांना हवे ते दिले. उन्मादाची भावना दिली, उत्तान शृंगाराची शाब्दिक चुणूक दिली. लिव्हरपूलमध्ये रडत बसलेले बिटल्स हॅम्बुर्गमध्ये लोकप्रिय झाले. हॅम्बुर्गने बिटल्सना अक्षरशः घडविले, बदलले. त्यांना नवे कपडे घेता आले.

एक दिवस जॉर्ज हॅरिसन हॅम्बुर्गच्या तलावात पोहावयास गेला. डोक्यावरचे केस बिटनिकी थाटाचे. पाण्यातून वर येताना जॉर्जचे केस जसे दिसले तसे यापुढे ठेवायचे असा निर्णय ठरला. हॅम्बुर्गचा हा तलाव जेव्हा मी पाहिला तेव्हा बिटल्सच्या या विक्षिप्तपणाची मला आठवण झाली. हॅम्बुर्गच्या नाईट क्लब्जची जेथे सर्वांत गर्दी आहे त्या ‘ संत पावली ’ या भागात फिरताना सारखे सूर ऐकू येत होते ते बिटल्सच्या संगीताचे. हॅम्बुर्गने बिटल्सना घडविले व तेच बिटल्स आता हॅम्बुर्ग घडवीत आहेत.

१९५९ मधील सहा महिने बिटल्स हॅम्बुर्गला राहिले. ते परतले ते विशेष श्रीमंत होऊन नव्हेत. कारण त्यांना फार पैसे मिळत नव्हते. परंतु लोकप्रियतेचे गाठोडे खांद्यावर घेऊन ते पुन्हा लिव्हरपूलमध्ये दाखल झाले. हॅम्बुर्गच्या कीर्तीमुळे एका स्थानिक बारमध्ये त्यांना प्रवेश मिळाला. तेथे बिटल्स गाऊ लागले. त्या गर्दीत एक नवा मित्र त्यांना मिळाला. बिटल्सना हॅम्बुर्गने घडविले, परंतु यशस्वी केले ते या व्यक्तीने.

दारूच्या त्या बारमध्ये घुटके घेत ऐकत बसलेली ही व्यक्ती बिटल्सच्या संगीतावर खूष झाली. १९६० मधील ही गोष्ट. ब्रायन इप्स्टेन हे त्याचे नाव. त्या वेळी तो २५ वर्षांचा

एक कलाप्रेमी, रसिक असा तरुण होता. ब्रिटल्सपैकी जॉन लेनॉन हा १९ वर्षांचा, पॉल मॅकर्टनी हा १७ वर्षांचा तर जॉर्ज हॅरिसन हा १८ वर्षांचा होता. १२ ते १६ वर्षे वयाच्या पोरापोरींना हे संगीत अधिक वेडे करील हे जाणले ते ब्रायनने. एका चांगल्या घरंदाज कुटुंबातली ही व्यक्ती. हे बिटल्स कनिष्ठ मध्यमवर्गातून आलेले. त्यांच्याशी जमवून घेणे तितके सोपे नव्हते. परंतु लिव्हिरपूलच्या कॅव्हर्नमध्ये जवळ जवळ हजार पोरंपोरी या संगीताच्या धुंदीत ' ट्विस्ट ' हे नृत्य करताना त्याने पाहिले होते.

ब्रायनने या तिघांचा मॅनेजर होण्याचे ठरविले व आपल्या या नव्या कंपनीच्या कलावंतांना प्रथम स्वच्छ करायचे ठरविले. त्याने त्यांच्यासाठी नवे कपडे शिवले. बिटल्स आता चांगल्या पँट्स व स्वेटर्स घालू लागले. इप्स्टेनने त्यांना अखेर सूट घातले. अर्थात त्यांचा ' बिटनिकी आवेश ' बदलला नाही. कोटाला कॉलर नव्हती ( अजूनही ती नाही ), केसांचे झुबके कायम होते. तंग विजारी बदलल्या नव्हत्या. मॅनेजरसाहेबांनी त्यांची खूप जाहिरात करायचे ठरविले. त्यांचे असंख्य फोटो काढले. मोठमोठ्या हॉटेल्समधून त्यांची जाहिरात केली आणि दोन वर्षांत लिव्हरपूरलच्या मेर्से नदीच्या तीराचे संगीत गाणारे हे बिटल्स सबंध जगातील टीन-एजर्सचे दैवत ठरले.

ब्रायनने त्यांचा पगार ठरविला. प्रत्येक कार्यक्रमासाठी त्यांना जवळ जवळ २०० रुपये मिळू लागले. त्यांच्या संगीताच्या रेकॉर्डस् काढल्या जाव्या म्हणून हे नवे मॅनेजर लंडनला आले. परंतु त्या कंपनीने या पोरांना काही बोलावले नाही. तेव्हा त्यांच्या गाण्याच्या रेकॉर्डस् नाहीत, निदान ' टेप ' तरी करून द्या, अशी त्याने मागणी केली. ती ' टेप ' घेऊन हा उत्साही मॅनेजर दुसऱ्या रेकॉर्डिंग कंपनीत गेला. या टेपवरून माझ्यापुरत्या मला रेकॉर्डस तयार करून द्या, अशी त्याने मागणी केली. त्या रेकॉर्डस् ठिकठिकाणी आपणच नेऊन लावायच्या असा त्याचा बेत होता. टेप वाजविण्याचा कार्यक्रम सुरू झाला. तेथे उपस्थित असणाऱ्या एका ध्वनिमुद्रकाला ते संगीत इतके आवडले की, याच व्यवसायातील आपल्या मित्राला त्याने टेलिफोन केला. तो मित्रही ते संगीत ऐकण्यासाठी तेथे आला. त्यालाही तो ' ताल ' मोहून टाकणारा वाटला. त्याने एका रेकॉर्डिंग कंपनीला या लिव्हर-पूलच्या गायकांची एक रेकॉर्ड करण्याचा आग्रह केला. ' लव्ह मी डू ' ही या बिटल्सची पहिली रेकॉर्ड. मॅनेजरच्या कौशल्यपूर्ण प्रसिद्धीने हे गाणे मुलामुलींच्या गळ्यात उतरले ते कायमचे स्थान घेण्यासाठी.

एका वर्षात हे बिटल्स कीर्तिशिखरावर जाऊन पोचले. बिटल्सची लोकप्रियता ही पोरासोरां-

पर्यंत मर्यादित राहिली नाही. लिव्हरपूलचा परिसर नव्हे तर अटलांटिक समुद्र ओलांडून हे बिटल्स अमेरिकेत जाऊन पोचले. एका कार्यक्रमाला दोनशे रुपये मिळणाऱ्या बिटल्सना अमेरिकेतील एका कार्यक्रमाचे वीस हजार रुपये मिळाले. अमेरिकन टेलिव्हिजनवरील हा कार्यक्रमही सर्वांत लोकप्रिय ठरला. एका वेळेस सात कोटी लोकांनी हा कार्यक्रम पाहिला. जी कंपनी त्यांची एकही रेकॉर्ड करावयास तयार नव्हती त्याच कंपनीने दोन वर्षांत त्यांच्या किती रेकॉर्डस् विकल्या असाव्यात काही अंदाज? दोन कोटी रेकॉर्डस् त्या कंपनीने विकल्या! 'प्लीज, प्लीज मी' ही रेकॉर्ड प्रकाशित झाली व सारी तरुण पिढी जणू वेडी झाली! त्या गाण्यातील 'कम् कम् कम् ऑन' ची जबरदस्त हाक पाश्चिमात्य जगातील सारे समुद्र, साऱ्या सरिता ओलांडून गेली. 'शी लव्हज् यू' या रेकॉर्डने तर रेकॉर्ड केले. खुद्द ब्रिटनमध्ये या गीताच्या दहा लाख रेकॉर्डस् संपल्या. 'हार्ड डेज नाइट' या नावाचा चित्रपटही त्यांच्यावर निघाला. त्यामधील गाणी पुन्हा लाखांवर खपली. चित्रपट काढताना बिटल्स कसे वागले यावर वृत्तपत्रांचे खास अंक निघाले. लंडनच्या मुक्कामात हा चित्रपट पाहण्याचा आम्ही प्रयत्न केला. परंतु तिकीट मिळणे ही अशक्यच गोष्ट ठरली.

ब्रिटनलाही भारताप्रमाणे परकीय चलनाची काही कमी निकड नाही. अमेरिकेत बिटल्सने जी अफाट लोकप्रियता मिळविली त्यामुळे ब्रिटनला लाखो पौंडांचे परकीय चलन मिळाले. १९६४ मध्ये हा आकडा ५ कोटी रुपयांवर गेला. एका कार्यक्रमाला २०० रुपये मिळविणाऱ्या लांब केसांच्या या बीटनिक्सनी देशाला उपकृत करून ठेवले. लोकप्रियतेच्या अनेक कसोट्या त्यांनी पुऱ्या केल्या होत्या.

ते जेथे जेथे गेले तेथे जमलेल्या लाखो पोरापोरींनी त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले. लंडनपासून न्यूयॉर्कपर्यंत, पॅरीसपासून बर्लिनपर्यंत कोणत्याही विमानतळावर बिटल्सच्या स्वागताची व्यवस्था पाहणे पोलिसांना अशक्य होऊन बसलेले आहे. ही गर्दी फक्त बीटनिक्सची नसते. १२ ते १६ वर्षांची सर्व शाळकरी मुले आपले उद्योग सोडून हजारोंनी या ब्रिटल्सच्या मागे धावत सुटतात. पोलिसांचे कडे तोडून त्यांना भेटण्यासाठी, मिठ्या मारण्यासाठी पळत असतात. त्यांचे, नाहीतर निदान त्यांच्या गिटारचे चुंबन घेण्याचा वेडापिसा प्रयत्न या मुली करतात.

१९६२ मध्ये सामील झालेला रिंगो स्टार हा ड्रमर या तिघांपेक्षाही आता अधिक लोकप्रिय झाला आहे. त्याचे बाकदार नाक व चेहऱ्याचा नाजूकपणा शाळकरी मुलींना अगदी मोहून टाकतो. त्याचे खरे नावही रिंगो स्टार हे नव्हे. रिचर्ड स्टॅकी हे त्याचे खरे

नाव, परंतु तो बोटात केवळ अंगठ्या घालतो म्हणून त्याचे नाव रिंगो स्टार झाले व या चौकडीच्या मॅनेजरने ते प्रसिद्धीसाठी मुद्दाम स्वीकारले. या रिंगो स्टारचे प्रेमप्रकरण हा वृत्तपत्रांचा अतिशय आवडता विषय. जॉन लेनॉन हा या चौघांतील यापूर्वीचा एकमेव विवाहित. शेकडो पोरी या चौघांच्या मागे अजूनही विवाहासाठी धावत आहेत. रिंगो स्टारला एकदा गर्दीने इतके घेरले की, तेवढ्यात एका मुलीने त्याच्या केसांचा झुबकाच कापून नेला! लंडन विमानतळावर खुद्द राणीच्या स्वागतालाही इतकी गर्दी कधी जमत नाही. एकदा तर या विमानतळावर बिटल्स व राणी एकाच वेळी उतरली तेव्हा राणीबरोबर त्या वेळचे ब्रिटिश पंतप्रधान ॲलेक् डग्लस ह्यूमही होते. त्या दोघांना बिटल्स जाईपर्यंत खोळंबून राहावे लागले. 'क्रेझी, बिटलमॅनिया' या शब्दात किंकाळणाऱ्या या गर्दीचे नेहमी वर्णन केले जाते. दरवाजे आपटत, खिडक्यावर गुद्दे देत, पाय आपटीत, शिट्ट्या मारीत, मोठमोठ्याने ओरडत, जेथून जागा मिळेल तेथून उड्या मारण्याच्या तयारीत ही 'टीन एजर्स' ची गर्दी आज बिटल्सच्या स्वागताला जमते. लंडन येथे भरलेल्या राष्ट्रकुल परिषदेस आयूबखान आले तेव्हा स्थानिक मुसलमानांनी लंडन विमानतळ गजवजून काढला. 'डेली मेल' या विख्यात दैनिकाने अयूब यांच्या स्वागताची छायाचित्रे देऊन वर मथळा टाकला—

'हू रिसिव्हड दि बिटललाइक वेलकम्'

बिटल्सची ही लोकप्रियता राणीच्या कानावर जेव्हा येऊन पोचली तेव्हा लंडनच्या प्रिन्स ऑफ वेल्स थिएटरमध्ये त्यांचा एक खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'फ्रॉम मी टु यू' हे गीत त्यांनी सुरू केले व राणी खूष झाली. "सो यंग फ्रेश ॲण्ड व्हायटल" असे वर्णन राजमातेने या बिटल्सचे केले. राजकन्या मार्गारेटच्या पतीबरोबर बिटल्सची छायाचित्रे घेतली गेली. बिटल्सच्या सर्व गाण्यांत उत्कट प्रेम असल्याने ती गाणी कोणाच्याही अंतःकरणाला जाऊन भिडतात. 'टेल मी व्हाय, व्हाय यू लाय टु मी' असा पुकारा त्यांनी केला की, तरुण-तरुणी अगदी भावनावश होतात. यांपैकी बहुतेक गाण्याचे कवी ते स्वतःच आहेत. अतिशय उच्च रवाने प्रेमाची ललकारी त्यांनी दिली की, सारी नाट्यगृहे बेफाम होऊन जातात. राणी उपस्थित असलेल्या कार्यक्रमाला असंख्य लोक हजर होतेच. राणीने कौतुकाची टाळी देताच तिचा स्वीकार करून या चौकडीतील एकजण ओरडला, "पिपल इन दी रिअर सीटस क्लॅप, दी आदर कॅन रॅटल देअर ज्युवेलरी" या घोषणेत त्यांच्या अंतःप्रेरणेचे दर्शन लोकांना घडले व पिटातल्या प्रेक्षकांनी टाळ्या वाजविल्या यात मग नवल काय? अमीरांबद्दलचा तिरस्कार व कामकऱ्यांबद्दलचा जिव्हाळा या लिव्हरपूलच्या

चौकडीला आहे व त्यात त्यांच्या लोकप्रियतेचे सर्व गमक साठविले आहे. अखेर हे लिव्हरपूलचे पाणी आहे.

या राजमान्यतेचा व लोकमान्यतेचा कळस गाठला तो मजूर मंत्रिमंडळाच्या एका अद्भुत निर्णयाने. लिव्हरपूरच्या झुबकेदार केसांच्या या चार गायकांना, राणीच्या वाढदिवशी 'ऑर्डर ऑफ दि ब्रिटिश एम्पायर' हा मानाचा सर्वोच्च किताब जाहीर झाला व ब्रिटन-मध्ये एकच खळबळ उडाली. या खळबळीचे स्वरूप ब्रिटनमधील माझ्या वास्तव्यात मी अनुभवू शकलो. तो आमच्या भ्रमंतीमधील एक महत्त्वाचा विषय ठरला. कारण प्रत्येक चर्चेत तो प्रश्न आम्हीच उकरून काढीत होतो. त्यामुळे ब्रिटनमधील आजच्या सामाजिक जीवनाचे वेध घेणारी परस्पर विरोधी मते आम्हाला ऐकावयास मिळाली. बिटल्सना ओ. बी. ई. दिल्यावर एका विशिष्ट वर्गात तर संतापाची लाट उसळली. दोन महायुद्धांतील अनेक लष्करी अधिकाऱ्यांना अतुल शौर्याबद्दल हा बहुमानाचा किताब दिलेला होता. तो किताब राणीला परत करण्याचे एकच सत्र सुरू झाले. लिव्हरपूलसारख्या चटोर गावच्या नाचऱ्या पोरांना ओ. बी. ई. देऊन राणीने आमचा व त्या किताबाचा अपमान केला आहे, अशी एकच हाकाटी केली गेली. वृत्तपत्रांनी हे किताब मिळविलेले लोक शोधून काढले. त्यांतील काहींना किताब परत करण्यास चिथावलेही. काहींच्या मुलाखती घेतल्या.

आमच्या या दौऱ्यात या प्रश्नावर औद्योगिक कारखान्यातील मॅनेजरपासून टॅक्सी ड्रायव्हरपर्यंत अनेकांशी आम्ही बोललो. 'हाऊ अबाउट दि अवॉर्डस ऑफ ओ. बी. ई. टु बिटल्स्?' हा आमचा हुकमी प्रश्न बनला व अनेकदा गंभीर चर्चेने रंगदार रूप घेतले. सर्वसाधारणपणे दोन गट नेहमी पडत गेले. तरुणांना या निर्णयाने अगदी बेहोष करून टाकले होते तर वयस्कांना संतप्त केले होते.

एका लष्करी अधिकाऱ्याने आपली 'ओ. बी. ई.' परत करताना असे चक्क म्हटले, की केवळ जंगली सूर वापरणाऱ्या व कर्कश ओरडणाऱ्या पोरांशी आमची बरोबरी करून राणीने आमचा अपमान केला आहे. एक चांगला अधिकारी या प्रश्नावर उत्तर देताना चटकन म्हणाला, "धिस इज दि बिगेस्ट जोक दॅट मि. विल्सन हॅज प्लेड बोथ ऑन दि क्वीन ॲण्ड दि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टी!"

लिव्हरपूल हे कामगारांचे, मजुरांचे माहेर. त्यामुळे साहजिकच तो मजूर पक्षाचा बालेकिल्ला आहे. लिव्हरपूलच्या कलावंतांचा हा बहुमान करून श्री. विल्सन यांनी तरुणांची मने जिंकली. पुढच्या दोन निवडणुकींसाठी तरुण मतदारांवर नजर ठेवून हा ओ. बी. ई.

ब्रिटल्सला देण्याची सूचना राणीला त्यांनी दिली असा धडधडीत आरोप हुजूर पक्षीयांनी श्री. विल्सन यांच्यावर केला. ही यादी पंतप्रधानच नेहमी राणीसाठी तयार करीत असतात. याचा उल्लेख करून एकजण मला चटकन म्हणाला, "आता ब्रिटिश एम्पायर राहिलेच आहे कुठे ? त्यामुळे 'ऑर्डर ऑफ ब्रिटिश एम्पायर 'ला अर्थ तरी काय राहतो ? " या सर्व चर्चेचा जो परिणाम मला तेथे आढळला तो असा की, या 'बिटल्स ' प्रकरणाने खरोखरच ओ. बी. ई. तेथे लौकरच रद्दबातल होईल आणि पद्मभूषण, पद्मश्रीचे काही नमुने तेथे तयार होतील. बिटल्सनी, 'बिटलमॅनिया ' निर्माण करून तरुण पिढी खराब केली आहे, असे म्हणणाऱ्यांना हे दुसरे हत्यार आता मिळाले आहे.

लिव्हरपूलच्या या सरितेतून आता दोनशेवर प्रवाह निर्माण झाले आहेत. 'पॉप म्युझिक'चा संप्रदाय इतक्या वेगाने वाढला आहे, की लिव्हरपूलच्या परिसरातच दोनशेच्यावर गायकांची अशी पथके निर्माण झाली आहेत. परंतु 'बिटल्स ' हे नाव फक्त या चौघांचेच. अनेकदा 'बिटल्स ' इतर गाणारे गट व 'बीटनिक्स ' यांच्यामध्येही फरक केला जात नाही. 'पॉप म्युझिक 'चे हे सारे शौकीन मूळचे बीटनिक्स. त्यामधील जॉर्ज, पॉल, रिंगो व जॉन हे बिटल्स आणि आता त्यांच्या पावलावर पाऊल टाकून गाणारे असंख्य गट गल्लोगल्ली निर्माण झाले आहेत. ते निरनिराळ्या नावांनी ओळखले जातात. त्यापैकी काहींनी 'बिटल्स ' इतकीच लोकप्रियता मिळविली आहे. 'सीकर्स ', 'बॅचलर्स ', 'रोलिंग स्टोन्स ', 'डेव्ह क्लार्क फाइव्ह ', 'हरमन्स हरमिटस् ', 'दि ॲनिमल्स ' अशा विचित्र नावांनी हे गट आज ओळखले जातात. यांपैकी अनेकांचे कार्यक्रम मी टेलिव्हिजनवर पाहिले. बिटल्सची सहीसही नक्कल ते करतात, परंतु त्यांपैकी अनेकांचे वैयक्तिक जीवनातील वर्तन मात्र बिटल्सच्या तोडीचे, दर्जाचे नाही. 'रोलिंग स्टोन्स ', या संगीत पथकातील गायकांवर दुर्वर्तनाबद्दल कोर्टात खटला भरला गेला आहे असे इंग्लंडमध्ये असताना मी ऐकले होते. वेडीवाकडी तोंडे करणे हे 'रोलिंग स्टोन 'चे वैशिष्ट्य मानले जाते. दिखाऊ जगाला वेडवणं दाखविण्याचाच हा प्रकार आहे.

लांब केसांच्या या विक्षिप्तांचे बहुविध दर्शन ब्रिटनमधील वास्तव्यात मला घडले. ब्रिटनमधील वयस्क लोकांना या प्रश्नाची मोठी चिंता पडली आहे. 'बिटल्स 'चे संगीत ऐकून बेफाम झालेल्या 'बीटनिक्स 'चे काय हा प्रश्न आज त्यांना भेडसावीत आहे. पेनार्थच्या समुद्रकिनाऱ्यावर बीटनिक्सचे थवेच्या थवे उभे अगर धक्क्यावर बसलेले दिसत. डोक्याला तेल न लावण्याचा साम्यवादी प्रयोग त्यांनी पूर्णपणे अमलात आणलेला असे.

पोरांनी व पोरींनी दोघांनीही सारख्याच तंग ' जीन्स ' व वर अर्धवट जाकिटासारखे काही तरी घातलेले. त्यावर चामड्याची जणू चिलखते चढविलेली. डोळे लालबुंद. साधारण पंधरा ते एकोणीस वर्षांची ही मुलेमुली. दोघांचे पोषाख सारखेच असल्याने त्यामधील मुलगा कोणता व मुलगी कोणती ते शोधून काढणे आम्हांला अशक्य होई. त्यात ते एकमेकांत इतके मिसळलेले असत की त्यांच्यातील उभे राहण्याच्या अंतरानेही काही न कळावे. कोणतीही शिष्टाचाराची बंधने ते पाळत नसत. प्रत्येकाची साधारण एक मैत्रीण असे. एकमेकांना ढकलणे, मुलींना उचलणे, शिवाशिव खेळणे, मध्येच येऊन एखाद्याने त्या मुलींना आलिंगन देणे असे प्रकार भर रस्त्यावर चाललेले असत. चुंबन हा प्रकार ब्रिटनमध्ये एकदम शिष्टसंमत. त्यामुळे त्याचा फायदा उठविणे ही या पोरांपोरींमधील सामान्य बाब.

पेनार्थच्या किनाऱ्यावरील ही दृश्ये, ब्रिटनमध्ये लंडनपासून बर्मिंगहॅमपर्यंत सर्वत्र मी पाहिली. कार्डिफ स्टेशनसमोरच्या बस स्टॉपच्या आवारात संध्याकाळनंतर बेफाम बीटनिकांचे चित्कार हवे तेवढे ऐकावयास मिळत. एखादी मुलगी आपल्या मित्रांच्या तडाख्यातून सुटण्यासाठी मोठ्याने किंचाळे, ब्रिटल्सनी आर्त लकेर फेकावी अशी ती हाक असे. परंतु रस्त्याने जाणारे आजूबाजूचे लोक स्थितप्रज्ञासारखे जात. कुणीही त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नसत. ' पॉप ' म्युझिकच्या उन्मादात बीटनिक्स आज ब्रिटनमध्ये अक्षरशः धिंगाणा घालत आहेत.

यातही दोन गट आहेत. रॉकर्स व मॉर्टस्. ' रॉकर्स ' मोटार सायकलवर वेगाने जाणारे व मॉर्टस् म्हणजे स्कूटरवजा सायकलवर जाणारे. रॉकर्स दणकट असतात तर मॉर्टस् मवाळ वाटतात. दोघांच्यामध्ये विळ्या-भोपळ्याचे नाते. त्यामुळे त्यांच्यामध्ये अनेकदा मारामाऱ्या होतात. या मारामाऱ्यांत मुलीही भाग घेतात. काही वेळेस हॉटेलवर दगडफेक होते. आणि मग हे रॉकर्स डोक्यावर पोलादी रंगीत शिरस्त्राणे घालून व आपल्या मैत्रिणीला पाठीशी बसवून आपल्या मोटारसायकलचा तुफान आवाज करीत निघून जातात.


या दोन्ही गटांच्या लोकांना आवश्यक असलेल्या कपड्यांची व वस्तूंची खास दुकाने ब्रिटनमध्ये बहुतेक शहरी आहेत. त्यांच्या क्लबांचे काही नियम आहेत. शंभर मैलांच्या वेगाने मोटारसायकल चालविता आल्याशिवाय बीटनिक्सच्या रॉकर्स क्लबचे तुम्हाला सभासदही होता येणार नाही. मॉर्टस्चा वेग त्या मानाने बराच कमी. कपडे, केस याबाबतचे सर्व नियम काटेकोरपणे पाळावे लागतात. एकमेकांच्या नातेवाइकांकडे समारंभासाठी जातानाही आपला हा वैशिष्ट्यपूर्ण पोशाख व आवेश सोडता येत नाही, किंवा केसांचा बुचडा बांधता येत नाही.

लांब केसांचे हे आकर्षण या पोरापोरींना का वाटते. याबद्दलच्या उत्तरात या साऱ्या प्रश्नाचे मूळही आहे असे वाटते. लांब सडक केसांतच सारी लैंगिकता आहे असे ते मानतात. शरीरसुखाच्या स्वैर कल्पनांतूनच हा बीटनिकी पंथ वाढीस लागला. एकदा या सुखाबद्दलची बंधने तुटली की जीवनाची इतर बंधने तकलुबी ठरली तर नवल नाही.


बिटल्सच्या संगीतापेक्षाही बीटनिक्सचे हे थैमान हे पाश्चिमात्य जगातील प्रौढत्वाला खरे आव्हान आहे, याबद्दल कुणाचेही आता दुमत नाही. परंपरा, रूढी, शिष्टाचार यांच्या अतिरिक्तपणाची ही प्रतिक्रिया आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. ' इट्स ए प्रोटेस्ट अगेन्स्ट दि ॲडल्ट वर्ल्ड ' असे एकाने म्हटले आहे, तर ' इट इज समथिंग विच एक्झिस्टस् इन ऑल ऑफ अस् ' असे दुसऱ्याने वर्णन केले आहे. बिटल्सचे वर्णन तर एकाने ' सिंबॉल ऑफ यूथ, ब्ल्यू आईड बेबी ॲंड गोल्डन बॉय ' असे केले आहे. तारुण्याच्या उंबरठ्यावर आलेल्या बहुतेकांना स्वैरतेची तहान लागलेली असते. परंतु कौटुंबिक संस्कार व समाजाची भीती यामुळे तो ते करू शकत नाही. या बिटल्सच्या संगीतात व बीटनिक्सच्या वर्तनात प्रत्येक तरुण हृदयात असलेली यौवनसुलभ स्वैरतेची भावना साकार झालेली आढळली. त्यामुळे ही ओढ अपरिपक्व मुलामुलीत वाढत गेली आहे.

इंग्लंडधील एका बड्या दैनिकाने ' व्हेअर वुइल इट ऑल लीड ? ' असा संत्रस्त सवाल एक दिवस टाकला. लोक चर्चा करीत आहेत. म्हातारे काळजीने अधिक बाकत आहेत. परंतु लिव्हरपूलचे ते चार बिटल्स व त्यांचे शेकडो सांप्रदायिक गल्लीगल्लीतील क्लबांत मोठमोठ्याने गात आहेत. बीटनिक्स नाचत आहेत. दुसऱ्या महायुद्धात हवाई हल्ल्याची सूचना देणारे भोंगे ब्रिटनमध्ये जितका आवाज करीत तितका आवाज या लोकांखेरीज दुसरे कोणी करीत नाहीत असे म्हटले जाते ते यथार्थ आहे ! कारण तो देश सोडून मला आता वर्ष लोटले. परंतु बिटल्सची ती हाक व ' आय वॉंट टु होल्ड युवर हॅन्ड ' ची ती लकेर मी अजून विसरू शकत नाही. हॅम्बुर्गच्या रस्त्यावरच नव्हे तर खुद्द पश्चिम बर्लिनच्या हमरस्त्यावर संध्याकाळी या बिटल्सचे शौकीन असे हे बीटनिक्सचे गट रस्त्यारस्त्यावर बसलेले मी पाहिले. त्या मुलींचा वेष तोच होता. उलट त्यांच्या पायातही नव्हते. फूटपाथवर त्यांनी चित्रे काढली होती. तेथेच मातीत बसल्याने त्यांचे कपडे व शरीर साफ मिळलेले होते. परंतु येजा करणाऱ्या जगाकडे ते विशेष पाहातही नव्हते. जगाकडे दुर्लक्ष करूच जगण्यातच त्यांच्या जीवनाचे सर्व सामर्थ्य एकवटले आहे. ही निर्भयता, ही बेफिकिरी, माणसाला एका धुंद जगात नेते. आपल्या आयुष्यात धुंदीचा असा एक तरी क्षण कधीतरी यावा असे

कुणाला वाटणार नाही ? म्हणूनच बिटल्स व बीटनिक्स यांचे हे धुंद जग न पटणारे, न उमजणारे वाटले तरी त्या तालाने मी मंत्रमुग्ध झालो व त्यांच्या स्वैरतेने माझे मन क्षणभर आनंदित झाले.



बदलणाऱ्या बर्मिंगहॅमचा हा एक जुना चौक.




बर्मिंगहॅमचा हा नवा बाजार. बुलरिंग.



बीटल्स : जॉर्ज हरिसन, रिचर्ड " रिंगो " स्टार, जॉन लेनन आणि पुढ्यात बसलेले पॉल मॅककर्टने.



थॉमसन हाऊसमधील आमचा वर्ग. चित्राचे संपादन कसे करावे याचे चाललेले हे दिग्दर्शन.




बर्लिनचे विभाजन करणारी बर्लिन भिंत. हिटलरचे वास्तव्य जेथे होते तो हा परिसर. श्री. प्रभाकर तुलकर, मार्गदर्शिका अंतालिका, मी, अभय छजलानी (इंदूर)

प्रकरण बाविसावे

# ब्रिटनमधील लोक आहेत तरी कसे ?

तीन महिने ज्यांच्या सहवासात मी राहिलो ते इंग्रज लोक मला कसे वाटले ? अनेकजण हा प्रश्न मला विचारतात. माझ्या मनातही तो प्रश्न अनेकदा रेंगाळतो. त्याचे उत्तर सहजपणे देणे, मला वाटते, फार कठीण आहे. आमचे राज्यकर्ते म्हणून आम्ही त्यांना काय कमी ओळखत होतो ? परंतु ब्रिटनमधील माझ्या वास्तव्यात त्या दृष्टिकोणातून मी त्यांच्याकडे पाहिले नाही अगर त्यांनीही आम्ही त्यांचे कधीतरी गुलाम होतो याची पुसट जाणीवही दिली नाही. दोन स्वतंत्र राष्ट्रांचे नागरिक म्हणून सारख्या मानाने आम्ही एकमेकांशी वागलो व राहिलो.

याचाच अर्थ असा, की त्यांचे जे गुणदोष मला दिसले त्याला पूर्वग्रहांची किनार नव्हती. ते जसे खरे आहेत तसेच मला दिसले असेच मी मानतो.

थॉमसन् फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळाल्याने लंडनच्या विमानतळावर मी उतरत होतो. परंतु विमानतळावर कुणाची वाट न पाहता लंडनच्या ' हॉटेल युरोप 'मध्ये सरळ या अशी त्यांची सूचना होती. पत्रकार परिषदा व साहित्य संमेलने यांनी लावलेल्या संवईच्या हे अगदी विरुद्ध होते. संमेलनाच्या गावी उतरले की बिल्ला लावलेला स्वयंसेवक समोर दिसला नाही, की संमेलन अर्धे अधिक अयशस्वी झाले असे आम्हांला नेहमी वाटत आले आहे. महागडी टॅक्सी न करता विमान कंपनीच्या बसने लंडन शहरात या वगैरे सर्व सूचना त्यांनी दिल्या होत्या. ' हॉटेल युरोप 'मध्ये आम्ही आलो. तेथे तरी कुणी बिल्ला लावून

आमची वाट पाहात असेल अशी आमची कल्पना. परंतु तीही खोटी ठरली. स्वागत कक्षेतील त्या मुलीने हसून आमचे स्वागत केले. खोलीची चावी हाती दिली. त्या आलिशान खोलीत जाऊन मी मुक्काम ठोकला. हे सर्व सूचनेबरहुकूम झाले. परंतु नंतर अर्धा दिवस गेला तरी आमच्या यजमानांचा पत्ता नव्हता. थोडी विश्रांती घेऊन त्या ऐतिहासिक शहरात पहिला फेरफटका मारण्यासाठी मी बाहेर पडणार इतक्यात दारावर टक् टक् झाले. मी दार उघडले तेव्हा सुटातील एक व्यक्ती हसत दरवाजात उभी होती.

" I am Rowlands. Mr. Gadkari, are you comfortable here ?"

थॉमसन् फाउंडेशनच्या शिक्षण विभागाचे डायरेक्टर श्री. डॉम रोलँडस् स्वतःच दरवाजात उभे होते. ते स्वतः येतील अशी माझी कल्पना नव्हती. मी संमेलनप्रतिनिधींची वाट पाहात होतो. अर्थात मी संमेलनास आलेलो नाही याची जाणीवही मला एकदम झाली. आपल्या अधिकारपदाचा थोडाही अहंकार त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता. उलट त्यांच्या चेहऱ्यावर बालसदृश उत्सुकता ओसंडत होती. ब्रिटनच्या भूमीवर सर्वप्रथम परिचित झालेली ही व्यक्ती. या व्यक्तीच्या सहवासात मी तीन महिने राहिलो. त्यांनी दरवाजावर केलेला टक् टक् आवाज मी नंतर नेहमी ऐकत होतो. या देशात दार ठोठावल्याशिवाय कुणी कुणाच्या खोलीत कधीही शिरत नाही, हे त्या दिवशीच प्रथमच उमजले. कुणाच्याही खोलीत सूचना न देता दार उघडून प्रवेश करण्याची भारतीय पद्धती येथे अतिशय असभ्य मानली जाते. टक् टक् केल्याने आतील माणसाला सावरायला किंवा आवरायला संधी मिळते. आत शिरणाऱ्या माणसाला दरवाजावरच थांबविता येते. वेळ ठरवून भेटीसाठी आलेल्या व आत असलेल्या माणसाची गैरसोय होत नाही. तुमच्या हजेरीत त्यांना खाजगी गप्पा चालू ठेवाव्या लागत नाहीत.

परंतु त्याचबरोबर हा देश अतिशय औपचारिक आहे याची जाणीव या पहिल्या भेटीनेही झाली. एकदा सूचना दिल्या की, वायफळ धावपळ येथे कुणी करीत नाही. पाहुण्याला खुष करण्यासाठी येथे नाक्यानाक्यावर स्वयंसेवक कुणी ठेवत नाही. सारे व्यवहार कसे ' बिझिनेसलाइक् ' ! जी गोष्ट करता येणे शक्य असेल तिलाच ' हो ' म्हणतील. I am afraid ने वाक्य सुरू झाले की, आपली मागणी पुरी होत नाही असे खुशाल समजावे; आणि त्यात मग बदल व्हावयाचा नाही. ' पाहतो ', ' जमले तर करतो ' वगैरे वाक्प्रचार येथे नाहीत. कामात असले तर थोड्या वेळाने भेटा असे स्पष्ट सांगतील.

ज्या कामासाठी आपली नेमणूक आहे ते काम करताना ही मंडळी अगदी औपचारिक-

पणे वागतील. परंतु ती खुर्ची एकदा सोडली की, त्यांच्याइतके अनौपचारिक कुणी नाही. 'हॉटेल युरोप' मधून बाहेर पडून आम्ही कार्डिफला जाण्यास निघालो तेव्हा याच मि. रोलँडसूना मी लोकांच्या बॅगा उचलताना पाहिले. मोटारीचा दरवाजा उघडून आम्हांला ते आत बसवीत. जेवावयास एकत्र बसलो तर पाहुण्यांचे अधिकाधिक समाधान कसे करता येईल याची श्री. रोलँडस् पति-पत्नी जातीने काळजी घेत. परंतु त्याचबरोबर या सर्व सफरीत फाउंडेशनतर्फे 'ड्रिंक्स' कधी दिली जात नसत. जेवण फाउंडेशनचे तर 'ड्रिंक्स' तुमच्या खर्चाने असा मामला असे. तेच अतिशय हसत पण स्पष्टपणे सांगितले जाई. औपचारिक निर्णय अनौपचारिक सहजतेने कानावर घातले जात.

'प्लीज' व 'थँक् यू' चा हा देश. येथील समाजात वर्ग नाहीत व त्यामुळे वर्गलढे नाहीत. झाडू-काम करणारी स्त्रीसुद्धा उच्च कुळातील असू शकते. तिच्या मालकीचा मोठा बंगलाही असतो. त्यामुळे तिने स्वीकारलेल्या कामावरुन तिची समाजातील योग्यता ठरविली जात नाही. म्हणूनच कोणत्याही व्यक्तीस काही सांगावयाचे असेल तर Will you please ची प्रस्तावना हरघडी करावी लागते. कुणाला थांबवावयाचे असेल, हॉटेलातील बेअररला 'हटकायचे' असेल तर Excuse me असे गर्जावे लागते. पण अगदी मृदू स्वरात.

कार्डिफ येथून प्रकाशित होणाऱ्या 'वेस्टर्न मेल' या दैनिकाच्या संपादकवर्गाबरोबर आमचे दुपारचे जेवण असे. अस्सल इंग्रजी पद्धतीचे हे जेवण. 'पॅट' नावाच्या एका वृद्ध स्त्रीकडे या जेवणाची व्यवस्था होती. नातवंडे असलेली ही आजीबाई या क्षेत्रातील तज्ज्ञ होती. फार मोठमोठ्या हॉटेलांतून तिने काम केले होते. त्यामुळे सुरुवातीचे आठ दिवस मोठे खटकेबाज गेले. ती ओळीने एकेकाच्या 'ऑर्डर्स' घेई. पहिली 'डिश्' संपल्याशिवाय दुसऱ्या 'डिश्' ची ऑर्डर घेत नसे. त्यामुळे हे 'मध्यंतर' फार जाणवे. परंतु इंग्रजी जेवण हे शांतपणे गप्पा मारीत घ्यावयाचे असते याचे 'ट्रेनिंग' ती आम्हांला देत होती. तब्बल पावणेदोन तास हा सोहळा चाले. बशीतील खाणे संपल्यावर काट्या-चमच्यांची जोडी बशीत उजवीकडे एकत्र व सुपडी करून ठेवावी लागते. तशी ठेवलेली असल्याशिवाय 'पॅट' बशी उचलत नसे. तिच्या तोंडाकडे आम्ही त्या अपेक्षेने पाहिले तर जवळ येऊन चटकन् म्हणे, 'But you have not finished' आणि मग काटे-चमचे त्या पद्धतीने आधी ठेवी व मग बशी उचली. 'प्लीज' म्हटल्याशिवाय काही आणून देत नसे.

आमच्याबरोबर असलेले नायजेरियन मित्र 'कांगो' पद्धतीचे आचरण अनेकदा करीत. 'I want butter' असे मध्येच एखादा ओरडे. 'पॅट' तिकडे लक्षही देत नसे. 'Excuse me, will you please give me butter' इतका सोपस्कार झाल्याशिवाय 'पॅट' विरघळत नसे व लोण्याचा लाभ होत नसे. पहिल्या आठ-दहा दिवसांत पाहुण्यांनी पॅटच्याविरुद्ध बऱ्याच तक्रारी केल्या. तिचे वर्तन उर्मट असल्याचे काहींनी सांगितले. परंतु तितक्याच दिवसांत आम्हालाही या पाश्चात्य संवई लागल्या. 'प्लीज' 'थँक् यू' चा आम्ही मारा करू लागलो. काटे-चमचे नीट ठेवू लागलो. दोन दोन तास जेवणावर घालवू लागलो, आणि पॅटचा सर्व नूर पालटला. परिचयही वाढत चालला होता. प्रत्येकाच्या कुटुंबियांबद्दल 'पॅट' चौकशी करू लागली होती; आणि मग त्याच स्त्रीचे आम्हांला वेगळे दर्शन झाले. आईने मुलांना जेवावयास घालावे, मधून मधून रागवावे असे चालू झाले. प्रत्येकाला मग ती घरच्या गोष्टी विचारी. पत्नीचे पत्र आले किंवा नाही याची चौकशी करी. कोणत्या क्लबमध्ये जावे याबद्दल सूचना करी.

एक दिवस कार्डिफच्या स्फिंक्स क्लबमध्ये आम्ही काहीजण जाऊन आलो. 'पॅट'ला कुणीतरी जेवताना ही बातमी दिली. मग 'पॅट' ने आमची कानउघाडणी करण्यास कमी केले नाही. परंतु हा सर्व मोकळेपणा आल्यावरही 'प्लीज' व 'थँक यू' च्या जयघोषात थोडाही बदल झालेला 'पॅट'ला अगर कुणालाही कधी मानवलेला नाही. जेथे नवरा बायको एकमेकांस पदोपदी 'प्लीज' व थँक् यू' म्हणतात तेथे इतरांचे काय?

पूर्व इंग्लंडच्या दौऱ्यावर असताना निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या एका जोडप्याला भेटण्याची संधी मिळाली. या हौशी जोडप्याने एक फार मोठा परिसर आपल्या ताब्यात घेतला असून तेथे पशुपक्ष्यांना स्वच्छंदपणे राहता येईल, अशी व्यवस्था केली आहे. रंगीबेरंगी पक्ष्यांना त्यांच्या 'घरात' पाहण्यासाठी म्हणून आम्ही तेथे गेलो. इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावरचा तो रम्य परिसर पाहून आल्यावर हे निर्माण करणाऱ्या त्या हौशी जोडप्याच्या घरी चहासाठी आम्ही गेलो. तेथे ती इंग्रजी औपचारिकता नसेल, पक्ष्यांचे नैसर्गिक जीवन असेल असे आम्हाला वाटत होते. आम्ही 'थँक् यू' 'थँक् यू' करीत होतोच. इतक्यात त्यांची पत्नी चहा घेऊन आली. चहाचा कप पतीच्या हातात देताच तो सहजपणे 'थँक्यू' म्हणाला. 'अरे, जरा चहा करा'ची घोषणा पत्नीकडे फेकायची आमची संवय. चहाचा कप आला, की त्यात साखर कमी पडल्याचा पुकारा. या सर्व वातावरणाच्या हे विरुद्ध होते. पत्नीला 'थँक् यू' म्हणायची कल्पनाच मला विलक्षण वाटली,

परंतु जेथे मुलाखत ठरविल्याशिवाय बाप मुलाची अगर मुलगा बापाची भेट घेत नाही तेथे या पति-पत्नीच्या ‘ थँक् यू ’ बद्दल आश्चर्य वाटावयास नको. एका गृहस्थाने अशाच एका रविवारी आम्हाला घरी येण्याचे निमंत्रण दिले. परदेशी पाहुण्यांशी परिचय करून घेण्यासाठी असे निमंत्रण काहीजण देत व घरी नेण्यापूर्वी आमच्या सूचनेप्रमाणे ते आपल्या मोटारीतून एखादा भाग दाखविण्यासाठी घेऊन जात. पेनार्थच्या इंटर-नॅशनल हाऊसमध्ये हे गृहस्थ आम्हांला नेण्यास आले तेव्हा आम्ही त्यांना जवळच्या ‘ बारी ’ बेटावर नेण्याची विनंती केली. परंतु तो गृहस्थ त्याबद्दल थोडे आढेवेढे घेऊ लागला. ‘ माझ्या वडिलांनी एक अगदी आधुनिक फ्लॅट घेतला आहे तो पाहण्यास चला ’ असा आग्रह तो करू लागला. हा फ्लॅट पेनार्थमध्येच होता त्यामुळे काळोख पडण्यापूर्वी आपण दूर फिरून येऊ व मग फ्लॅट पाहण्यास जाऊ असे आम्ही सुचविले. त्याप्रमाणे तो अखेर निघाला. बारी बेटाची चक्कर पुरी करून आम्ही मग त्याच्या वडिलांच्या फ्लॅटकडे निघालो. पेनार्थच्या समुद्रकिनाऱ्यावरच एका नव्या उंच इमारतीत ती जागा होती. आम्ही लिफ्टने वर गेलो. मुलाने वडिलांच्या फ्लॅटची बेल वाजविली. वडील दरवाज्यात आले ते बाहेर जाण्याच्या तयारीतच. त्यांना मुलाने दिलेली वेळ टळल्याने ते बाहेर जाण्यास निघाले होते व त्याप्रमाणे ते आमच्याशी हस्तांदोलन करून एक मिनिटात गेलेही. फार महत्त्वाच्या कामासाठी त्यांना जावे लागले असेल असे आम्ही धरून चाललो. परंतु नंतर बोलता बोलता कळले की, ते सहज फिरावयास गेले होते.

या गृहस्थाच्या बरोबर मग आम्ही त्याच्या घरी आलो. ब्रिटनमधील सर्वच घरे एक-सारखी. परंतु याचे घर वेगळे होते. एका नव्या कॉलनीतील ते आधुनिक घर होते. त्याला तीन महिन्यांची लहान मुलगी होती. तिची झोपण्याची, खेळण्याची खोली वेगळी होती. रात्री आईजवळ ती झोपत नसे. इतक्यात आमच्या या नव्या मित्राचे सासू–सासरे तेथे आले. आमचे चहापाणी चालले होते. ताबडतोब जावई उठला व त्याने सासूला बसावयास जागा दिली. सासूबाई नातीला घेऊन तिथे बसल्या व अनेक विषयांवर त्या बोलू लागल्या. सासरे व जावईबापू उभे होते. त्याची सासू-पत्नी दोघीही बसून होत्या.

स्त्रियांचे आदरातिथ्य ही मंडळी ज्या पद्धतीने करतात ते वाखाणण्यासारखे आहे. स्त्रिया उभ्या आहेत व पुरुष बसलेले आहेत असे दृश्य या देशात तुम्हाला क्वचितच दिसेल. हॉटेलात स्त्री-पुरुष शिरले की पती पत्नीच्या खांद्यावरचा गरम कोट स्वतः उतरून खुंटीला ठेवील. तुमच्याबरोबर असलेल्या कोणत्याही स्त्रीबाबत हे आदरातिथ्य अपेक्षित असते. हॉटेलात

शिरताच तिच्या खांद्यावरचा कोट तुम्ही उतरविला पाहिजे. खुर्ची पुढे ओढून तिला बसण्याची विनंती केली पाहिजे. नाहीतर हे सर्व त्या हॉटेलातील वेटर करतो. तो कोट चढवितो अगर उतरवितो. बाहेर दरवाजा उघडून त्या स्त्रीला बाहेर पडण्यास अगर शिरण्यास जागा करून देणे हे प्रत्येकाचे सामान्य कर्तव्य. मग ती स्मित हास्य करून तुम्हांला ' थँक् यू ' म्हणणारच.

मोटारीच्या दरवाजाची तीच गत. दरवाजा उघडून ती बसल्याशिवाय तुम्हाला स्थानापन्न होण्याची सोय नाही. इतकी नम्रता स्त्रियांबाबत दाखविली जात असताना त्यांना Weaker Sex म्हणून ही वागणूक मिळते असे मात्र कुणी समजू नये. कारण पुरुषांच्या बरोबरीने त्या सर्व क्षेत्रांत वावरत आहेत. बसमध्ये कंडक्टर म्हणून ती तुम्हाला भेटेल, पेट्रोल पंपावर मळक्या कपड्यात मोटार पुसणारी व पेट्रोल भरणारी म्हणून तिची गाठ पडेल. विक्रेत्यासारखी सर्व कामे तर तिच्याच हाती. दुकानात सर्वत्र मुली. मग ते जोडे शिवण्याचे दुकान असो की दुसरे कसले असो. ब्रिटिश सरकारच्या दौऱ्यातील आमची मार्गदर्शिका ॲन फोर्ड हिने अतिशय तत्परतेने व कार्यक्षमतेने आपली जबाबदारी पार पाडली. विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या भेटीगाठी या दौऱ्यात सारख्या चालू असत. त्यात मध्यस्थाची भूमिका तिला करावी लागे. चर्चेत भाग घ्यावा लागे. सकाळपासून रात्री ११ पर्यंत सतत काही कार्यक्रम चालू असे. सरकारने आखून दिलेले कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्याची व पाहुण्यांची बडदास्त ठेवण्याची जबाबदारी संपूर्ण तिची. तिला आणखी सहकारी दिलेले नव्हते. आम्ही राहात होतो त्या हॉटेलातच ती राहात असे. केंब्रिज हे तिचे राहण्याचे ठिकाण. परंतु आठवड्याभरात आपल्या घराकडे न वळता तिने हा कार्यक्रम तडफेने पुरा केला. मात्र स्त्रीदाक्षिण्याचे नियम येथेही आम्हाला पाळावे लागत. तिच्या खांद्यावरच्या कोटाची काळजी आम्हांला घ्यावी लागे. मोटारीचे दार तिला उघडून द्यावे लागे. हॉटेलात शिरताना पुढे होऊन दरवाजा उघडावा लागे. मग ॲन फोर्ड आत शिरे. त्या हॉटेलमधील लॉजमध्ये अनेक लोक बसलेले असत. परंतु तीन भारतीयांची उठाबस एक स्त्री करीत आहे अशा विचाराने त्यांनी दृष्टिक्षेप टाकलेला मी कधी पाहिला नाही. बर्लिनच्या विमानतळावर उतरलो तर तेथेही एक जर्मन ॲन फोर्ड आमच्यासाठी उभी. अंतालिका तिचे नाव. आमच्यापेक्षा किती तरी उंच. शरीराने धिप्पाड. युरोपातील स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व आघाड्यांवर कशा चमकत आहेत हे या दोघींनी आपल्या कर्तृत्वाने आम्हांला पटवून दिले.

परंतु त्याचबरोबर इंग्रज स्त्रियांच्या भावनाशून्यतेची चुणूकही मधूनच मिळे. माझे हे

विधान आमच्या यजमानांवर थोडे अन्याय करणारे वाटेल. परंतु हा माझा आक्षेप स्त्रियांपुरात मर्यादित नाही. वैज्ञानिक प्रगतीची फळे चाखणाऱ्या या देशातील नागरिकांमध्ये या आधुनिकतेतून आलेले दोषही आढळले तर नवल काय ? अर्थप्राप्तीने व्यावहारिकता येते, ती अधिक मिळविण्यासाठी माणूस जास्तीत जास्त यांत्रिक बनतो व त्याचा परिणाम भावनाशून्यतेत होतो असे म्हटले तर ते गैर ठरू नये. पेनार्थच्या ज्या इंटरनॅशनल हाऊसमध्ये आम्ही राहात होतो तेथील व्यवस्था रेव्हरंड जोन्स व सौ. जोन्स पाहात असत. रेव्हरंड जोन्स हे फार मिस्कील गृहस्थ. ज्या ज्या गोष्टीत मदत करणे शक्य असेल त्यात मदत करतील. दोघाही पति-पत्नीची वागणूक तशीच. परंतु हे सर्व त्यांच्या कामाच्या वेळात करतील.

एक दिवस साडे आठ वाजता ब्रेकफास्टसाठी आम्ही खाली आलो तर आमच्या भोजनगृहातील कॉर्नफ्लेक्सचा साठा संपलेला. इंगा ही जर्मन विद्यार्थिनी तेथे ही सर्व व्यवस्था पाहात असे. कॉर्नफ्लेक्स ही ' ब्रेकफास्ट ' मधील सर्वांची पहिली डिश्. कॉर्नफ्लेक्स नाही म्हणून विचारणा सुरू झाली. ' कुलपातील माल काढावयाचा राहिला. त्याची चावी मिसेस् जोन्स यांच्याकडे आहे व आता त्यांना तसे सांगता येणार नाही, ' असे सांगितले गेले. सकाळची साडे आठची वेळ होती. नऊ वाजता सौ. जोन्स् खाली यावयाच्या होत्या. पहिल्या मजल्यावरच त्यांचा फ्लॅट होता. जिन्याच्या १० पायऱ्या ओलांडून त्यांच्याकडून चावी आणणे काही कठीण नव्हते. परंतु त्यांची खाली येण्याची वेळ नऊ ही होती व त्या आधी त्यांना त्रास देणे गैर मानले जात होते. आपल्याकडे कुणी अशा जागी असते तर त्याने रात्री अपरात्री हाक मारणेही गैर मानले नसते. शिस्त, व्यवहार, चोख व्यवस्था यांची आवरणे आली की भावनेला मुरड पडते असे येथे पदोपदी जाणवे. भारतीय मंडळी त्यांच्यापेक्षा अधिक भावनाप्रधान आहेत. त्यांच्यात अधिक माणुसकी आहे असे मला निश्चितपणे वाटते. येथे मुलगा अगर बाप ' अपॉईंटमेंट ' घेऊन एकमेकास भेटणार नाहीत. पत्नी व पती एकमेकाला थँक् यू म्हणणार नाहीत. पाहुण्यांना समोर बसते ठेवून एकटे चहा पिणार नाहीत. पाच वर्षे न चुकता भाडे दिले व एकदा उशीर झाला तर मालकीण जुन्या भावना कायम ठेवील अशी खात्री ब्रिटनमध्ये राखता येत नाही.

भौतिकवादाचे सुसंस्कृत स्वरूप मला ब्रिटनमध्ये दिसले. वेल्सचा एक लेखक आमच्या भेटीला आला. त्याने मात्र चहा हक्काने मागितला. स्वतः उठून प्रत्येकाला चहा दिला. व्यावहारिकतेचे पाश त्याला जखडू शकलेले दिसले नाहीत. माझ्या दृष्टीने त्याचे एकत्र

कारण असावे. त्याचे वय ८० पेक्षा अधिक होते. ब्रिटनच्या जुन्या पिढीचा तो प्रतिनिधी होता. दुसऱ्या महायुद्धाच्या जखमा त्याने सोसल्या होत्या, परंतु त्यातूनच निर्माण झालेली ही भौतिकता त्याने आत्मसात केली नव्हती. आपल्याकडे शहरी जीवनातही भौतिकता काही कमी शिरलेली नाही. तरीही आपल्या जीवनात अजूनही ओलावा खूप आहे. त्या ओलाव्याने थबथबलेल्या 'पॅट' सारख्या काही म्हाताऱ्या मला ब्रिटनमध्ये बसच्या प्रवासात भेटत. परंतु नवी पिढी? देशाची आर्थिक भरभराट व माणसांची आन्तरिक प्रगती हे दोन्ही मार्ग परस्परविरोधी तर नाहीत ना, असे तो देश सोडताना मला वाटले.

प्रकरण तेविसावे

# झिमझिम पावसातील पारी व सरोवराकाठचे झुरिक

लंडन अखेर सोडले त्या रात्री १ पर्यंत आम्ही जागे होतो. पहाटे ५-३० वाजता पश्चिम लंडनचे एअर टर्मिनल गाठावयाचे होते. त्या बादशाही स्ट्रॅंड पॅलेस हॉटेलमधील आमचा मुक्काम संपणार होता. ब्रिटन आम्ही सोडणार होतो. आयुष्यातील एक आकांक्षा सफल झाली होती. लंडनची वारी झाली होती व ती आता संपणारही होती. डोळ्यांसमोर आता दिसत होते ते पॅरिस. संबंध जगातील सुंदर शहर म्हणून ऐकलेले. सुंदर स्त्रियांचे, सुंदर कलांचे, सुंदर मनांचे माहेर म्हणून गौरवलेले. फ्रेंच राज्यक्रांतीने गाजलेले. जगाला स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्वाचे तत्त्वज्ञान देणारे पॅरिस. 'टेल ऑफ टू सिटीज' या चित्रपटात पाहिलेले पॅरिस. क्रांतीने पेटलेले, गिलोटीनने भयभीत झालेले. पॅरिस हे जसे व्हिक्टर युगोचे तसेच ते नेपोलियनचे. दुसऱ्या महायुद्धात जर्मन रणगाड्यांपुढे शरण गेलेले. पुन्हा उठलेले.

'एअर फ्रान्स'च्या विमानातून ठरल्याप्रमाणे प्रवास सुरू झाला. ब्रिटनकडून लोकशाहीची, सहिष्णुतेची शिकवण आम्हांला मिळाली होती, तर वैयक्तिक स्वातंत्र्याचा वारसा घेण्यासाठी आम्ही आता पॅरीसला चाललो होतो. 'पॅरीसमध्ये आले की कसे मोकळेमोकळे वाटते,' श्री. अनंत काणेकरांची तेथे भेट झाली तेव्हा ते किती सहजपणे म्हणाले. परंतु त्यांचे वर्णन अगदी यथार्थ होते.

एका तासात आमचे विमान पॅरीसच्या ऑर्ली विमानतळावर येऊन थडकले. सकाळचे

फक्त ८–३० वाजले होते व आता सबंध दिवस पॅरीसमध्ये भटकण्यास मिळेल असे मनोरथ आम्ही रचत होतो. परंतु लंडनला चुकविलेला पाऊस येथे आमच्या स्वागतासाठी हजर होता व ती युरोपची पारी ( की प्यारी ) त्या झिमझिम पावसात भिजत होती. विमानातूनच पॅरिसचे मनोहर दर्शन आम्हाला घडले होते. एफेल टॉवर, सीन नदीचे पात्र व त्या नदीच्या तीरावरचे नोत्रदामचे चर्च या दिसणाऱ्या ठळक गोष्टी. बाकी प्रचंड: रस्ते, व एकाबाजूला जुन्या पॅरीसची गर्दीची घरे.

पॅरीसमध्ये आम्ही उतरणार होतो त्या हॉटेलचे नावच होते हॉटेल शांपेन. येथे शांपेन स्वस्तात मिळेल अशी आशा करून हॉटेलच्या दारात पोहोचलो तेव्हा साहेबांची भाषा संपली हे सर्वप्रथम जाणवले. फ्रान्स व ब्रिटन यांच्यामध्ये फक्त एक चिंचोळी खाडी. परंतु या खाडीपलीकडची खडी इंग्रजी फ्रान्सने कधीच स्वीकारली नाही, किंबहुना ब्रिटनचे जाणूनबुजून काहीही स्वीकारले नाही.

येथे इंग्रजी बोललेलेही फारसे लोकांना आवडत नाही. ब्रिटन, फ्रान्स दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रे म्हणून लढली तरी ते खरे दोस्त कधीच झाले नाहीत. त्यांचा ऐतिहासिक काळापासूनचा उभा दावा जणू अजून चालूच आहे. दी गॉल यांच्या आडमुठेपणामुळेच आज ब्रिटनला युरोपची सामायिक बाजारपेठ बंद झाली आहे.

हॉटेलच्या मालकिणीने वरच्या मजल्यावर आमच्यासाठी एक मोठी खोली राखून ठेवली होती. एअर इंडियाच्या मार्फतच हे बुकिंग आम्ही केलेले होते. या खोलीत तीन पलंग टाकून आम्हा तिघांचीही व्यवस्था केली होती. एकूण स्वस्तातला मामला होता. तशी स्वच्छता चांगली होती.

तेथे पोहोचताच आमच्या इंदूरवासी पत्रकार बंधूने पॅन्टसोबती टॉवेल गुंडाळून आंघोळीची घोषणा केली. समोर फ्रेंच सेविका येताजाताना दिसत होत्या. त्यांना इंग्रजी मुळीच येत नसल्याने हे प्रतीकात्मक नाट्य उपयोगी पडत होते. कमरेच्या त्या टॉवेलवरून व हातवाऱ्यावरून आम्ही आंघोळ करू इच्छितो हे तिने जाणले.

आमच्या या मागणीने तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य झळकलेले दिसले. येथे आंघोळ सणासुदीला करावयाची हा नियम. आमच्या त्या खोलीला बाथरूम नव्हती. त्यात गरम पाणी हवे होते. आमच्या मागणीमुळे सेविकेचा मालकिणीबरोबर आंघोळ या विषयावर एक परिसंवाद घडला. अर्थात तो फ्रेंच भाषेत झाल्याने आम्हाला बाधला नाही. ती पुन्हा वर आली व पलीकडच्या खोलीलगतची एक बाथरूम तिने आम्हाला उघडून दिली. तेथे अर्थात

गरम--थंड पाण्याचे नळ होतेच. एक जुनासा का होईना टब होता. या युरोप दौऱ्यात खरे सुख देणारा आमचा मित्र म्हणजे टब. या टबमध्ये एकदा शरीर बुडविले की स्थितप्रज्ञता, कृतकृत्यता, सहिष्णुता, जीवनाची सार्थकता, पुन:प्रत्ययाचा आनंद, मोक्ष सारे काही लाभल्यासारखे वाटते. बाहेर पावसाची झिमझिम चालूच होती. बाथरूमच्या खिडक्यांतून ती दिसत होती. आपणही असे भिजत पडावे असे सारखे वाटत होते. परंतु ओलेल्या पारीचे दर्शन घ्यावयाचे होते. एखाद्या राजाने तख्त सोडावे अशा ऐटीत तो टब मी अखेर सोडला.

पॅरीसचे वेगळेपण जाणवते ते दोन गोष्टींत. प्रचंड इमारतींचे राक्षस आपल्या चोहो-बाजूंना उभे आहेत असे वाटत नाही. सारी जुन्या पद्धतीची घरे, बेताच्या मजल्यांची. फ्रान्सने लौकर शरणागती पत्करल्याने पॅरीस जर्मन बॉम्बहल्ल्यांच्या तडाख्यातून वाचले. एकापरीने हे ठीक आहे. नाहीतर येथेही अमेरिकन पैशातून उभ्या केलेल्या पन्नास मजल्यांच्या इमारती दिसल्या असत्या. दुसरे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे कोपऱ्याकोपऱ्या-वरची कॉफीगृहे. श्री. अनंत काणेकरांनी वर्णन केलेली स्वातंत्र्याची खरी भावना या कॉफीगृहात बसल्यावर जाणवते. फुटपाथवर खुर्च्या टाकून ही कॉफीगृहे पसरली आहेत. अर्थात कॉफीऐवजी व्हिस्की-बियर पिण्याची कल्पना फ्रेंच लोकांना हल्ली फारशी मानवत नसावी. रोममध्येही कॉफीचा जोर दिसला होता. परंतु या कॉफीच्या पेल्यावर चालणाऱ्या गप्पा या अधिक महत्त्वाच्या. पॅरीसमध्ये प्रत्येक कलावंत गटांचे वेगवेगळे कॉफी क्लब्स आहेत. चित्रकारांचे वेगळे, कवींचे वेगळे, लेखकांचे वेगळे, टीकाकारांचे वेगळे, राजकीय कार्यकर्त्यांचे वेगळे—असे बहुरंगी कॉफी क्लब्ज हेच आज पॅरीसचे खरे ऐश्वर्य आहे. त्यासाठी खूप दिवस पॅरीसमध्ये राहावयास पाहिजे. दोन दिवसांत पॅरीस पाहणे हा पॅरीसचा अपमान आहे. परंतु हे सारे चलन वाचविण्यात गढलेल्या आपल्या भारत सरकारला कुठे पटायचे ?

मग प्रवासी पॅरीसमध्ये येतो तो आधी सीन नदीतून सफर करतो. पॅरीसचे सारे सौंदर्य या सीन नदीतूनच जन्माला आले व ते दिसलेही बहारदार या सरितेतील सफरीतून. हंच-बॅक ऑफ नोत्रदाम हा चित्रपट ज्यांनी पाहिला असेल त्यांना नोत्रदामचे मर्म चांगलेच आठलेल. त्या चर्चच्या सर्वांत वरच्या मजल्यावर चढलेला तो कुबडा व ती प्रचंड घंटा डोळ्यांसमोर आल्याशिवाय राहणार नाही. या प्रचंड चर्चचा बहिरंग गडद काळा वाटतो. व निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ती प्रचंड वास्तू थोडी मेसूर वाटते. सीन नदीतून फिरताना लोक माना उंचावतात ते एफेल टॉवरच्या दिशेने. एफेल टॉवरवर गेलेले लोक माना वाकवितात ते सीन नदी पाहण्यासाठी. ही सफर करून आम्ही परतलो तेव्हा बोट-

धक्क्यावर आमचीच छायचित्रे लटकलेली. बोटीत बसलो तेव्हा झटकन सर्व प्रवाश्यांची छायाचित्रे घेऊन एकाने त्याच्या प्रतीही काढून तेथे लावल्या होत्या. हौशी प्रवाश्यांना भेटून धंदा कसा मिळवायचा याचा हा उत्तम नमुना होता. पुनः तो छायाचित्रकार स्वस्थपणे बाजूला बसून होता. आपली छायाचित्रे घेतली जाणारच याची त्याला खात्री होती. फोटो घेताना त्याने कुणाला विचारले नव्हते, परंतु प्रत्येकजण तो मागेल ती किंमत देऊन आता फोटो घेत होते.

सीन नदीचा निरोप घेऊन आम्ही निघालो ते युनेस्कोच्या इमारतीकडे. फ्रेंच युवतींच्या डोळ्यांत सीन नदीच्या पाण्याची निळी झाक असते असे ब्रिटनमध्ये कुणीतरी आम्हाला सांगितले होते व असे दोन निळे डोळे शोधण्यासाठी आम्ही युनेस्कोत चाललो होतो. ब्रिटन-मधील सरकारी मार्गदर्शिका ॲन फोर्ड हिची युनेस्कोत एक मैत्रीण होती. तिला तिने पत्र पाठविले होते. फ्रॅन्सिन लेग्रँड हे तिचे नाव. फ्रॅन्सिन युनेस्कोत भेटली तेव्हा नजरेत भरली ती तीच सीन नदीच्या पाण्याची निळी झाक.

त्या निळ्या झाकेतूनच आम्ही युनेस्कोची इमारत पाहिली. जागतिक सहकार्याचे प्रतीक अशी ही इमारत आहे. अमेरिका, इटली व फ्रान्स या तीन देशांचे स्थापत्य शास्त्रज्ञ एकत्र आले व त्यांनी ही वास्तू घडविली. युनेस्कोचे मुख्य सभागृह, प्रमुख कमिटी रूम्स, रेडिओ व टेलिव्हिजन यांचे स्टुडिओ इथपासून स्वतंत्र मुद्रणालयापर्यंत सर्व काही या एका इमारतीत आहेत. युनेस्कोचे वेगवेगळे कार्य पाहणाऱ्या जवळजवळ हजार कचेऱ्या या इमारतीत आहेत. सेक्रेटरिएट बिल्डिंग, कॉन्फरन्स बिल्डिंग, डेलिगेशन बिल्डिंग अशा तीन इमारतींतून हे युनेस्को तयार झाले आहे. सर्व देशांनी आपले भांडे येथे आणून ठेवल्याने स्थापत्यशास्त्र व अंतर्गत सजावट यांचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनच येथे तयार झाले आहे. या इमारतीचे बांधकाम दहा संस्थांनी केले. स्वीडनने ग्रंथालय सजविले, डेन्मार्कने ' प्रेसरूम ' सजविली तर नॉर्वेने ' गिफ्ट शॉप ' घेतले. या सर्व यादीत भारत, पाकिस्तानचे नाव कुठे आढळले नाही. बड्या राष्ट्रांनी अर्थात मोठी कामे केली.

कोणत्या देशातील कोणत्या कलात्मक वस्तू निवडावयाच्या हे काम जगातील काही नामवंत कलावंतांनी केले. खुद्द पिकासो व मेक्सिकोचे रुफिनो टमायो यांनी ' मुरल्स ' तयार केली. पिकासोचे लाकडावरील एक नवचित्र त्या डेलिगेटस् हॉलच्या समोरच झळकते आहे. त्याचा अर्थ समजणे मात्र कठीण. अनेक रंगांचे पट्टे त्यात आहेत. एक माणूस उभा व स्त्रीसारखी आकृती त्यात दिसते आहे. एक लाकडी ठोकळ्यासारखा माणूस

पाय पसरून बसला आहे. एक भुतासारखी आकृती त्यात आहे. मानवाचा काही उद्धार या चित्रात अभिप्रेत असावा असे आम्ही धरून चाललो व तेथून बाहेर पडलो. युनेस्कोच्या कचेऱ्यांत फारच थोडे भारतीय आहेत. आमची आकांक्षाच बऱ्याचदा मुंबईत चांगली नोकरी मिळविण्याइतकीच असते. पॅरिसच्या युनेस्को कचेरीत नोकरी मिळविण्याचे बेत कधी कुणी आखत नाही. एक परकीय भाषा येणे त्यासाठी आवश्यक आहे. आता या कचेऱ्यांसाठी देशपरत्वे एक निश्चित आकडा मुक्रर करण्यात आला आहे. भारताचा या कार्यात वाटा कमी असल्याने फार जागा आपल्याला मिळत नाहीत.

हे सारे पाहात असताना ते निळे डोळे आमच्याबरोबर होते. त्या निळ्या डोळ्यांनीच दुपारच्या भोजनासाठी एक सुंदर हॉटेल शोधून काढले. लंडनच्या मानाने कमी दरात व उत्तम जेवण तेथे मिळाले. रेड वाईनने मजा आणली. आमच्या शाकाहारी मित्रांनाही त्या निळ्या डोळ्यांनी उत्तम ' डिशेस ' शोधून दिल्या.

आता पाऊस बराच निवळला होता व निळ्या डोळ्यांचा निरोप घेऊन आम्ही पुन्हा भ्रमंतीसाठी बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही भटकलो ते ' सिटीरामा ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काचेचे छप्पर असलेल्या बसमधून. बसमध्ये बसूनच सारे दिसावे यासाठी तीन चतुर्थांश बस ही काचेची. त्यात पुन्हा पावसाची झिमझिम सुरू झाली होती. काचेवरून पाणी ओघळत होते. झाडांच्या फांद्या वाऱ्याने वाकत होत्या व बसच्या छपराला चाटून जात होत्या. सारे रस्ते ओलेचिंब होते. नेपोलियनच्या समाधीचा तो प्रचंड रस्त्यांचा चौक पावसामुळे कसा म्लान वाटत होता. फ्रान्सचा हिरो म्हणजे हा ' लिटल सोल्जर ' ! नेपोलियनला ते या आपुलकीच्या नावाने ओळखतात. त्यांच्या नवा नेपोलियन मात्र ' बिग सोल्जर ' आहे. बस एका वाड्याच्या भिंतीजवळून जाऊ लागली व मार्गदर्शक म्हणू लागला, " येथे दी गॉल राहतात. " फ्रान्सला पुन्हा स्थैर्य आणले आहे ते या बड्या सैनिकाने. दररोज कोसळणारे लोकशाही सरकार त्याने थांबविले आहे. फ्रान्सची युरोपातील प्रतिष्ठा वाढविली आहे व युरोपातील अमेरिकन वर्चस्वाला नवे आव्हान उभे केले आहे. जॉन्सन ते विल्सन कुणासही दी गॉलना खुष करणे जमलेले नाही.

दी गॉल यांचा अंमल आणखी जाणवला तो रात्री पॅरीसच्या नाइट क्लब्जमध्ये गेलो तेव्हा. या नाइट क्लब्जच्या बेछूट कार्यक्रमांवर थोडे पांघरूण घालण्याचे कामही दी गॉलनी केले असल्याचे तेथे ऐकले. ' पब्ज आणि नाइट क्लब्ज ' या स्वतंत्र प्रकरणात पारीचा हा

जल्लोष मी वर्णन केला आहे. एखादा नाईट क्लबला प्रवासी गेला की तो सकाळी ८–३० शिवाय उठत नाही. जागा झाला तरी तो झगझगाट डोळ्यांसमोर चमकत राहतो. दोन दिवसांच्या भ्रमंतीत हॉटेलात पाणी मिळणे मुष्किल झाले होते. तेथे कोण पाणी पितो ? हॉटेलात शिरावे, मोठमोठ्या बास्केटस्‌मध्ये ठेवलेल्या बिअरच्या बाटल्या उचलून बगलेत माराव्या व जेवण घ्यावे.

व्हर्सोइल्सचा राजवाडा पाहण्यास आम्ही गेलो ते श्री. कॅटस यांच्याबरोबर. काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम या संस्थेच्या पॅरीस कचेरीचे ते प्रमुख. पॅरीस हे या संस्थेचे मुख्य केंद्र. श्री. अनंत काणेकरही बरोबर होते. फ्रान्सच्या राजेशाहीचा सर्व इतिहास येथे घडला. चौदाव्या लुईचा पुतळा तेथे वाड्यात आहेच. प्रचंड प्रासाद, प्रचंड बगिचा म्हणजेच व्हर्साइल्स. आम्ही आत इमारतीत शिरलो व श्री. काणेकर कॅटससह बागेत रेंगाळले. जुना इतिहास आम्ही पाहात हिंडत होतो. ते सर्व पाहून खाली उतरलो तर श्री. काणेकर म्हणाले, “ चालताबोलता इतिहास आता मी पाहिला. ” त्या बागेत हिंडण्यासाठी आले होते आठवे एडवर्ड आपल्या पत्नीसह. प्रेमासाठी राज्यपद व देश सोडून आलेले.

कुठल्याकुठे हा राजवाडा पाहात हिंडलो असे आम्हाला झाले. परंतु आता उपयोग नव्हता. अंधार पडू लागला होता. पुन्हा आधल्या रात्री पाहिलेल्या नाइट क्लबची आठवण येऊ लागली. खिसे चाचपून शिल्लक मोजली आणि पुन्हा पॅरीसच्या वाटेला लागलो.

सकाळी हॉटेलचा निरोप घेताना हाती बिल आले त्यात आंघोळ प्रकरण वेगळे दाखविले होते. प्रत्यक्ष राहण्याच्या बरोबरीने बिल झाले ते आंघोळीचे. तिघांनीही रोज आंघोळ केल्याने त्या मालकिणीने धास्ती घेतलेली दिसत होती. आघोळीचे फ्रँक्स आम्ही तिला दिले तेव्हा इतक्या रकमेत बियरच्या बाटल्या किती आल्या असत्या याचा अंदाज मी मनातल्या मनात घेतला. ही चूक पुढच्या खेपेस दुरुस्त करावयाची असे ठरवून आम्ही पॅरीसचा निरोप घेतला.

स्वीस एअरने आम्ही आता उड्डाण केले ते झुरिकला. युरोपच्या या नंदनवनात आम्ही पोहोचलो तो रविवार होता. त्यामुळे सर्व ‘ हॉलिडेमेकर्स ’ घराबाहेर पडलेले होते. उन्हाळा असल्याने हौशी प्रवाश्यांची गर्दी सर्वत्र होतीच. एकच दिवस आम्ही झुरिकमध्ये होतो. परंतु ते गावच इतके लहान की बहुतेक गाव आमचे फिरून झाले.

या गावचे सारे सौंदर्य आहे ते सरोवरात. सरोवराच्या काठावरचे हे शहर स्वित्झर्लंडमधील प्रमुख. हे सरोवरच आहे २४ मैल परिघाचे. यावरून त्याचे अवाढव्य स्वरूप कळून येईल. असंख्य बोटी सरोवरात हिंडत होत्या. झुरिक गावाची अनेक उपनगरे असावी, कारण तेथील

लोकांचे सर्व दळणवळण या बोटीतून चालत होते. आम्हीही तिकीट काढून एका बोटीत बसलो व तो सरोवर-विहार सुरू झाला. मधुचंद्राचा भाग ठरावा असा तो विहार आम्हा तीन पुरुष पत्रकारांचा चालला होता. बोटीत म्हातारे-म्हाताऱ्या होत्याच. त्या सर्वांना चुकविण्यासाठीच तरुण-तरुणींनी लहान होड्या हाकारल्या होत्या. सबंध सरोवर माणसांनी फुलून गेले होते. नावा नाचत होत्या. आमची छोटी बोट लहानलहान स्टेशने घेई. बाजाराला आलेली मंडळी उतरून जात. या सरोवराच्या दोन दिशांना डोंगर होते, आणि त्यांच्या साहाय्याने सरोवरावर जोडपी फिरत होती. सरोवराभोवतालचे सर्व झुरिक एक नजरेच्या टप्प्यात त्यांना दिसत असावे. झुरिकवर जर्मन भाषेचा बराच प्रभाव आहे. परंतु आम्हांला दोन्ही भाषा येत नव्हत्या. भाषेची अडचण जास्त जाणवते ती भूक लागल्यावर. सरोवरातील भ्रमंती संपल्यावर झुरिकच्या निळ्या ट्रॅम्समधून भटकलो. हौशी प्रवाश्यांसाठी बस होती दुपारी तीनला. या बसने झुरिकचा उरलसुरला परिसर आम्ही पाहिला. त्या सरोवरातून अनेक कालवे निघाले होते. किनाऱ्यावर जिथे तिथे गळ टाकून बसलेले लोक. माणूसही जीवनप्रवाहात असाच गळ टाकून बसलेला असतो. उत्तम संधीचा मासा कधीतरी गळाला लागेल या आशेने.

झुरिकची सफर संपली ती एक टेकडीवरच्या रेस्टॉरॉमध्ये. आल्पसच्या अनेक रांगांपैकीच ही एक रांग. बस थेट जाऊन उभी राहिली ती हॉटेलच्या दारात. खाली सर्व झाडी. दाटी केली होती ती अल्पाइन वृक्षांनी. मधूनच एखादे घर डोकावे. एखाद्या बागेत बसावे तसे सर्वजण चहा-कॉफी घेत बसले होते. स्वित्झर्लंडच्या हवेचा खरा अदमास तिथे येत होता. अल्पाईनच्या फांद्या वाऱ्यावर लवत होत्या, डोलत होत्या. ‘ वीपिंग विलोज ’ असे त्यांचे वर्णन केले जाते. परंतु त्या डोलण्यात मला रुदन भासले नाही. त्यांना ‘ Smiling willows ’ का म्हणू नको असेच मनात आले. पॅरीसचा रंगेलपणा येथे नव्हता. होते सारे स्तब्ध पण मोहक वातावरण. झुरिकचा एक दिवसही कसा निवांतपणे घालविल्यासारखे वाटले. दुसऱ्या दिवसापासून पुन्हा धावपळीचा दौरा सुरू व्हावयाचा होता. प. जर्मन सरकारचे पाहुणे म्हणून रात्रीच बर्लिन गाठावयाचे होते. झुरिक रात्री ८ ला सोडले व तीन तासांत एका झगमगत्या नगरीत पोहोचलो. बर्लिन आले होते, ऐतिहासिक बर्लिन. घारीने तिरकी झेप घेऊन जमीन गाठावी तसे विमानाने हिटलरच्या भूमीवर पाय टेकले.

## प्रकरण चोविसावे

# पब्ज आणि नाईट क्लब्ज

पब्ज आणि नाईट क्लब्ज हा पाश्चात्त्य जगाचा एक विलासी पैलू. जीवन हे उपभोगण्या-साठी आहे असे हे जग मानते. त्यामुळे आयुष्याला रंगत आणणाऱ्या अनेक गोष्टींची येथे चहा होते. संस्कृतीच्या कल्पनाही येथे वेगळ्या आहेत. हवामानही निराळे आहे. सिगारेट हा केवळ पुरुषांचा षोक नाही. " दुनियेला तू सिगारेट ' ऑफर ' करशील, परंतु पत्नीला नंतर देशील, " अशा तक्रारी करणाऱ्या बायका येथे अनेक भेटल्या. सिगारेटच्या धुराचा खरा आनंद घ्यावयाचा असेल तर पब्जमध्येच जायला पाहिजे. पब्जला ' स्मोकिंग रूम ' हे नाव पूर्वी नेहमी दिले जात असे ते अधिक यथार्थ होते.

पब्जची संस्कृतीच काही वेगळी आहे. बाहेरून काहीही दिसत नसलेल्या एखाद्या पब्जचे दार उघडावे व आत शिरावे तर पहाटेच्या धुक्यात शिरल्यासारखे वाटते. सिगारेटच्या धुराची वलये सर्वत्र विहार करीत असत. प्रवेशद्वाराजवळ मुख्य बार. सोनेरी केसांच्या परितशी उलटलेल्या स्थूल बायका काउंटरवर बसलेल्या. मागच्या बाजूला दारूची पिंपे. काउंटरसमोर उंच वर्तुळाकार सीट असलेली लोखंडी आसने. त्यावर बैठक मारली की, ती समोरची सोनेरी केसांची **वारांगना** " What will you like to have ? " असे मृदु स्वरात विचारणार. " Pinta of bear " किंवा " A peg of whisky " असे हुकूम मग येऊ लागतात. अनेकजण तिथेच घोट घेत बसतील. कुणी जवळच्या तशाच एका आसनावर बैठक मारील. काउंटरजवळ दोन माणसे हातात ग्लास घेऊन

अगदी काही मनातले बोलत आहेत हे दृश्य कुठच्याही पब्जमध्ये दिसणारे. विशेष असे की दुसऱ्याच्या गप्पांत कुणीही सहसा लक्ष घालत नाही. मध्येच एखाद्या कोपऱ्यात काही विनोद होतो व दहा मजली हास्य त्या पेयासारखे खळाळते. बिअरचा फेस, व्हिस्कीची चकाकी, शेरीची चमक, शांपेनची झळाळी यापुढे आजूबाजूच्या जगाचे भान न राहिले तर कोणते नवल ? येथे तर साऱ्या दिलाच्या गोष्टी चाललेल्या.

खूप बोलायचे असेल तर बिअरचे ' मग् ' उचलावे व आणखी आत शिरावे. ही खरी ' स्मोकिंग रूम '. येथे काही माणसे अशा थाटात बसलेली, की गेले दोन-तीन दिवस त्यांचा मुक्काम येथेच पडलेला आहे असे वाटावे. पेयाचे प्रमाण जसे वाढते तसे बोलण्याचा आवाजही चढत जातो. परंतु या सर्वांकडे स्थितप्रज्ञतेने पाहात असतात काउंटरवरच्या सोनेरी केसांच्या त्या बायका.

पेनार्थपासून बर्मिंगहॅमपर्यंत, रोमपासून पॅरिसपर्यंत, लंडनपासून हॅम्बुर्गपर्यंत या पब संस्कृतीचा विलास पाहात, अनुभवीत, उपभोगीत मी फिरलो. पेनार्थला स्टेशनजवळ एक बार होता. बार व पब्ज यात पुन्हा थोडा फरक. बार हा जरा आकाराने मोठा. पब्जचा आकार लहान व त्यात जवळीक जास्त. मोठमोठ्या जुन्या पद्धतीच्या खुर्च्या कमी. परंतु आता बहुतेक ठिकाणी पब, बार व स्मोकिंग रूमचे मिश्रण आढळते. दुपारी ' वेस्टर्न मेल ' दैनिकातील ' लंच ' घेण्यापूर्वी अनेकदा पावले कार्डिफमधील बारकडे वळत. ' पिंट ऑफ गिनेस ' घेऊन सिगारेटचे झुरके फेकीत लंचला परतण्याचा उन्माद काही वेगळा.

उत्तर वेल्सच्या दौऱ्यावरून आम्ही परतलो त्या दिवशी स्वान्सी या गावी एका पेट्रोलियम ' मॅग्नेटतर्फे ' आम्हाला मेजवानी होती. पेट्रोलियमचे प्रचंड साठे असलेले हे स्वान्सी गाव हिटलरने दुसऱ्या महायुद्धात साफ उद्ध्वस्त केले होते. ते आता पुन्हा वसले आहे. गावाच्या मध्यभागी डूंगन नावाचे एक प्रचंड व आलिशान हॉटेल आज उभे आहे. तेथे हे ' डिनर ' होते.

जेवण्यापूर्वी नेहमीप्रमाणे सारेजण त्या हॉटेलच्या पबमध्ये प्रथम गेले. तेथे व्हिस्कीचे प्याले रिकामे होण्यात तास–दीड तास गेला. त्यानंतर ' डिनर ' सुरू झाले. सुरुवातीलाच प्रत्येकाच्या खुर्चीजवळ आइसक्रीम पॉटसारखे काहीतरी आले. त्यात बर्फ होता व एक बाटली होती. स्टुअर्ड मधोमध बसलेल्या आमच्या यजमानाजवळ येऊन उभा राहिला व त्याने एक बाटली फोडून अगदी थोडे मद्य यजमानाच्या समोरील एका चषकात टाकले. त्याने ते चाखून पाहिले व सर्वांना देण्याची खूण केली. ऐतिहासिक रिवाजाप्रमाणे यजमानाने

प्रथम पेय घ्यायचे ते पाहुण्यांना विषप्रयोग करण्याचा येथे प्रयत्न नाही हे दाखविण्या-साठी. ताबडतोब चार बेअरर्स पुढे आले व त्यांनी भराभर बाटल्या फोडून चषक भरण्यास सुरुवात केली. ती सर्व शांपेन होती, व ग्लासात ओतताच अशी काही चकाकी त्यावर तरळत होती की, आपल्या डोळ्यांत तरारलेला मोह झाकता न यावा. एका मोठ्या दालनात हे डिनर चालले होते. थोडा दूर असा बँड वाजत होता. काहीजण नृत्यही करीत होते. येथे गप्पा, विनोद, राजकीय पुढाऱ्यांची थट्टा, बीटनिक्स व बिटल्स यांच्या कहाण्या या साऱ्यावर वहात होती ती ही बिलोरी शांपेन. "Champagne was flowing" या शब्दप्रयोगाचे दर्शन येथे खरेखुरे घडत होते. शांपेनची चवही काही न्यारीच. त्यात बियरचा कडवटपणा नाही की व्हिस्कीचा तिखटपणा नाही. अतिशय मधुर असे हे पेय. तितकेच मादक. माझ्या शेजारी आमचा जमाइकन मित्र बसला होता. डिनर संपावयास आले व पुन्हा एक वेगळे 'ड्रिंक' आले. जमाइकन मित्राच्या आग्रहावरून आलेल्याचे सहर्ष स्वागत करण्याचा निर्णय मी घेतला. ती एक वेगळ्या तऱ्हेची ब्रँडी होती. अखेर अशी निर्मळ ब्रँडी पिऊन कार्यक्रम संपविला जातो. त्या दिवशी सारेजण थोडे हवेतच चालत होते. परंतु हे सारे थोडा वेळ. अर्ध्या तासाने तोही अंमल गेला. स्वान्सीहून मोटारी केव्हा सुटल्या हे सर्वांना कळले नाही. तरी कार्डिफच्या अर्ध्या वाटेवर मोटारी आल्यावर पुन्हा रात्री कुठे जायचे याचा बेत सुरू झाला. रात्रीचे १०-३० वाजून गेले होते. आमचे सरकारी मार्गदर्शकही मोठे रसिक. "तुमचा उत्साह असेल तर एका क्लबात तुम्हांला घेऊन जातो," असे तो म्हणताच, आमच्या मोटारीतील चौघांनी ताबडतोब हात उंचावले आणि आमची मोटार पेनार्थजवळच्या बारी बेटावरील एका क्लबाकडे वळली.

त्या क्लबमध्ये आम्ही शिरलो तेव्हा रात्रीचा ११-३० चा सुमार होता. परंतु नुकताच दिवस उजाडल्याप्रमाणे सारे स्त्रीपुरुष उत्साहात दिसत होते. "Night is still very young" ह्या शब्दांचा अर्थ असा १२ च्या सुमारास एखाद्या क्लबमध्ये शिरल्याशिवाय कळायचा नाही. समोरच आधी पब होता. सारेजण वर्तुळाकार आसनावर जाऊन बसले. व्हिस्की, बियर, पुन्हा हुकूम सुटले, "Whisky after bear is risky, bear after whisky, there is no fear" असा काही उपदेश केला जात होता. परंतु त्याकडे विशेष कुणाचे लक्ष नव्हते. अनेकांच्या ओळखी करून दिल्या जात होत्या. हस्तांदोलने होत होती. परंतु यांपैकी एकही ओळख उद्या आठवायची नाही असे त्या वेळी कुणाच्या मनातही येत नव्हते. सारे कसे उमेदीने चाललेले. प्रणयी युगुलांनी कोपरे गाठले

होते. कुणीतरी कुणाच्या ओठाला ग्लास लावत होते. तेवढ्यात दुसरा कुणीतरी आपली ओळख करून घेण्याचा प्रयत्न करीत होता. जाता जाता ओळख-कार्ड देण्याचा प्रयत्न करीत होता. आमच्या टर्की मित्राला एकीची ओळख करून घेण्याची इच्छा झाली. त्याने " Excuse me "चा पुकारा करून तोंड खुपसले. ती मुलगी प्रियकराबरोबर काही गूढगुंजन करीत होती. या मित्राची भावना तिने ओळखली असावी किंवा तिला हे परिचयाचे असावे. तिने आपल्या प्रियकराला पाहुण्यासाठी पेय आणावयास पाठविले, व ती त्याच्याशी बोलत बसली. माझ्याशी बोलावयास मिळावे म्हणून तिने आपल्या प्रियकराला किती सुंदर कटविले या आनंदात त्या क्षणापासून आमचा टर्की मित्र होता, तो पुढे आठ दिवस. तिने दिलेल्या पत्त्यावर या आमच्या मित्राने नंतर खूप फोन्स करून पाहिले. परंतु त्या नावाची मैत्रीण काही सापडली नाही. पब्जमधील ते धुंद क्षण तेवढ्यापुरते असावेत. तेथेच ते फुलतात व तेथेच धुक्यासारखे विरतात. श्रीमत समाजातील तरुण-तरुणींचा हा क्लब होता. तरुणी ज्याच्याबरोबर येते त्याच्याच बरोबर ती नृत्य करते. त्याच्या परवानगीशिवाय, त्या रात्री तरी, दुसऱ्याबरोबर ती नृत्य करणार नाही. त्या रंगेलपणालाही काही शिस्त आहे. त्या मस्तीलाही काही नियम आहेत.

त्याचबरोबर या धुंदपणालाही एक परंपरा आहे, याचा अनुभव मला लंडनमध्ये आला. तेथील आमचे स्नेही डॉ. वसन्तराव प्रधान यांनी रविवारच्या ' ऑब्झर्वर 'ची रंगीत पुरवणी माझ्या पुढ्यात टाकली. त्यात एक लेख होता : " Two walks in London, where tourist don't go " असा त्या लेखाचा मथळा होता. त्यांच्या सूचनेला मान देऊन मी निघालो. ही भ्रमंती पायी करावयाची होती. जुन्या लंडनमध्ये भटकायचे होते. त्या ऐतिहासिक आगीतून वाचलेले लंडन आम्ही पाहणार होतो व या सफरींचे मोठे आकर्षण होते ते तितकेच जुने व त्याच स्थितीत अजूनही असलेले पब्ज. लंडनमध्ये आलेले बहुतेक हौशी प्रवासी थेम्स नदीतून सफर करतात. आम्हीही ती केली. परंतु त्यामधून सुंदर दृश्य दिसते ते फक्त वेस्टमिन्स्टर पॅलेसचे. बाकीचे लंडन इतके भिकार दिसते की, वरचे प्रचंड पूल व त्यावरचे निळे आकाश पाहूनच प्रवाशाने परतावे. जुन्या धुरकटलेल्या पडत आलेल्या इमारती या थेम्स नदीतून दिसतात. जुन्या लंडनच्या मोठ्या इमारतींची हीच ती पाठीमागची बाजू. त्यापेक्षा ह्या ' दोन फेऱ्या ' होत्या त्याच भागातील. परंतु इमारतींच्या पुढील भागातून करावयाच्या ' ब्लॅक फ्लायर्स ' या ट्यूब स्टेशनपासून हे दोन्ही मार्ग सुरू होत होते. एक होता थेम्स नदीच्या अलीकडचा तर एक पलीकडचा.

हे खरे जुने लंडन. येथे अजूनही खरा लंडनवासी राहतो. आगीच्या भक्ष्यस्थानी एकेकाळी पडले ते हेच लंडन. त्या आगीतून वाचलेल्या इमारती अजून तेथे आहेत. आग कुठून सुरू झाली त्याचे स्मारक तेथे आहे. त्यापेक्षा त्या आगीतून वाचलेले पब्ज तेथे आहेत. लंडन शहरातील सर्वांत जुना पब मार्टिन लेनमध्ये आहे असे ' ऑब्झर्वर ' मधील त्या लेखात होते. तो शोधीत आम्ही निघालो.

कॅनन स्ट्रीटवरून जाताना उजवीकडे मार्टिन लेन येते. मर्ढेकरी भाषेत सांगायचे म्हणजे मार्टिन लेन कॅनन स्ट्रीटला टांग मारते. या गल्लीत डावीकडेच ' दी ओल्ड वाइन शेडस ' या नावाचा पब लागतो. लंडनमधील हाच सर्वांत जुना पब. १६६३ मध्ये स्थापन झालेला. येथूनच १०० यार्डांवर ती कुप्रसिद्ध आग लागली. त्या अग्निहोमातून सुलाखून निघालेली सुवर्णकांती या पबमधील पेयावर आहे. याच पबमध्ये चार्लस डिकन्स येऊन बसला. डॉ. जॉन्सन आले. लंडनचे जुने लेखक, व्यापारी, लंडन बंदरात उतरणारे खलाशी या साऱ्यांनी ज्या पबमध्ये पायधूळ झाडली, त्याच पबमध्ये आम्ही शिरलो.

आजही तो पब त्याच ऐतिहासिक स्वरूपात ठेवलेला आहे. खुर्च्या, टेबले सारे त्याच शतकातील आहे. कारण त्यांची घडणच होती ठोकळेबजा. जाडजूड. मदिरेचे असंख्य चषक त्यावर रिते झाले म्हणून ते खराब झाले नाहीत. उलट पडलेले थेंब रिचवून त्यांनी एक वेगळा रंग घेतला आहे. पबचा दर्शनी भाग खाली लाकडी व वर काचा अशा पार्टिशनचाच बनलेला. मुख्य दरवाजातून आत शिरले की, उजव्या हाताला मदिरेचा दरबार भरलेला. दारू जितकी जुनी तितकी चांगली व ती महागही तशीच, याचे प्रत्यंतर पाहावयास मिळाले ते येथे. येथे नव्या पब्जमध्ये दिसणारी दर्शनी चकाकी नव्हती. पिंटा व पेग देण्याचे स्टीलचे फाउन्टन्स लावलेला काउंटर येथे नव्हता. मागे उभे केले होते ड्रम्स. एकावर एक. त्याला चक्क नळाच्या तोट्या. त्या ड्रमवर दुसरा थर होता अशाच लाकडी ड्रम्सचा. त्यावर त्या मदिरेचे जन्मवर्ष लिहिलेले होते. त्यावर त्यांची नावेही होती. ' स्पॅनिश शेरी ', ' पॉमेरी शांपेन ', ' रियल स्कॉच व्हिस्की ', ही नावे पाहून आमच्या तोंडाला पाणी तर सुटलेच. आमची प्रिय गिनेस ही बिअर तेथे होतीच. हे गिनेस नाव आगाखानाच्या पत्नीचे व प्रिन्स अलीखानच्या आईचे आहे हे तेथे कळले. त्यांच्या मालकीचीच ही ब्रुअरी आहे. " Good movements are worth waiting for ", अशी या बिअरची जाहिरात टेलिव्हिजनवर केली जाते. तो फेसाळलेला ' मग् ' तोंडाला लावून जाहिरातीमधील माणसाप्रमाणे आपणही तेच पुटपुटतो.

आम्हालाही त्या पबमध्ये शिरल्यावर आयुष्यातील चांगले क्षण हे वाट पाहण्यालायक असतात हे पटले. आमचे प्याले घेऊन आम्ही त्या पबमध्ये आणखी आत शिरलो. तेथे एका चवुतऱ्यावर आरामात बसण्याची जागा होती. खुर्च्या, टेबले, तीच जुनी. ऐतिहासिक. भिंतीवर लटकविलेल्या तैलचित्रांना भोके पडली होती. काहीतर साफ अस्पष्ट झाली होती. कावळ्यांच्या चोचीतील एक बाटली कोपऱ्यात लटकवलेली होती. 'तुम्हाला कधी स्पर्शही केला जाणार नाही.' या घसघशीत आश्वासनावर जणू ती सारी मंडळी जागच्या जागी लटकलेली होती. 'कॉर्नर ऑफ दी स्मोकिंग रूम' या नावाने ओळखला जाणारा हा भाग. पलीकडे चौघाचौघांना एकत्र बसता येईल असा मध्ये पार्टीशन असलेला भागही होता. स्मोकिंग रूमच्या छतातून व एका काचेच्या कौलातून सूर्यकिरण आत येत होते. एखाद्या रंगमंचावर दारूच्या गुत्त्याचा सेट लावावा व वरून प्रकाशझोत टाकावा तसे दृश्य दिसत होते. अर्थात या रंगमंचावर आम्ही दोघे बिअर रिचवीत होतो. सिगारेटचा धूर त्या सूर्यकिरणांत मिसळत होतो.

याच भागातील आणखी काही पब्ज आम्ही पालथे घातले. दी 'जमाइका वाइन हाऊस' असेच एक येथील ख्यातनाम पेयगृह. एका गल्लीबोळातील. बाहेर प्रचंड लंडन शहर आहे हे या पबमध्ये बसून जाणवणार नाही. येथेच १६५२ मधील सर्वांत पहिले लंडन कॉफी हाऊस होते. टॅव्हर्न पब, मिले टॅव्हर्न बार या साऱ्या जुन्या लंडनच्या जागविलेल्या आठवणी. भिंतीवरची चित्रे व नक्षी जुन्या वळणाची. अधिक भडक. परंतु हे सारे संभाळावयाचे आहे या ईर्षेने टिकविलेले. फ्लीट स्ट्रीटवरही अमेरिकन प्रवासी जातात ते तेथील सर्वांत जुन्या हॉटेलात जेवण्यासाठी. डॉ. जॉन्सन यांच्या घराकडे जाणाऱ्या गल्लीतच हे हॉटेल आहे. तेथे इतकी तुफान गर्दी असते की, त्या हॉटेलातील पबमध्येही नंबर लागणे कठीण. पुन्हा येथेही जुने सारे टिकवायचे या ईर्षेत अधिक लोकांची व्यवस्था व्हावी म्हणून बदल घडणे अशक्य. फ्लीट स्ट्रीटचा ४७ 'एल व्हिनो' हा पबही असाच नामांकित व्यक्तींचा आवडता. ओल्ड बेली कोर्ट हे फ्लीट स्ट्रीटजवळच असल्याने पत्रकारांबरोबर वकिलांचाही हा पब म्हणजे अड्डा. लंडनच्या दैनिकांना अर्ध्याअधिक बातम्या या नेहमी पबमध्ये मिळतात. त्यांपैकी बऱ्याचशा या फ्लीट स्ट्रीटवरच्या पबमध्ये मिळत असाव्यात. ब्रिटनमध्ये सायंदैनिके अधिक का खपतात याचे कारण पण हीच संस्था असावी. कारण स्थानिक बातम्या येथे त्यांना चांगल्या मिळत असाव्यात व त्या एक ग्लास पिऊन लिहिल्यावर अधिक रंगदार ठरत असाव्यात.

फ्ज या संस्थेच्या युरोपातील शाखा त्याच धर्तीच्या. हल्ली युरोपातील लोक अधिक कॉफी पिऊ लागलेले दिसले. कारण रोम, पॅरीस, बर्लिन येथे पबजपेक्षा कॉफी हाऊसेस मला अधिक आढळली. रस्त्याच्या फुटपाथवर पसरलेली कॉफी हाऊसेस हे पॅरीस व रोमचे नवे वैभव. या लोकांना ही उपरती का झाली कळत नाही. त्यांच्या लेखनाचा व कलाकृतीचा दर्जा घसरला असला पाहिजे असे विधान करण्यास हरकत नसावी. पब्जबरोबर नाइट क्लब्जचा दर्जाही युरोपात उतरत चालला आहे हे पाहून तर मला अधिक आश्चर्य वाटले. पॅरीसपुढे लंडनने आता आघाडी मारली आहे. ' मूला रूझ ' व ' फॉलीज बर्जर ' या पॅरीसमधील नाइट क्लब्जपेक्षा लंडनच्या पिकॅडलीतील ' सनसेट ' हा कितीतरी पुढे गेला आहे. भव्यता व झगझगाट यांच्या गदारोळात ज्यासाठी नाइट क्लबमध्ये प्रवासी येतात ते झाकून ठेवण्याचा प्रयत्न पॅरीसमध्ये होत असलेला आढळला. हॅम्बुर्गमध्ये तर याचे अगदी बाजारी स्वरूप आढळले. हॅम्बुर्ग हे लंडनप्रमाणेच बंदर. परंतु खलाश्यांच्या तांड्यांना परवडतील असे नाईट क्लब्ज अधिक येथे निघाले असावेत. युरोपात कुठेही, कोणत्या नाइट क्लबमध्ये जायचे हे आधी स्वतः ठरवून तेथे नेण्याची सूचना टॅक्सीवाल्यास द्यावी लागते. कारण त्यांचे क्लबवाल्यांशी संधान असते व जेथे त्यांना दलाली मिळेल अशा गुलहौशी घरात हौशी प्रवाश्यांना ते नेऊन सोडतात. अशा नाईट क्लबमध्ये शिरलेला प्रवासी नेसत्या कपड्यानिशी सकाळी बाहेर पडला तर त्याचे नशिब.

' फॉलीज बर्जर ' हे पॅरीसच्या पिगालचे सर्वांत मोठे आकर्षण. ' मूला रूझ ' आता यामानाने मागे पडला आहे. तेथील कार्यक्रमांचे स्वरूपही बदलले आहे. " न्यूडेस्ट ॲन्ड नॉटिएस्ट शो ऑन अर्थ ", असे वर्णन या ' फॉलीज बर्जर ' चे केले जाते. ' स्प्लेन्डर ', ' स्पेक्टॅक्युलर ' असे वर्णन प्रत्येक कार्यक्रमाचे केले जाते. लाखो फ्रँक्स एकेका कार्यक्रमावर खर्च होतात. मॉरिस शिवेलियर सारखे नट या कार्यक्रमात प्रथम गाजले व नंतर चित्रपटात गेले. अनेक नटनट्यांच्या कर्तृत्वाचा जन्म येथे झाला. शिवेलियरच्या प्रेमात सापडलेली Mistingguett याच फॉलीज बर्जरीच्या रंगमंचावरील. तिचे सारे पाय हे तिचे सौंदर्य. एका कार्यक्रमात ती भव्य जिन्यावरून ज्या लालित्याने पावले टाकीत येई ते पाहण्यासाठी लोक येत. एक लाख डॉलर्सचा विमा तिच्या पायांचा उतरण्यात आला होता. पॉल डेरवल हा या फॉलीज बर्जरच्या साऱ्या वाह्यातपणाचा निर्माता. १९१६ मध्ये त्याच्याकडे क्लबची मालकी आल्यावर स्त्रीच्या नग्नतेला कलात्मक कोंदण घालून त्याने तिला नखरेल रंगमंचावर नाचवले. त्यामुळे साऱ्या जगाचे प्रवासी पॅरीसला आले की ' फॉलीज बर्जर ' कडे वळल्या-

शिवाय राहिले नाहीत.

आम्हीही त्याला अपवाद नव्हतो. रात्री ११ च्या सुमारास 'फॉलीज बर्जर'चे फिरते दिवे पाहात आम्ही आत शिरलो. तिकीट १५ शिलिंग्जचे होते. आत शिरताच एक व्यवस्थापक पुढे आला व त्याने आम्हांला पब्जवळ नेले. "या १५ शिलिंग्जमध्ये तुम्हाला शांपेन मिळेल व या कठड्याजवळ उभे राहून तुम्हाला समोरचा कार्यक्रम पाहता येईल. या कठड्यापलीकडील टेबलावर तुम्ही हवे तर बसू शकता." "परंतु तेथील सगळ्याच गोष्टींचे दर वेगळे आहेत." दुसरा एकजण कानात पुटपुटला.

'फॉलीज बर्जर'चा फोलपणा प्रथम जाणवला तो त्या पेयात. शांपेनचे चार थेंब व इतर लेमन घुसडून एक पेय आमच्या हाती देण्यात आले. त्याला कसलीच चव नव्हती. त्यापेक्षा समोर चाललेला कार्यक्रम अधिक चवदार होता. विदुषकी चाळे त्यात अनेक चालले होते. हल्ली पुरुषांची लुडबुडही बायकांच्या कार्यक्रमात वाढत चालली आहे. प्रेक्षकांची आतुरता वाढवत न्यायची व ती अगदी शिगेला पोहोचल्याशिवाय मुद्देमाल दाखवायचा नाही हे धोरण या कार्यक्रमाचे साधारण असते. कार्यक्रम पाहणाऱ्यांच्या वासनांशीच तो एक चाललेला खेळ असतो. अनेक स्त्रिया नृत्य करीत येतात. वर एक दिखाऊ असा मोठा वेष असतो. एखाद्या पिसांच्या कोटासारखा. तो पहिल्याच झटक्याला विंगमध्ये फेकला जातो व मग मदनमस्त मांड्यांचे उघडे पाय हवेत फेकले जाऊ लागतात. स्त्रीचे सारे सौंदर्य हे मुख्यत्वे लांब पायात आहे हे येथे जाणवते. मग पायातील मोजे निघण्यातच बराच वेळ जातो. हे सारे एकीकडे चालू असताना समोरच्या मुख्य दालनातील टेबलावर प्रणयाची फुले फुलायला सुरुवात होते. त्या कठड्याची लक्ष्मण रेषा ओलांडून तुम्ही आत पाऊल टाकले व टेबल पकडले की, एक छटेल तरुणी तुमच्या शेजारी येऊन बसतेच. तुम्ही कोणत्या देशातून आला आहात हे ती अनुभवाने जाणते व जवळकीची भाषा करते. ताबडतोब बेअरर येऊन उभा राहतो व पेयांची ऑर्डर ती देते तुमच्यासाठी. स्वतःलाही काहीतरी मागवते. या पेयांचा दर चौपट असतो. पाहुण्याला असली माल दिला जातो व ती सरबत रिझवीत असते. कोटाच्या बटनांशी ती खेळते, गळ्यात हात टाकून सांगते, "मला अधिक पेय पिऊन कसे चालेल, समोर जाऊन मला आता नृत्य करावयाचे आहे आणि हे नृत्य पाहा आता मी तुझ्याकडे पाहून करते," असे सांगून ती रंगमंचावर जाते व त्याच्याकडे कटाक्ष फेकीत वस्त्रे उतरते. तोपर्यंत तो पुरुष साफ विरघळलेला असतो. पेयांच्या ऑर्डरीत ढिलेपणा राहू नये म्हणून नुकतेच नृत्य करून आलेली तरुणी त्याच्याजवळ येऊन बसते.

मॅनेजरचे बरोबर लक्ष असते व आपल्या शिकारीवर रोखलेले मदनाचे बाण तो कमी पडून देत नाही. ती कपडे घालून "माझे नृत्य कसे झाले" असे विचारावयास परत येते तोपर्यंत हा नागवला गेला असतो याची शुद्ध त्याला नसते. शंभर शंभर पौंड रात्रीत गमावून जाणारे अनेक शौकीन येथे येतात. पहाटे येथून जातात तेव्हा अनेकांच्या जवळ बसच्या तिकिटालाही पैसे नसतात.

फॉलीज बर्जरच्या कार्यक्रमातील एक कार्यक्रम 'नवा नवा' म्हणून गाजत होता. एका प्रचंड पिंजऱ्यात एका निग्रो पुरुषाला ठेवण्यात आले होते. अतिशय अगडबंब, राकट असा हा पुरुष होता. हल्ली काळ्या-गोऱ्यांच्या संबंधांचे नवे आकर्षण युरोपला लागले असल्याचे दिसते. त्याचाच हा पडसाद होता. या पिंजऱ्यावर एक स्त्री नृत्य करते. त्या स्त्रीला पाहून साहजिकच तो राकट काळाकभिन्न पुरुष पेटतो. ती स्त्रीही घाबरल्याचा अभिनय करते. पण तो अभिनयच. अंगावरचे एकेक वस्त्र पिंजऱ्यातल्या त्या जनावरासारख्या माणसाला दाखवीत ती उतरते. त्याच्या वासना चेतविल्या जातात व साहजिकच तो पिंजऱ्यातून हात बाहेर काढून तिच्या शरीरावर झेप घेण्याचा प्रयत्न करतो. संगीताचा ठणठणाट वाढतो, तिच्या नृत्याची लय वाढते, आणि वस्त्रे उतरण्यासही वेग येतो. त्या पिंजऱ्यातील माणसाच्या अवस्थेतच त्या क्लबमधील सारे पुरुष येतात. टेबलावर अधिक चाळवाचाळव सुरू होते. पेयाची नवीन बाटली आणण्याची हीच वेळ हे मॅनेजर जाणतो. ती पिंजऱ्यावर थयथय नाचत असते. तिचे उघडे उरोज कुंभ साऱ्यांच्या नजरेत रिकामे होत असतात. शरीराच्या हालचालींना आता कसले निर्बंध राहिलेले नसतात. एक सोनेरी ठिपका फक्त चमकत असतो. बाकीचे सारे स्वैरभैर उडत असते. त्या पिंजऱ्यातील तो काळा पुरुष अनावर होतो. प्रेक्षक अनावर होतात व अनावर होऊन पडदाही पडतो.

पहाटे उरलेले पुरुष बाहेर येतात, तेव्हा त्यांना आपल्या अंगावर कपडे असून आपण नग्न आहोत असे वाटत असते, आणि त्या छटेल पोरी अंगावर जाडजूड कपडे घालून, कुलीन स्त्रियांच्या ऐटीत रस्त्याला लागलेल्या असतात.

असा हा ऐतिहासिक कार्यक्रम सादर करणाऱ्या पोल डेरवेलचा एक विचार मला अधिक पटला तो लंडनच्या 'सनसेट' या नाईट क्लबातील कार्यक्रम पाहताना. वस्त्रे हा मानवजातीला एक मोठा वर आहे असे तो म्हणतो. कारण वस्त्रांशिवाय सुरेख दिसणे ही गोष्ट फारच कठीण आहे. सुंदर वस्त्रे लेवून स्त्रिया आपले सौंदर्य खुलवतात. त्यामुळे या व्यवस्थापकांना नाईट क्लबसाठी पोरी निवडताना त्या नग्नावस्थेत चांगल्या दिसतील याची

खबरदारी प्रथम घ्यावी लागते. पोषाखात जी सुंदर दिसते ती वस्त्रे उतरल्यावर सुंदर दिसेल याची खात्री नाही असे तो म्हणतो. याचे प्रात्यक्षिक आम्ही पाहिले ते लंडनच्या ‘ सन-सेट ’ मध्ये.

हा ‘ सनसेट ’चा कार्यक्रम नावाप्रमाणे सूर्यास्तानंतर सुरू होतो. पिकॅडलीतील सर्व कार्यक्रम खरे सुरू होतात ते रात्री १० नंतरच. या ‘ सनसेट ’ क्लबचा आकार ‘ फॉलीज बर्जर ’च्या मानाने अगदी लहान. येथे १२ शिलिंगचे तिकीट काढले की आत लक्ष्मण रेषा नाही. खोल्या पेयांचा बार नाही की टेबल आणि ती मोहिनी नाही. एखाद्या छोट्या तमाशाच्या थिएटरात बसावे तशा खुर्च्या. समोर लहानसाच रंगमंच, व त्यावर अगदी जवळच सर्व थयथयाट चाललेला. इतकेच नव्हे तर अनेकजणी रंगमंचावरून खाली उतरून प्रेक्षकांत येत व काहींच्या टोप्या उडवून परत जात. या कार्यक्रमात जवळ जवळ ४० मुली होत्या; आणि त्या एकएकट्या रंगमंचावर येऊन बहारदार कार्यक्रम करून जात. त्यांच्या शरीरयष्टीत व अवयवांच्या आकारात अतिशय फरक होता व कोणत्या तऱ्हेच्या मुली विवस्त्रावस्थेत चांगल्या दिसतील याची जणू ती एक परेडच होती.

प्रत्येकीने वेगळा कार्यक्रम सादर केला. त्यात तमाशाचा पांचटपणा भरपूर होता. एक पोरगी पाय उडवीत आली. तिने वर्ग घेतला. वर्गातल्या शाळकरी पोरांशी तिने वाह्यात अंगविक्षेप केला व “ I like a Jamaican bannana ” म्हणून त्याला कविता शिकविली. एकीने एका विशीतल्या पोराला आपल्या बरोबर आणले. तो अर्ध्या पॅन्टमध्ये होता. एखाद्या बावळट पुरुषाचा तो नमुना होता व इरसाल स्त्रीच्या भूमिकेत तिने त्याला वेगवेगळे पेच टाकून लोळविले. एकीकडे हे करीत असताना तिची वस्त्रे विंगमध्ये अगर एखाद्या प्रेक्षकाच्या अंगावर फेकली जात होती ती वेगळीच. एकीने एका पुतळ्याबरोबर प्रणयाराधन केले. त्या पुतळ्यासारखी ती स्त्री लांब पायांची व तिचे वक्षस्थल पपयासारखे लांबट होते. तिने अंगविक्षेपाचा कहर केला. खजुराहोचे शिल्प तिने तेथे सादर केले. पुन्हा यात अनेक देशांतील पोरी होत्या. सावळ्या रंगाच्या पोरी गोऱ्या लोकांना अधिक आवडत होत्या. त्यांचे डोळे अधिक मादक होते व शरीरसौष्ठवात त्या कमी असल्या तरी त्यात वासना अधिक होती. एका स्वाहिली चेहऱ्याच्या मुलीने तर कळसच केला. एका अरण्यात ती सापडली आहे व तिला रात्री अनेकांनी गाठली आहे व ते तिच्यावर बलात्कार करीत असून ती त्यांच्या तावडीतून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नाट्य तिने वठविले. बसायलाही तिने एक ओंडका आणला होता. मागे जंगलाचा पडदा टाकला होता.

रंगमंचावर कुणी पुरुष नव्हता. सारे कल्पनेने ती करीत होती. तिची वस्त्रे ओढून टाकली जात होती, व तिचा उपभोग घेतला जात होता. अतिशय उत्तान असा हा शृंगार येथे दाखविला जात होता, आणि या क्लबचे वैशिष्ट्य असे की, अखेरीस ती स्त्री सरळ उभी राही तेव्हा सोनेरी तुकडाही उडालेला असे.

पॅरिसमधील पिगालच्या एक पाऊल पुढे लंडनची पिकॅडली आता गेली आहे. तेथे आणखी एका क्लबात आम्ही गेलो तेव्हा असाच कार्यक्रम पाहावयास मिळाला. तो क्लब अगदीच लहान होता व मुलीही थोड्या होत्या. परंतु तेथेही धमाल नृत्य होते. एक मुलगी जरा मागे उभी राहून नृत्य करीत होती. तेव्हा एक प्रेक्षक ओरडला, " Please come forward ! "

" I shall dance as I want, O. K. ! " कडक शब्दात रंगमंचावरून उत्तर आले. त्या ' ओकेत ' तर असा काही हिसका होता की तो पुरुष क्षणभर घाबरलाच. लोकांच्यापुढे आपल्या देहाचे प्रदर्शन मांडणाऱ्या या स्त्रियांची मन:स्थिती या एका उत्तरात स्पष्ट दिसली. ' सनसेट ' मधील एखादी पोरगी खाली उतरे. परंतु कुणी त्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करीत आहे असे लक्षात येताच त्या वाघिणीसारख्या चवताळून उलट्या फिरत. तो सर्व कार्यक्रम पाहिल्यावर माणूस बाहेर येतो तो थोडासा खिन्न होऊनच. " अरे या गोष्टी झाकण्यातच खरी मौज आहे ", असे त्याला बाहेर पडताच जाणवते.

आम्ही जवळच्या ट्यूब स्टेशनवर जाऊन उभे राहिलो. शेजारी एक मुलगी गरम कोट घालून उभी होती. माझा मित्र म्हणाला, " अरे त्या ' सनसेट ' मधीलच ही एक स्ट्रिप्टीज ! " आम्ही तिला नीट ओळखू शकलो नाही. कारण कपडे घालून आम्ही तिला पाहिले नव्हते.

प्रकरण पंचविसावे

# दुभंगलेले बर्लिन

' गुटन मॉर्गन ! ' चहाचा ट्रे घेऊन माझ्या खोलीत शिरणाऱ्या जर्मन तरुणाने आपल्या भाषेत सुप्रभातीची सलामी दिली व त्या शब्दांनी कोणत्या देशात आपण आता उतरलो आहोत याची जाणीव झाली. झुरीकहून स्वीस एअरने निघालो व स्टुटगार्टला लुफ्तान्साचे विमान घेऊन आदल्या रात्री आम्ही बर्लिनला आलो होतो. स्टुटगार्टला विमान बदलण्यास फक्त १५ मिनिटांचा अवधी होता. तितक्यात एका विमानातून बाहेर पडून दादरला गाडी बदलावी तसे आम्ही दुसऱ्या कंपनीचे बोर्डिंग कार्ड घेऊन विमान गाठले. बर्लिन विमानतळ अगदी गावात असल्याने ' लाल ' समुद्रातील हे बेट विमानातून फार सुंदर दिसत होते.

बर्लिन विमानतळ फारसा मोठा नाही. आम्ही कस्टम्सजवळ येताच समोर एक भरदार अंगाची उंच तरुणी उभी होती. बर्लिनलाही एक जर्मन ॲन फोर्ड आपल्यासाठी आली असावी असे मी सहज श्री. प्रभाकर नुलकरांना म्हटले. तिनेही आमच्याकडे कटाक्ष टाकला. तिला ओलांडून आम्ही पुढे गेलो व कस्टम्सला आमचे सामान दाखवू लागलो. इतक्यात बर्लिन विमानतळाचा कर्णा ओरडू लागला. चब्लानी, गॅडकरी, नूलकर असे शब्द जर्मन अपभ्रंशात येऊ लागले. आम्ही तेथे तात्काळ धाव घेतली. तर तीच तरुणी पुन्हा उभी. बर्लिनलाही जर्मन ॲन फोर्ड आमच्या स्वागताला आली होती. आम्हा तिघांपेक्षाही ती उंच होती व प्रकृतीनेही आडदांड होती. तिने आमचे सस्मित स्वागत केले. प. जर्मन सरकारचे पाहुणे म्हणून आम्ही आल्याने बाहेर मोटार उभी होती. तीत बसून हॉटेलात गेलो.

कोणत्याही नव्या गावी उतरलो की, सामान हॉटेलात टाकून गाव पाहावयास ताबडतोब बाहेर पडायचे हा आमचा नेहमीचा शिरस्ता. आलो त्या रात्रीच बर्लिनच्या हमरस्त्याने आम्हाला गुंगवून टाकले. दिव्यांचा लखलखाट, मोठमोठ्या दुकानांतील रोषणाई व सजावटीने मांडलेल्या विविध वस्तू, निऑन लाइटसूची ती चमचम, हे सारे न्याहाळीत आम्ही अनेक तास हिंडत राहिलो. दुसऱ्या महायुद्धाचा सारा इतिहास येथे घडला व त्याची सुरुवात व शेवट या बर्लिनमध्ये झाली हे क्षणभर खरे वाटेना. कारण कुठेही पडलेले घर नव्हते की, साचलेली राख नव्हती. राखेतून नवे दिवे पेटलेले होते. त्या दिव्यांच्या प्रकाशात बर्लिन पुन्हा उजळून निघाले होते.

दुसऱ्या दिवशीचा सरकारी कार्यक्रम साडेदहा वाजता सुरू व्हावयाचा होता. आता आठपर्यंत उठायचे नाही असा निर्धार करून बर्लिन ॲम्बॅसडरच्या त्या दरबारी खोलीत मी झोपी गेलो. परंतु सकाळी ६ वाजता 'खर्‌र्‌र्' 'टर्‌र्‌र्' अशा भेदक आवाजांनी जाग आणली. सकाळीच हे कसले आवाज म्हणून उठून खिडकीतून बघू लागलो. समोरच्या इमारतीचे बांधकाम चालले होते. कारागीर सहा वाजल्यापासून आपल्या यंत्रावर आरूढ झाले होते. हॉटेलच्या तीन बाजूंना प्रचंड इमारती बांधल्या जात होत्या. रात्री मला त्याचा पत्ता लागलेला नव्हता. सूर्य उगवण्याअगोदर हा 'बर्लिनर' उठला होता. देश उभारणीचे कार्य हा त्यांच्या दृष्टीने व्याख्यानाचा विषय नव्हता. भल्या पहाटेचे हे दृश्य पाहून युद्धाच्या राखेतून प. जर्मनी पुन्हा उभे का राहिले याचे रहस्य मी समजू शकलो. कामाचे तास ठरवून घेऊन देशाची उभारणी होत नाही हे युरोपच्या दौऱ्यात पदोपदी जाणवत होते. खरेखुरे राष्ट्र-उभारणीचे कार्य येथे चालले होते. श्रम व वेळ यांचे गणित येथे कुणी मांडीत नव्हते. प. जर्मनीची ही माझी पहिली ओळख त्या आठवड्यात मी जे पाहणार होतो त्याची निदर्शक होती.

अर्थात पश्चिम बर्लिन म्हणजे भौगोलिकदृष्ट्या पश्चिम जर्मनी नव्हे. प. बर्लिन हे पूर्व जर्मनीरूपी 'लाल' समुद्रातील एक बेट आहे. प. जर्मनीच्या मूळ भूमीपासून ते जवळ जवळ शंभर मैलावर आहे. पूर्व जर्मनी या प. बर्लिनची भूमीवरून केव्हाही नाकेबंदी करू शकतो. त्यामुळे निदान सहा महिने पुरेल इतके धान्य प. बर्लिनमध्ये सतत ठेवले जाते. जर्मनीतील बर्लिन हे सर्वांत मोठे शहर. युरोपचे ते हृदय. स्टुटगार्ट, म्युनिक, फ्रॅंकफुर्ट ही तीन शहरे एकत्र केली तरी त्यापेक्षा अखंड बर्लिन मोठे ठरेल. परंतु युरोपच्या या हृदयाची आज दोन शकले झालेली आहेत. बर्लिन दुभंगलेले आहे.

त्यामुळे साहजिकच येथे जो येतो तो प्रथम जातो बर्लिनची ती भिंत पाहण्यासाठी. या भिंतीचे दडपण प. बर्लिनच्या प्रत्येक माणसावर आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याचे हे चिरेबंदी थडगे मोठे भेसूर आहे. आम्हीही सकाळी उठून ' ब्रँडनबर्ग गेट ' समोरच्या त्या भव्य रस्त्यावर येऊन दाखल झालो. जुन्या बर्लिनचा हा रस्ता म्हणजे सारा दिमाख. दिल्लीच्य इंडिया गेटसारखा हा उंच सहा खांबांचा ' गेट ' तेथे आता उभा आहे तो केवळ एक ऐतिहासिक वास्तू म्हणून. त्यावर घोड्यांच्या रथाचे सुंदर शिल्प आहे. तो गेट आता पूर्व बर्लिनच्या हद्दीत गेला आहे. त्याच्यापुढे काही यार्डांवरच बर्लिनची भिंत आता उभी आहे. त्या भिंतीच्या डाव्या बाजूलाच हिटलरची व गोअरिंगची मुख्य कचेरी होती. पूर्व बर्लिनच्या हद्दीत हिटलरने गाजविलेली ही इमारत आता आहे. त्यावर लाल बावटा फडकत होता. भिंतीपासून काही यार्डांवर उभे राहून ते दृश्य आम्ही पाहात होतो. ज्या रस्त्यावर एकेकाळी मोठमोठी दुकाने होती, त्या रस्त्यावर–पूर्व बर्लिनच्या हद्दीत एक माणूसही दिसत नव्हता.

या भिंतीच्या छायेत सकाळी आम्ही फिरत राहिलों. ' Achtung ' ( Attention ) त्या मनाला धडकी देणाऱ्या पाट्या समोर येत होत्या. ' पश्चिम बर्लिनचा अमेरिकन विभाग तुम्ही सोडता आहात ', ' फ्रेंच विभाग तुम्ही सोडता आहात ' असे त्या त्या ठिकाणी इशारा देणारे ते फलक आणि एकाच शहरातील, एकाच रक्ताच्या दोन भावांना अलग करणारी ती भिंत हे सारे पाहताना माणूस भांबावून जातो. पूर्व बर्लिनमधील दृश्य पाहण्यासाठी व भिंतीची भयानकता जाणून घेण्यासाठी मुद्दाम उभारलेल्या उंच पाय-यांवर आम्ही चढलो. पलीकडे भकास भूमीचा एक पट्टा दिसत होता. भिंतीपासून दूर काही इमारती उभ्या होत्या. परंतु त्यांत अगदी शुकशुकाट होता. समोर पूर्व बर्लिन पोलिसांच्या चौक्या होत्या व त्यात सैनिक दुर्बिणी व कॅमेरे लावून बसले होते. त्या चौक्याही अशा उभारल्या आहेत की त्यातील सैनिक दिसू नयेत. माणसाला माणूस दिसून माणुसकीची आठवण होऊ नये. दिसतात फक्त हालणारे डोळे. दूरवर एक सैनिकांची पलटण संगिनी सरसावून उभी. कोणत्याही क्षणाला युद्ध होईल असे मानून गोळ्या सोडण्यासाठी सारे कसे सज्ज ! प. बर्लिनचे सारे वातावरण लष्करमय आहे.

दोस्त राष्ट्रांच्या थोड्याशा चुकीमुळे बर्लिनचा हा प्रश्न दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस निर्माण झाला. रशियन फौजांनी बर्लिनला धडक दिली तेव्हा अमेरिकन फौजांनी त्यांच्याबरोबर राहावे असे अनेकजण सुचवीत होते. परंतु अमेरिकन सेनानी आयसेनहॉवर यांना ते पटले नाही. त्यामधूनच आजची बर्लिनची समस्या निर्माण झाली. संपूर्ण चूक होण्यापूर्वी

दोस्तांच्या फौजा जर्मनीत शिरल्या व अर्धे बर्लिन आणि अर्धा जर्मनी त्यांनी आपल्या ताब्यात आणला. तरी पुढे संबंध बिघडत गेले. लाल राजवटीने आपले खरे दात दाखविण्यास सुरुवात केली व एका पहाटे ( १३ ऑगस्ट १९६१ ) पश्चिम बर्लिनचे नागरिक जागे झाले ते ही भिंत व काटेरी कुंपण पाहण्यासाठी. रशियन हद्दीतून पश्चिम बर्लिनकडे लागलेली माणसांची रीघ थांबविण्यासाठी, पूर्व जर्मनीचे प्रमुख उलब्राइट यांनी हा निर्णय घेतला. एका रात्रीत ही भिंत बांधण्यात आली. लाल राजवटीतून पळून जाणाऱ्यांना अडविण्या-बरोबर पूर्व जर्मनीची आर्थिक घडण मोडू नये यासाठीही उलब्राइट यांनी हा निर्णय घेतला होता. पूर्व जर्मनीतून तरुण डॉक्टर्स, इंजिनियर्स इकडे आल्याने त्यांची शक्ती कमी होत होती. त्याचबरोबर आर्थिक बाजारात पूर्व जर्मनीच्या मार्कची किंमत घसरविण्याचा जाणून-बुजून प्रयत्न होत असल्याचे उलब्राइटना वाटत होते.

कारणे काहीही असोत, परंतु आज जे दृश्य दिसते ते भयंकर आहे. सीमेवरच्या इमारती लोकांना खाली करण्यास लावल्या आहेत. सुरुवातीच्या काळात मुक्त होण्यासाठी या घरांचा लोक उपयोग करीत व दोरांच्या साहाय्याने पश्चिम बर्लिनमध्ये उतरत. रिकाम्या झालेल्या घरांतूनही लोक अंधाराचा फायदा घेऊन पळतील म्हणून या घरांच्या पश्चिम बर्लिन बाजूच्या खिडक्या, दारे सारी विटांनी लिंपून टाकली आहेत. ही घरे अगदी भयाण दिसतात. एके ठिकाणी तर ही घरे पाडण्याचे काम पूर्व बर्लिनचे सैनिक करीत होते. पलीकडे आम्ही उभे होतो. परंतु त्यांचे लक्षही नव्हते. राजकीय तत्त्वज्ञान माणसाचे व्यक्तिमत्त्व, आपापसातील नाते, भावना, साधी माणुसकी, सारे नष्ट करते तेव्हा उरते अशी एखादी भिंत.

आणि त्या भिंतीच्या आडोशाला पडली होती काही फुले. काही पुष्पचक्रे, काटेरी कुंपणावर फुललेली व कोमेजलेली माणुसकीची फुले. भिंत उभारल्यावर पहिल्या दोन-तीन वर्षांत अनेकांनी पूर्व बर्लिनमधून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांत तरुण होते, विद्यार्थी होते. काही प्रियकर होते. त्या भिंतीच्या कुंपणावरून स्वातंत्र्याकडे झेप घेत असताना त्यांना पूर्व बर्लिनच्या सैनिकांनी निर्दयपणे गोळ्या झाडल्या. काही तारेवरच मरून पडले. काहींनी गोळ्या झेलीत पश्चिम बर्लिनमध्ये झेप घेतली. निदान आपला मृत्यू, जेथे व्यक्ति-स्वातंत्र्य आहे, तेथे झाला म्हणून त्यांनी धन्यता मानली. या भिंतीबरोबरच तिच्या लगतचे हुतात्म्यांचे हे बलिदान माणसाला अधिक हतबुद्ध करते. जवळ जवळ ६५ सामान्य जनांनी या गोळ्या खाल्ल्या व भिंतीजवळच देह ठेवले. त्या भिंतीवर अजूनही गोळ्यांच्या खुणा आहेत.

भिंतीपलीकडील पूर्व बर्लिनचे दृश्य पाहण्यासाठी एके ठिकाणी पायऱ्यांचे व्यासपीठ पश्चिम बर्लिनकरांनी उभे करताच, त्याच रात्री पूर्व बर्लिनच्या सैनिकांनी ती भिंत आणखी उंच बांधून काढली. दोन दिवस ही स्पर्धा चालली होती. अखेर पूर्व बर्लिनने ती सोडली. या भिंतीपलीकडे एक मोठा फलक पाश्चात्यांच्या पाहुण्यांसाठी पूर्व जर्मनीने लावला आहे. " Your doctrine has nothing to do with peace and reality." असे एकच वाक्य त्यावर लिहिले आहे. क्रुश्चेव पूर्व बर्लिनमध्ये आले तेव्हा " या भिंतीचा मला अभिमान वाटतो, " असे उद्‌गार त्यांनी काढले होते. परंतु पश्चिम बर्लिनमध्ये काही रशियन पाहुणे येतात तेव्हा त्यांना " भिंत पाहावयास येता का ? " असे विचारले जातेच. परंतु क्रुश्चेव यांना अभिमान असलेली भिंत पाहण्यास कोणताही कम्युनिस्ट भिंतीच्या कोणत्याही बाजूस येत नाही.

अशा वातावरणात प. बर्लिनचे २० लाख नागरिक राहतात. युद्धापूर्वी बर्लिनची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात होती. परंतु आज जे आले आहेत त्यांपैकी अर्धअधिक पूर्व जर्मनीतून आलेले आहेत. प. बर्लिनमध्ये येणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी व उद्योगपतींसाठी खास सवलती दिल्या जात आहेत. पश्चिम बर्लिन हे ' लाल ' समुद्रातील बेट असले तरी ते ' बुडणार ' नाही असा विश्वास निर्माण करण्याचे काम प. बर्लिनच्या राज्यकर्त्यांना करावे लागले आहे व ते त्यांनी तितक्याच निर्धाराने केले आहे. ' डे वेल्ट ' हे पश्चिम बर्लिनमधील सर्वांत प्रमुख दैनिक. त्यांनी तर नवी इमारत अशा ठिकाणी बांधली आहे की, इमारतीचा एक भाग भिंतीपलीकडे ' लाल ' साम्राज्यात जातो. भिंत बांधण्यापूर्वी त्यांनी जागा घेतली होती व इमारतीचे काम सुरू केले. भिंत बांधली गेली तरी त्याच निश्चयाने त्यांनी इमारत पुरी केली. ' डे वेल्ट 'च्या या नव्या इमारतीत आम्ही गेलो होतो व त्या दैनिकाच्या संपादकांची आम्ही भेट घेतली. " वृत्तपत्र स्वातंत्र्याचा हा दीपस्तंभ मी या भिंतीच्या उरावर उभारला आहे. " असे मोठ्या अभिमानाने ते आम्हाला सांगत होते.

अनेक नवे कारखाने पश्चिम बर्लिनमध्ये आता सुरू होत आहेत. आपल्या कारखान्याची येथे जो शाखा काढील त्याला प. जर्मनीतील सर्व कारखान्यांतील उत्पन्नावरील करात सवलत मिळते. 'सीमन्स' ने आपल्या कारखान्याची मोठी शाखा पश्चिम बर्लिनमध्ये उघडली. त्यांचे जवळ जवळ ५० हजार कामगार येथे आले. यामुळे त्यांना एकूण करात ३० टक्के सूट मिळते. प. बर्लिनमध्ये विक्रीकर नाही. पश्चिम जर्मनीत तो ४ टक्के आहे. अनेक सिगारेट कंपन्या येथे आता आल्या आहेत.

इतकेही करून पुरुषबळ पश्चिम बर्लिनमध्ये फार कमी आहे. तरुणांना आकर्षित करण्यासाठी प. बर्लिन सरकारने तीन हजार मार्कसच्या कर्जाची सवलत जाहीर केलेली आहे. जो बर्लिनमध्ये येऊन स्थायिक होईल व स्थानिक मुलीशी विवाह करील त्यास हे कर्ज मिळते. भारतीय तरुणांनाही ही सवलत घेता येईल. जर्मन तरुणीशी फक्त त्यांनी विवाह केला पाहिजे. आतापर्यंत ६० हजार तरुणांना ही आर्थिक मदत मिळाली. पुन्हा तेथे कुटुंबनियोजन नाही. ज्याला अधिक मुले त्याला अधिक सवलती. तीन मुले झाल्यावर हे कर्जेही सरकार रद्द करते. उलट मुलगे झाले असल्यास सरकार बक्षिस देते. दुसऱ्या महायुद्धाची ही समस्या आहे. त्या संहाराची कल्पना आपल्याला येणार नाही.

ही सारी माहिती प. बर्लिनचे प्रसिद्धी अधिकारी आम्हांला देत होते. भाषेची अडचण आम्ही येथे प्रथम अनुभवली. कारण ते जर्मन भाषेत बोलत होते व मधूनमधून जोराने टेबलावर हात आपटीत होते. दुभाषीचे काम अंतालिकाच करीत होती. परंतु तिचे इंग्रजी सुरू होईपर्यंत आम्हांला त्या जर्मन वक्तृत्वापुढे माना डोलावाव्या लागत.

येथे आलेला प्रवासी भिंतीच्या दडपणाखालून सुटावयास एक दिवस जातो. कारण या राजकीय प्रश्नाबरोबर इतरही अनेक गोष्टी या पश्चिम बर्लिनमध्ये आहेत. अर्थात जेथे जावे तेथे अमेरिकेने हे बांधले असे ऐकावयास मिळते. अमेरिकेचे पश्चिम बर्लिनमधील अस्तित्व हे पदोपदी जाणवते. अमेरिकन सेक्टरमध्ये तर डॉलर्समध्ये व्यवहार चालतो. १५ हजार अमेरिकन सैनिक येथे आहेत. सुरुवातीस बर्लिनची सत्ता ही अमेरिकन, रशियन, ब्रिटिश, व फ्रेंच अशा चौघांकडे होती. संयुक्त सत्तेचे हे तत्त्व तोडून काढण्यासाठी उलब्राइटने बर्लिनची भिंत उभारली व तिघांपासून तो अलग झाला, असेही सांगितले जाते.

बर्लिनमधील कुओफ्युस्टन डाम् हा मोठमोठ्या दुकानांचा रस्ता. या रस्त्याजवळच आम्ही राहात होतो. ' के वाडे ' हे प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्स या रस्त्यावरच आहे. तेथे ज्या दिवशी ' समर सेल 'चे उद्‌घाटन झाले त्या दिवशी तेथे उडालेली झुंबड व चाललेला गोंधळ अगदी अजब होता. शिस्तप्रिय अशा जर्मन नागरिकांकडून तो अपेक्षित नव्हता. अर्थात स्त्रियांचीच तेथे इतकी गर्दी झाली होती, की पुरुष नेहमीप्रमाणे ' बिचारे ' ठरले होते. टेरिलिन शर्टस् हे सहा रुपयांपासून होते. इतके स्वस्थ शर्टस् युरोपात इतरत्र कुठेही मिळत नाहीत. याच रस्त्यावर ' युरोपा सेंटर ' नावाचे एक अनेक मजली विविध दुकानांचे केंद्र उघडले आहे. या सेंटरवरून पलीकडे जाण्यासाठी एक पूल आहे. या पुलावरून रात्रीच्या झगझगाटात बर्लिनचे जे वैभव दिसते ते अगदी अप्रतिम.

याच रस्त्यावर दुसऱ्या महायुद्धाचे आणखी एक स्मारक आहे. येथेही ब्रिटनमधील कॉव्हेंट्रीप्रमाणे नवे जुने अशी दोन प्रार्थनामंदिरे आहेत. पहिले प्रार्थनामंदिर असेच बॉम्ब हल्ल्यात अर्धवट उद्‌ध्वस्त झाले आहे, तर दुसरे कॉव्हेंट्रीप्रमाणेच अमेरिकन मदतीने अगदी आधुनिक असे उभे केले आहे. कॉव्हेंट्रीच्या प्रार्थनामंदिरावर निर्घृण हल्ला जर्मन बॉम्बफेकी विमानांनी कसा केला असे तिथे सांगितले जाते. येथे हळूच कुणीतरी पुटपुटतो, " येथील बॉम्बहल्ला अमेरिकन विमानांनी केला " आणि त्यांनीच हे चर्च पुनः बांधून दिले. एकूण दोघांनीही बॉम्बहल्ले केले, प्रार्थनामंदिरावर केले, हेतुपूर्वक अगर हेतुविरहित केले. युद्धाच्या कथांचा तो एक भाग बनला व देशपरत्वे भाषा बदलून या कथा मग सांगितल्या गेल्या. जर्मनीत तर अनेकांनी अमेरिकन बॉम्बहल्ल्याच्या अमानुष कथा आम्हांला सांगितल्या. युद्ध जवळ जवळ संपल्याचे घोषित झाले असताना अमेरिकन विमानांनी काही जर्मन गावे साफ उद्‌ध्वस्त केली. कोलोन हे असेच एक गाव. युद्ध सुरू झाले की अमानुषता ही देशनिरपेक्ष येते. त्याचे प्रमाण कमीजास्त असते इतकेच.

म्हणूनच बर्लिन सोडताना चारही घटक राष्ट्रांच्या संयमाचे कौतुक मला अधिक वाटत होते. १९३६ मध्ये जेथे ऑलिम्पिक सामने हिटलरने भरविले ते स्टेडियम पाहताना अगर हॅटच्या आकाराचे छप्पर असलेला अगदी आधुनिक असा काँग्रेस हॉल पाहताना हेच विचार मनात अधिक येत होते. परंतु कालपरत्वे बर्लिनच्या प्रश्नाची गंभीरता कमीकमी होऊ लागली आहे. चीनने जगाच्या राजकारणाची संघर्षक्षेत्रेच नव्या ठिकाणी व नव्या विषयावर नेली आहेत.

तरीही भिंतीपलीकडच्या बर्लिनची चाहूल घ्यावी असे मनात होतेच. पश्चिम बर्लिनला येणारा प्रत्येक परदेश प्रवासी ती भिंत ओलांडून पूर्व बर्लिनला जातोच. पश्चिम बर्लिनचा झगझगाट व ऐश्वर्य आणि पूर्व बर्लिनचे कनिष्ठ जीवन यांमधील फरक त्याला उघडउघड दिसतो, म्हणून पश्चिम बर्लिनचे अधिकारीच ही व्यवस्था करतात. यासंबंधीचे नियमही मोठे गमतीदार आहेत. प. बर्लिनचा कुणीही रहिवासी पूर्व बर्लिनमध्ये जाऊ शकत नाही. याचा अर्थ प. बर्लिनचा जो रहिवासी असतो त्याच्याकडेही प. बर्लिनचेच अधिकृत कार्ड असते. या कार्डधारकांनाच प. बर्लिनच्या सर्व सवलती मिळतात. परंतु पश्चिम जर्मनीत राहणाऱ्या नागरिकांना मात्र पूर्व बर्लिनमध्ये जाता येते. तो पश्चिम जर्मनीचा नागरिक असल्याचे त्याला वेगळे कार्ड असते. तसेच पूर्व जर्मनीतील नागरिकाला पश्चिम जर्मनीत जाता येते. याचा अर्थ पश्चिम बर्लिन व पूर्व बर्लिनचे नागरिक फक्त एकमेकांकडे जाऊ शकत नाहीत.

आमच्या दिमतीसाठी एक ब्रिटिश पासपोर्ट असलेला ड्रायव्हर व त्याची प. बर्लिनचा नंबर नसलेली गाडी देण्यात आली होती. ब्रिटिश चेक पॉईंट चार्ली येथून आम्ही भिंत ओलांडली. तो सारा अनुभव अर्थात आम्हांला नवा होता. भिंतीजवळ येऊन 'आम्हाला आत यावयाचे असे सांगताच' आडवा टाकलेला लोखंडी खांब क्रेनने जर उचलला गेला. आमची छोटी गाडी आत शिरली. ताबडतोब एका पूर्व बर्लिनच्या सैनिकाने आमचे पासपोर्टस् हाती घेऊन तो जवळच्या कचेरीत गेला. आम्हीही त्याच्या पाठोपाठ गेलो. तेथे प्रत्येकाला एक फॉर्म भरावयाचा होता. तो भरल्यावर दुसऱ्या काऊंटरवर जाऊन आम्हाला पूर्व बर्लिनचे मार्क्सचे चलन घ्यावे लागले. हे प्रत्येकाला घ्यावेच लागते. ते घेतल्याची पावती दाखविल्यावर व खिशात असलेले इतर परकीय चलन 'डिक्लेअर' केल्यावर पूर्व बर्लिनमध्ये शिरण्याचा परवाना मिळाला. तेथे त्या ड्रायव्हरला काही प्रश्न विचारले गेले; परंतु आम्हांला काहीही विचारले नाही. पासपोर्टस्वरून तेथे ताबडतोब व्यक्तींची छायाचित्रे काढून घेतली जातात असे कुणी सांगत होते. भिंतीपलीकडे उभे राहून पूर्व बर्लिन पाहणाऱ्यांची छायाचित्रेही त्या पहारेकऱ्यांच्या चौक्यातून घेतली जातात असे कळते. येथे दोन्ही ताडून वाहिली जातात व पूर्व बर्लिन पाहण्यास आलेल्यांची शहानिशा केली जाते.

परंतु परवाना मिळाल्यावर आमच्या ड्रायव्हर पोराने गाडी जोरात हाकली. त्याचा हा नेहमीचा उद्योग असल्याने तो अगदी बेफिकीर होता. एकेक गोष्ट तो निवांतपणे दाखवीत होता. आम्हालाच उगीच बावरल्यासारखे झाले होते. पूर्व बर्लिनमध्ये शिरल्याबरोबर डाव्या हाताला हिटलर जेथे भूमीखाली संरक्षणास जाई तो खंदक 'हिटलर्स बंकर' म्हणून ओळखला जातो. या जर्मन नेत्यासाठी आत चांगली खोली तयार केली होती. अर्थात तेथे जवळ जाऊन पाहणे आता अशक्यच. कारण ती जागा अगदी भिंतीलगत आहे. मोटारीतून उतरून भिंतीजवळ कुणी अपरिचित जाऊ लागला की कोणत्या कोपऱ्यातून बंदुकीची गोळी येईल याचा नेम तेथे नाही.

पश्चिम बर्लिनसारख्या येथे मोटारी नव्हत्या, की रस्त्यावर गर्दीही नव्हती. या भिंतीची लांबी जवळ जवळ ४३ किलो मीटर आहे. तिच्या जवळची कितीतरी हजार फ्लॅटस् बांधता येतील इतकी जमीन पूर्व बर्लिन सरकारने उजाड ठेवली आहे. त्यामुळे सुरुवातीचा भाग कसा भकास वाटतो; परंतु यावरूनच पूर्व बर्लिनबद्दल व पूर्व जर्मनीबद्दल मत बनविणे थोडे चुकीचे ठरेल. पूर्व जर्मनीने युद्धोत्तरकाळात आर्थिक विकास समाधानकारक साधला आहे. यांत्रिक प्रगती तर पूर्व जर्मनीने अतिशय झपाट्याने केली आहे. पूर्व जर्मनीचा असो की

पश्चिम जर्मनीचा असो, जर्मन माणूस हा मूळतः उद्योगी, यांत्रिक ज्ञान उत्तम असलेला व कष्टाळू. त्यामुळे पश्चिम जर्मनीचे नागरिक तेवढे धडपडे असे म्हणणे सयुक्तिक ठरणार नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर मार्शल प्लॅन आला व त्यामुळे पश्चिम जर्मनीचा आर्थिक विकास अतिशय वेगाने झाला व त्याचे वैभव हे नजरेत भरणारे ठरले. पूर्व बर्लिनचे तसे झाले नाही. पूर्व बर्लिनमध्ये आम्ही मोकळेपणाने फिरत होतो. एकदा परवाना घेतल्यावर आमच्या-वर कुणी नजर ठेवीत आहे असे कुठेच वाटले नाही. परंतु साम्यवादी देशाचे जे एक अपयश नेहमी सांगितले जाते ते येथेही आढळत होते. ग्राहक वस्तूंचा तुटवडा येथे दुकानातील गर्दीवरून अजमाविता येत होता. पात्र, भाजीपाला घ्यावयास तुफान गर्दी होती. आमचा ब्रिटिश ड्रायव्हर मित्र अनेक गंमती सांगत होता. तो म्हणाला, " अनेक दुकाने हिंडलात तरी तुम्हांला पूर्व बर्लिनमध्ये दुधाचे क्रीम मिळणार नाही." ब्रिटन व पश्चिम जर्मनीत दूधदुभत्याचा सुकाळ आम्ही पाहिला होता, उपभोगला होता. येथे यांत्रिक प्रगतीच्या शर्यतीत पूर्व बर्लिनकरास क्रीमवर पाणी सोडणे भाग पडले होते.

मोटारींची ये-जा रस्त्यात इतकी कमी होती की, पाश्चात्त्य देशातील एखाद्या मोठ्या शहरात आपण फिरतो आहोत असे वाटत नव्हते. त्या दिवशी शनिवार दुपार असल्याने येथेही ' शॉपिंग ' चालू होते. स्त्री-पुरुष व मुले बाजारात फिरत होती. आम्हीही मुख्य बाजारातील एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेलो. बदलून आणलेले मार्कसचे पूर्व जर्मनीचे चलन खर्चावयाचे होतेच. कारण काही रक्कम उरली तर ती बाहेर नेता येत नाही असे सांगितले होते. तेथे रेड क्रॉसचे डबे ठेवलेले आहेत. त्यात ती उरलेली नाणी टाकून द्यावी लागतात.

परंतु आमच्या ड्रायव्हरने मध्येच थोडा गुंगारा दिल्याने भाषेमुळे आमची फार पंचाईत झाली. त्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये विक्रेत्या बहुतेक मुली होत्या व त्यांना कुणाला इंग्रजी येत नव्हते. त्यामुळे कोणत्याही गोष्टीची किंमत विचारणे अशक्य झाले होते. अखेर आम्ही खेळण्यांच्या विभागात गेलो व एक काड्यांचा खेळ उचलला. परंतु त्या खेळाचे रहस्य काही कळेना. बरेच हातवारे केल्यावर तिने त्या काड्यांचा खेळ खेळून दाखविला. काड्यांचा जुडगा खाली टाकून एका काडीने त्या पुन्हा एकेक उचलण्याचा तो खेळ तिने सुरू केला. उचलण्याच्या काडीला लोहचुंबक होते व त्या सर्वच काड्यांना लोखंडी पत्र्याचा बारीक तुकडा होता. त्यामुळे उचलावयाची काडी जवळ धरताच काड्या ओढल्या जात. हा खेळ चीनमधून येथे विक्रीस आला होता. तो मी विकत घेतला व आणखी काही खेळणी बकोटीस मारून आम्ही खाली उतरलो तर आमचा ब्रिटिश ड्रायव्हर हसत उभा होताच.

आमच्या हातातील खेळणी पाहिल्यावर तो म्हणाला, " अहो, या दुकानात तुम्हाला काय मिळणार आहे? आताच मला पूर्व बर्लिनबद्दल एक गमतीदार बातमी मिळाली. गेल्या आठवड्यात या डिपार्टमेंटल स्टोअर्सवर लोकांनी तोबा गर्दी केली होती. कारण काय माहीत आहे तुम्हांला? पूर्ण बर्लिनमध्ये कुठेही टॉयलेट पेपर मिळत नव्हता. येथे मिळेल या अपेक्षेने लोक आले पण येथेही नव्हता. एक आठवडा पूर्व बर्लिनवासियांना टॉयलेट पेपर मिळाला नाही." आणि तो खो खो हसू लागला.

मोटारीतून फेरफटका करीत आम्ही एका नव्या कॉलनीकडे आलो. युद्धानंतर पूर्व बर्लिनच्या सरकारने बांधलेल्या या इमारती. मजल्यांवर अनेक फ्लॅटसच्या. येथे फ्लॅट मिळण्यातील गोम एकाने नंतर सांगितली. वर्गविरहित समाजरचना करीत असतानाही काही वर्ग कसे निर्माण होतात याचे प्रत्यंतर या प्रकरणात ऐकावयास मिळाले. कम्युनिस्ट पक्षाचा तो कोणत्या वर्गाचा सभासद आहे यावर हा फ्लॅट मिळणे अवलंबून असते. त्यामुळे कम्युनिस्ट सरकारच्या नोकरीत असूनही क्रमांकाप्रमाणे ब्लॉक मिळेल असे नाही. पक्षाचे हे कार्यकर्ते आवश्यकता नसताना ब्लॉक लाटतात व कुरघोडी करतात अशी तक्रार सामान्यांची होती. " This is a preferential class" असे वर्णन एकाने या ब्लॉकमध्ये राहणाऱ्यांचे केले. साम्यवादाचे तत्त्वज्ञान स्वीकारले म्हणजे त्या व्यक्तीला स्वार्थ उरतच नाही असे नाही. त्याच्यातील माणूस अखेर शिल्लक राहतोच.

मनाला चटका लावणारी एकच जागा पूर्व बर्लिनमध्ये आहे. ज्या जागेवर जर्मनांचा पराभव रशियन फौजेने केला ती जागा. आज बागेसारख्या दिसणाऱ्या त्या छोट्या जागेवर पाच हजार रशियन सैनिक मारले गेले. बर्लिनसाठी अतिशय तुंबळ युद्ध येथे झाले. धारातीर्थी देह ठेवणाऱ्या रशियन वीरांचे स्मारक तेथे आहे. रशियन सैनिकाचा एक प्रचंड पुतळा तेथे उभा आहे; आणि समोर, जरा दूरवर दुसरे शिल्प आहे. भावनेला साम्यवादात स्थान आहे याची जाणीव करून देणारे पहिले स्मारक. आपल्या मृत पुत्रांसाठी शोक करणाऱ्या रशियन मातेचे हृदय हेलावणारे शिल्प तेथे आहे.

शेजारच्या पोलंडचा पूर्व जर्मनीवर बराच परिणाम झाला आहे असे दिसते. पोलंडमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याला त्या मानाने बराच वाव आहे. तेथे अनेक पाश्चात्त्य चित्रपट दाखविले जातात. पूर्व बर्लिनमध्येही ते मधूनमधून येतात असे ऐकले. विद्यार्थ्यांची अशा चित्रपटांना झुंबड उडत असते यात नवल नाही. पूर्व बर्लिनमध्ये फिरताना सारखे वाटत होते की, ही माणसे एक मोठे दुःख गिळून वावरत आहेत. समोर दिसणाऱ्या भिंतीकडे ते जणू पाहातच

नाहीत. एका हॉटेलात जाऊन आम्ही कॉफी घेतली. अनेक कुटुंबीय तेथे बसले होते. परंतु गप्पांचा आवाज खालच्या सुरातील होता. वैयक्तिक स्वातंत्र्याला ते मुकले आहेत यात संदेह नव्हता. 'ही भिंत पाडा', असे तेथे कुणी बोलू शकत नव्हते. त्यासाठी जाहीर सभा घेणे तर दूरच. विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, यांना मुकलेल्या पूर्व बर्लिनमधून आम्ही परतलो तेव्हा एका बंदिस्त जागेतून बाहेर आल्यासारखेच वाटले. आपलीही सुटका झाली असल्याची भावना मनात चटकन येते. येताना आमच्या ड्रायव्हरची व त्याच्या मोटारीची कसून तपासणी झाली. मोटारची 'डिकी' उघडून तर पाहिलीच. परंतु बॉनेटही त्या पूर्व बर्लिनच्या सैनिकाने उघडून पाहिले. एखादा पूर्व बर्लिनचा नागरिक त्यात लपलेला असायचा. पाश्चात्त्य संस्कृतीचे 'थँक् यू' येथे नव्हते. सारे अपरिचितासारखे वागत होते. अपरिचित म्हणून निघून जात होते.

प्रकरण सत्त्विसावे

# हॅम्बुर्ग बंदरात

तीन दिवसांच्या मुक्कामानंतर आम्ही बर्लिन सोडले. बर्लिन सोडले की भिंतीचे ते दडपण नष्ट होते. पॅन अमेरिकन कंपनीच्या हवाई जहाजातून आमचा हा प्रवास चालला होता. बर्लिन-हॅम्बुर्ग हे अंतर विमानाने दीड तासात तोडले. परंतु हा सर्व प्रवास पूर्व जर्मनीच्या भूमीवरून, त्या ' लाल ' बेटावरून चालला होता. " You are now flying over East Germany ", माइक्रवरून सूचना येत होती. पश्चिम जर्मनीच्या भूमीवर विमान येताच, एखादी खूप आनंदाची बातमी सांगावी अशा सुरात घोषणा झाली,

" And now we are on West Germany. Hamburg is now very near ".

दोन जर्मनीचे हे द्वंद्व असे सारखे शब्दांत, सुरात व्यक्त होत होते. तरी हॅम्बुर्गमध्ये फारच मोकळे वातावरण आहे. याचे कारण हॅम्बुर्ग हे बंदर आहे. जर्मनीचेच नव्हे तर साऱ्या युरोपचे हे महत्त्वाचे बंदर. ८०० वर्षांचे जुने. एल्ब नदीने हे बंदर बनविले. या नदीचा पसारा येथे समुद्रासारखा आहे. तिचे पात्र खूप रुंद आहे व पाण्यावर जोरदार लाटा उसळताना आढळतात. एल्ब नदीतून बाहेर पडले की, ताबडतोब समुद्र लागतो असेही नाही. चार-पाच तास बोटी हाकारल्यावर समुद्राचे दर्शन होते. अशी ही सामर्थ्यवान नदी. या नदीने हॅम्बुर्ग शहराला संपत्ती दिली तशी वेगळी संस्कृतीही दिली. देशोदेशींच्या बोटी येथे आल्या त्याचबरोबर त्यांनी आपली संस्कृतीही आणली. हिटलरला हॅम्बुर्ग आवडत

नसे. कारण या बंदरात येणाऱ्या साऱ्या जगाच्या बोटींनी व त्यामधील लोकांनी हे जर्मन शहर भ्रष्टविले आहे अशी त्याची भावना होती. जवळ जवळ २० हजार बोटी दरवर्षी या बंदरात येतात. तितकेच हजार गोदी कामगार कोट्यवधी टन माल चढवितात व उतरवितात. हॅम्बुर्गचे सर्व जीवन या बंदराने मुंबईप्रमाणे बनविले आहे. त्यात हॅम्बुर्ग हे खुले बंदर आहे. तेथे अनेक देशांतून येणारा कच्चा माल महिनेच्या महिने साठविला जातो; आणि पुन्हा सूचनेप्रमाणे रवाना केला जातो. यावर कोणताही कर प. जर्मन सरकार आकारीत नाही. त्यामुळे साहजिकच सर्व युरोपच्या व्यापारचे हे एक केंद्र बनले आहे. या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने या खुल्या बंदर विभागात आहेत. त्यांच्यावर कर लादले जात नाहीत. त्याचा पर्यायाने फायदा प. जर्मनीला मिळतोच. आज युरोपची बाजारपेठ हॅम्बुर्ग बंदरावर अवलंबून आहे.

हॅम्बुर्ग विमानतळावर ' इंटर नेशन्स 'चे प्रतिनिधी आमच्या स्वागतासाठी हजर होतेच. हॉटेल ' ॲल्स्टर हॉफ 'मध्ये ते आम्हाला तावडतोब घेऊन गेले. हॅम्बुर्गच्या ऐश्वर्याला साजेसेच ते हॉटेल होते. तेथे ' डिनर ' घेऊन आम्ही नेहमीप्रमाणे भटकण्यास बाहेर पडलो. हॉटेल-पासून काही यार्डांवरच वळण होते. उजव्या बाजूला वळलो व समोर एक मोठे सरोवर दिव्यांच्या झगझगाटात चमकत होते. हॅम्बुर्गचे ऐश्वर्य वाढविले एल्ब नदीने तर सौंदर्य खुलवले ॲल्स्टर नदीने. आमच्या हॉटेलने याच रूपवतीचे नाव घेतले होते. ही ॲल्स्टर नदी गावाच्या मधून वाहते. तिच्या भोवती गाव वसले आणि ते अशा पद्धतीने वाढले की या नदीच्या पात्रांची अनेक सरोवरे निर्माण झाली. समोर असेच एक मोठे सरोवर आम्ही पाहात होतो व त्याच्या किनाऱ्यावर जीवन हे लुटण्यासाठी आहे असे मानणाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. सरोवर म्हटले की, त्यावर एक मोठे हॉटेल आलेच. जवळपास करमणुकीची साधने आलीच. निऑन लाइट्स आले. त्यांची झगमग आली. त्याची प्रतिबिंबे आली. या निऑन लाइट्सच्या प्रकाशात माणसे उजळलेली दिसत असावीत. तेथे फिरणाऱ्या साऱ्यांचे जीवनच उजळून निघालेले दिसत होते. काहीजण मात्र गर्दी टाळून निवांत कोपरे गाठीत होते. शांतपणे बसून पाइपचे झुरके घेत होते.

एका सुंदर गावात आपण आलो आहोत अशा समाधानात त्या रात्री आम्ही झोपी गेलो. सकाळी उठल्यावर पहिला कार्यक्रम होता तो बोटीने एल्ब नदीत विहार करण्याचा. साऱ्याच हौशी प्रवाश्यांचा हा येथील मुख्य कार्यक्रम. जर्मन नौदलासाठी बोटी पुरविणारे सर्वांत मोठे ' शिपयार्ड ' याच बंदरातील. दोस्तांच्या विमानांनी ते ८० टक्के उद्ध्वस्त केले. पाणबुड्यां-

पासून मोठ्या टॅंकर्सपर्यंत साऱ्यांची बांधणी या बंदरातील. परंतु असे सर्व असूनही हॅम्बुर्ग गाजले तें व्यापारी बंदर म्हणूनच. आमचे पडाव लाटांवर तरंगत चालले होते. परंतु समोर इतक्या प्रचंड बोटी उभ्या होत्या की, त्या पाहण्यातच सारे लक्ष गुंतले होते. हॅम्बुर्ग बंदरातून नुसती केळीच लाखोंनी अनेक देशांना जातात. समोर एक स्वीस बोट उभी होती. आमचा मार्ग-दर्शक म्हणाला, " ही बोट येथेच बांधली गेली व येथूनच तिचा सारा व्यवहार चालतो. स्वित्झर्लंडची ही बोट आपल्या देशाचा किनारा कधीच पाहणार नाही. कारण त्या देशाला किनाराच नाही."

प्रत्येक बोटीवर त्या राष्ट्राचा झेंडा होता. आता या बंदराचेही येणाऱ्या मालाप्रमाणे भाग पडले आहेत. त्याप्रमाणे एल्ब नदीचे कालवे तयार झाले आहेत. हॅम्बुर्गपासून युरोपातील अनेक देशांत रेल्वेमार्ग जातात. त्यामुळे तेथे नाना देशांचा माल उतरतो. रोज साधारण ५० तरी नव्या बोटी बंदरात येतातच. त्यावरचे खलाशी एकदा गावात शिरले की गावाचाही रंग बदलतो.

दुपारी आम्ही हॅम्बुर्गमधील एक छोटा टेलिव्हिजन स्टुडियो पाहिला. हॅम्बुर्ग गावाबाहेर एका टुमदार घरात तो होता. पुन्हा हा टेलिव्हिजन स्टुडिओ खाजगी मालकीचा होता, सरकारी नव्हे. परंतु दिल्लीच्या आमच्या टेलिव्हिजन स्टुडिओपेक्षा तो किती तरी मोठा होता. तेथे कार्यक्रम सादर करण्यासाठी ३ फ्लोअर्स होते. त्यांचा एकाच वेळी एकाच विषयाच्या चित्रणासाठी उपयोग करण्याचीही व्यवस्था होती. आधुनिक कॅमेरे असल्याने एकजण चार कॅमेरे एका वेळी हाताळत होता. " Ruhe " म्हणजे " Silence " हे शब्द जिथे तिथे चमकत होते. जवळ जवळ ५०० लोक येथे काम करीत होते. स्टुडिओत सर्व तऱ्हेची व्यवस्था होती. आपल्याकडे टेलिव्हिजनचा सार्वत्रिक प्रसार ही अजून तरी अशक्य गोष्ट आहे. खाजगी कंपन्यांच्या हाती प्रचाराचे माध्यम जाऊ द्यावयाचे नाही या तात्त्विक वादात अनेक गोष्टींप्रमाणे टेलिव्हिजनही अडकले आहे.

हॅम्बुर्गच्या विद्यापीठाला आम्ही भेट दिली. त्यानिमित्ताने पश्चिम जर्मनीतील विद्यापीठीय शिक्षणाचा एक नवा पैलू पाहावयास मिळाला. व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य वगैरेप्रमाणे विद्यापीठीय स्वातंत्र्याचे नवे स्वरूप येथे पाहावयास मिळाले. " We enjoy here academic freedom ", असे आमचा मार्गदर्शक सांगत होता. तोही या विद्या-पीठातील एक विद्यार्थी. अनेक तरुण-तरुणी ' इंटर नेशन्स ' या प. जर्मन सरकारच्या प्रचार-खात्यासाठी मार्गदर्शकाचे काम स्वीकारतात. त्यांना दिवसाचा ठराविक रोज मिळतो व

त्याशिवाय 'ड्रिंक्स्, डिनर्स' यांचा आनंद असतोच. या स्वातंत्र्याचे स्वरूप त्यांनी आम्हांला समजावून सांगितले. येथे विद्यार्थ्यांना ट्युटोरियल्स नाहीत की वर्गात हजर राहण्याची सक्ती नाही. उलट अधिक विद्यार्थी हजर करण्याची जबाबदारी येथे प्राध्यापकांवर टाकली जाते. प्रत्येक प्राध्यापकाला येथे महिना दोन हजार मार्क्स् मुख्य पगार मिळतो. परंतु त्याशिवाय त्यांच्या वर्गात विद्यार्थी किती हजर होतात त्या संख्येवर अधिक रक्कम या प्राध्यापकांना दिली जाते. हे एक मोठे आव्हान प्राध्यापकांना आहे. त्यात काही विषयांसाठी पंधराशे विद्यार्थी एका वेळी बसू शकतील अशी सभागृहे आहेत. आपल्या वक्तृत्वावर, शिकविण्याच्या हातोटीवर जो प्राध्यापक अधिक विद्यार्थी जमवतो तो पैसेही कमावतो. चांगल्या प्राध्यापकांचे वर्ग विद्यार्थीही मग चुकवीत नाही.

त्यांचे दरही ठरलेले आहेत. १० मार्कस फी भरली की चार लेक्चर्स मिळतात, म्हणजे प्रत्येक तासाला २·५० मार्कस फी पडते. यांपैकी २ मार्कस त्या प्राध्यापकाला प्रत्येक विद्यार्थ्याचे मिळतात. अशा हिशेबाने प्राध्यापक पगार मिळवतो व विद्यार्थी हव्या त्या भाषणांचेच पैसे भरतो. या हॅम्बुर्ग विद्यापीठात १८ हजार विद्यार्थी आहेत व ७ फॅकल्टीज आहेत. विद्यार्थि-विद्यार्थिनींचे घोळके तेथे आवारात फिरत होते. बहुतेक विद्यार्थ्यांच्या हातात कचेऱ्यांना उपयुक्त अशा बॅगा होत्या. केवळ विद्यार्थी जीवन जगणारे फार कमी विद्यार्थी दिसत होते. 'ॲकेडेमिक फ्रीडम' चा हा प्रयोग भारतातही करून पाहिला पाहिजे. रटाळ व्याख्याने देणारे प्राध्यापक आणि वर्गात हजर न राहणारे विद्यार्थी या दोघांनाही हे आव्हान ठरेल.

राजकीय स्वातंत्र्याचा सरकारी पातळीवरून दिसलेला असाच एक आविष्कार आम्हांला मोठा बोधप्रद वाटला. त्या वेळी बॉन सरकार हे संपूर्णपणे ॲडनॉर यांच्या ख्रिश्चन डेमॉक्रॅटिक पार्टीचे होते. या पक्षाच्या सरकारचे पाहुणे म्हणून आम्हांला निमंत्रण होते. तरी त्यांनी आमची हॅम्बुर्गमध्ये सोशल डेमॉक्रॅटसच्या नेत्याची भेट ठरवून दिली होती. अर्थात हॅम्बुर्गची सत्ता त्यांच्या हाती होती. हॅम्बुर्ग पार्लमेंटचे चेअरमन श्री. ऑस्वाल्ड पॉलींग यांची 'सिटी हॉल'मध्ये आम्ही भेट घेतली. आपल्या पक्षाचा कार्यक्रम व पुढील निवडणुकीत विजय मिळणार याबद्दल त्यांना असलेली खात्री ते फार जोरदारपणे आमच्याकडे व्यक्त करीत होते. त्यांना इंग्रजी बोलता येत होते हे विशेष.

"केंद्रीय धोरणापेक्षा हॅम्बुर्गचे धोरण वेगळे आहे," ते आम्हांला सांगत होते. युरोपच्या सामायिक बाजारपेठेत ब्रिटनला घेतले पाहिजे असे मत हॅम्बुर्गने त्यावेळी नोंदविले.

जगाच्या बाजारात जर्मनीला नेणारे हॅम्बुर्ग ख्रिश्चनलाही खुले ठेवले पाहिजे, असे त्यांच्या पक्षाला वाटते.

तुमच्या या दोन पक्षांत आम्हाला फारसा फरक वाटत नाही असे आम्ही म्हणताच जॉर्ज फर्नांडीस यांच्या आवेशात त्यांनी एकेक उदाहरणे आमच्या पुढे टाकली. " श्रीमंत शेतकरी व मालक आमच्या पक्षाला कधी मते देत नाहीत. वकील मंडळी आमच्यात कमी कारण त्यांना मिळकती वाढविण्यात व टिकविण्यात सारा रस. त्याच्या उलट दुकानांतून काम करणारा सारा नोकरवर्ग आमच्या पाठीशी आहे. अहो, हॅम्बुर्गमधील साधे रस्ते बांधताना श्रीमंतांची घरे न पाडता ख्रिश्चन डेमॉक्रॅटस्नी ते बांधले. त्यामुळे ते वळणे घेत घेत जात. आम्ही ते रस्ते सरळ रेषेत आणले."

" तुमचा पक्ष हा आम जनतेचा दिसतो. मग पूर्व जर्मनीबद्दल तुम्हांला अधिक प्रेम वाटावयास हवे."

" East Germany has become an align country to us". ते पटकन उत्तरले. " युद्धानंतर हे दोन्ही वेगळे देशच आता झाले आहेत. आमची भाषा एक असली तरी पूर्व व पश्चिम जर्मनीचा नवा नागरिक एकमेकाशी पूर्वीसारखा बोलू शकत नाही. आमचे व त्यांचे तांत्रिक शब्द वेगळे आहेत. कार्ल मार्क्सपासून त्यांच्या शिक्षणाला सुरुवात होते. त्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांचे सुपर मार्केट ही चीज त्यांना समजूच शकत नाही. युद्धानंतरच्या दोन्ही पिढ्या वेगळ्या देशांतच वाढत आहेत असे समजा."

" या हॅम्बुर्गमध्ये हतक्या देशांचे मतप्रवाह बंदराला लागतात की, कम्युनिझम येथे मूळच धरू शकत नाही. परंतु त्याचबरोबर वेगळा देश समजून हॅम्बुर्गचे व्यापारी संबंध पूर्व जर्मनीबरोबर आहेतच. चेकोस्लोव्हाकिया व इतर कम्युनिस्ट देश ही तर हॅम्बुर्गची 'हिन्टरलँड' आहे."

गप्पा चालू असताना नव्या नाझी पक्षाचा विषय निघाला. परंतु अंगावरचे झुरळ झटकावे तसे " They can collect only foolish people around it". असे ते चटकन उत्तरले. तरुण या पक्षाकडे मुळीच आकर्षित होत नाहीत असे त्यांचे म्हणणे.

त्यांचे एक भविष्य खरे झाले आहे. पुढच्या निवडणुकीत बॉनला संयुक्त सरकार स्थापन होईल असे ते आम्हाला सांगत होते. त्या रात्री आमच्या आलिशान हॉटेलच्या डिनर रूममध्ये थाटाचा खाना होता. डिनर म्हणजे गप्पा अधिक. तीन इंग्रजी भाषा येणाऱ्या जर्मन विद्यार्थिनी या डिनरला आल्या होत्या. भारताबद्दल त्यांच्या मनात असंख्य शंका होत्या.

त्यांच्या देशाची युद्धोत्तर प्रगती व आमचे असंख्य वादविषय यांचा मेळ त्या घालू शकत नव्हत्या. " तुमच्या दक्षिण भारतातील लोकांना इंग्रजी का नको ? " इथपासून काश्मीरपर्यंत सारे प्रश्न त्यांनी विचारले. त्यांची उत्तरे देणे कठीण जात होते. हॅम्बुर्गच्या ' रीपरबान 'वर रात्री भटकण्याची लज्जत चुकू नये म्हणून त्यांना काश्मीर समस्येतून आम्ही लौकर बाहेर काढले. लंडनची पिकॅडली, पॅरीसचे पिगाल व हॅम्बुर्गचा ' रीपरबान ', हे सारे एका जातीचे. बर्लिनमध्ये ' मूला रूझ ' आहे तर हॅम्बुर्गमध्ये ' कॅसिनो दी पॅरीस ' आहे. त्याहीपेक्षा हॅम्बुर्गचा सेंट पॉल स्ट्रीट फार अजब वाटला. या पवित्र सेंट पॉलचे ' सन्त पावली 'त रूपांतर करून येथे अवतरले अनेक नाईट क्लब्ज. सूर्य जसा अस्ताला जातो तसा या रस्त्यावरचा दिवस उजाडतो. नवी बोट बंदरात येते त्या दिवशी येथील वस्तूंचे व ललनांचे भाव बदलतात. हॅम्बुर्गचे एक वेगळे स्वरूप येथे पाहावयास मिळते. नौदलातील अधिकाऱ्यांचा पोषाक हे क्लब्ज मॅनेजर चढवितात व खलाश्यांना आणि प्रवाशांना आवाहन करून आतील ' मालाची ' जाहिरात करतात. जर्मन बिअरमध्ये हे सारे प्रवासी जवळ जवळ बुडालेले दिसतात. येथे रात्र कधीच संपत नाही. सकाळी बोटींचे भोंगे रात्री हरवलेल्या खलाश्यांसाठी ' कोक्लू ' लागतात तेव्हा सन्त पावली पुन्हा मिटते.

हॅम्बुर्गचा आमचा मुक्कामही असाच बोलता बोलता मिटला. विमानतळावर आम्ही गेलो तेव्हा हवा बरीच बिघडली होती. परंतु आम्हाला म्युनिकला घेऊन जाणारे विमान सुटणार होतेच.

" डंकअ् ", " डंकअ् " ( थँक् यू ) असे बोलून आम्ही आमच्या मार्गदर्शकाचा व हॅम्बुर्गचा निरोप घेतला. विमान उडाले व मुसळधार पाऊस सुरू झाला. ढगांच्या वर आम्ही गेलो तर दुसरा थर आमच्या समाचाराला हजर. काळ्या ढगातील वीज फार धोकादायक असते ही एका वैमानिक मित्राने दिलेली माहिती अशा वेळी आठवली. आकाशात दूर विजा चमकत होत्या. त्या विजा जेथे चकमत आहेत, नेमक्या त्याच दिशेने आमचे विमान धावत आहे असे वाटत होते. " बेल्टस लावा " चा इशारा केव्हाच झाला होता व विमान चांगलेच हिसके खात होते. ' ढग व विमान यांचे मीलन होते तेव्हा ३३ कोटी देवांतील काहीतरी देव आठवतात ' या एका विधानाची प्रचीती येऊ लागली होती. हवाई सुंदरीने जेवण दिले. परंतु ते अतिशय हिंदकळत व अनेकांना नंतर ते खाणे कठीण झाले. चमचा तोंडात नेमका जाईल याची खात्री उरली नव्हती. अखेर, ' विमान फार हालत असल्याने कॉफी देता येत नाही ', याबद्दलची दिलगिरीची घोषणा झाली. परंतु

आमच्या वैमानिकाने ज्या झपाट्याने म्युनिकला विमान उतरविले त्यावरून त्याला या सर्व गडबडीचा थोडाही उपसर्ग पोहोचला नसावा: असे वाटले. अगदी धो धो पाऊस पडत होता. त्यामधून विमानतळही दिसत नव्हता आणि ते 'लुफ्तान्सा' चे हवाई जहाज, एखाद्या कुशल फलंदाजाने सहजतेने 'लेटकट' मारावी तसे खाली उतरविले. विमानातून उतरताना झालेल्या त्रासाबद्दल हवाई सुंदरी गोड आवाजात क्षमा मागत होती. विमान जमिनीला लागल्याने साऱ्यांच्या अंगी आता बळ आले होते. तरी काही मन उघडे करीत होते. कोसळत असलेल्या पावसाचे व हिटलरच्या आवडत्या म्युनिकचे दर्शन घेण्यासाठी आम्हीही आभार मानून खाली उतरलो.

## प्रकरण सत्ताविसावे

# बव्हेरियातील म्युनिक

" विलकॉमन् इन म्युनशिन " !

( वेलकम् इन म्युनिक )

धुवाधार पावसातून आम्ही विमानतळ गाठला तेव्हा या शब्दात आमचे स्वागत झाले. प. जर्मन सरकारच्या प्रतिनिधीने आपल्या मातृभाषेत आमचे स्वागत केले. जर्मनीचा जाज्वल्य अभिमान असणाऱ्या भागात आम्ही आलो आहोत याची जाणीव करून देणारी ही पहिली सलामी. हिटलरला म्युनिक आवडे ते याचसाठी. फार मोठी संचलने हिटलरच्या काळात येथे होत. फ्युररवर प्रेम करणारी सर्वांत अधिक माणसे याच भागात होती. आता सारेच चित्र बदलले आहे.

विमान उतरले तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते. म्युनिक रेल्वे स्टेशन जवळच्या हॉटेल एक्सलसियरमध्ये आमचा मुक्काम होता. तेथे पोहोचल्यावर आमच्या विमानाला तडाखा देणाऱ्या पावसाने म्युनिकचा निरोप घेतला होता.

म्युनिक हे जुन्या बव्हेरियाचे जणू मुख. ब्रिटनमधील वेल्सप्रमाणे बव्हेरियालाही आपल्या इतिहासाचा अभिमान दिसला. गजबजलेले रस्ते, छोट्या मोटारींची गर्दी, रस्त्याच्या कडेने जाणाऱ्या निळ्या रंगाच्या सुरेख ट्रॅम्स म्हणजे म्युनिक. दोन वेगळ्या प्रकारची प्रार्थनामंदिरे ही म्युनिकमधून कुठूनही दिसतात. एक चर्च आकाशाचा वेध घेत जाणाऱ्या निमूळत्या मनोऱ्याचे, तर दुसऱ्यावर मशिदीच्या घुमटासारखी डोक्यावर टोपी घातलेली. या चर्चला

पुन्हा दोन मनोरे. फ्रॉवेनकि्‍र्झे हे उंच चर्च हेच म्युनिकचे मानचिन्ह. अकराव्या शतकातील हे चर्च म्युनिकचा मोहरा ठरवते. जर्मनीतील त्या छोट्या छोट्या मोटारींचा एक प्रचंड तांडा या चर्चच्या पायाशी असा पहुडला होता की, क्षणभर वाटावे मुसलमानांचा नमाज चालू आहे. मुस्लिम संस्कृतीचे थोडेसे मिश्रण या बव्हेरियन संस्कृतीत असावे असे वाटते.

म्युनिकचा स्टाकोझ स्क्वेअर हा सर्वांत गजबजलेला. पूर्वी ट्रॅम होती तेव्हा बोरीबंदरचा चौक गजबजलेला दिसत असे तसा. येथे सभोवती दुकानांचे फार मोठे वर्तुळ पडले आहे. या दुकानांभोवती घोटाळणाऱ्या बव्हेरियन तरुणी हा म्युनिकचा खरा प्राण, खरे सौंदर्य. त्यांचा पोषाखही मोठा रंगदार. स्कर्ट एका रंगाचा तर ब्लाऊज दुसऱ्या रंगाचा व विशेषतः फुलाफुलांच्या कापडाचा. स्वयंपाकघरात काम करताना गृहिणी ' ॲप्रन ' चढवितात तसा फुलाफुलांचा ॲप्रन प्रत्येक मुलीने बाजारात हिंडतानाही चढविलेला. अनेक मुलींनी डोक्यावर असेच सुरेख रुमाल बांधलले. गोऱ्या अंगकांतीने हे सारे भडक रंग खुललेले. हॅम्बुर्गपेक्षा म्युनिकची संस्कृती वेगळी आहे याचा हा ' ॲप्रन ' एक निदर्शक.

म्युनिकच्या बाहेर पडले की प्रचंड ' ॲटोबान्स ' तुमचे स्वागत करतात. सामान्यपणे शंभर मैलांच्या वेगाने आमची मोटार धावे. हे हमरस्ते सोडून म्युनिकच्या परिसरात आम्ही गेलो तेव्हा निसर्गाचे एक वेगळे दर्शन घडले. आल्पसच्या सावलीतील बव्हेरियाचा हा भाग एखाद्या स्वप्ननगरीसारखा वाटतो. म्युनिक शहराबाहेरच्या प्रार्थनामंदिरांनाही मशिदीच्या घुमटाचे आकार आहेत. परंतु इंग्लंडप्रमाणे ' हिरवे गालिचे ' या प्रार्थना-मंदिराच्या सभोवती युरोपात प्रथमच दिसले. बव्हेरियन लोकांची घरे तर कोणालाही मोहीत करतील. सर्व घरे दुमजली, दुपाखी व कौलारू. परंतु वरच्या मजल्यावर चारही बाजूंनी एक अरुंद गॅलरी, आणि या गॅलरीत चारही दिशांना फुलबाग फुलविलेली. एखाद्या सुंदर चित्राला रंगीबेरंगी फुलांची चौकट घालावी तसे हे एकेक घर दिसते. घरांचा रंग व फुलांचा रंग एकमेकांशी स्पर्धा करणारा. फुले अधिक लाल रंगाची, आणि तेच रंग स्त्रियांच्या पोषाखाचे. म्युनिकचा हा बव्हेरियन परिसर अगणित रंग उधळून रंगलेल्या होलिकोत्सवातील उत्तर भारतीय स्त्रियांसारखा मला वाटला. हातावर घसरणारा पदर सतत सावरणाऱ्या नववधू-सारखी येथील झाडे आपल्या फांद्यावर ओघळणारी पाने सावरीत होती.

अशाच एका भागातील बव्हेरियन फार्मला भेट देण्यास आम्ही गेलो होतो. गावाचे नाव होते वेलहेम. तेथे आमचे स्वागत केले ते मिस्टर विमा या नावाच्या गृहस्थांनी.

त्यांच्या नावाआधी Oberlandwirtschaftsrat. इतका लांबलचक शब्द लिहिला होता. त्याचा अर्थ आपल्या येथील जिल्हा लोकल बोर्डाचा पूर्वी अध्यक्ष असे, तसा काही होता. अतिशय उंच असा हा गृहस्थ स्वतः शेतकरी होता व मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या वळणावर आपली छोटी गाडी घेऊन तो आमची वाट पाहात होता. तेथून आम्ही आल्प्सच्या उतारावरील या मळ्याकडे गेलो. आल्प्सची काही शिखरे समोर दिसत होती. बर्फाचे छोटे पुंजके मधून मधून दिसत होते. काळ्या केसांत पांढरे केस मधून मधून डोकवावे तसे.

श्री. विमा यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा शेती विभाग येथे काम करीत होता. डोंगरातील शेतीचे अनेक प्रश्न त्यांच्यापुढे होते. हिवाळ्यातील व पावसाळ्यातील येथील सारेच स्वरूप बदलून जाते. हिवाळ्यात डोंगराच्या आसपास –२५° इतके तपमान उतरते. सगळीकडे बर्फच बर्फ. उन्हाळ्यातच या डोंगरावर २५° तपमान असते. हिवाळ्यात येथे सर्वत्रच १ मीटर बर्फ साचतो. डोंगराळ भागात तर तीन मीटरपर्यंत बर्फ साचतो. एकूण २२० दिवस येथे हिवाळा असतो. पाऊसही तुफान पडतो. अशा सर्व परिस्थितीत येथे अनेक उत्पन्ने काढली जातात. दुग्धव्यवसाय हा जोड व्यवसाय म्हणून येथे फार मोठ्या प्रमाणावर वाढविला आहे. २५ टक्के भाग हा जंगलाचा आहे. त्याचे उत्पन्न मिळवून तो टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. एका टेकडीवजा मळ्यावर आम्ही उभे राहून सारे पाहात होतो. हवेत गारवा बराच होता. समोर मध्येच असे चढउतार दिसत होते. निवांतपणे बसावे अशा अनेक जागा तेथे होत्या. येथील हिवाळाच पाहण्यासाठी खरे गेले पाहिजे. अशा निसर्ग-संपन्न भागातील लोक हे कलावंत नसले तरच नवल. "आमच्या भागाचे वैशिष्ट्य हे की येथे चित्रकारांची संख्या भरपूर आहे आणि त्यांपैकी अनेकांनी जगाचे दौरे केले आहेत." मिस्टर विमा आम्हाला सांगत होते.

तेथून आम्ही जवळच एका शेतकऱ्याचा वैयक्तिक मळा पाहण्यासाठी गेलो. मिस्टर सीस हे त्या शेतकऱ्याचे नाव. दुसऱ्या महायुद्धाच्या जखमा अंगावर घेऊन धान्य पिक-विणारा हा शेतकरी. युद्धकाळात चेकोस्लोव्हाकियात गेला व समाप्तीनंतर पुन्हा प. जर्मनीत परतला. येथेही वर्षातील २०० दिवस हिवाळा. शेतकी विद्यालयाचा पदवीधर असलेला त्याचा पंचविशीतील मुलगा हेन्स हाही बापाबरोबरच सर्व काम शेतीचेच पाहतो. तीन फुटांपेक्षा अधिक उंचीचा बर्फाचा थर ज्या भूमीवर जमतो तेथे काम करणारे हे बापलेक. २० गाईंचे खिल्लार त्यांच्याजवळ आहे. म्युनिकच्या परिसरात फिरताना ब्रिटनप्रमाणे रस्त्याच्या कडेला ठेवलेले दुधाने भरलेले 'कॅन्स' अनेक ठिकाणी दिसत होते. ठराविक

वेळेला भररस्त्यावर हे डबे आणून ठेवले जातात. ट्रक्स येऊन ते घेऊन जातात व आदल्या दिवशीचे रिकामे डबे तेथे ठेवून जातात. दोन्ही देशांत दुधाचे भरलेले डबे चोरीला गेल्याचे मी कधी ऐकले नाही.

युद्धानंतर प. जर्मनीलाही धान्यतुटीला तोंड द्यायचे होते. त्यांना अक्षरशः राखेतून नवे राष्ट्र निर्माण करायचे होते. त्यामधून पहिली योजना निघाली ती जमिनीच्या अदलाबदलीची. आपल्याप्रमाणेच अनेकांची जमीन दहा तुकड्यांत दहा ठिकाणी होती. त्यांची अदलाबदल करून शेतीचा सलग तुकडा करण्याची पद्धती प. जर्मनीने अवलंबिली. मिस्टर सीस यांची जमीन अशीच दोन ठिकाणी होती. वेलहेमपासून काही मैलांवर आज त्यांची शेती आहे. सरकारी कर्ज घेऊन सुंदर घर त्यांनी तेथेच बांधले आहे. डेअरीचा भाग घरालाच चिकटलेला होता. परंतु मधला दरवाजा उघडल्याशिवाय पलीकडे गोठीवाडा आहे असे कळायचे नाही. जमिनीचे सलग तुकडे करणे व सबंध कुटुंब काम करू शकेल असे फार्म तयार करून देणे हा प. जर्मन सरकारच्या या योजनेचा गाभा होता. त्याचा उपभोग घेत असलेल्या या बव्हेरियन शेतकऱ्याच्या सहवासात मी जवळ जवळ अर्धा दिवस होतो. बियरच्या बाटल्या तो घरातून सारखा आणून टेबलावर ठेवीत होता; आणि स्वतः ग्लासचा पोषाखी वापर न करता संबंध बाटली एका दमात रिचवीत होता.

तो, त्याची पत्नी, त्याचा मुलगा व सून हे सारे मग आमच्या गप्पांत सामील झाले. अडचण भाषेची होतीच. ती आमचा मार्गदर्शक मिटवीत होता. ते सारेजण या मळ्यासाठी खपत होते. त्यापैकी ५० टक्के जमिनीतून ते गहू व बटाटे यांचे उत्पन्न काढीत. उरलेल्यात ते गुरांसाठी गवताचे उत्पन्न काढीत. २० गाईमुळे रोज ३१० किलोग्राम दूध त्याला मिळे. प्रत्येक किलोग्रामला साधारण ३८ ते ३९ फेनिक्स असा भाव त्यांना मिळतो. बाहेर लोकांना ५० फेनिक्सला १ किलोग्राम या दराने दूध विकले जाते. ५० फेनिक्स म्हणजे आपल्याकडील साधारण ५० पैसे.

युरोपातील सर्वच दुग्धव्यवसाय हा स्वयंचलित यंत्रावर चालणारा. शेतकरी आपल्या वैयक्तिक मळ्यावरही ही सारी यंत्रणा लावतो. गुरांच्या मलमूत्र-विसर्जनाची तरुण हेन्सने खास व्यवस्था स्वतःच्या अक्कलहुशारीने केली होती. स्वतः खणून त्यांच्यासाठी जणू भूमिगत ड्रेनेज त्याने तयार केले होते व ते शेतात नेऊन सोडले होते. शेणखताचा युरोपातील शेतकरी अतिशय सहजतेने उपयोग करतात हे प्रत्येक ठिकाणी पाहावयास मिळते. आपल्याकडील राब हे प्रकरण त्यांना अगदी विचित्र वाटते. शेतकीची कोणतीही अवजारे लागली

की मिस्टर विमा यांचे खाते त्याचा पुरवठा करते.

या साऱ्यांना आम्ही अनेक प्रश्न विचारल्यावर मिस्टर विमा आपली फेल्ट हॅट एका जागेवरून दुसऱ्या जागेवर ठेवीत म्हणाले की, आता तुमच्या देशाबद्दल आम्हांला थोडी माहिती द्या; आणि त्यांनी पहिला प्रश्न केला तो आपल्या अन्नधान्य तुटीचा. आपल्याकडे इतकी जमीन व इतकी माणसे असताना पुरेसे धान्य आपण पिकवू शकत नाही हे श्री. विमा यांना पटत नव्हते. या शेतकऱ्याशी बोलताना आपल्या देशाबद्दलच्या उणिवा तीव्रतेने जाणवत होत्या. बोलता, बोलता एकाने मोठा मार्मिक प्रश्न केला. तो पटकन म्हणाला, "तुमचे तुमच्या देशावर खरोखरच प्रेम आहे का?" प्रश्न साधा होता, परंतु उत्तर देणे अशक्य होते. आमच्या सर्व दोषांवर त्यांनी एका प्रश्नात नेमके बोट ठेवले होते. स्वतःवरच प्रेम असलेली लहानमोठी माणसे आपण रोज बघतो. राजकीय पुढारी हे स्वतःवर जितके प्रेम करतात तितके देशावर करीत नाहीत, असेच त्याला सुचवावयाचे होते काय? व्यक्तीचे स्वतःच्या स्वार्थावरचे प्रेम, धंद्यावरचे प्रेम, नफ्यावरचे प्रेम, राजकीय नेत्यांचे निवडणुकीवरचे प्रेम, पक्षावरचे प्रेम, भाषेवरचे प्रेम, स्वदेशापेक्षा असलेले प्रांतावरचे प्रेम, या धामधुमीत आमच्या देशावर प्रेम करण्यास काही शिल्लक उरत नसावे. त्या शेतकरी कुटुंबाचा निरोप घेऊन आम्ही ते छोटे गाव सोडले ते थोड्या अस्वस्थतेनेच.

ती अस्वस्थता घालविली आल्प्सने. आल्प्सचे जवळून दर्शन घेण्यासाठी आम्ही दुपारनंतर गेलो. प. जर्मनीच्या बाजूचे आल्प्सचे सर्वोच्च शिखर आम्ही चढणार होतो. 'Typical बव्हेरियन लंच' भरपूर घेतल्यावर आम्ही आल्प्सचे शिखर चढून जाणार होतो. नऊ हजार सातशे फूट उंचीचे. त्या शिखराचे नाव 'झूगपिट्झ'. मुंबईतील तीन जिन्यांची चाळ चढून जाणे कठीण वाटते. परंतु बोलता बोलता, जर्मनी व स्वित्झर्लंडची सीमा ठरविणाऱ्या आल्प्सच्या रांगांवर आम्ही चढूही लागलो. समुद्राच्या किनाऱ्यावर वाळूचे छोटे छोटे डोंगर करावे व त्यावर एखाद्या मुलाने रांगत जावे तितक्या सहजतेने आम्ही गेलो. क्षणार्धात आम्ही ढगांतून जात होतो. मधूनच सूर्यकिरणांतून. मधूनच खाली खोल दरी दिसे. मध्येच बर्फाचे तुकडे. काही ठिकाणी बर्फाच्या राशी. मातट मातट रंगाच्या. उंच झाडे खुरटी दिसत होती. मोठमोठे कडे दिसत होते व बोलता बोलता आम्ही ते ओलांडून जात होतो. कड्यांवरून झेप घेतली तरी कडेलोट होत नव्हता. कोसळण्याची भीती नव्हती. डोंगरावरील बर्फाला पायही लागत नव्हते. कारण आम्ही होतो विद्युत पाळण्यात. स्वस्थ उभे. निसर्गावर मात केल्याचा आनंद सिगारेटच्या धुरातून व्यक्त करीत होतो. ट्रॅमच्या छोट्या

डब्याच्या आकाराचा हा पाळणा. ती शिखरे, ते कडे लीलया ओलांडीत होतो. आल्पसचा हा अधिक निकटचा परिचय. पांढऱ्या केसाने माणूस गंभीर दिसतो तसे हे डोंगरही भारदस्त वाटत होते. दोन महायुद्धांची धुमश्चक्री पाहूनही स्थितप्रज्ञ राहिलेले हे आल्पसचे डोंगर. हिमवर्षावाने त्याचे मनही कसे शांत राहिले असावे. काही मिनिटांतच ढगांचे पडदे पाहून आम्ही 'शूगपिटझ्' गाठले. आमच्या प. जर्मनीतील प्रवासाचा तो सर्वार्थाने परमोच्चबिंदू होता.

तेथे पोहोचलो. पाळण्यातून बाहेर आलो तर एका मानवाने त्या उच्च शिखरावर चक्क रेस्टॉरॉं टाकलेले. आजूबाजूला सर्वत्र बर्फ पडला होता. पलीकडे स्वित्झर्लंडचा परिसर दिसत होता. वसंत ऋतू असल्याने साराच परिसर सूर्यकिरणात चमकत होता. तेथे पुन्हा अत्युच्च टोकावर जाण्यासाठी दोन जिने आहेत. सर्वोच्च शिखरावर जेथे झेंडा व क्रूस लावलेला होता तिथपर्यंत जाण्यासाठी सोपा मार्ग करून ठेवला आहे. हॉटेलच्यावर एक लांबलचक सपाट असा गच्चीवजा भागच तयार केला आहे. आल्पसच्या डोक्यावर मनमुराद नाचण्यास मिळावे म्हणून ही जागा तयार केली असावी. पेयाचे घुटके घेत, आल्पसचे वारे खात आम्ही कितीतरी वेळ बसलो. राखेतून उभ्या राहिलेल्या त्या उन्मेषशाली देशात भेटलेल्या एकेक व्यक्ती आठवत होत्या. वातावरणातील शीतलता व बर्फाच्छादित परिसर यांना गुंगवणारा एक सूर हॉटेलातील रेडिओतून ऐकू येत होता. वाटत होते की, हे स्वप्न संपूच नये.

परंतु सूर्य खाली बुडाला व स्वप्न संपवून त्याच विद्युत् पाळण्याने आम्हाला सत्य-सृष्टीतील भूमीवर उतरावे लागले. त्या रात्री आमचा जेवणाचा कार्यक्रमही अनेक दिवसांनी एका भारतीय हॉटेलात झाला. म्युनिकमध्ये भारतीय हॉटेल असेल अशी कल्पना नव्हती. परंतु माझ्याबरोबरचे दोन्ही पत्रकार हे शाकाहारी असल्याने त्यांची इंग्रजी पद्धतीच्या हॉटेलात फार पंचाईत होती. मलाही त्याचे आकर्षण वाटे ते पुलाव्यासाठी. मार्गदर्शकाबरोबर सहज विषय निघाला व त्याने तेथे भारतीय हॉटेल असल्याची वर्दी दिली. तावडतोब आम्ही तेथे मोर्चा वळविला. ते हॉटेल एका उत्तर प्रदेशियाचे आहे. त्याने मोठ्या हौसेने आमचे स्वागत केले. सध्या युरोपात भारतीय पद्धतीच्या जेवणाला सर्वत्रच वाढते गिऱ्हाईक आहे. आपल्या मसालेदार जेवणाची युरोपला चटक लागू लागली आहे. ते जेवण आमच्या जर्मन मार्गदर्शकाला तर इतके आवडले की, तो दुसऱ्या दिवशी आपल्या वृद्ध आईला ते चाखण्यासाठी घेऊन गेला. आमच्या उत्तर प्रदेशीय हॉटेल मालकाने तर जेवण सुरू होताच

हिराबाई बडोदेकरांची रेकॉर्ड लावून जेवणाला भारतीय बहार आणली. परदेशात गेल्यावर तेथील गोष्टी पाहाव्या, ऐकाव्या, खाव्या हे कितीही खरे असले तरी काही दिवसांनी हा सूर आपल्याला घरी आणून सोडतो.

म्युनिक मुक्कामात आम्ही आणखी अनेक गोष्टी पाहिल्या. निफेनबर्गचा राजप्रसाद हा बव्हेरियाच्या इतिहासाचा एक न भंगलेला पुरावा. अर्थात युद्धाची झळ या प्रासादालाही लागली. परंतु तो जसाच्या तसा पुन्हा बांधून काढण्यात आला. सर्वसामान्यपणे राजवाड्यांचे जे स्वरूप असते तसे या प्रासादाचे आहे. जुनी तैलचित्रे आहेत, व्हेनिसच्या बिशपचे अंगरखे आहेत. पोर्सिलिनची नमुनेदार भांडी आहेत. परंतु त्यापेक्षाही सर्वांत आकर्षक वाटतो तो प्रासादाबाहेर दूर हिरवळीवर एकटाच उभा असलेला एका स्त्रीचा पुतळा. Symbol of Bavaria म्हणून हा स्त्रीचा पुतळा उभारण्यात आला आहे. यात बव्हेरियन स्त्रीचे सौंदर्य व पराक्रम व जनतेचा पुरुषार्थ, सारे उत्कृष्ट रीतीने प्रकट केले आहे. १८१५ ते १८७० या कालातील सुंदर स्त्रियांची चित्रे या प्रासादात लावलेली आहेत. फ्रेंच, जर्मन राजे येथे राहिले. इंग्लंडच्या राणीने पश्चिम जर्मनीत जो नुकताच दौरा केला तेव्हा या प्रासादातच मुक्काम केला होता. पूर्वी इंदूर, बडोदे वगैरे संस्थानिकांच्या आठआठ घोड्यांच्या बग्गा पाहण्यास मिळत तशी येथेही सातव्या कैसरची आठ घोड्यांची गाडीही आहे.

म्युनिकला आम्ही असताना एक जागतिक प्रदर्शनही होते. हे प्रदर्शन होते वाहतूक विभागाचे. यात सर्केरमा दाखविण्यात येत असल्याचे कळले म्हणून आम्ही मुद्दाम तेथे गेलो. मुंबईस मागे सर्केरमा एकदा आला होता. परंतु प्रचंड गर्दीमुळे मीही तो पाहू शकलो नव्हतो. चित्रपट क्षेत्रातील हा विक्रम पाहिल्याशिवाय त्याचे सामर्थ्य उमजणार नाही. प्रेक्षक मध्ये उभे राहतात व त्यांच्याभोवती सर्व बाजूंस साधारण उंचीच्या पडद्यावर एकाच चित्रपटातील अनेक दृश्ये एकदम दाखविली जातात. समोर एक दृश्य दिसते, उजवीकडे पाहावे तर त्या-आधीचे दिसते, उजवीकडे आणखी पुढचे चित्र तर मागच्या बाजूस त्या चित्रात धावत असलेली गाडी निघूनही गेलेली असते. लहानपणी शाळेत टपला मारून एखाद्या पोराला चार विद्यार्थी अनेक दिशांना वळून पाहण्यास लावतात, तसा हा प्रकार वाटला. एकाच वेळी सर्व दिशांना चित्रपट दाखविण्यात येत असल्याचा पहिला परिणाम असा होतो की, ती घटना जेथे घडत असते तेथे आपण प्रत्यक्ष उभे आहोत असे भासते. आपल्या आजूबाजूने वाहने जात आहेत. माणसे समोर बोलत येत आहेत असे वाटत राहते. जनावरांच्या

हालचाली तर आपल्याला तुडवून होत असल्याचा भास होतो. वाघाने झेप घेतली तर तो आपल्या अंगावर झटकन येतो. जरा दचकून बाजूला व्हावे व मागे नजर टाकावी तर त्याने तेथे दुसऱ्या कठ्यावर पाय रोवलेले असतात. म्युनिकच्या दौऱ्याचा शेवट या सर्कॅमाने झाला. पाश्चात्य जगाने मारलेली शास्त्रीय आघाडी पाहिली की, आपल्या देशातील प्रगतीची मालगाडी इच्छित स्थळी कधी पोहोचणार हे उमजत नाही. म्युनिकच्या विमानतळावर आम्ही आलो तर भारतीय मालगाडी ऐवजी पॅन अमेरिकन कंपनीचे विमान आम्हाला बर्लिनला पुन्हा परत नेण्यास हजर होते. येताना आमचे स्वागत करणारा धुवाधार पाऊसमात्र आता नव्हता. आकाश निरभ्र होते. पाहिलेल्या अनेक गोष्टींचे मेघ आमच्या मनात मात्र दाटून आले होते.

प्रकरण अठ्ठाविसावे

# पाश्चात्त्य रंगभूमी व चित्रपट

" बोईंग बोईंग " हा चित्रपट आता अनेकांनी पाहिला असेल. भारतातील अनेक शहरांत तो झळकून गेला. लोकांना तो खूप आवडलेला दिसला. जेट युगाची ही रंगेल कथा बहारदार आहे यात शंका नाही. परंतु ज्या नाटकावरून हा चित्रपट निघाला ते " बोईंग बोईंग " हे नाटक मला अधिक प्रभावी वाटले. लंडनच्या स्ट्रँड थिएटरमध्ये मी हे नाटक पाहिले. चित्रपटात नायकाच्या मित्राची भूमिका जेरी लेवीस हा नामांकित विनोदी नट करतो. नाटकात निकोलस पार्सन्स हा ख्यातनाम नट ती भूमिका रंगवितो. पार्सन्स व लेवीस यांनी त्या भूमिकेकडे वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहिल्यासारखे मला वाटले. पार्सन्सच्या भूमिकेच्या पासंगालाही लेवीसची भूमिका उतरू शकत नाही, असे माझे तो चित्रपट पाहून मत झाले. स्ट्रँड थिएटरमध्ये सतत चार वर्षे नाटकाचा तो प्रयोग चालू होता; आणि त्याचे ७० टक्के श्रेय निकोलस पार्सन्सच्या भूमिकेला दिले जात होते.

लंडनमध्ये गेल्यावर नाटके पाहावयाची असे खूपच मनात होते. परंतु आमचे हे वृत्तपत्रीय जीवन असे सर्वव्यापी आहे की, व्यक्तिगत आवडीनिवडीला मुरड घालून जो विषय समोर येईल त्याला सामोरे जावे लागते. तसेच येथे नाटके पाहणे ही गोष्ट सर्वांत कठीण आहे हे तेथे आल्यावर जाणवले. पहिली गोष्ट म्हणजे नाटकांची तिकिटे फार अगावू नोंदविली जातात त्यात तिकिटांचे दर फार महागडे. आपल्या जुन्या चलनदरात सांगावयाचे म्हणजे कमीत कमी १० रुपयांचे तिकीट नाटकाला काढावे लागते. कमी दराची

तिकिटे साहजिकच लौकर संपून जातात. त्यात काही नाटके एकाच थिएटरात वर्षानुवर्षे चालू आहेत. तरीही गर्दी कायम आहे. ' माऊस स्ट्रॅप ' हे नाटक मी तेथे गेलो तेव्हा आठव्या वर्षांत त्याच थिएटरमध्ये चालू होते. पात्रे बदलतात, नाव कमावलेल्या नट्या निघून जातात. जुनीचे आव्हान स्वीकारून नव्या येतात व नाटक चालू राहते. रंगभूमीचे ते ऐश्वर्य पाहून मनात साहजिकच आले की, आमच्या मराठी रंगभूमीचेही असेच ऐश्वर्य होते. परंतु ते भूतकाली.

नाटकाचे गिऱ्हाइक हुकमी पकडण्याचे येथील लोकांचे तंत्र आपल्याला अवलंबिता येईल काय याचाही विचार येथील नाटक कंपन्यांनी करावयास हवा. इंग्रजी भाषा ही जगातील बहुतेकांना येणारी. त्यामुळे परदेश प्रवासी लंडनमध्ये येताच त्यांना हॉटेलातच गाठले जाते. लंडनमधील सर्व प्रमुख हॉटेलात नाटकांच्या तिकीटविक्रीची व्यवस्था असते. अमेरिकन प्रवासी अर्थातच सर्वांत जास्त आणि तितकेच श्रीमंत. त्यांची उपस्थिती नाटककारही लक्षात घेत असावेत. येथील अनेक नाटकांत अमेरिकनांची व त्यांच्या चालीरीतींची थट्टा उडविलेली आढळते. आपली उडविलेली टिंगल तेही मोठ्या रसिकतेने चाखताना आढळतात. मुंबई-सारख्या शहरात नवनाटककाराने हा प्रयोग करून पाहता येण्याजोगा आहे. एकाच थिएटरमध्ये अनेक वर्ष प्रयोग चालल्याने लंडनच्या मंडळींना सारेच काम सोपे जाते. त्यात इंग्रजी भाषेचे माध्यम. आपल्याकडे ती गोष्ट अशक्य. तरीसुद्धा मुंबईत येणारे परदेशीय व आंतर-प्रांतीय प्रवासी यांना महाराष्ट्राची रंगभूमी पाहण्याची हौस असणारच आणि कमी असली तर ती आपण वाढविली पाहिजे. ताजमहालपासून सर्व हॉटेलांत मराठी नाटकांच्या तिकीट-विक्रीची व्यवस्था व्हावयास पाहिजे. भारतीय प्रवाश्यांनाही आकर्षित करणारी जाहिरात हवी. हौशी प्रवाश्यांचा मोसम पाहून तरी असा प्रयोग करून पाहावा. त्यांच्यासाठी इंग्रजीतून परिचय पत्रिका छापून ठेवता येतील. परंतु ' एक शून्य बाजीराव 'सारखा प्रयोग अशा मोसमात दोन-तीन दिवस तरी लावून पाहावा. थिएटर हवे तर छोटे घ्यावे. परंतु नव्या मराठी नाटकाचे स्वरूप पाहण्यासाठी बंगाल, आंध्र प्रदेशचे रसिक येतील तसे परदेशीय पाहुणेही येतील. जेथे बंदर आहे व आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे तेथे धंदा मिळविता आला नाही तर त्यात अधिक दोष आपला समजला पाहिजे.

" बोईंग बोईंग " हे नाटक पाहा असे आम्हांला सांगितले ते मुंबईतीलच तेथे भेटलेल्या लेखक मंडळींनी. हे नाटकही एका पत्रकाराच्या जीवनावरील आहे. पॅरीस विमानतळावरील एक पत्रकार बातम्या जमविण्याऐवजी हवाई सुंदरीशी संधान बांधतो. विमानांचे वेळापत्रक

संभाळून या आंतरराष्ट्रीय पऱ्यांबरोबर घरी विलास करतो. एअर फ्रान्सला पोहोचवून जर्मन लुफ्तान्साला घेऊन येतो, परंतु एक दिवस वेळापत्रक घसरते व बी. ओ. ए. सी. एअर फ्रान्स व लुफ्तान्सा या सगळ्याच एका वेळी येऊन थडकतात. त्यांना वेगवेगळ्या खोल्यांत, एकमेकांना दिसणार नाहीत अशा ठेवण्यात त्याची धांदल उडते. अचानक आलेला हा मित्र यात त्याला मदत करतो. ते दोघेच व मैत्रिणी अधिक त्यांमुळे अधूनमधून मौजही लुटतो. अनेक पेचप्रसंग निर्माण होतात. एक लपविण्यासाठी दहा खोट्या गोष्टी त्यांना सांगाव्या लागतात व त्या उघड्या पडल्या की त्यांची गडबड उडते.

चित्रपटाचा व नाटकाचा शेवट अगदी वेगळा आहे. चित्रपटात अखेर सर्वजणी समोरासमोर येतात व त्यात दोन अशियाई हवाई सुंदऱ्या दरवाजाबाहेर उभ्या येऊन ठाकलेल्या पाहताच हे दोघे अक्षरशः घरातून पळून जातात. एक टॅक्सी धरतात व धूम ठोकतात. ती टॅक्सी एक स्त्री चालवीत असते. आपला नुकताच उडालेला फजितवाडा विसरून तिच्याशी त्यांचे प्रणयाराधन सुरू होते. पुन्हा ते आपल्या मूळपदावर येतात, या वातावरणात चित्रपट संपतो. नाटकात या पत्रकाराचे व त्याच्या मित्राचे विवाह होतात. बी. ओ. ए. सी. ची हवाई सुंदरी तो गोंधळ पाहून रागाने निघून जाते. लुफ्तान्साने त्या मित्राला पकडलेले असते. ती नाटकात प्रथम प्रवेश करते तेव्हा पाठमोऱ्या बसलेल्या या मित्राला आपला प्रियकर समजून त्याचे प्रदीर्घ चुंबन घेते. आपले काय झाले हे समजण्यापूर्वी तो मित्र त्या कडक चुंबनाने गुदमरून जातो. " जर्मन मुलगी आपल्या प्रियकरालाच असे चुंबन देते व हे चुकून दिले असले तरी आता त्यामुळे तूच माझा प्रियकर झाला आहेस " असे तर्कट लढवून लुफ्तान्साचे पाखरू त्याच्या गळ्यात पडते. त्यामुळे ' एअर फ्रान्स ' एकटी राहते व ती नायकाच्या साहजिकच गळ्यात पडते.

रंगभूमी ही चित्रपटापेक्षा जास्त निकटची. त्यामुळे या नाटकाचा प्रभाव चित्रपटापेक्षा अधिक पडत असावा. नाटकातील स्वयंपाकीण व चित्रपटातील स्वयंपाकीण या दोघीही वेगळ्या वाटल्या. नाटकातील स्वयंपाकीण कमी बोलते. चित्रपटातील बाहेर येऊन वादात भाग घेते. वाक्य बोलतच रंगमंचावर प्रवेश करावयाचा व तसेच तक्रारीच्या सुरात बोलत आत परतावयाचे इतकेच काम तिला नाटकात दिले होते. दोन्ही माध्यमांच्या स्वरूपामुळे काही बदल करणे आवश्यक पडले असावे. परंतु नाटकात दार उघडले की, आता कानावर वाक्य यावयाचे व त्या शब्दापाठोपाठ जणू ती स्वयंपाकीण यायची. तिच्या प्रत्येक एन्ट्री-एक्झीटबरोबर प्रचंड हशा व्हायचा.

पार्सन्स व लेव्हीस यांच्या अभिनयाचे स्वरूपही माध्यमाप्रमाणे बदलले असावे. पार्सन्स निष्पापतेचा अभिनय लेव्हीसपेक्षा अधिक चांगला करतो. लेव्हीसची पूर्वीची चित्रपटकीर्ती नजरेसमोर आल्याने कदाचित असावे, परंतु तो निष्पाप वाटत नाही. अर्थात रंगभूमीवरील नायक पार्सन्समुळे फिका पडतो तसे चित्रपटात होत नाही. नाटकाचा विषय अत्यंत आधुनिक. अनेक देशांच्या हवाई सुंदऱ्या त्यात आल्याने नाट्यविषयाला विश्वव्यापी स्वरूप येते. अमेरिकनांची थट्टा उडविणारी काही वाक्ये या नाटकातही होती. अडीच तास सबंध नाट्यगृह हास्यात बुडून गेले होते. एका दिवाणखान्याच्या एका सेटवर फक्त नाटक चालते. त्यामुळे व्यावसायिक दृष्ट्या नेपथ्याचा भरमसाट खर्चही त्यांना नाही.

'इप्सविच' गावात 'ब्लिथ स्पिरिट' या नावाचे नाटक आम्ही पाहिले. ब्रिटनमधील हौशी रंगभूमीवरील इप्सविच आर्टस् थिएटरने ते सादर केले. इप्सविच आर्टस थिएटरचा ट्रस्ट आहे व त्यांना ब्रिटनचे आर्टस् कौन्सिल आर्थिक मदत करते. इप्सविच युथ थिएटर, इप्सविच थिएटर क्लब या आणखी संबंधित चळवळी. 'ब्लिथ स्पिरिट' हे नोवेल कॉवर्डचे नाटक मराठी रंगभूमीवरही आलेले आहे. इप्सविचच्या या नाटकातील नटमंडळी ही अतिशय नामवंत अशी नव्हती. तरी अभिनय व प्रयोग निर्मिती ही कोणत्याही व्यावसायिक रंगभूमीच्या तोडीची होती. या नाटकातील नायकाच्या पहिल्या मृत पत्नीचे भूत चक्क घरात वावरते. ते फक्त पतीला दिसते. दुसऱ्या पत्नीला व इतर कुणालाही ते दिसत नाही. चार्लसची निळसर पायघोळ पोषाखातील मृत पत्नी समर्पक प्रकाशझोतात रंगमंचावर प्रथम येते तेव्हा सारे थिएटर क्षणभर हबकतेच. तिचे रंगमंचावरील फिरणे व ती जवळून गेली तरी आपल्याला दिसत नसल्याचा चार्लसच्या पत्नीने केलेला अभिनय हा अतिशय परिणामकारक होता. "तुला कशी ती दिसत नाही? तुझ्यासमोर ती उभी आहे", म्हणून पती ओरडतो तरी पत्नी रिकामा डोळ्यांचा रिकामा चेहरा करून पाहात राहते. दुर्दैवाने मोटार अपघातात ही पत्नीही मरते व तिचे तसेच निळ्या रंगातील भूत रंगमंचावर येते. त्या दोघी एका योनीतील म्हणून आता एकमेकींना पाहू शकत असतात. एकमेकींचे गुणगान व दोषदिग्दर्शन पतीने उपस्थितीप्रमाणे केलेले असते. आता त्या एक होतात व त्याच्यावर तुटून पडतात. सबंध घर हालत आहे. भिंतीवरच्या तसबिरी खळखळत आहेत, दोन्ही पत्नींची भुते घरात शिरली आहेत अशा अवस्थेत चार्लस सफाईने दरवाजा बंद करून ते घर सोडून निघून जातो व नाटक संपते. रंगमंचावरील दिवाणखान्याचा सेट हालत असतो, तसबिरी धरणीकंपाने हलाव्यात तशा हिंदकळत असताना पडदा पडतो.

वर्तमानकाळातील घटनांचा उल्लेख नाटकात आणण्याची हौस या प्रयोगाच्या वेळीही दिसली. भारत–चीन संबंध त्या वेळी बिघडल्याने गाजले होते. या नाटकाची खलनायिका आहे एक चेटकीण. तिच्या गप्पांची प्रचीती पाहण्याच्या खटाटोपातून ही भुते अवतरतात. तिच्या पहिल्या प्रवेशाच्या वेळी चार्लसची पत्नी तिला विचारते, " तुम्ही चहा घेणार का? " तेव्हा ती चेटकीण विचारते,

" Which tea you have got ? "

" Indian and Chinese. "—पत्नी उत्तरते.

" Give me Chinese tea and not Indian. " ती सांगते व नाट्यगृहात हशा पिकतो. एकतऱ्हेने आमच्या पराभवाचीच केलेली ही चहा होती.

नाटक संपल्यावर आम्ही पडद्याआड जाऊन कलावंतांना भेटलो व त्यांचे अभिनंदन केले. चेटकिणीचेही तिने केलेल्या विनोदाबद्दल कौतुक केले. आपल्याकडे हौशी रंगभूमीच्या ' ग्रीन रूम ' मध्ये जसे वातावरण असते तसेच तेथे होते. तो चार्लस व त्याच्या पत्नींची भुते आता कॉफी पिण्यात गर्क होती. आमच्या या अभिनंदनाचा त्यांनी मोठ्या प्रेमाने स्वीकार केला.

एक तिसऱ्या प्रकारचे नाटक आम्ही पाहिले ते पश्चिम जर्मनीतील म्युनिक या शहरात. नाटकाचे नाव होते ' दी फायरवर्क ' ( दा फ्युअरवेर्क ). अर्थात भाषा जर्मन होती. परंतु भाषेची जराही अडचण नाटक पाहताना वाटली नाही. याचे कारण नाटक शाब्दिक कसरती-पेक्षा रंगमंचावरील विविध कसरतींवर आधारलेले होते.

म्युनिकच्या ' डचेस थियेटर 'मध्ये हे नाटक आम्ही पाहिले. वाचवृंद समोर खाली थाटात बसला होता. गावात सर्कस आलेली असते, ती पाहून एका मोठ्या घरातील मुलीला आपण सर्कशीत जाऊ असे वाटू लागते. तिला अडविण्याचा खूप प्रयत्न केला जातो. परंतु तरीही ती सर्कशीत जाते. या नाटकाला कथानक विशेष होते अगर त्यामधील नाट्यविषय प्रभावी होते असे नव्हे. नेपथ्याकरिता व करमणूक म्हणून हे नाटक पाहिले जात होते. या नाटकात साधारण तीन सेटिंग्ज येत. दर्शनी पडदा सतत पडत नसे. क्षणभर काळोख होई व या काही मिनिटांतच प्रासादाच्या जागी सर्कस येई. त्या रंगमंचाला भरपूर उंची असावी. कारण घरातील दिवाणखान्याचा सेट चटकन वर उचलला जाई व सर्कशीचा तंबू खाली येई. ट्रॅपीझचे खेळ व उड्या सुरू होत. त्यात ही नायिका असे. जनावरे येत व रंगमंचाच्या डाव्या-उजव्या बाजूला प्रेक्षकही येत. नाटकातील प्रेक्षकांची ही भूमिका करण्यास अनेक



१०४०१२ ग्रं.प्र.

लोक तयार असावेत. या प्रेक्षकांत वेगवेगळ्या वयाचे लोक दिसत. त्यांच्या सेटलाही खाली चाके असावीत. कारण प्रेक्षक धावत येऊन बसताना थोडेही दिसत नसत.

या सर्कशीचा प्रवेश संपला की, नायिकेच्या प्रणयराधनेचा प्रवेश येई. वाड्याचे अंगण दिसे. बाहेरचा उंच लोखंडी दरवाजा कळ दाबताच उतरावा तसा आकाशातून उतरे, आणि वाड्याचा एका कोपऱ्यात एक झाड 'उगवे'. त्या झाडाखाली 'प्रेम' सुरू होई. वाड्याच्या अंगणातील मंद दिवे लावलेले असत व एक फिका निळसर प्रकाशझोत चांदण्यासारखा त्यांच्या अंगावर पडे. उत्तम प्रकाशयोजना, भव्य सेटिंग्ज व विनोदी भूमिका यामुळे नाटक रंगले होते व भाषेचा अडथळा विसरून आम्हीही त्या प्रयोगाशी समरस झालो होतो.

या तिन्ही नाटकांत एक गोष्ट समान होती. नाटक संपल्यावर गाडी पकडण्याची घाई नसल्याने प्रेक्षक साऱ्या कलावंतांना 'कर्टन कॉल' ची प्रचंड टाळी देत होते. प्रत्येक कलावंत पुढे येई व त्याला तितक्याच उत्साहाने टाळी मिळे. भूमिकेप्रमाणे टाळ्यांच्या कडकडाटाचा निनाद अर्थातच घुमे. परंतु हा सन्मान प्रेक्षक तेथे ज्या उत्साहाने देत तो पाहून आमची थिएटर सोडण्याची घाईगर्दी आठवली. म्युनिकच्या 'फायरवर्क' मधील कमी बोलणारा एक नोकर व 'बोईंग बोईंग' नाटकातील ती वैतागलेली स्वयंपाकीण सारख्याच टाळ्या घेऊन गेली. 'बोईंग बोईंग' चा पार्सन्स जेव्हा टाळी घेण्यास रंगमंचावर आला तेव्हा तर स्टॅंड थिएटर लोकांनी डोक्यावर घेतले. मराठी रंगभूमीच्या वैभवाच्या काळात बालगंधर्वांने अशी टाळी घेतलीही असेल. आमच्या आजच्या घाईगर्दीच्या जीवनात 'कर्टन कॉल'वर पडदा पडलेला दिसतो.

पाश्चात्त्य चित्रपटांबद्दल लिहावे तितके थोडेच आहे. आता बहुतेक चित्रपट सर्व देशांत दाखविले जातात. परंतु अर्थात सेन्सॉरची कात्री देशपरत्वे लावली जाते. आपल्याकडे येणारे बहुतेक इंग्रजी चित्रपट एक चतुर्थांश तरी कापलेले असतात. 'रशिया विथ लव्ह' या चित्रपटाचे तर आपले राजनैतिक संबंध कायम राखण्यासाठी भारतात प्रकाशन झाल्यावर नाव बदलले गेले. 'बोईंग बोईंग' या चित्रपटातील काही मोक्याची चित्रे काटलेली जाणवत होती. लैंगिकतेबद्दलच्या आपल्या व पाश्चात्त्य कल्पना यांत फरक आहे यात शंका नाही. परंतु अर्धवट वस्त्र घातलेली स्त्री ही जशी अधिक वासना निर्माण करते तसे या चित्रपटांचे झाले आहे. 'मॅरेज इटालियन स्टाइल' हा चित्रपट सोफिया लॉरेनचे शरीरसौष्ठव पाहण्यासाठी जे जातात ते अखेर फसतात. हा चित्रपट मी कार्डिफमध्ये पाहिला. भारतात तो आला तो असेच तुकडे कापून. परंतु या चित्रपटाला उत्तरार्धात जे वळण मिळते त्यामध्ये

माणसाच्या वासना जळून जातात. उत्तान शृंगाराचे प्रतीक वाटणारी सोफिया लॉरेन, तिचे उन्नत वक्षस्थळ, मादक डोळे व प्रेक्षकांना हादरा देणारी नितंबाची ती हालचाल लोकांना दिसेनाशी होते. तीच सोफिया लॉरेन आई म्हणून प्रेक्षकांचे नेत्र व मन व्यापते. कारण तिच्या त्या श्रीमंत प्रियकराच्या अंतःकरणातील पित्याचे मन जागे झालेले असते. ही आई चार मुले समोर उभी करते आणि यात तुझा एक मुलगा आहे एवढेच सांगते. परंतु त्यांपैकी नेमका कोणता हे सांगण्याचे नाकारल्याने स्त्रीकडे केवळ उपभोग म्हणून पाहणाऱ्या त्या पुरुषांतील पिता जागा होतो. ' तुझा मुलगा नेमका कोणता हे सांगितले तर इतर मुलांसाठी तू पैसे देणार नाहीस. ' असे सांगून ती आई उत्तर टाळते. त्यामधून निर्माण झालेल्या संघर्षातून हे जग ज्यावर चालते असे काही चिरंतन मूल्य वर येते. प्रेक्षकांची पकड घेते. माणूस थिएटर सोडतो तेव्हा त्याच्या मनात त्या चित्रपटात पाहिलेले एकही तथाकथित अश्लिल चित्र शिल्लक राहिलेले नसते. चित्रपटाचा अखेर परिणाम काय होतो यावर त्याचे मूल्य-मापन व्हावयास हवे. आपल्याकडे ते कधीच होत नाही.

मनातून न जाणारा असाच एक चित्रपट मी लंडनमध्ये पाहिला. त्याला चित्रपटापेक्षा माहितीपटच म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. लंडनच्या पिकॅडलीत काहीतरी रंगदार, ढंगदार बघावे म्हणून आम्ही एका चित्रपटगृहात शिरलो. तेथे ' न्यूड क्लब ' वरील एक चित्रपट दाखविला होता. एका ' न्यूड क्लब ' च्या जवळ असलेल्या समुद्रावर तीन मैत्रिणी सहज फिरावयास जातात सुंदर वस्त्रे परिधान करून, इथपासून चित्रपटाला सुरुवात होते. इतक्यात त्यांची न्यूड क्लबमधील एका स्त्रीशी गाठ पडते. विवस्त्र राहण्याचा अगम्य आनंद ती त्यांना समजावून सांगते. उत्कृष्ट शरीरसौष्ठव असलेल्या त्या तीन मुलींना ते पटते व अंगावरील वस्त्रे टाकून त्या क्लबमध्ये त्या सामील होतात. कुठूनही नग्न स्त्रियांचे प्रदर्शन होईल असा काहीतरी कथाभाग जुळवून हा चित्रपट तासभर चालतो.

त्यानंतर तेथे सुरुवातीस उल्लेख केलेला माहितीपट सुरू होतो. त्याचे नाव " प्रिमिटिव्ह लंडन " ! सबंध जगातील आधुनिक, सुशिक्षित, सुसंस्कृत असे गणले जाणारे हे लंडन कसे ' प्रिमिटिव्ह ' आहे, रानटी आहे. याचे दर्शन देणारा हा माहितीपट त्या नग्न स्त्रियांच्या मागोमाग येतो व तुमचे मन प्रक्षोभक विचारांनी ढवळून काढतो.

लंडन शहरात जे जे आम्ही पाहात होतो, उपभोगीत होतो, त्या त्या गोष्टींचे पडद्याआडचे जीवन या चित्रपटात दाखविले होते. कॅसिनो क्लब्जमधील समोर होणारी उलाढाल व मागे होणारी घालमेल, बीटनिक्सचे क्लब्ज, नाईट क्लब्जमधील पडद्याआडचे चित्र हे सारे इतक्या

उत्कटतेने दाखविले होते की, पाहणाऱ्यांना जीवनाचा हा प्रवाह कुठे वाहतो आहे याची भ्रांत पडावी व आत किती दुःख भरले आहे याची जाग येऊन ते अस्वस्थ व्हावेत. बीटनिक्स क्लब्जमध्ये जाऊन त्यांच्या घेतलेल्या मुलाखती या चित्रपटात आहेत. सिगारेटचा धूर सोडीत बसलेली पोरापोरींची ही टोळकी जीवनाबद्दल किती बेफिकिरीने बोलतात. क्षणभर वाटते की, ही बेफिकिरी किती कौतुकास्पद आहे. इतक्यात मुलीला विचारले जाते, " तू तुझ्या बीटनिक मित्राबरोबर विवाह करणार आहेस का ? " तेव्हा ती चटकन 'नाही' असे उत्तर देते. तिला एका चांगल्या कुटुंबातील, घरंदाज पुरुषाशी विवाह करावयाचा असतो. मनात पुन्हा चारचौघांसारखी कौटुंबिक जीवनाचे स्वप्न ती पाहात असते. येथे ती रमलेली असते ती तात्पुरती. " Wilson is a good lad ! " अशा थाटात हे बीटनिक आपल्या पंतप्रधानाबद्दल बोलत असतात. हे पाहता पाहता कॅमेरा एका जाहिरात कंपनीत जातो. तेथे बराच वेळ एक चांगल्या चेहऱ्याचा नट एकच वाक्य पुन्हा पुन्हा बोलत असतो. त्याची 'फिल्म' घेतली जात असते. औषधाची ती जाहिरात असते व त्यामुळे होणारा चांगला परिणाम एका वाक्यात तो सांगत असतो. परंतु ते वाक्य कसे बोलायचे याबद्दल दिग्दर्शक प्रत्येक वेळी नवी सूचना देतो व त्याला घामाघूम करतो. हसऱ्या चेहऱ्याने पडद्यावर येऊन कंपनीच्या मालाची जाहिरात करणाऱ्या नटाचे दुःख यात वेचले आहे व ते दृश्य अंतराअंतराने पुन्हा दाखवून विलक्षण परिणाम निर्मात्याने साधला आहे.

लंडनवासियांच्या असंस्कृत मनोवृत्तीची असंख्य चित्रे या माहितीपटात येतात. खाजगी क्लब्ज येतात. तेथे चालणारे प्रकार प्रकट होतात. इतक्यात एखाद्या खाटिकखान्यात कॅमेरा जातो. कापलेल्या हजारो कोंबड्यांची मालिका येते. न संपणारी. लंडनवासी इतक्या कोंबड्या पोटात रिचवतो हे सांगत असतानाच कॅमेरा वळतो तो नाईट क्लबमध्ये.

तिथे प्रेक्षक गोळा झालेले असतात. वाद्यांच्या लयीवर, हळुवारपणे अंगावरचे एकेक वस्त्र काढणाऱ्या त्या 'स्ट्रिप्टीज'ची सारेजण वाट पाहात असतात. कंपनीचा मॅनेजर ही अजून का आली नाही म्हणून वाट पाहात असतो. इतक्यात धावच धावत ती येते. दिवसभर तिने नोकरी केलेली असते. ट्यूब रेल्वे तिने धावत पकडलेली असते. परवडत नाही म्हणून चारचौघींसारखी ती चालत, धावत थिएटरपर्यंत पोहोचलेली असते. रस्त्यातून चालताना कशी ती अनेक कुलीन स्त्रियांसारखी दिसते. बाजूने चालणाऱ्या लोकांना वाटणारही नाही की, ही आता समोरच्या थिएटरमध्ये शिरेल व अंगावरची वस्त्रे चारचौघांसमोर उतरेल.

परंतु घरच्या परिस्थितीमुळे तिने ते काम स्वीकारलेले असते. कमी श्रमात भरपूर मोबदला

टे गारे. थिएटरच्या ‘ ग्रीन रूम ’मध्ये ती येते. कुलीन कपडे अंगावरचे उतरते व नंतर उतरावयाचे अंगावर चढविते. तिची ती धांदल, चेहऱ्यावर दिसणारे श्रम सारे पाहून प्रेक्षक मनात कष्टी बनतो. लोक वाट पाहात असतात म्हणून ती किती चटकन बाहेर रंगमंचावर येते. श्रम विसरून हसते. किती कृत्रिम ! परंतु रोजच्या सरावाने नैसर्गिकतेचा अभिनय करून आपले घर, आपले व्यक्तिमत्त्व ती विसरून वाद्य वाजत असताना, एखादी रंगेल ओळ कुणीतरी आतून गात असते, आणि ती वस्त्रे उतरवीत असते. एखाद्या बाहुली-सारखी. ते पाहण्यात रंगलेले लोक खुषीने साथ देत असतात व ‘ प्रिमिटिव्ह लंडन ’ हे चित्र पाहात असलेले प्रेक्षक अंतर्मुख होऊन बाहेर पडत असतात. त्या पहिल्या ‘न्यूड क्लब ’ची शिसारी आलेली असते व सुसंस्कृतपणाचे वस्त्रहरण झाल्याने लंडन अगदी छोटे वाटते आणि वस्त्रे पुन्हा घालून घरी गेलेली ती ‘ स्ट्रिप्टीज ’ अधिक श्रेष्ठ वाटते.

## प्रकरण एकोणतिसावे

# साम्यवाद्यांची मक्का — मॉस्को

" पासपोर्ट " रशियन भूमीवर ऐकलेले हे पहिले शब्द. थोड्याशा करड्या आवाजातच उच्चारलेले. ब्रिटिश संस्कृतीचा प्रतीक गणला जाणारा " प्लीज " हा शब्द तिथे जोडलेला नव्हता. स्टालिनच्या अमदानीत ज्याच्या सावलीनेही माणसे घाबरत असत तो रशियन पोलीस विमानातून उतरण्यापूर्वीच पासपोर्टची मागणी करीत होता. मॉस्कोला येण्यापूर्वी अर्धा डझन देशांच्या भूमीवर माझे पाय लागले होते; परंतु विमानातच पासपोर्टची मागणी कधी झाली नव्हती. पोलादी पडद्याची ही पहिली चुणूक असावी असे मानून माझा पासपोर्ट मी त्याच्या स्वाधीन केला. विमानतळावर कुठेही पासपोर्टची तपासणी झाली की, तिथल्या तिथं पासपोर्ट परत केला जातो. येथे सर्वांचे पासपोर्ट ' जमा ' करण्यात आले होते.

पूर्व-बर्लिनहून फक्त दोन तासांत मॉस्कोला घेऊन येणाऱ्या त्या प्रचंड रशियन ' जेट '-मधून मी खाली उतरलो तेव्हा प्रथम लक्ष वेधून घेतले ते " Moskvae " या अक्षरांनी. साऱ्या जगाला एकेकाळी नवी प्रेरणा देणाऱ्या लेनिनच्या भूमीवर मी अखेर उतरलो तो केवढ्या उत्सुकतेने. साम्यवाद्यांच्या या मक्केचे दर्शन घेण्याच्या इच्छेबरोबरच कुतूहलाची भावना माझ्या मनात अधिक होती. कोणत्याही पूर्वग्रहांनी तेथे मी उतरलो नव्हतो. रशियाच्या पर्यटनखात्याचा एक प्रवासी म्हणून मी तेथे आलो होतो. विमानतळावरील मुख्य दालनात आल्यावर " इनटुरिस्ट " या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रशियन पर्यटन कचेरीचा प्रतिनिधी मी शोधू लागलो. समोरच " इनटुरिस्ट " हा फलक होता. फलकाच्या

आडोशाला एक टेबल होते. काही कागद त्या टेबलावर इतस्ततः पडलेले होते. परंतु खुर्चीतील 'मानवा'चा पत्ता नव्हता. कदाचित तो अंतरालात गेला असावा. ज्यांना मॉस्कोत प्रवासी या नात्याने यावयाचे असते त्यांना दर दिवसाचा खर्च आगाऊ आपापल्या देशातील रशिया-मान्य प्रवासी कंपनीत भरावा लागतो. लंडनच्या अशा एका प्रवासी कंपनीत दर दिवसाचे पाच पौंड या दराने आम्ही पैसे भरलेले होते. त्यामुळे "इनटुरिस्ट" चा प्रतिनिधी शोधून काढणे अत्यावश्यक होते. मॉस्कोमध्ये आमची जी काही भलीबुरी व्यवस्था व्हावयाची ती त्यावर अवलंबून होती. परंतु अर्धा तास शोध करूनही कुणी सापडेना. मॉस्को विमानतळावर कुठेही 'माहिती' अगर 'चौकशी' साठी एकही खिडकी नव्हती. कदाचित रशियन भाषेमुळे तिची आमची गाठ पडली नसावी. 'इंग्रजी'ला आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता देण्यास रशिया तयार नसावे. मग गमावलेला पासपोर्ट परत मिळवावा म्हणून पासपोर्ट विभागाचा शोध केला. एके ठिकाणी घोळका दिसला. त्यात सामील झालो तेव्हा पासपोर्ट मिळाला. जड सामान आम्हांला विमानतळावरच ठेवायचे होते. त्याकरिता 'क्लोकरूम' चा शोध सुरू केला. तेव्हा ती बंद झाल्याचे कळले. आंतरराष्ट्रीय विमानतळावरची 'क्लोकरूम' बंद होऊच शकत नाही असा सवाल टाकताच ती उघडण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन मिळाले.

बर्लिन ते मॉस्को हे एक हजार मैलांचे अंतर विमानाने दोन तासांत तोडले तर मॉस्को विमानतळावर पहिला एक तास या प्राथमिक चौकशीत गेला. माझ्या घड्याळात तर चार वाजले होते. क्लोकरूम बंद होती. "इनटुरिस्ट" कचेरीच्या टेबलावरचे कागद फडफडतच होते. अखेर आसनगावच्या स्टेशनमास्तरला बोलावून आणून बाथरूम उघडून द्यावी तशी ती क्लोकरूम एकाने येऊन उघडली. घड्याळातील चाराचे सहा करा अशी सूचना त्याने आल्याबरोबर दिली. मॉस्को बर्लिनपेक्षा दोन तासाने आघाडीवर आहे. पश्चिमेकडून आता आम्ही पूर्वेकडे वळलो आहोत याची जाणीव या दोन तासांनी दिली. परंतु रशियासारख्या बलाढ्य देशाच्या राजधानीत आम्ही उतरलो नसून मध्य रेल्वेच्या एखाद्या आडवळणाच्या स्थानकावर उतरलो आहोत असे पहिल्या तासातच वाटू लागले. भाषेची अडचण जबरदस्त. अखेर अधिक हातवारे व कमी परंतु मोठ्याने उच्चारलेले शब्द याच्या साहाय्याने फलाटावर भटकणाऱ्या एका 'इनटुरिस्ट' प्रतिनिधीला आम्ही अखेर गाठले. मामलेदाराच्या पटेवाल्याच्या बेफिकिरीत 'तुम्ही इनटुरिस्टतर्फे आला आहात काय' असे त्याने आम्हांला विचारले. गळ्याला टाय नसलेला आम्हाला या दौऱ्यात भेटलेला हा पहिला माणूस. त्याच्या

डोईवरील केस साम्यवादाची पताका फडकावीत होतेच. त्याने आमचे स्वागत-बिगत काही केले नाहीच उलट, ‘ महाशय, आपण इतका वेळ कुठे होता व त्या टेबलाजवळ आपण बसला असतात तर काही बिघडले असते काय?’ या माझ्या प्रश्नाकडे त्याने साफ दुर्लक्ष केले. अगदी थंडपणे आम्हांला एका टॅक्सीवाल्याच्या स्वाधीन करून तो पुन्हा दिसेनासा झाला.

प्रत्येक उद्योग हा सरकारी मालकीचा झाला की, त्यामध्ये वैयक्तिक स्वारस्य कसे उरत नाही याची मिळालेली ही पहिली चुणूक. किंबहुना पाश्चात्त्यांचा नाटकीपणा त्यांना आवडत नसेल असे क्षणभर मी मानले, आणि टॅक्सीत बसलो. अर्थात ती टॅक्सीही कुणा व्यक्तीची नव्हती. रशियन सरकारचीच ती गाडी. त्यामुळे त्या टॅक्सीत ड्रायव्हरने केलेली काही सजावट नव्हती. एखादे खेळणे अगर चित्र लटकावलेले नव्हते.

मॉस्को विमानतळ शहरापासून जवळ जवळ २० मैल दूर आहे. त्यामुळे शहरात शिरण्यापूर्वी ग्रामीण भागाचे ओझरते दर्शन मिळू शकत होते. रस्त्याच्या एका बाजूला शेते व दुसऱ्या बाजूला झोपड्यांची रांगच रांग दिसत होती. पत्रे, झावळ्या यांनी झाकलेल्या कोळ्यांच्या घरांसारख्या त्या झोपड्या दिसत होत्या. प्रत्येक घराच्या पुढील दारी विहीर होती व अगदी भारतीय पद्धतीने रहाटाचे संगीत तेथे चालू होते. बहुतेक झोपड्या रस्त्याच्या उंचीच्या मानाने सखल जागेत होत्या व त्या रस्त्यालगतच्या पायऱ्यांवर स्त्रिया व मुले ठिकठिकाणी बसलेली होती. ब्रिटन, फ्रान्स, स्वित्झर्लंड व प. जर्मनीसारख्या देशांतून येथे आल्यावर एकदम वेगळे वाटते. त्या स्त्री-पुरुषांचे पोशाख अगदी साधे होते. ऐश्वर्याची थोडीही छटा तिथे दिसत नव्हती.

अंधारातही चमकू शकणाऱ्या एका स्तंभावरील विळ्याकोयत्याचे गावाच्या सीमेवर दर्शन घडले व मॉस्को शहरात शिरत असल्याचा निर्वाळा मिळाला. प्रचंड इमारती नजरेसमोर येऊ लागल्या. दुसऱ्या महायुद्धात मॉस्को उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न हिटलरने विशेष केला नाही. कारण विजयी वीराप्रमाणे मॉस्कोत प्रवेश करण्याची त्याची मनीषा होती. तरीही मॉस्कोला चटके बसलेच. त्या राखेतून पुन्हा मॉस्को उभे राहिले आहे. विमानतळावर उतरल्यापासून जवळ जवळ तीन तासांनी एका टोलेजंग इमारतीत आम्हांला सोडण्यात आले. आकाशाचा वेध घेणारा उंच मनोरा असलेली ही इमारत हॉटेल युक्रेनची होती. अंधार पडू लागला होता, व २९ मजल्यांच्या या इमारतीवरील मनोऱ्यावर लाल तारा चमकू लागला होता. ‘ धुक्यातून लाल ताऱ्याकडे ’ आम्ही पोहोचलो होतो

हॉटेल युक्रेन हे अनेक सरकारी हॉटेलांपैकी एक. तेथे शिरल्याबरोबर पुन्हा त्या पोलादी पडद्याचे जासूद आपले काम करू लागले. पासपोर्ट पुन्हा घेण्यात आला. त्या पहिल्या भव्य दालनात प्रचंड गर्दी होती. सर्व देशांचे प्रतिनिधी तेथे दिसत होते. अमेरिकन प्रवाश्यांची तेथे अधिक गर्दी आढळली. सर्व देशांच्या प्रवाश्यांना रशियाने आपली दारे खुली केल्याचा तो पुरावा होता. तेथे रांगेत बराच वेळ उभे राहिल्यावर एका काउंटरवर आमच्या हाती सिनेमाच्या तिकिटांसारखी काही तिकिटे पडली. आगावू भरलेल्या पैशाच्या मोबदल्यात मिळालेली ती " कुपन्स " होती. त्याला रशियन पद्धतीत ' पेन्शन ' म्हटलेले होते. दोन दिवसांची ' पेन्शन ' घेऊन आम्ही मॉस्कोत राहणार होतो. २३ व्या मजल्यावर २३१२ नंबरची खोली मला मिळाली. कोणत्याही पाश्चिमात्य राष्ट्रातील उत्कृष्ट हॉटेलातील खोलीशी बरोबरी करू शकेल अशीच ही जागा होती. सर्व सोयींनी ती युक्त होती. खोलीत इतर ठिकाणांप्रमाणे रेडिओ होता. टेलिफोन होता. थोडा आराम करावा म्हणून पलंगावर अंग टाकले तर सारे अंथरूण गार लागत होते. कारण त्या चादरी पुऱ्या वाळलेल्याही नव्हत्या. तेथे प्रवाश्यांची गर्दी इतकी उडालेली होती की, त्यांना वस्तू पुरविणे त्यांच्या आटोक्याबाहेर गेलेले दिसत होते.

ओल्या चादरीवर पडण्यापेक्षा २३ व्या मजल्यावरून दिसणारी मॉस्को नगरी पाहावी म्हणून खोलीच्या खिडकीत मी उभा राहिलो. दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघालेले मॉस्को, चमकणाऱ्या त्या इमारती व त्यांच्या पडछायेने रंगलेली ती ' मास्क्वा ' नदी असे मोठे विहंगम दृश्य समोर दिसत होते. खाली भव्य रस्त्यावर मोटारींची ये-जा चालू होती, परंतु आमच्या कार्डिफ इतकीही मोटारींची गर्दी तेथे नव्हती. या हॉटेलसमोरचा रस्ता हा बाजारपेठेचा नसल्याने माणसांची वर्दळही फारशी नव्हती. सारे वातावरण कसे शांत होते. उजव्या बाजूला आभाळाला भिडलेला एक लाल तारा दिसत होता. बराच दूरवर. कुणीतरी म्हणाले, " तो तारा क्रेमलीनचा ". त्या शब्दांनी अनेक गोष्टी डोळ्यांसमोर आल्या आणि उत्कटतेने आठवण झाली ती क्रुश्चेवची. युनोत अमेरिकेला जोडा दाखविणाऱ्या क्रुश्चेवची. परंतु त्याचबरोबर स्टालिनचा पोलादी पडदा फाडणाऱ्या त्या हसतमुख मूर्तीची.

रात्रीचे जेवण घ्यावे म्हणून लिफ्टकडे वळलो. वसंताचे राज्य असल्याने हौशी प्रवाश्यांची अफाट गर्दी येथेही झालेली होती. त्यामुळे या प्रासादतुल्य हॉटेलची व्यवस्था पाहणारा नोकरवर्ग कामाने अगदी थकून गेलेला दिसत होता. खिडकीतून दिसणाऱ्या त्या रम्य दृश्याचे आकर्षण त्यांना वाटत नसावे. पाश्चात्य देशात पुरुषांच्या बरोबरीने सर्वत्रच स्त्रिया

वावरतात. परंतु रशियात स्त्रियांनाही काम करणे हे कायद्याने बंधनकारक आहे. या हॉटेलची सर्व व्यवस्था जवळजवळ स्त्रियांच्या हाती आहे. २९ मजल्यांची ये-जा करणाऱ्या लिफ्टस् स्त्रिया चालवितात. प्रत्येक टेबलाशी व्यवस्था करण्यासाठी स्त्री बसलेली आहे. उपाहारगृहात स्त्री-सेविकाच आणि यांपैकी प्रत्येक विभागातील स्त्रीला जवळ जवळ १२ तास कामावर राहावे लागते. भोजनालयातील स्त्रिया सर्वांत अधिक थकलेल्या दिसत होत्या. कामाचे तास भारतात कमी करून मागणाऱ्या आमच्या साम्यवादी बंधूंच्या भगिनी तेथे किती राबत आहेत याचे त्रस्त नमुने मी पाहात होतो. कोणा खासगी मालकासाठी त्या काम करीत नसून देशासाठी राबत असल्याचे उत्तर यावर दिले जाईल. परंतु शरीरप्रकृतीने खंगलेल्या अनेक मुली कामाचे हे डोंगर उपसताना मी तेथे पाहिल्या. अनेकांना मी त्याबद्दल विचारले. सकाळी ८ पासून रात्री ८ पर्यंत प्रवाश्यांच्या हजारो प्रश्नांना उत्तरे देऊन थकलेली स्त्री मी तेथे पाहिली. सतत ठणठणणाऱ्या टेलिफोनकडे दुर्लक्ष करून टेबलावरून उठून जाणारी स्त्री मी तेथे पाहिली. कामामागे प्रेरणा नसेल तर प्रत्येक क्षेत्राची ' कलेक्टर कचेरी ' कशी बनते याचा प्रत्यक्ष अनुभव दोन दिवसांत मला मिळाला. सर्व प्रवासी असंतुष्ट व चिडलेले होते. टेबलाजवळ संबंधित व्यक्ती हजर नसणे, एका टेबलाकडून दुसरीकडे चौकशी करणाऱ्याला हाकलणे असे सरकारी कचेरीवजा प्रकार इतके चालले होते की, मॉस्को पाहावयास येणाऱ्यांचा अधिक वेळ नुसती माहिती काढण्यात जात होता. टॅक्सीजही सरकारी मालकीच्या. भाडे मिळावे अशी उत्सुकता त्यांना नव्हती. त्यामुळे टॅक्सीवाल्याला ' हुकूम ' हाती देताच त्याने कपाळाला आठ्या टाकल्याच. माझी ' झोप ' घालविणारे हे कोण लोक आले अशा दृष्टीनेच त्याने आमच्याकडे एक नजर फेकली. भोजनगृहात कोणी कुठे बसायचे याबद्दल सर्वत्र गोंधळ होता. एखाद्या टेबलाजवळ जाऊन बसावे तर तेथून उठविण्यात येई. अर्धा अर्धा तास प्रतीक्षा केल्याशिवाय मागणी स्वीकारली जात नसे. पण कोणत्या तरी टेबलावरचा रुमाल, दुसऱ्या टेबलावर उरलेले काटे चमचे आणून व्यवस्था केली जाई. अनेकदा हे रुमालही ओलेच असत. पुन्हा त्या सेविकांना इंग्रजी भाषा येत नव्हतीच. त्यामुळे आमची मागणी त्यांना समजावून सांगणे हे मोठे दिव्य होते. रशियन मेनूचा अभ्यास करण्यातच आमचा पहिला दिवस गेला. २९ मजल्यांची व जवळ जवळ तीन हजार लोकांची व्यवस्था होऊ शकेल अशी ही इमारत होती. परंतु तितक्या लोकांना पुरेल इतकी सामग्री तेथे नाही हे सारखे जाणवत होते. दुसऱ्या युद्धाने या देशाचे मनुष्यबळ कमी झालेले आहे. त्यामुळे स्त्रियांवर कामाचा अधिक भारही पडलेला आहे. परंतु यापेक्षा वाईट स्थितीतून वर

आलेला प. जर्मनी हा देश मी नुकताच पाहिला होता. त्यामुळे पहिल्याच दिवशीच्या या अनुभवाने अनेक प्रश्न माझ्या मनात उभे केले. कम्युनिस्ट राजवटीबद्दल मन साशंक झाले. परंतु एकीकडे थोडी गैरसोय वाट्याला असताना सुखद वाटले ते येथील अनौपचारिक वातावरण. तीन महिन्यांनंतर प्रथमच मी गळ्याचा टाय काढून ठेवू शकलो. माझ्या डोक्या-वरील वाढलेल्या केसांचे तेथे कौतुक होईल असे वाटू लागले. हवा सुंदर पडली होती. अंगावरचा कोटही आम्ही टाकून दिला व नुसत्या शर्टाने व खुल्या गळ्याने मॉस्कोच्या रस्त्यावर आम्ही बाहेर पडलो.

प्रकरण तिसावे

# क्रुशेवची निंदा आणि ते न संपलेले ‘ पेन्शन ’

“ आर यू फ्रॉम क्यूबा ? ”

लिफ्टमध्ये एका गृहस्थाने आम्हाला प्रश्न केला. या प्रश्नाने आम्ही मात्र दचकलो. कारण दुसऱ्यांदा हा प्रश्न आम्हांला केला गेला होता. याचा अर्थ भारतीय लोक क्युबातील लोकांसारखे दिसतात की काय असा प्रश्न आमच्या मनात उभा राहिला. आम्ही नम्रपणे पुन्हा नाही सांगितले, आणि आम्ही भारतीय असल्याची माहिती दिली. परंतु या चौकशीत अनेक क्युबन्स मॉस्कोत असल्याचे कळले. अमेरिकेच्या छायेत लागलेला तो लाल दिवा केनेडीच्या कारकीर्दीत किती गाजला होता याची आठवण झाली.

परंतु आमच्या मनात सतत घर करून होते ते क्रुशेव. मॉस्कोच्या रस्त्यावर बाहेर पडल्यापासून आम्ही सहजपणे चौकशी करीत गेलो ती क्रुशेव यांच्या नव्या निवासस्थानाची. “ क्रुशेव यांचे घर कुठे आहे हे कृपया सांगता काय ? ” हा प्रश्न मी मॉस्कोत अनेकांना विचारला. इंग्रजी भाषेतून मॉस्कोचे सुंदर वर्णन करणाऱ्या आमच्या रशियन मार्गदर्शकालाही मी हाच प्रश्न केला. परंतु प्रत्येकाने क्रुशेवचे घर माहीत नसल्याचे सांगितले. घर शोधल्याशिवाय आम्ही राहात नाही हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी पवित्रा बदलला. “ क्रुशेव दोन दिवसांपूर्वीच मॉस्कोबाहेर गेले आहेत ”, तो मार्गदर्शक आम्हाला सांगू लागला.

“ हे तुम्हांला कसे कळले ? ‘ प्रावदा ’ दैनिकात तसे वृत्त आले होते काय ? ” मी विचारले.

दुसऱ्या एका दैनिकात तसे वृत्त आल्याचे सांगून त्याने वेळ मारून नेली. कारण 'प्रावदा'त क्रुश्चेव यांचे नाव येणे मला शक्य वाटत नव्हते. क्रुश्चेव यांच्या पदच्युतीची वार्ता सबंध जगातील वृत्तपत्रांनी ठळक मथळे व छायाचित्रे देऊन जेव्हा प्रसिद्ध केली तेव्हा 'प्रावदा'ने चार ओळींचा एक 'फिलर' टाकून क्रुश्चेव यांना निरोप दिला होता.

ज्या रशियन भूमीवर एके काळी क्रुश्चेवचे कौतुक झाले तेथेच त्याची निंदानालस्ती आम्ही ऐकत होतो. कम्युनिझमचे हे वाण क्रुश्चेवच्याही पदरात पडलेले मी स्वतः अनुभवीत होतो. "क्रुश्चेव यांच्या हातून चुका झाल्या असे तुम्हांला खरोखरच वाटते काय?" असा प्रश्न मी सरळ त्या मार्गदर्शकाला टाकला आणि कोणत्याही तऱ्हेचे आढेवेढे न घेता त्यांनी क्रुश्चेव यांच्या चुकांची यादी सांगण्यास सुरुवात केली. स्टालिनच्या प्रेताचे उत्खनन क्रुश्चेवने केले व स्टालिनबद्दल लोक जसे एकदम वाईट बोलू लागले तसे क्रुश्चेवबद्दल आज तेथे बोलले जात आहे.

"क्रुश्चेव यांनी आपल्या औदार्याचे प्रदर्शन करण्याच्या हेतूने राष्ट्रविघातक अशा अनेक गोष्टी केल्या." मार्गदर्शक सांगू लागला. "'हिरो ऑफ सोव्हिएट' हा आमच्याकडील सर्वांत मानाचा किताब. तो मिळविणे, म्हणजे सर्वोच्च मान मिळविणे. एखादा बिल्ला कुणाला द्यावा तसा हा किताब क्रुश्चेव यांनी नासेरला दिला. इतर देशांना आपल्याकडे ओढण्यासाठी त्यांनी जी मदत दिली ती स्वैर ठरली. मदत घेऊन हे देश रशियाचे मित्र राहिले नाहीत. जी यंत्रे आमच्या देशाला आज आवश्यक होती, ती या गृहस्थाने आपल्या औदर्याचा टेंभा मिरविण्यासाठी खुशाल दुसऱ्या देशांना देऊन टाकली. येथे धान्य उत्पादन घटत गेले. जागतिक शांतता निर्माण होईल या खोट्या आशेने संरक्षणखर्चात कपात केली."

"क्रुश्चेव भारतात व इतर देशांतही लोकप्रिय झाले ते नेमके याच गोष्टीने" मी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. "सहजीवनावर त्यांचा खराखुरा विश्वास होता व जागतिक शांततेची त्यांना खरी ओढ होती असे आम्हाला वाटे" असे मी त्याला म्हटले तेव्हा तो नुसता हसला. वरच्या आदेशाबरहुकूम तो आम्हांला सांगत होता असे मात्र मला वाटले नाही. कारण अतिशय मोकळेपणाने तो बोलत होता. काही वर्तमान गोष्टींवर तो टीकाही करीत होता.

माझ्या अल्प वास्तव्यात मला जाणवले ते हेच की, क्रुश्चेव पदच्युत झाले असले तरी त्यांनी आणलेल्या स्वातंत्र्याचा वारसा, मुक्ततेचा ठेवा रशियन लोकांनी जतन करून ठेवला आहे.

आम्ही मॉस्कोत मोकळेपणे हिंडू शकत होतो हा वारसाही कुणाचा ? " मॉस्कोत तुमच्यावर कोणाची नजर होती काय ? अगर मॉस्कोत कुठेही तुम्हाला एकटे हिंडता येत होते काय ? " असे प्रश्न मला अनेकांनी विचारले, त्याचे उत्तर होकारार्थीच आहे. अगदी खुलेपणाने आम्ही फिरत होतो. " मॉस्कोला आम्हाला जायचे आहे, आमची व्यवस्था करता काय ? " असे दोन चांगल्या प्रवासी कंपन्यांना आम्ही विचारले तेव्हा आम्हाला नकारच मिळाला होता. " तुम्ही पत्रकार आहात, तुम्हाला मॉस्कोत प्रवेश मिळणार नाही " असे अनेकांनी आम्हांला सांगितले होते. परंतु ते सारे खोटे ठरले. मॉस्कोचा व्हिसा चार तासात आम्हांला मिळाला. लंडनच्या रशियन वकिलातीत आम्ही गेलो त्या दिवशी त्यांचा काही नोकरवर्ग गैरहजर होता. आम्ही त्यांना एक दिवसाचीही मुदत ठेवलेली नव्हती. त्याचा फायदा घेऊन ते आम्हांला टाळू शकले असते. दुसऱ्या दिवशी आम्ही लंडन सोडणार आहोत असे सांगितले तेव्हा त्वरेने दुपारी दीड वाजता त्या रशियन अधिकाऱ्याने आम्हांला व्हिसा दिला. पासपोर्टबद्दलची जादा चौकशी असूनही अगर फोटोच्या चार प्रती आमच्याकडून घेऊनही आमच्यावर कुणाची मॉस्कोत ' नजर ' आहे असे कधीही वाटले नाही. मार्गदर्शकाची वेळ संपल्यावर मॉस्कोच्या अनेक रस्त्यांवरून आम्ही मुक्तपणे हिंडलो. कुठेही आम्हाला अटकाव झाला नाही.

गॉर्की स्ट्रीट हा मॉस्कोचा सर्वांत गर्दीचा रस्ता. दुकाने, थिएटर्स, पुतळे यांनी गजबजलेला हा भाग. बसने आम्ही या रस्त्यावर पोहोचलो. मॉस्कोला बसमध्ये कंडक्टर नसतो. कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी बसचा दर एकच असतो. दरवाज्यातून आत शिरल्यावर समोरच्या यंत्रात नाणे टाकायचे व तिकीट स्वतः घ्यायचे. त्यासाठी ' कोपेक्स ' ची सुटी नाणी लागतात. दोन प्रवासी तिकीट न घेता बसमध्ये उभे होते व त्यांचे नाके आल्यावर ते उतरून गेले. सुटी नाणी नसल्याने हा अप्रामाणिकपणा त्यांना करावा लागला असेल असे आपण मानू या. कारण साम्यवादी राजवटीतील लोक अप्रामाणिक कसे असू शकतील ? गॉर्की स्ट्रीटवर आम्ही उतरलो तर दुकाने व रस्ते माणसांनी फुलून गेलेले होते. रेडिओ, कॅमेरे या गोष्टी मॉस्कोत चांगल्या मिळतात. विद्युत उपकरणाच्या दुकानातून बरीच गर्दी होती. सर्वांत अधिक गर्दी म्हणजे धान्य, फळे व मांसाच्या दुकानात. मॉस्कोवासियांना मांसाचा बडा शौक दिसला. बाहेरच्या ' शोकेस ' मध्ये अनेक ठिकाणी मांसाचे नमुने ठेवलेले होते. मांसाची अशी जाहिरात मी इतरत्र कुठे पाहिली नव्हती. येथेही साप्ताहिक खरेदीची बरीच संवय लोकांना दिसली. परंतु ही दुकाने मालाने

ठासून भरलेली नव्हती. माशांमुळे काही दुकानांत इतकी दुर्गंधी येत होती की, आत पाऊल टाकणे अशक्य होई. अनेक समुद्रांतील व विविध नद्यांतील मासे मी आतापर्यंत चाखले होते, तरी ' मॉस्क्वा ' नदीतील या पक्वान्नाचा गंध मी सहन करू शकलो नाही. दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या गोष्टींचा अजूनही येथे तुटवडा आहे हे जाणवत होते. दुकानातून विशेष स्वच्छता नव्हती. गॉर्की स्ट्रीटपेक्षा पूर्व बर्लिनचे रस्ते शतपटीने स्वच्छ होते. लोकांत कपड्यांची ऐट नव्हती. सिगारेटची थोटके अनेक ठिकाणी पडलेली होती. कामावरून परतणारे अनेक कामगार ' व्होडका ' ढोसून चालले होते. गॉर्की स्ट्रीटवर झिंगलेले अनेक लोक आम्हांला दिसले. एकाने तर माझ्याबरोबर असलेल्या पत्रकाराच्या खिशातील फौंटनपेन जबरदस्तीने घेण्याचा प्रयत्न केला. गॉर्की स्ट्रीटवर अनेक पोलीस उभे होते. त्यांच्या निळसर पॅन्ट व खाकी रंगाचा शर्ट या गणवेशाचे भय पूर्वी मॉस्कोला फार होते. परंतु आज याच शहराच्या प्रमुख रस्त्यावर त्याच पोशाखातील पोलिसांची नोंद कुणी घेत आहे असे वाटले नाही. ही शिथिलता क्रुश्चेव यांच्या राजवटीत आली असे एकाने बोलूनही दाखविले.

मुंबईप्रमाणे ठरविक जागेवरून लोकांनी रस्ता ओलांडावा म्हणून पोलीस वाहतुकीवर नियंत्रण करीत होते. पोलिसांच्या सूचनेसाठी लोक थांबलेले होते. इतक्यात गुलाब फुलाची टोपली घेतलेली एक रशियन तरुणी रस्ता ओलांडून गेली. मॉस्कोत मुंबई इतक्याही मोटारी नाहीत. पोलिसाने हसत तिच्याकडे एक नजर फेकली. फुलांना जबरदस्त मागणी दिसत होती. तरुण-तरुणींची फुले घेण्यासाठी गर्दी उडालेली होती. कम्युनिस्ट राजवटीत अशा कोमल भावनांना स्थान नाही असे म्हणणाऱ्यांना साफ खोटे पाडणारे हे दृश्य होते.

परंतु मला सर्वांत धक्का मिळाला तो पुश्किनच्या भव्य पुतळ्याच्या परिसरातील थिएटरच्या आवारात. पुश्किनचा उत्कृष्ट पुतळा या गॉर्की स्ट्रीटवर उभा आहे. रोम हे कारंजाचे शहर तर मॉस्को ही पुतळ्यांची नगरी. त्या पुतळ्याशी आम्ही आलो व पहिली हाक मिळाली. तो काय बोलतो हे आम्हांला कळेना. समोर एक भव्य थिएटर दिसत होते. तेथील कार्यक्रमाची तिकिटे तो चक्क काळ्या बाजारात विकत होता. मुंबईतील कोणत्याही सिनेमागृहाबाहेर दिसणारे ते दृश्य होते. मुंबईच्या टाऊन हॉलसारख्या असलेल्या पायऱ्या चढून आम्ही थिएटरकडे जाऊ लागलो तर जास्त भावाने तिकिटे विकणारी अनेक माणसे पायऱ्यांवर उभी होती. मुंबईच्या सिनेमा थिएटरबाहेर जशी माणसे पाहून विचारले जाते तसेच ही माणसे विचारत. त्या पायऱ्यांवर पोलीसही उभे होते. त्यांच्या डोळ्यांदेखत हा काळाबाजार चालला होता.

बोल्शेविक बॅले पाहण्यासाठी येथे येणारे सर्व प्रवासी धडपड करतात. युक्रेन हॉटेलमध्ये मॉस्कोतील अशा कार्यक्रमाची तिकिटे मिळविण्याची व्यवस्थाही ठेवलेली आहे. तेथे संध्याकाळी कार्यक्रम सुरू होण्याच्या अर्धापाऊण तास आधी चौकशी केली तर तिकिटे मिळतात. परंतु चार दिवस आधी मागणी केलीत तर मात्र मिळणार नाहीत. तिकिटे दाबून ठेवली जातात हे स्पष्ट दिसत होते. त्यावरून युक्रेन हॉटेलच्या चौकशी कक्षेत खटकेही उडत होते.

मुंबईकराने भटकताना लिंबूसरबत घ्यावे तसे मॉस्कोवासी एक सरबत नेहमी घेताना दिसत. फक्त तीन कोपिक्सला हे पेय मिळे. त्याला ' क्वास ' असे नाव होते. सरदारजी जसे मोफत लस्सीचे दुकान थाटतो तशी दुकाने या पेयाची लागलेली होती. एकंदरीत मॉस्कोत खाद्यपदार्थांचे भाव अतिशय कमी वाटले. जीवनावश्यक वस्तू स्वस्त मिळाल्या पाहिजेत ही साम्यवाद्यांची प्रमुख मागणी मॉस्कोने पुरी केली आहे. त्या मुबलक मात्र नाहीत. भाषेची अडचण व स्वस्ताई यामुळे भोजनखर्चासाठी जी ' पेन्शन ' कुपन्सद्वारे आम्हांला मिळाली होती ती तीन दिवसांत सर्व खर्च होऊ शकली नाहीत. कम्युनिस्ट राजवटीतील :पोलादी पडदा पुन्हा जाणवतो तो अशा परिस्थितीत. पूर्व बर्लिनप्रमाणे या लाल राजवटीचे जे चलन एकदा तुम्ही हाती घ्याल ते तेथे संपवलेच पाहिजे असा नियम आहे. खिशात आणलेले पैसे संपविण्यास भाग पाडण्याचाच हा प्रकार आहे. दुसऱ्या कोणत्याही पश्चिमी देशात असे बंधन नाही. उरलेले पैसे देश सोडताना खुशाल परत करावेत व त्याचे पुन्हा पौंड करून घ्यावेत. त्यामुळे उरलेली ' पेन्शन ' व रुबल्सचे परकीय चलन संपविण्यासाठी त्या नियमात बसणाऱ्या वस्तूच घ्याव्या लागल्या. भोजन कुपनात चॉकलेटस् मिळाली. एका भारतीय प्रवाश्याने माहिती नसल्याने रूबल्स घेऊन मॉस्को सोडण्याचा प्रयत्न केला. पासपोर्ट दाखवून कस्टमपार तो होत असताना हे चलन त्याच्याजवळ असल्याचे आढळले तेव्हा सामान तेथेच ठेवून बाहेर जाऊन त्या पैशाची त्याला खेळणी घ्यावी लागली. आपले चलन बाहेर जाऊ न देणे व परकीय चलन एकदा मोडले की परत न करणे असा दुहेरी हेतू यात रशियन सरकार साधीत आहे.

हॉटेल युक्रेनमध्ये एक असेच विविध वस्तूंचे दुकान आहे. तेथे फक्त परकीय चलनच घेतले जाते. तुमच्याकडे अधिक रशियन रूबल्स राहिले व ते तुम्हाला खर्च करायचे असले तरी या दुकानात घेतले जाणार नाहीत आणि घेण्याजोग्या अधिक वस्तू याच दुकानात आहेत. इतर देशात अशा दुकानांतून स्वदेशातील चलनाबरोबरच परकीय चलन घेण्याची व्यवस्था असते. मुंबईच्या हँडलूम हाऊसप्रमाणे. परंतु हँडलूम हाऊसने भारतीय चलनच

उद्या न घेण्याचे ठरविले तर हास्यास्पद ठरेल. रशियाला आज परकीय चलनाची अतिशय जरुरी आहे. त्यामुळे क्रुशेवने निर्माण केलेल्या वातावरणाचा उपयोग करून घेऊन परदेशी प्रवाश्यांना रशियात अधिकाधिक आणण्याचा प्रयत्न केला जात आहे व त्यांच्याकडून परकीय चलन मिळविले जात आहे. या दुकानात मी ब्रिटिश, फ्रेंच व जर्मन नाणी दिली, परंतु रशियन पैसे मात्र साफ नाकारण्यात आले.

जुने व नवे मॉस्को असे या शहराचे दोन भाग आहेत. सर्वसाधारण गावात आढळतात अशी घरे मधूनमधून लागतात ते जुने मॉस्को. मग एकदम प्रचंड घरांची दुतर्फा मालिका दिसू लागते. वीस वीस मजल्यांच्या असंख्य इमारती आज मॉस्कोत उभ्या आहेत. प्रत्येकाचे स्वतःचे टुमदार घर. छोटीशी मोटार वगैरे कल्पना येथे संमत नसल्याने नव्या मॉस्कोत सर्वत्र मोठमोठ्या इमारती दिसतात. एकेका भागाला येथे ' डिस्ट्रिक्ट ' म्हणण्याची पद्धती आहे. अशाच अवाढव्य घरांचा ' वर्किंग क्लास डिस्ट्रिक्ट ' आम्हांला दाखविण्यात आला. घरांचे तयार भाग क्रेनने एकावर एक रचले जाऊन फार त्वरेने या इमारती उठवल्या जातात. तीन खोल्यांचे घर कामगाराला मिळते व त्यासाठी महिन्याला फक्त चार ते पाच रूबल्स म्हणजे २० ते २५ रुपये त्याला भाडे द्यावे लागते. कामगाराचा मासिक पगार साधारणपणे १०० रुबल्स म्हणजे ५०० रुपये असतो.

अडीच मैल लांबीचा सरळ रस्ता असलेल्या लेनिन ॲव्हेन्यूकडे आम्ही वळलो. परंतु या भव्य रस्त्यावरही मोटारींची फार वर्दळ नव्हती. बस स्टँड मात्र अतिशय चांगले बांधलेले आहेत. सिनेमागृहात गर्दी त्या मानाने कमी. ' पपेट शोज ' चे मॉस्कोवासियांना अधिक वेड दिसले. म्युझियमस् हे खरे मॉस्कोतील वैभव. एकेका व्यक्तीवर तेथे म्युझियमस् आहेत. मॉस्कोतील भुयारी गाड्या व त्यांची स्थानके म्हणजे वेगळे जग आहे. लंडन, पॅरिस, हॅम्बुर्ग येथील भुयारी गाड्यांतून मी भरपूर प्रवास केला. परंतु मॉस्कोच्या ट्यूबसची सर त्यांना नाही. मॉस्कोतील स्टेशन्स आधी अतिशय खोल आहेत. परंतु खाली नगर वसवावे तशी भव्य स्टेशन्स उभारलेली आहेत. दिव्यांच्या लखलखाटात चमकणारी भिंतीवरची लांबरुंद व रंगीत तैलचित्रे उत्कृष्ट आहेत. रशियन क्रांतीमधील अनेक प्रसंग तेथे चित्रित करण्यात आले आहेत. एका चित्रात स्टॅलिनही दिसत होता. लेनिनची चित्रे अर्थात सर्वत्रच अधिक आहेत. १२ स्थानकांच्या जाळ्यात मॉस्को गोवलेले आहे. येथेही तिकिटांसाठी खिडक्या नाहीत. कोणत्याही स्टेशनासाठी तिकिटाचा दर एकच आहे. विद्युत जिन्याच्या तोंडावरच यंत्र ठेवलेले आहे. त्यात नाणे टाकून तिकीट ' घ्यायचे '. तो

घेतल्याशिवाय त्या विद्युत जिन्यावर पाय ठेवला तर तो चालूच होत नाही. तेथेही दरवाजावर स्त्रिया तिकीट कलेक्टरसेच्या भूमिकेत उभ्या होत्या. भाषा माहीत नसताना हा भुयारी गाड्यांचा प्रवास करणे धाडसाचे होते. स्टेशन्सची नावे व ते विविध मार्ग शोधणे हा प्रत्येकाने परदेशात गेल्यावर संशोधन करण्याजोगा विषय आहे. परंतु त्या तिकीट-कलेक्ट्रेसने तिच्या दृष्टीने सोप्या रशियनमध्ये मार्गदर्शन केलें व तिकीट घेऊन भूमिगत मॉस्कोचे दर्शन घेण्यासाठी त्या प्रचंड विद्युत शिडीवर मी पाय ठेवला.

हॉटेल ‘ युक्रेन ’जवळ नेणारे ‘ ट्यूब ’ स्टेशन आम्ही नकाशावरून शोधून काढले होते, आणि त्याप्रमाणे एके ठिकाणी पुन्हा गाडी बदलून आम्ही हे स्थानक गाठले. संध्याकाळची वेळ असल्याने गाड्यांतून गर्दी बरीच होती. पुरुषांच्या बरोबरीने काम करणाऱ्या स्त्रिया गाड्यात होत्याच. परंतु मुखावर नट्टापट्टा मुळीच नव्हता. काहींनी डोक्यांना रुमाल बांधले होते. रशियन स्त्री-पुरुष ठसठशीत तोंडावळ्याचे. स्टेशनातील विद्युत शिडी चढून आम्ही पुन्हा भूमीवरील मॉस्कोत आलो. अशा स्थानकावर ब्रिटनमध्ये झुंबड उडालेली असते ती सायंदैनिकांची. वृत्तपत्रांच्या गडबडाटावर देशातील चैतन्य जाणवते असे मान्य केले तर येथे चैतन्यच नव्हते असे म्हणावे लागते. या स्थानकावर बाहेर एका नियतकालिकाचा गठ्ठा पडलेला होता. परंतु सरकारी पत्रक मधून मधून एखाद्याने घ्यावे तसे चालले होते. तेथे दोन पत्रांची स्पर्धा नव्हती. ताज्या बातम्यांची घोषणा नव्हती. त्याऐवजी मदिराक्षीचे काही भक्त जास्त घोषणा देत होते. स्टेशनच्या बाहेर एक वृद्धा आपल्या जास्त प्यायलेल्या मुलाला घरीं घेऊन जाण्याच्या खटपटीत दिसत होती. साम्यवाद स्वीकारला तरी आई-मुलाचे संबंध बदलले नाहीत याची साक्ष देणारे हे दृश्य. श्री. मोरारजी देसाई कदाचित या दृश्याचा उपयोग दारूबंदीच्या प्रचारासाठी करून घेतील. मॉस्कोतील माणसांचे हे बहुविध दर्शन घेत आम्ही चालू लागलो होतो ते हॉटेल युक्रेनच्या लाल ताऱ्याकडे पाहात. अर्थात ती भव्य इमारत समोर दिसत होती. परंतु आम्हांला वाटली तितकी ती जवळ नव्हती. अनेक छोटे, खडबडीत रस्ते ओलांडत आम्ही ‘ मॉस्क्वा ’ नदीच्या पुलावर आलो. हा पूल ओलांडला तेव्हा कुठे हॉटेल ‘ युक्रेन ’चा रस्ता सापडला. आमच्याबरोबर ‘ गाईड ’ नव्हताच. पायपीट करीत आम्ही हॉटेल युक्रेन गाठले ते कुपन्स देऊन भरपूर भोजन करण्याच्या उद्देशाने. परंतु तेथे अनेक शिष्टमंडळांनी टेबले व्यापून टाकली होती. अनेक टेबलांवर ‘ डेलिगेशन ’ असे बोर्ड ठेवलेले होते. थकलेल्या मुली धावत होत्या. आम्ही स्वतः खूप थकलो होतोच. परंतु ते सारे मॉस्कोच अगदी थकलेले आहे असे भासत होते.

## प्रकरण एकतिसावे

# क्रेमलिनच्या परिसरात

" शरीरयष्टी अगदीच ठेंगू आणि किडकिडीत. रुंद आणि पुढे आलेल्या खांद्यावर ते भले मोठे डोके, कसे वरून चिकटवून बसविल्यासारखे वाटे. डोळे बारीक, जरा बसकट नाक, रुंद आणि औदार्य प्रतीत करणारी ओठांची ठेवण व जाडजूड हनुवटी आणि त्यावरची विश्वविख्यात होत असलेली ती दाढी. पोषाख अगदीच गचाळ. विजार तर त्याच्या मानाने केवढी तरी लांब."

लोकनेता लेनिनचे हे वर्णन. ऑक्टोबर क्रांतीनंतर ८ नोव्हेंबरला स्मोलनी इन्स्टिटयूट-मध्ये भरलेल्या पहिल्या सोव्हिएट परिषदेत, टाळ्यांच्या कडकडाटात व गगनभेदी जयजयकारात लेनिनने प्रवेश केला तेव्हा तो कसा दिसला याचे एका अमेरिकन पत्रपंडिताने केलेले हे व्यक्तिचित्रण. रीड हे या पत्रकाराचे नाव. तो या सोहळ्यास जातीने उपस्थित होता. ही व्यक्ती दिसावयास सामान्य असली तरी अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर तिने आपल्या देशबांधवांनाच नव्हे तर इतर राष्ट्रांतील जनतेला कसे मोहित केले होते याचे सुंदर वर्णन या पत्रकाराने केले आहे. 'प्रगल्भ बुद्धीचा प्रतिभाशाली पुरुष' असे नेहरूंनी लेनिनचे वर्णन केले आहे. हे सर्व आठवीत मी पुन्हा उभा होता तो लेनिनचे दर्शन घेण्यासाठीच. मॉस्कोच्या त्या ऐतिहासिक लाल चौकात क्रेमलिनच्या त्या पोलादी भिंतीसमोर हजारो लोक तेथे त्या क्षीण आकृतीच्या महापुरुषाचे दर्शन घेण्यासाठी आले होते. लालसर रंगाच्या दगडांनी बांधलेले लेनिनचे लहानसे कबरस्थान समोर दिसत होते. याच इमारतीच्या

तळघरात लेनिनचा अचेतन देह चांगल्या प्रकारे जतन करून ठेवलेला आहे. याच कबर-स्तानाच्यावर रशियन नेते मे दिनाची मानवंदना घेण्यासाठी उभे राहतात. चित्रात ते दृश्य किती भव्य दिसते. परंतु प्रत्यक्ष पाहिल्यावर कबरस्तानावरचे ते लहानसे व्यासपीठ अगदी साधे वाटते. येथेच स्टालिन व क्रुश्चेवने सलामी घेतली व ते तेथून गेले. एक निधनामुळे अदृश्य झाला तर दुसऱ्याला जिवंतपणी निरोप घ्यावा लागला. मे दिनाच्या संचलनासाठी या व्यासपीठावर कोण कुठे उभा राहतो यावर जगाचे राजकारण ठरते व बदलते. उजव्या बाजूला क्रेमलिनची लांबच लांब भिंत दिसत होती. पोलादी पडदा हा शब्दप्रयोग स्टालिनच्या राजवटीत आला तो या भिंतीच्या आड होणाऱ्या, ठरणाऱ्या गोष्टींमुळेच. " क्रेमलिनच्या भिंतीपलीकडे काय चालले आहे हे कळत नाही, " असे वाक्य नेहमी वाचण्यात येई. त्या सर्व गोष्टी आठवत लाल चौकातील या लांबच लांब रांगेत मी उभा होतो.

ती करड्या रंगाची भिंत त्या मानाने बरीच उंच आहे. नक्षीकामाची किनार लावावी तशी झालर त्या पोलादी भिंतीलाही आहे. आतील इमारतीचा काही भाग बाहेरून दिसतो. परंतु अतिशय नजरेत भरतो तो क्रेमलिनचा घुमट व त्यावर डौलाने फडकणारा तो लाल झेंडा. दुसऱ्या टोकाचा उंच मनोरा तितकाच लक्ष वेधून घेणारा. त्यावर आहे एक प्रचंड घड्याळ व लाल तारा. " धुक्यातून लाल ताऱ्याकडे " ची आठवण पुन्हा करून देणारा. समोर दिसत होते एक पुरातन चर्च. सेंट बेसिल कॅथेड्रलची ही इमारत, मंदिराचा कळस व मशिदीचा घुमट यांचे मिश्रण असलेले हे प्रार्थनामंदिर. धर्माला स्थान न देणाऱ्या क्रेमलिनच्या समोरच झारशाहीतील हे प्रार्थनामंदिर अजूनही उभे आहे. " मॉस्कोत चर्च-मध्ये कुणी जाते का ? " बरोबर असलेल्या मार्गदर्शकाला मी लगेच विचारले. " तरुण माणसे चर्चमध्ये जात नाहीत. म्हातारी फक्त जातात. अर्थात त्यांना चर्चमध्ये जाण्यास अटकाव नाही, " त्याने सांगितले. इतक्या वर्षांच्या साम्यवादी राजवटीनंतरही धर्माचे मूळ खुद्द मॉस्कोतही उपटले गेले नाही.

मॉस्कोच्या लाल चौकाला दिल्लीच्या राष्ट्रपतिभवनासारखा उतार आहे. मात्र तो भाग काँक्रिटने बांधून गुळगुळीत केलेला नाही. खडबडीत दगडांनी लाल चौक सर्वत्र बांधलेला आहे. त्यावरच मे दिनाची कवाईत होते. रशियात कडाक्याची थंडी असल्याने रस्त्या-रस्त्यावर बर्फ साठते. त्या दृष्टीने हा लाल चौक फत्तरात बांधलेला असावा किंवा क्रेम-लिनच्या कणखरपणाचे ते प्रतीक असावे.

लेनिनच्या देहाचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासून लोक लाल चौकात येतात. स्त्रिया, पुरुष, मुले यांची तोबा गर्दी तेथे उडते. खेड्यापाड्यांतील शाळकरी मुलांना मॉस्को पाहण्यासाठी मुद्दाम आणले जाते. त्याचा खर्च सरकार करते. वसंत ऋतू हा अशा कार्यक्रमांना सर्वांत सोईस्कर. त्यामुळे लाल चौकात अतिशय गर्दी दिसत होती. आम्ही सकाळी ११ च्या सुमारास तेथे गेलो. ती गर्दी पाहिल्यावर लेनिनचे दर्शन आम्हांला होईल असे वाटले नाही. परंतु आमचा मार्गदर्शक मोठा हुषार होता. आमचा 'पत्रकार' हा हुद्दा आम्हाला सर्वच ठिकाणी उपयोगी पडे. मॉस्कोत गर्दी दिसली व आत शिरायचे असले की, तेथे एक शब्द मोठा उपयोगी पडे. 'डेलिगेशन' असे म्हटले की कुठेही शिरकाव मिळे. विविध देशांतील अनेक शिष्टमंडळे तेथे आलेली होती. आफ्रिकेतून येणाऱ्या शिष्टमंडळांची संख्या अधिक दिसली. काळ्याकभिन्न शरीरावरची ती रंगीबेरंगी वस्त्रे त्या गर्दीतही उठून दिसत होती. अशाच एका शिष्टमंडळात आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला घुसविले त्यामुळे 'लेनिन मॉसेलियम्'च्या अगदी सान्निध्यात आम्ही येऊन उभे राहिलो. इतक्यात समोर तेथील संरक्षक बदलण्याचा कार्यक्रम सुरू झाला. ब्रिटिश अगर जर्मन सैनिकापेक्षा रशियन सैनिकाची चाल कितीतरी वेगळी आहे. समोर बाराचे ठोके क्रेमलिनच्या त्या मनोऱ्यातील प्रचंड घड्याळात पडत होते. सैनिक सलामी देत होता व श्रमजीवी जनतेचे पहिले राज्य स्थापन करणाऱ्या लेनिनला अभिवादन करण्यासाठी त्या कबरस्थानात आम्ही शिरत होतो.

संथ पावले टाकीत आम्ही त्या कबरस्थानात शिरलो. सर्वत्र निस्तब्ध शांतता होती. पावलांचे आवाजही ऐकू येत नव्हते. माणसे अती हळू आवाजात एकमेकांशी बोलत होती. इतक्यात एक परदेशी माणूस माझ्या कानात पुटपुटला, "येथे 'पिकअपस्' लावलेले आहेत. येथे लोक काय बोलतात हे रेकॉर्ड होते." लेनिनबद्दल प्रवासी काय बोलतात हे ऐकण्यासाठी अशी उपाययोजना केली असण्याचीही शक्यता आहे. परंतु ते वातावरणच इतके उदात्त आहे की, तेथे स्तुतीखेरीज काही उच्चारले जाणेच अशक्य. आत शिरलो व समोर तो चिरनिद्रा घेत शांतपणे पहुडलेला लेनिन दृष्टिक्षेपात आला.

तोच तो चेहरा. अमेरिकन वार्ताहराने वर्णन केलेला. डोक्याचे टक्कल, तेच ढोबरे नाक, डोळे मात्र बंद होते. परंतु ओठाची जिवणी, त्यावरच्या मिशा व हनुवटीवरची दाढी जणू अजूनही क्रांतीची भाषा बोलत होती. सबंध जगातील कामगारांना एक व्हा असा आदेश देत होती. चेहरा त्या तांबूस प्रकाशात कसा तेजस्वी दिसत होता. अंगात काळे जाकीट व काळा कोट घातलेला. दोन्ही हात छातीवर आणलेले. परंतु त्यामधील एक मूठ अजूनही

या जुन्या निश्चयाने मिटलेली. आकृती किती लहान दिसत होती! एक काळसर वस्त्र गुडघ्यापर्यंत टाकलेले होते. उंची नसलेल्या ह्या कृश व्यक्तीने गगनाला गवसणी घालणारी स्वप्ने नुसती रंगविली नाहीत तर ती प्रत्यक्षात उतरविली. सारे जग त्यामुळे हादरले. एक नवे वारे जगात निर्माण झाले. एकावेळी दोन डझन शत्रूंशी मुकाबला करण्याचे मनोधैर्य असणारी व्यक्ती इतकी कृश, इतकी लहान असू शकेल हे खरेच वाटत नाही. परंतु चेहऱ्या-वरची निर्भयता, ती ध्येयनिष्ठता अजूनही त्या तेजस्वी चेहऱ्यावरून लोपलेली नाही. संबंध मॉस्कोच्या वास्तव्यात नतमस्तक करणारा हा क्षण मला वाटला. लेनिनचा मृत्यू होऊन ४० पेक्षा अधिक वर्षे झाली. परंतु त्याचा देह सजीव वाटावा इतक्या उत्कृष्ट स्थितीत ठेवलेला आहे. लेनिनचे दर्शन घेतल्यावर सहजच स्टालिनला जवळ कुठे ठेवले होते याची हळूच चौकशी केली. त्याचा मागमूस तेथे नव्हता.

बाहेर आल्यानंतर सर्व वळतात ते क्रेमलिन भिंतीकडे. त्या भिंतीच्या आडोशाला सर्व श्रेष्ठ रशियन नेत्यांची थडगी आहेत. रशियन क्रान्तीमधील व दुसऱ्या महायुद्धात महनीय कामगिरी बजावणाऱ्या नेत्यांचे देह तेथे पुरलेले आहेत. अनेकांचे पुतळे त्या थडग्यांवर आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करणारे शिलालेख त्यावर कोरलेले आहेत. रशियन भाषा व नावे, यामुळे त्या व्यक्ती ओळखणे मला अशक्य होते. परंतु आता सर्व लक्ष होते ते स्टालिनचे थडगे शोधण्यात. लेनिनच्या शेजारी मानाने पहुडलेल्या स्टालिनला क्रुशेवने उखडून काढले व या पंक्तीत आणून बसविले. मार्गदर्शकाला हे थडगे आम्हांला जरूर दाखव म्हणून आम्ही बजावून ठेवले होते. असंख्य लोक नुसती नजर टाकून जात होते अशा एका साध्या कबरीजवळ त्याने आम्हाला उभे केले व म्हटले, " हे स्टालिनचे थडगे."

लेनिननंतर रशियन राष्ट्र ज्याने उभे केले व दुसऱ्या महायुद्धाच्या खाईतून वाचविले तो स्टालिन आज या भिंतीच्या पलीकडे ' अन्संग, अन्ऑनर्ड ' असा पडला आहे. क्रेमलिन-मध्ये स्टालिनच राहिला व त्याच्या मृत्यूनंतर तेथे आता कोणी राहात नाही. क्रुशेवने स्टालिनचे प्रेत उखडले व क्रेमलिनचा पोलादी पडदाही फाडून टाकला. आज क्रेमलिनमध्ये कुणीही प्रवासी जाऊ शकतो. जेथे क्रुशेवने स्टालिनच्या विभूतिमत्त्वाच्या ठिकऱ्या उडविल्या ते कम्युनिस्ट काँग्रेसचे प्रचंड व आकर्षक सभागृह आज कोणीही जाऊन पाहू शकते. क्रेमलिनची भिंत आज कोणीही ओलांडू शकतो ह्याचे श्रेय क्रुशेवला आहे. क्रुशेवच्या मृत्यूनंतर त्याला या क्रेमलिनच्या परिसरात काही फूट जागा कदाचित दिलीही जाणार नाही. परंतु रशियन भूमीत त्याने आणलेले मुक्ततेचे वारे कुणी आता फिरवू शकेल असे मला वाटत नाही. मॉस्कोच्या

विश्वविद्यालयाच्या अवाढव्य इमारतीच्या परिसरात मी नंतर गेलो, तेथेही या वाऱ्याची चाहूल मला लागली. लेनिन टेकड्यावर मॉस्को युनिव्हर्सिटी आज उभी आहे. खाली मॉस्क्वा नदी वाहते आहे. पलीकडचे दृश्य इतके मनोहर आहे की, माणसाचे पाऊल तिथून निघत नाही. लेनिन टेकड्यांवर जी नवी पिढी आज तयार होत आहे ती पुन्हा पोलादी पडदा स्वीकारू शकणार नाही. लुमुम्बा विद्यापीठाच्या निमित्ताने आशियातील व आफ्रिकेतील असंख्य विद्यार्थी मॉस्कोत सध्या येत आहेत. साम्यवादाचे बाळकडू त्यांना येथे दिले जात असले तरी आपल्या देशातील वैयक्तिक स्वातंत्र्याचा वारसा ते येथे ठेवून जात आहेत. मॉस्कोत इतक्या भयंकर चोऱ्या सध्या होत आहेत की, दिल्लीला लाज वाळगण्याचे काहीच कारण नाही. परदेशीय विद्यार्थ्यांच्या मालमत्तेचे अपहरण सर्वांत अधिक होते. त्यामुळे साम्यवादाचे बाळकडू तितके अंगी लागत नाही. मॉस्को बदलत आहे हे सारखे जाणवत होते. काळाप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे धोरणांना मुरड घालणे हे लेनिनचे मुख्य तत्त्व होते. नवा रशिया याच तत्त्वाचा अंगिकार करील असे मॉस्को सोडताना मला वाटले.

प्रकरण बत्तिसावे

# अखेर ते चालणे व चरणेही संपले !

मॉस्को सोडले व घराची ओढ सुरू झाली. अखेर माणूस कितीही दूर गेला तरी घरट्याकडे परतण्यास उत्सुक असलेल्या पक्ष्यासारखीच त्याची स्थिती असते. कितीही उंच इमारती पाहिल्या, मोठमोठे रस्ते पाहिले, आलिशान हॉटेले पाहिली आणि चाखली तरी अखेर ओढ लागते गल्ली-बोळातील आपल्या घराची. वरणभाताची. गावाची. देशाची. या परदेशवारीतील सर्वांत मोठा अनुभव कोणता असेल तर मायदेश ही भावना खरी समजते. जगाच्या दुसऱ्या कोपऱ्यात उभे राहून एका पृथ्वी गोलावर बोट ठेवून आपला देश दाखविताना हृदय उचंबळून येते. भारत देश दुसऱ्या देशातून पाहताना काही वेगळा दिसतो. विरहाने प्रेम वाढते ते सर्वच प्रकारचे. आता तर मी पुन्हा माझ्या देशाला परतत होतो. प्रत्यक्ष परतत असतानाची भावना ही शब्दांनी समजणारी नाही. सैबेरियाच्या प्रचंड पठारावरून विमान उडत होते. खाली सर्वत्र दूरवर पसरलेली धरित्री दिसत होती. डोंगर नव्हते, दऱ्या नव्हत्या. झुडपे नव्हती. मध्येच घरांचे टोळके दिसे. पुन्हा विस्तीर्ण पठार. रशियाने केलेल्या सामुदायिक शेती प्रयोगाचे ते क्षेत्र. मधून मधून कालवे दिसत. आकाश निरभ्र होते. मावळत्या सूर्याबरोबर लेनिनच्या भूमीचा निरोप आम्ही घेत होतो.

एअर इंडियाच्या विमानाने दुपारी मॉस्को सोडले होते व पाकिस्तानवरून दिल्लीच्या वाटेने ते दौडत होते. लाहोरवरून ते आले आणि झपाट्याने मजल गाठली ती दिल्लीची. एअर इंडिया या भारतीय कंपनीच्या विमानातून आम्ही परतत होतो. या दौऱ्यातील

नवळ्या कंपनीच्या विमानातून हा प्रवास होता. मुंबई-रोम आम्ही अलिटालियाने गेलो. रोमहून लंडनला क्वान्टास या आस्ट्रेलियन विमान कंपनीच्या हवाई जहाजातून प्रवास केला. लंडनहून पॅरिसला एअर फ्रान्सने आलो. फ्रान्सहून झुरिकला 'स्वीस एअर'ने गेलो. झुरिकहून स्टुटगार्टपर्यंत बी. इ. ए. ने व स्टुटगार्टहून बर्लिन गाठले ते लुफ्तान्सा या 'जर्मन' विमानाने. बर्लिन ते हॅम्बुर्ग हा प्रवास पॅन अमेरिकन कंपनीच्या विमानाने झाला. हॅम्बुर्ग–म्युनिक हा प्रवास पुन्हा लुफ्तान्साने तर पूर्व बर्लिन ते मॉस्को हा प्रवास रशियन जेटमधून झाला. आठ परदेशी विमान कंपन्यांची ती उडती जहाजे, त्यामधील खाद्य पदार्थ व ते आणून देणाऱ्या हवाई सुंदऱ्या या सर्वांचे परिशीलन करून आता भारतीय कंपनीच्या विमानात बसलो होतो, आणि अभिमानाची गोष्ट अशी की एअर इंडियाची व्यवस्था ही या सर्व कंपन्यांपेक्षाही मला सरस वाटली. (फक्त हवाई सुंदऱ्यांचा हडकुळेपणा माफ केल्यास) आज ब्रिटनमध्ये तर एअर इंडियाचा फार मान आहे व असंख्य परदेशी प्रवासी एअर इंडियाने येणे पसंत करतात.

आमचा हा वाकडा-तिकडा वळणाचा विमान प्रवास कार्डिफच्या एअर इंडिआ ऑफिसातील एका आंग्ल युवतीने दोन दिवसांत निश्चित करून दिला. प्रवाश्यांच्या सुखसोई पाहण्याकडे त्यांचे असलेले लक्ष हे सारेच अभिमान वाटणारे होते.

अखेर दिल्ली आली, मुंबईही आली व ही भ्रमंती संपली. माझे एक मित्र म्हणाले, 'अरे आपले चालणे व चरणेही संपले.' चालणे त्या मानाने कमी होते व चरणे मात्र अफाट चालले होते. ते संपले याचे थोडे दुःख वाटलेच. या दौऱ्यात जे प्राणी मी खाल्ले त्यांच्यासाठी विमानातून उतरल्यावर दोन मिनिटे प्रार्थना करावी असेही अनेकदा मनात आले.

हे खाद्य जीवन काही अपूर्व होते. जाताना विमानातच ते सुरू झाले. डुकराचे 'पोर्क' या नावाने मिळणारे बुटाच्या सोलासारखे दिसणारे तुकडे किती रोचक लागतात हे अलिटालियाने शिकविले. 'ही इज इन ए सूप' ही इंग्रजी म्हण तर साफ चुकीची असल्याचा प्रत्यय या दौऱ्याने मला आणून दिला. आम्ही सतत 'सूप' मध्ये होतो व त्यामुळेच फार आनंदात होतो. पाश्चात्त्य भोजन पद्धतीमधील हे सूप भारताच्या प्रत्येक घरात आले पाहिजे. लंच व डिनर म्हटले म्हणजे ड्रिंक्स घ्यायची व कोणतेतरी सूप मागवायचे हे ठरलेले. किती तऱ्हेची 'सूप्स' मिळावीत? त्याचबरोबर प्रत्येक 'सूप' देण्याचे भांडेही वेगळे. टोमॅटो सूप, चिकन सूप, मटन सूप हे नेहमीचे भिडू. परंतु दहशत बसविणारे सूप म्हणजे 'ऑक्स टेल सूप.' बैलाच्या शेपटीचे हे सूप आहे असा अर्थ नावावरूनच होतो. जेथे प्रत्यक्ष

गाई-बैल पचवायला मी तयार होतो तेथे बैलाच्या शेपटीचे काय? सूप थोडे चवीला उग्र वाटे. परंतु उसळलेल्या बैलाची शेपटी पिरगळीत असल्याच्या थाटात त्याचे भुरके मी मारले आहेत. फ्रेंच ओनियन सूप जर्मनीत अधिक चांगले मिळते. नावाप्रमाणे डौलदार. एका मोठ्या बशीत, मोठा वाडगा, त्यात हे फ्रेंच ओनियन सूप चुरचुरीत टोस्टचे तुकडे मिरवीत येते. त्यावरून येणाऱ्या वाफेवरच ते आणणाऱ्या माणसाचे इंजिन चालत असावे.

लंडनमध्ये पोहोचलो त्याच दिवशी बीफचा समाचार घेण्याचा प्रश्न निर्माण झाला. ज्या 'हॉटेल युरोप'मध्ये आम्ही उतरलो होतो तेथे दुसरे कोणतेच 'शाकाहारी' जनावर मारलेले नव्हते. लंडनचा आमचा एक भारतीय मित्र या वेळी पुढे आला. त्याचे तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरले. त्याने पटकन् सांगितले, "भारतातील गाय ती गोमाता. लंडनची गाय ही काही गोमाता नव्हे! त्यामुळे येथील गुराढोरांचा समाचार घेण्यास काहीच हरकत नाही." इतका सोपा गुरुमंत्र मिळताच मग काही कठीण गेले नाही. इंटरनॅशनल हाऊसमध्ये बीफच्या उत्तम डिशेस असत. सकाळी ब्रेकफास्टला मिळणारे सॉसेजिस आमचे मित्र झाले. रविवारी संध्याकाळी तर 'कोल्ड मीट'ने आमची क्षुधाशांती होत असे. चिकनचे विविध प्रकार हाताळताना टर्कीचे व्यवच्छेदन मी काट्या-चमचाने शिताफीने करू लागलो. ब्रेकफास्टच्या वेळचे कॉर्नफ्लेक्स, पाव, अंडी, दूध वगैरे एकावेळी खाणे व पचविणे हा हातचा मळ बनला होता. त्यांच्या खाद्यपदार्थांत मसाले नसतात. त्यामुळे ते तितकेसे चविष्ट वाटत नाहीत. परंतु तेथील हवामानात तसेच पदार्थ जास्त पाचक ठरतात.

मासे हे दुसरे प्रमुख अन्न. येथे मासे पकडल्यानंतर त्यांची सफाई बंदरावरच होत असल्याने कोणत्याही 'फीश-डीश'मध्ये काटा नसतो. आपल्याकडे ताज, नटराज वगैरे हॉटेलात असेच पदार्थ मिळतात. 'फिश फिलेट विथ लेमन', पोटॅटो चिप्स व मटर ही दुसरी आवडती डिश. त्याबरोबर व्हाईट वाईन मात्र हवी. आइस्क्रीम पॉटसारख्या भांड्यात व्हाइट वाइनची बाटली ठेवायची व 'फिश फिलेट'चा समाचार घेणे सुरू करावयाचे. जर्मनी अगर रशियातील मासळीचे पदार्थ चांगले वाटले नाहीत. मॉस्कोत तर चिकन कटलेस या एकमेव डिशवर मी दिवस काढले. कारण दुसरी नावे समजून सांगता येत नसत. या चिकन कटलेसमध्ये काटा रोवला की एक चिळकांडी उडे. कोंबडीच्या रक्ताची नव्हे. आत ठेवलेल्या लोण्याच्या तुपाची. आत लोणी असे. गरम चिकनने ते आतल्या आत वितळे. असे हे चरणे मॉस्कोपर्यंत चालले होते.

विमान मुंबईच्या विमानतळावर उतरले तेव्हा रात्रीचे अडीच वाजले होते. घरी जाई-

पर्यंत चार वाजले. गप्पा मारतच झोपी गेलो व जाग आली ती दचकूनच. चुकीच्या ट्यूब रेल्वेत आपण चढत आहोत असा भास होऊन. रोम, लंडन, पॅरीस, झुरिक, बर्लिन, मॉस्को, सारी शहरे एक क्षणार्धात डोळ्यापुढून गेली.

' डंक अ्. '

डोळे चोळीत समोर पाहिले. भारतातील मुंबई नामक शहरातील, विलेपार्ले उपनगरातील तीन खोल्यांच्या ब्लॉकमध्ये मी झोपलेलो होतो. डोळे चोळीत मी समोर पाहिले. पत्नीने चहा आणला होता. मी चटकन् म्हटले,

" थँक् यू ! "

वर्ग
अनुक्रम
क्रमांक
दि:
१०६४९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५४०१२
क्रमांक २१४ दि: ... प्रवास
नोंद दि. 13|67

REFBK 0017695
REFBK-0017695